सत्यमेव जयते

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी
# २०१५-१६








अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी
# २०१५-१६

अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

# प्रस्तावना

'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' हे प्रकाशन राज्य विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सादर करण्यासाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग दरवर्षी तयार करते. सदर प्रकाशन २०१५-१६ या वर्षासाठी तयार करण्यात आले असून मालिकेतील हा ५५ वा अंक आहे. या प्रकाशनात अर्थव्यवस्थेतील विविध सामाजिक-आर्थिक क्षेत्रांच्या स्थितीबाबतची माहिती व संदर्भासाठी शक्य त्या ठिकाणी निर्देशांक व स्थितीदर्शक कल देण्यात आले आहेत.

२. अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नामुळे या प्रकाशनात समाविष्ट केलेली काही आकडेवारी / अंदाज अस्थायी स्वरुपातील आहेत.

३. केंद्र व राज्य शासनाचे संबंधित विभाग व उपक्रम यांनी उपयुक्त माहिती या संचालनालयास वेळेत उपलब्ध करून दिल्यामुळे हे प्रकाशन तयार करणे शक्य झाले, त्याबद्दल हे संचालनालय त्यांचे आभारी आहे.

अ.दी. देव
संचालक,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
महाराष्ट्र शासन

मुंबई

दिनांक : १७ मार्च, २०१६

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१५-१६

## अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **राज्याचा संक्षिप्त आढावा** | १ |
| अ. | **दृष्टीक्षेपात महाराष्ट्र** | ३ |
| ब. | **महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती** | ६ |
| १. | **राज्य अर्थव्यवस्था** | ९ |
| २. | **लोकसंख्या** | १३ |
| ३. | **राज्य उत्पन्न** | २१ |
| ४. | **किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था**<br>किंमती<br>सार्वजनिक वितरण व्यवस्था | ३३ |
| ५. | **लोकवित्त** | ५५ |
| ६. | **संस्थांद्वारे वित्त पुरवठा व भांडवली बाजार** | ६७ |
| ७. | **कृषि व संलग्न कार्ये**<br>कृषि<br>सिंचन<br>फलोत्पादन<br>पशुसंवर्धन<br>दुग्ध विकास<br>मत्स्यव्यवसाय<br>वने व सामाजिक वनीकरण | ७७ |
| ८. | **उद्योग आणि सहकार**<br>उद्योग<br>सहकार | १०३ |
| ९. | **पायाभूत सुविधा**<br>ऊर्जा<br>वाहतूक व दळणवळण | १२५ |
| १०. | **सामाजिक क्षेत्र**<br>शिक्षण<br>सार्वजनिक आरोग्य<br>महिला व बाल कल्याण<br>रोजगार व दारिद्र्य<br>गृहनिर्माण<br>पाणी पुरवठा आणि स्वच्छता<br>पर्यावरण संवर्धन<br>सामाजिक न्याय<br>मानव विकास | १४९ |
| ११. | **विशेष अभ्यास** | २०३ |
| | **व्याख्या सूची** | २०९ |
| क. | **भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक** | २१४ |

## परिशिष्टे


| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. २.१** | महाराष्ट्राची व भारताची जनगणनांवर आधारित लोकसंख्या | १५ |
| **परि. २.२** | महाराष्ट्राची जनगणनांवर आधारित राज्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या | १५ |
| **परि. २.३** | जिल्हानिहाय लोकसंख्याविषयक निर्देशक - जनगणना, २०११ | १६ |
| **परि. २.४** | धर्मनिहाय लोकसंख्या - जनगणना, २०११ | १७ |
| **परि. २.५** | धर्मनिहाय साक्षरतेचे प्रमाण - जनगणना, २०११ | १८ |
| **परि. २.६** | महिला साक्षरता दराच्या वर्गीकरणानुसार जिल्हानिहाय गावांची संख्या - जनगणना, २००१ व २०११ | १९ |
| **परि. ३.१** | मूळ किंमतींनुसार स्थूल मूल्यवृध्दी व बाजार किंमतींनुसार स्थूल राज्य उत्पन्न - चालू किंमतींनुसार | २५ |
| **परि. ३.२** | मूळ किंमतींनुसार स्थूल मूल्यवृध्दी व बाजार किंमतींनुसार स्थूल राज्य उत्पन्न - स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार | २६ |
| **परि. ३.३** | मूळ किंमतींनुसार निव्वळ मूल्यवृध्दी व बाजार किंमतींनुसार निव्वळ राज्य उत्पन्न - चालू किंमतींनुसार | २७ |
| **परि. ३.४** | मूळ किंमतींनुसार निव्वळ मूल्यवृध्दी व बाजार किंमतींनुसार निव्वळ राज्य उत्पन्न - स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार | २८ |
| **परि. ३.५** | मूळ किंमतीनुसार देशांतर्गत स्थूल मूल्यवृध्दी व बाजार किंमतीनुसार देशांतर्गत स्थूल उत्पन्न चालू किंमतींनुसार | २९ |
| **परि. ३.६** | मूळ किंमतीनुसार देशांतर्गत स्थूल मूल्यवृध्दी व बाजार किंमतीनुसार देशांतर्गत स्थूल उत्पन्न स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार | ३० |
| **परि. ३.७** | मूळ किंमतीनुसार देशांतर्गत निव्वळ मूल्यवृध्दी व बाजार किंमतीनुसार देशांतर्गत निव्वळ उत्पन्न चालू किंमतींनुसार | ३१ |
| **परि. ३.८** | मूळ किंमतीनुसार देशांतर्गत निव्वळ मूल्यवृध्दी व बाजार किंमतीनुसार देशांतर्गत निव्वळ उत्पन्न स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार | ३२ |
| **परि. ४.१** | महाराष्ट्रातील ग्रामीण भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक | ३९ |
| **परि. ४.२** | महाराष्ट्रातील नागरी भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक | ४० |
| **परि. ४.३** | महत्त्वाच्या राज्यांसाठी ग्राहक किंमती निर्देशांक (केंद्रिय) | ४१ |
| **परि. ४.४** | महाराष्ट्र व अखिल भारतातील शेतमजुरांकरिता व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ४२ |
| **परि. ४.५** | औद्योगिक कामगारांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ४३ |
| **परि. ४.६** | महाराष्ट्रातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ४४ |
| **परि. ४.७** | महाराष्ट्रातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ४५ |
| **परि. ४.८** | अखिल भारतीय घाऊक किंमतींचे निर्देशांक | ४६ |
| **परि. ४.९** | महत्त्वाच्या किंमती निर्देशांकावर आधारित चलनवाढीचे दर | ४७ |
| **परि. ४.१०** | जिल्हावार शिधापत्रिकांची संख्या (३१ डिसेंबर,२०१५ रोजी) | ४८ |
| **परि. ४.११** | अधिकृत शिधावाटप / रास्त भाव दुकानांना देण्यात आलेला तांदूळ व गहू | ४९ |
| **परि. ४.१२** | भारत सरकारकडून राज्याला मिळालेले नियतन | ४९ |
| **परि. ४.१३** | जिल्हावार उपलब्ध गोदामांची संख्या, क्षमता, रास्त भाव दुकानांची संख्या | ५० |
| **परि. ४.१४** | अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत सन २०१४-१५ करीता नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना अन्नधान्याचे वाटप | ५१ |
| **परि. ४.१५** | अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत सन २०१५-१६ करीता डिसेंबर पर्यंत नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना अन्नधान्याचे वाटप | ५३ |

| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. ५.१** | दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प | ६२ |
| **परि. ५.२** | अर्थसंकल्प : महसुली व भांडवली लेख्यांवरील जमेतील कल | ६३ |
| **परि. ५.३** | अर्थसंकल्प : महसुली व भांडवली लेख्यांवरील खर्चाचे कल | ६४ |
| **परि. ५.४** | वर्षभरातील कर्जे व इतर दायित्वे | ६५ |
| **परि. ५.५** | शासनाच्या उपभोग्य बाबींवरील अंतिम खर्च व भांडवल निर्मितीवरील खर्च | ६६ |
| **परि. ६.१** | सर्व अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्ज | ७४ |
| **परि. ६.२** | जिल्हानिहाय वार्षिक कर्ज योजना (२०१५-१६) | ७५ |
| **परि. ७.१** | राज्यातील मुख्य पिकांखालील क्षेत्र, उत्पादन आणि प्रति हेक्टर उत्पादकता | ९४ |
| **परि. ७.२** | राज्यातील कृषि उत्पादनाचे पीकनिहाय निर्देशांक | ९७ |
| **परि. ७.३** | कृषि गणनांनुसार राज्यातील एकूण वहिती खातेदार, वहितीचे एकूण क्षेत्र व सरासरी क्षेत्र | ९८ |
| **परि. ७.४** | राज्यातील जमिनीच्या वापराची आकडेवारी | ९९ |
| **परि. ७.५** | राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र | १०० |
| **परि. ७.६** | सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी आकारणी, वसुली व थकबाकी | १०१ |
| **परि. ७.७** | महाराष्ट्र राज्यातील पशुधन आणि कोंबड्या व बदके | १०२ |
| **परि. ८.१** | महाराष्ट्रातील उद्योगांच्या महत्त्वाच्या बाबी | ११७ |
| **परि. ८.२** | भारतातील औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक | ११९ |
| **परि. ८.३** | महाराष्ट्रातील उद्योगांना वित्तीय संस्थांनी मंजूर केलेले व वितरित केलेले अर्थसहाय्य | १२० |
| **परि. ८.४** | महाराष्ट्रातील खनिजांचे उत्पादन | १२१ |
| **परि. ८.५** | महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचा तपशील | १२२ |
| **परि. ९.१** | राज्यातील विजेचा पुरवठा व वापर | १४४ |
| **परि. ९.२** | महाराष्ट्र राज्यातील रस्त्यांची प्रकारांनुसार लांबी (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदा यांच्या देखभालीखालील) | १४५ |
| **परि. ९.३** | जिल्हानिहाय रस्त्यांच्या लांबीचे रुंदीनुसार वर्गीकरण (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील) | १४६ |
| **परि. ९.४** | महाराष्ट्र राज्यातील वापरात असलेली मोटार वाहने | १४७ |
| **परि. १०.१** | राज्यनिहाय संयुक्त शिक्षण विकास निर्देशांक सर्व शाळा : सर्व व्यवस्थापन | १८७ |
| **परि. १०.२** | सन २०१५-१६ मधील आरोग्य विज्ञान संस्थांची संख्या, प्रवेश क्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | १८८ |
| **परि. १०.३** | सन २०१५-१६ मधील तंत्रशिक्षण संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | १८९ |
| **परि. १०.४** | सन २०१५-१६ मधील कला, विज्ञान, वाणिज्य, इतर बिगर- कृषि अभ्यासक्रम, विधी, शिक्षणशास्त्र व ललित कला अभ्यासक्रमांकरीता एकूण संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | १९० |
| **परि. १०.५** | सन २०१५-१६ मध्ये कृषि, पशु व मत्स्य विज्ञान अभ्यासक्रमांकरीता संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | १९१ |
| **परि. १०.६** | महाराष्ट्र राज्यातील उपलब्ध वैद्यकीय सुविधा(सार्वजनिक आणि शासन सहाय्यित) | १९२ |
| **परि. १०.७** | महाराष्ट्र राज्याचे नमुना नोंदणी पाहणीवर आधारित जन्मदर, मृत्युदर, अर्भकमृत्युदर व एकूण जननदर | १९३ |
| **परि. १०.८** | काम करणाऱ्या लोकांची जनगणना २०११ नुसार आर्थिक वर्गवारी | १९४ |

| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. १०.९** | महाराष्ट्रातील विविध उद्योगांतील सरासरी दैनिक रोजगार | १९५ |
| **परि. १०.१०** | महाराष्ट्रातील कार्यरत कारखाने व त्यातील रोजगार | १९६ |
| **परि. १०.११** | राज्यातील रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांमध्ये नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या, अधिसूचित केलेली रिक्त पदे व भरलेली पदे | १९७ |
| **परि. १०.१२** | रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांच्या चालू नोंदवहीत ३१ डिसेंबर, २०१४ अखेर असलेल्या व्यक्तींची संख्या | १९८ |
| **परि. १०.१३** | महाराष्ट्रातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली घेण्यात आलेल्या विविध कामांच्या प्रकारानुसार संख्या व त्यावरील खर्च | १९९ |
| **परि. १०.१४** | महाराष्ट्रातील औद्योगिक विवाद ** | २०० |
| **परि. १०.१५** | जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांक २०११ | २०१ |
| **परि. ११.१** | दृष्टिक्षेपात पाचवी व सहावी आर्थिक गणना | २०६ |
| **परि. ११.२** | ढोबळ आर्थिक कार्यांनुसार आस्थापनांची आणि कार्यरत व्यक्तींची संख्या (सहावी आर्थिक गणना) | २०७ |

# राज्याचा संक्षिप्त आढावा

देशाचा पश्चिम व मध्य भाग व्यापलेल्या महाराष्ट्र राज्यास अरबी समुद्राचा ७२० किमी लांबीचा विस्तीर्ण सागरी किनारा लाभला आहे. पश्चिमेकडील सह्याद्री पर्वताच्या रांगा राज्याचा प्राकृतिक कणा असून उत्तरेस असलेल्या सातपुडा पर्वताच्या रांगा व पूर्वेस असलेल्या भामरागड - चिरोली - गायखुरी या डोंगररांगा राज्याच्या नैसर्गिक सीमा आहेत. राज्याच्या वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्य प्रदेश, पूर्वेस छत्तीसगढ, आग्नेयेस आंध्रप्रदेश, दक्षिणेस कर्नाटक व नैऋत्येस गोवा ही राज्ये आहेत.

राज्यात उष्ण कटिबंधीय मोसमी हवामान आहे. मार्चपासून सुरु होणारा, अंगाची लाहीलाही करणारा उन्हाळा जूनच्या सुरुवातीला पाऊस घेऊन येतो. पावसाळ्यातील हिरवळीत लपेटलेले आल्हाददायी वातावरण, ऑक्टोबरच्या त्रासदायक वातावरणानंतर येणाऱ्या हिवाळ्यात टिकून राहते. पश्चिम समुद्र तटावरुन येणाऱ्या पावसाळी ढगांमुळे सह्याद्रीच्या डोंगर रांगांवर ४०० सेंमी पेक्षा जास्त पाऊस पडतो. समुद्र किनारपट्टीवरील कोकणात मुसळधार पाऊस पडतो व तो उत्तरेकडे सरकताना कमी होत जातो. सह्याद्रीच्या पूर्वेला पश्चिम पठारावरील जिल्ह्यात ७० सेंमी एवढा अत्यल्प पाऊस पडत असून सोलापूर व अहमदनगर हे सर्वाधिक कोरडे जिल्हे आहेत. पूर्वेस विदर्भ व मराठवाड्याकडे सरकताना पावसाचे प्रमाण काहीसे वाढते.

लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र हे देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून राज्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३.०८ लक्ष चौ.किमी आहे. जनगणना, २०११ नुसार राज्याची लोकसंख्या सुमारे ११.२४ कोटी असून ती देशातील एकूण लोकसंख्येच्या ९.३ टक्के आहे. राज्याचे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असून ४५.२ टक्के लोकसंख्या नागरी भागात राहते.

राज्यात ३६ जिल्हे असून प्रशासकीय सुविधेसाठी ते कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या सहा महसुली विभागात विभागले आहेत. जिल्हा स्तरावरील नियोजनासाठी प्रभावी यंत्रणा कार्यरत आहेत. स्थानिक प्रशासनासाठी राज्याच्या ग्रामीण भागात ३४ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या व २७,९२० ग्रामपंचायती आहेत, तर नागरी भागात २६ महानगरपालिका, २३० नगरपरिषदा, ११० नगरपंचायती व सात कटक मंडळे आहेत.

मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी तसेच देशाची आर्थिक राजधानी असून बहुतांशी प्रमुख खाजगी कंपन्या व वित्तीय संस्थांची मुख्यालये या शहरात आहेत. देशातील प्रमुख वायदे व भांडवली बाजार आणि विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्रे मुंबईत आहेत.

राज्यातील २३४ लाख हेक्टर जमीन लागवडीखाली तर ५२.१ लाख हेक्टर वनांखाली आहे. सिंचनात वाढ व्हावी यासाठी अनेक सिंचन प्रकल्प राबविण्यात येत आहेत. बिगर सिंचन क्षेत्रात मृद व जलसंधारणाची कामे गतीने होण्यासाठी पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्राला '२०१९ पर्यंत पाणी टंचाई मुक्त राज्य' करण्याकरिता जलयुक्त शिवार अभियान सुरु करण्यात आले असून याद्वारे दरवर्षी ५,००० गावे पाणी टंचाई मुक्त करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे.

पशुसंवर्धन हे कृषि क्षेत्राशी संबंधीत महत्वाचे क्षेत्र आहे. देशातील पशुधन व कुक्कुट पक्ष्यांच्या संख्येमध्ये राज्याचा हिस्सा अनुक्रमे ६.३ टक्के व १०.७ टक्के आहे.

महाराष्ट्र हे मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण झालेल्या राज्यांपैकी एक राज्य आहे. लघु उद्योगात हे अग्रेसर असून देशांतर्गत तसेच विदेशी संस्थांकडून औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्यात राज्याने सातत्य राखले आहे. माहिती तंत्रज्ञानाचे हे प्रमुख केंद्र आहे.

राज्याने प्राथमिक शिक्षणास महत्व दिल्यामुळे साक्षरता दरात सातत्याने सुधारणा होत आहे. जनगणना २०११ नुसार अखिल भारतीय स्तरावरील ७३ टक्के साक्षरता दराच्या तुलनेत राज्याचा साक्षरता दर ८२.३ टक्के आहे. बारावीपर्यंत मुलींना मोफत शिक्षण दिले जात असून राज्यात अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि व्यवस्थापन क्षेत्रातील उच्च शिक्षणाच्या उत्कृष्ट संस्था आहेत.

भारताचा मानव विकास अहवाल २०११ नुसार देशाचा मानव विकास निर्देशांक ०.४६७ आहे तर राज्यासाठी तो ०.५७२ आहे.

राज्यात २.९९ लाख किलोमीटर लांबी असलेले (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील) सर्वदूर पसरलेले रस्त्यांचे जाळे आहे. येथील सुमारे ९९ टक्के गावे बारमाही व हंगामी रस्त्यांनी जोडलेली आहेत. भूपृष्ठीय वाहतूक सुविधा तसेच बंदरे व विमानतळांशी असणाऱ्या संपर्क व्यवस्थेमुळे राज्यात वाहतूकीची चांगली सुविधा उपलब्ध झाली आहे.

हे राज्य प्रशासकीय क्षमता आणि नवीन धोरणे अंगिकारण्यासाठी प्रसिद्ध आहे. महिला धोरण राबविणारे तसेच महिलांच्या विकासासाठी 'महिला व बालकल्याण' या स्वतंत्र विभागाची स्थापना करुन अर्थसंकल्पीय तरतूद करणारे हे पहिले राज्य आहे. 'रोजगार हमी योजना' राबविणारे हे आद्यप्रवर्तक राज्य असून केंद्र शासनाने ही योजना अंगिकारली आहे.

महाराष्ट्र हे केवळ भौगोलिक सीमांनी रेखांकित केलेले राज्य नसून येथील जनतेने संघटितरित्या परिश्रमपूर्वक घडविलेले राज्य आहे. या राज्याची वैशिष्ट्यपूर्ण मराठी संस्कृती विकसित होण्यास नैसर्गिक तसेच सांस्कृतिक विविधता सहाय्यभूत झाली आहे. स्वत:ची अध्यात्मिक बैठक असलेले हे राज्य 'संतांची भूमी' म्हणून ओळखले जाते. राज्याने देशाच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रात लक्षणीय भूमिका बजावली आहे.

अजंठा, वेरूळ व घारापुरीची लेणी, गेट वे ऑफ इंडिया आणि वास्तुशास्त्राच्या वैशिष्ट्यपूर्ण वास्तू जसे विहार व चैत्य यामुळे जगभरातील पर्यटक राज्याकडे आकर्षित होतात. मानव विकासास सहाय्यभूत ठरणाऱ्या प्रत्येक क्षेत्रात कार्य करणारी व्यक्तिमत्वे राज्यात उदयास आली आहेत. क्रीडा, कला, साहित्य व सामाजिक सेवा यामध्ये राज्याचे भरीव योगदान आहे. 'बॉलीवूड' नावाने जगप्रसिध्द असलेला चित्रपट उद्योग राज्यात स्थित आहे.

महाराष्ट्र हे या सर्व वैशिष्ट्यांमुळे सर्वोत्तम राज्य बनले आहे.

* * * * *

# अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| बाब (१) | १९६०-६१ (२) | १९७०-७१ (३) | १९८०-८१ (४) | १९९०-९१ (५) | २०००-०१ (६) | २०१०-११ (७) | २०१४-१५ (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१. भौगोलिक क्षेत्र** - (हजार चौ.कि.मी.) | ३०६ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ |
| **२. प्रशासकीय रचना -** | | | | | | | |
| महसूली विभाग | ४ | ४ | ६ | ६ | ६ | ६ | ६ |
| जिल्हे | २६ | २६ | २८ | ३१ | ३५ | ३५ | ३६ |
| तालुके | २२९ | २३५ | ३०१ | ३०३ | ३५३ | ३५५[@@] | ३५५[@@] |
| वस्ती असलेली गावे | ३५,८५१ | ३५,७७८ | ३९,३५४ | ४०,४१२ | ४१,०९५ | ४०,९५९ | ४०,९५९ |
| वस्ती नसलेली गावे | ३,०१६ | २,८८३ | २,४७९ | २,६१३ | २,६१६ | २,७०६ | २,७०६ |
| शहरे[#] | २६६ | २८९ | ३०७ | ३३६ | ३७८ | ५३४ | ५३४ |
| **३. जनगणनेनुसार लोकसंख्या** - (हजारात) | (१९६१) | (१९७१) | (१९८१) | (१९९१) | (२००१) | (२०११) | (२०११) |
| एकूण | ३९,५५४ | ५०,४१२ | ६२,७८४ | ७८,९३७ | ९६,८७९ | १,१२,३७४ | १,१२,३७४ |
| पुरुष | २०,४२९ | २६,११६ | ३२,४१५ | ४०,८२६ | ५०,४०१ | ५८,२४३ | ५८,२४३ |
| स्त्रिया | १९,१२५ | २४,२९६ | ३०,३६९ | ३८,१११ | ४६,४७८ | ५४,१३१ | ५४,१३१ |
| ग्रामीण | २८,३९१ | ३४,७०१ | ४०,७९१ | ४८,३९५ | ५५,७७८ | ६१,५५६ | ६१,५५६ |
| नागरी | ११,१६३ | १५,७११ | २१,९९३ | ३०,५४२ | ४१,१०१ | ५०,८१८ | ५०,८१८ |
| अनुसूचित जाती | २,२२७ | ३,१७७ | ४,४८० | ८,७५८ | ९,८८२ | १३,२७६ | १३,२७६ |
| अनुसूचित जमाती | २,३९७ | ३,८४१ | ५,७७२ | ७,३१८ | ८,५७७ | १०,५१० | १०,५१० |
| लोकसंख्येची घनता (प्रती चौ.कि.मी.) | १२९ | १६४ | २०४ | २५७ | ३१५ | ३६५ | ३६५ |
| साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | ३५.१ | ४५.८ | ५७.१ | ६४.९ | ७६.९ | ८२.३ | ८२.३ |
| स्त्री-पुरुष प्रमाण (स्त्रिया प्रति हजार पुरुष) | ९३६ | ९३० | ९३७ | ९३४ | ९२२ | ९२९ | ९२९ |
| नागरी लोकसंख्येचे प्रमाण (टक्के) | २८.२२ | ३१.१७ | ३५.०३ | ३८.६९ | ४२.४३ | ४५.२ | ४५.२ |
| **४. राज्य उत्पन्न** - (चालू किंमतीनुसार) | | | | | | | |
| राज्य उत्पन्न (₹ कोटी) | २,२४९ | ५,७८० | १९,३७७ | ६८,८६१ | २,४३,५८४ | ९,५०,७७१ | १५,७२,०३७[††] |
| कृषि व संलग्न कार्ये क्षेत्र (₹ कोटी) | ५८५ | १,०७८ | ३,७५६ | १२,३२६ | ३२,७११ | १,२२,९३२ | १,५७,४७७[†††] |
| उद्योग क्षेत्र (₹ कोटी) | ५५३ | १,७३२ | ६,२२४ | २२,५५४ | ६४,९४२ | २,६३,५१२ | ४,४८,०७७[†††] |
| सेवा क्षेत्र (₹ कोटी) | १,१११ | २,९६९ | ९,३९७ | ३३,९८१ | १,४५,९३१ | ५,६४,३२६ | ७,५२,७०८[†††] |
| दरडोई राज्य उत्पन्न (₹) | ५७६ | १,१६८ | ३,११२ | ८,८११ | २८,५४० | ८४,८५८ | १,३४,०८१[+] |
| **५. कृषि** - (क्षेत्र हजार हेक्टरमध्ये) | | | | | | | |
| निव्वळ पेरणी क्षेत्र | १७,८७८ | १७,६६८ | १८,२९९ | १८,५६५ | १७,८४४ | १७,४०६ | उ. ना. |
| पिकांखालील स्थूल क्षेत्र | १८,८२३ | १८,७३७ | १९,६४२ | २१,८५९ | २१,६१९ | २३,१७५ | उ. ना. |
| स्थूल सिंचित क्षेत्र | १,२२० | १,५७० | २,४१५ | ३,३१९ | ३,८५२ | @ | @ |
| *त्यापैकी* लाभ क्षेत्र[^] | २२६[$] | ४२२ | ७१८ | १,०७६[$$] | १,७६४[##] | २,९५५[##] | ३,१३७[##] |
| स्थूल सिंचित क्षेत्राचे पिकांखालील एकूण स्थूल क्षेत्राशी प्रमाण (टक्के) | ६.५ | ८.४ | १२.३ | १५.२ | १७.८ | उ. ना. | उ. ना. |
| **६. प्रमुख पिकांखालील क्षेत्र -** (हजार हेक्टरमध्ये) | | | | | | | |
| तांदूळ | १,३०० | १,३५२ | १,४५९ | १,५९७ | १,५१२ | १,५१६ | १,५५१ |
| गहू | ९०७ | ८१२ | १,०६३ | ८६७ | ७५४ | १,३०७ | १,०६७ |
| ज्वारी | ६,२८४ | ५,७०३ | ६,४६९ | ६,३०० | ५,०९४ | ४,०६० | ३,२८८ |
| बाजरी | १,६३५ | २,०३९ | १,५३४ | १,९४० | १,८०० | १,०३५ | ८६५ |
| सर्व तृणधान्ये | १०,६०६ | १०,३२० | १०,९७६ | ११,१३६ | ९,८२४ | ८,९८५ | ८,०५९ |
| सर्व कडधान्ये | २,३४९ | २,५६६ | २,७१५ | ३,२५७ | ३,५५७ | ४,०३८ | ३,४१३ |
| सर्व अन्नधान्ये | १२,९५५ | १२,८८६ | १३,६९१ | १४,३९३ | १३,३८२ | १३,०२३ | ११,४७२ |

उ. ना. - उपलब्ध नाही @@ मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यांमधील ३ तालुके वगळून # गणना शहरांसह + पहिले सुधारित अंदाज (पायाभूत वर्ष २०११-१२)
† बाजार किंमतींनुसार अंदाज †† मूळ किंमतींनुसार अंदाज @ विशेष तपासणी पथकाच्या शिफारशींनुसार पुढील कार्यवाही ठरविण्यासाठी विविध समित्या / उपसमित्या गठित करण्यात आल्या आहेत. $ १९६१-६२ $$ १९९१-९२ ## प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील कालव्यावरील, उपसा व धरणातून नदी नाल्यामध्ये सोडलेल्या तसेच लाभक्षेत्रातील विहिरीव्दारे प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र. ^ जलसंपदा विभागाकडून निर्मित लाभक्षेत्र

# अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| बाब (१) | १९६०-६१ (२) | १९७०-७१ (३) | १९८०-८१ (४) | १९९०-९१ (५) | २०००-०१ (६) | २०१०-११ (७) | २०१४-१५ (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ऊस क्षेत्र | १५५ | २०४ | ३१९ | ५३६ | ६८७ | १,०४१ | ९८७ |
| ऊस तोडणी क्षेत्र | १५५ | १६७ | २५८ | ४४२ | ५९५ | ९६५ | १,०३० |
| कापूस | २,५०० | २,७५० | २,५५० | २,७२१ | ३,०७७ | ३,९४२ | ४,१९० |
| भूईमूग | १,०८३ | ९०४ | ६९५ | ८६४ | ४९० | ३९५ | ३२७ |
| ७. **प्रमुख पिकांचे उत्पादन** - | | | | | | | |
| (हजार टनात) | | | | | | | |
| तांदूळ | १,३६९ | १,६६२ | २,३१५ | २,३४४ | १,९३० | २,६९१ | २,९४६ |
| गहू | ४०१ | ४४० | ८८६ | ९०९ | ९४८ | २,३०१ | १,३०८ |
| ज्वारी | ४,२२४ | १,५५७ | ४,४०९ | ५,९२९ | ३,९८८ | ३,४५२ | २,१०९ |
| बाजरी | ४८९ | ८२४ | ६९७ | १,११५ | १,०८७ | १,१२३ | ५३८ |
| सर्व तृणधान्ये | ६,७५५ | ४,७३७ | ८,६४७ | १०,७४० | ८,४९७ | १२,३१७ | ९,२६७ |
| सर्व कडधान्ये | ९८९ | ६७७ | ८२५ | १,४४१ | १,६३७ | ३,०९६ | १,६८१ |
| सर्व अन्नधान्ये | ७,७४४ | ५,४१४ | ९,४७२ | १२,१८१ | १०,१३४ | १५,४१३ | १०,९४८ |
| ऊस | १०,४०४ | १४,४३३ | २३,७०६ | ३८,१५४ | ४९,५६९ | ८५,६९१ | ९१,५३८ |
| कापूस (रुई)# | १,६७३ | ४८४ | १,२२४ | १,८७५ | १,८०३ | ७,४७३ | ३,५७७ |
| भुईमूग | ८०० | ५८६ | ४५१ | ९७९ | ४७० | ४७० | ३७९ |
| ८. **कृषि उत्पादनाचा निर्देशांक**@ - | -- | -- | -- | १३६.५ | १२७.४ | २२३.८ | १७५.७ |
| ९. **कृषि गणना** - | | (१९७०-७१) | (१९८०-८१) | (१९९०-९१) | (२०००-०१) | (२००५-०६) | (२०१०-११) |
| वहिती खातेदारांची संख्या (हजारात) | -- | ४,९५१ | ६,८६३ | ९,४७० | १२,१३८ | १३,७१६ | १३,६९८ |
| वहिती क्षेत्र (हजार हेक्टर्समध्ये) | -- | २१,१७९ | २१,३६२ | २०,९२५ | २०,१०३ | २०,००५ | १९,७६७ |
| वहितीचे सरासरी क्षेत्र (हेक्टर) | -- | ४.२८ | ३.११ | २.२१ | १.६६ | १.४६ | १.४४ |
| १०. **पशुधन गणना** - | (१९६१) | (१९६६) | (१९७८) | (१९८७) | (१९९७) | (२००७) | (२०१२) |
| एकूण पशुधन (हजारात) | २६,०४८ | २५,४४९ | २९,६४२ | ३४,२५५ | ३९,६३८ | ३५,९५४ | ३२,४८९ |
| एकूण कोंबड्या-बदके (हजारात) | १०,५७८ | ९,९०२ | १८,७५१ | २४,८३० | ३५,३९२ | ६४,८०० | ७७,७९५ |
| | | | | | | (२००३) | (२००३) |
| ट्रॅक्टर | १,४२७ | ३,२७४ | १२,९१७ | ३४,५२९ | ७९,८९३ | १,०५,६११ | १,०५,६११ |
| ११. **वन क्षेत्र** (चौ.कि.मी.) | ६३,५४४ | ६२,३११ | ६४,२२२ | ६३,७९८ | ६१,९३५ | ६१,९३९ | ६१,५७३* |
| १२. **औद्योगिक गुंतवणूक**$ - | | | | | | (२०१४-१५) | (२०१५-१६) |
| मंजूर प्रकल्प (संख्या) | -- | -- | -- | -- | -- | १८,७०९ | १९,०५३ |
| प्रस्तावित गुंतवणूक (₹ कोटी) | -- | -- | -- | -- | -- | १०,६३,३४२ | १०,९७,३३७ |
| १३. **वीज** - (दशलक्ष कि.वॅ.तास) | | | | | | | |
| एकूण निर्मिती | ३,२६८ | ७,९२५ | १७,८६४ | ३६,४३० | ६१,२०९ | ८३,०१७ | १,०३,७७९ |
| एकूण वापर | २,७२० | ७,६५० | १४,०३४ | २९,९७१ | ४७,२८९ | ८७,३९६ | १,१२,८५५ |
| औद्योगिक वापर | १,८५३ | ५,३१२ | ८,१३० | १४,७०६ | १८,३६३ | ३४,४१६ | ४१,५२२ |
| कृषि वापर | १५ | ३५६ | १,७२३ | ६,६०४ | ९,९४० | १६,२५७ | २६,४०७ |
| घरगुती वापर | २६० | ७३२ | १,७७९ | ५,०६५ | ११,१७२ | १९,५४७ | २५,४२८ |

* अस्थायी # कापसाचे उत्पादन १७० किलोची एक गासडी याप्रमाणे हजार गासड्यांमध्ये

@ पाया - त्रैवार्षिक सरासरी १९७९-८२ = १०० $ ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर

# अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| बाब | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१४-१५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **१४. बँका - (अनुसूचित वाणिज्यिक)** | | (जून,१९७१) | (जून, १९८१) | (जून, १९९१) | (जून, २००१) | (जून, २०१०) | (जून, २०१४) |
| बँक कार्यालये | उ.ना. | १,४७१ | ३,६२७ | ५,५९१ | ६,२९४ | ८,०३७ | १०,७६०* |
| | | | | (मार्च, १९९१) | (मार्च, २००१) | | |
| ग्रामीण लोकसंख्येसाठी बँक कार्यालये | उ.ना. | ४५० | १,३५५ | २,७४९ | २,२९४ | २,१७० | २,९१४* |
| **१५. शिक्षण+ -** | | | | | | | |
| प्राथमिक शाळा | ३४,५९४ | ४४,५३५ | ५१,०४५ | ५७,७४४ | ६५,९६० | ७५,६९५ | १,०४,५५१ |
| विद्यार्थी (हजारात) | ४,१७८ | ६,५३९ | ८,३९२ | १०,४२४ | ११,८५७ | १०,६२६ | १६,१७२ |
| माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकसह) | २,४६८ | ५,३१३ | ६,११९ | १०,५१९ | १५,३८९ | २१,३५७ | २४,४९७ |
| विद्यार्थी (हजारात) | ८५८ | १,९८५ | ३,३०९ | ६,२६० | ९,२६७ | १०,७११ | ६,१८१ |
| **१६. आरोग्य -** | | (१९७१) | (१९८१) | (१९९१) | (२००१) | (२०११) | (२०१४) |
| रुग्णालये | उ.ना. | २९९ | ५३० | ७६८ | १,१०२ | १,३६८ | १,४०२ |
| दवाखाने | उ.ना. | १,३७२ | १,७७६ | १,८९६ | १,५४४ | ३,०१२ | ३,०८७ |
| दर लाख लोकसंख्येमागे खाटा | उ.ना. | ८८ | ११४ | १४४ | १०६ | १०३ | १०८ |
| | | | | | | | (२०१३) |
| जन्मदर@ | ३४.७ | ३२.२ | २८.५ | २६.२ | २०.७ | १६.७ | १६.५ |
| मृत्युदर@ | १३.८ | १२.३ | ९.६ | ८.२ | ७.५ | ६.३ | ६.२ |
| अर्भक मृत्युदर@ | ८६ | १०५ | ७९ | ६० | ४५ | २५ | २४ |
| **१७. वाहतूक -** | | | | | | | |
| रेल्वे मार्गाची लांबी (किलोमीटर) | ५,०५६ | ५,२२६ | ५,२३३ | ५,४३४ | ५,४५९ | ५,९८४ | ६,१०३ |
| एकूण रस्त्यांची लांबी (किलोमीटर)† | ३९,२४१ | ६५,३६४ | १,४१,१३१ | १,७२,९६५ | २,१६,९६८ | २,४१,७१२ | २,९९,३६८ |
| *त्यापैकी* पृष्ठांकित | २४,८५२ | ३५,८५३ | ६६,६१६ | १,३२,०४८ | १,७८,९९९ | २,२१,१८२ | २,४५,२१४ |
| मोटार वाहने (हजारात) | १०० | ३१२ | ८०५ | २,६४१ | ६,६०७ | १६,९९० | २५,०६० |
| **१८. सहकार -** | | | | | | | |
| प्राथमिक कृषि पतसंस्था | २१,४०० | २०,४२० | १८,५७७ | १९,५६५ | २०,५५१ | २१,४५१ | २१,०६४* |
| सभासद (लाखात) | २२ | ३८ | ५४ | ७९ | १०१ | १५० | १४४* |
| सहकारी संस्थांची एकूण संख्या | ३१,५६५ | ४२,५९७ | ६०,७४७ | १,०४,६२० | १,५८,०१६ | २,२४,३०६ | २,२५,७२१* |
| एकूण सभासद (लाखात) | ४२ | ८६ | १४८ | २६९ | ४३० | ५३० | ५३९* |
| सहकारी संस्थांचे एकूण खेळते भांडवल (₹ कोटी) | २९१ | १,४८९ | ५,२१० | २४,२८४ | १,३४,४४० | २,४८,४३४ | ३,३८,०७४* |
| **१९. स्थानिक स्वराज्य संस्था -** | | | | | | | (२०१५-१६)$ |
| जिल्हा परिषदा | २५ | २५ | २५ | २९ | ३३ | ३३ | ३४ |
| ग्रामपंचायती | २१,६३६ | २२,३०० | २४,२८१ | २५,८२७ | २७,७३५ | २७,९१३ | २७,९२० |
| पंचायत समित्या | २९५ | २९६ | २९६ | २९८ | ३२१ | ३५१ | ३५१ |
| नगर परिषदा | २१९ | २२१ | २२० | २२८ | २२८ | २२२ | २३० |
| महानगरपालिका | ३ | ४ | ५ | ११ | १५ | २३ | २६ |
| नगर पंचायत | -- | -- | -- | -- | ३ | ४ | १११ |
| कटक मंडळे | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ |

* अस्थायी @ नमुना नोंदणी पाहणी उ. ना. उपलब्ध नाही

† सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्ते $ राज्य निवडणूक आयोगाच्या अहवालानुसार (दि.२५.२.२०१६ रोजीची)

\+ वर्ष २०११-१२ पासून सदर माहितीचा आधार बदलला असल्यामुळे सदर माहिती प्राथमिक शाळा (१ ते ८) व माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकसह) (९ ते १२) या स्वरुपात प्राप्त झाली असून पूर्वीची माहिती प्राथमिक शाळा (१ ते ७) व माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकसह) (८ ते १२) या स्वरुपात आहे. तसेच सदर माहितीचा आधार (२०१४-१५) यु-डीआयएसई आहे.

## ब. महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती

| बाब | परिमाण | महाराष्ट्र | भारत | भारताशी तुलना (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| **१. लोकसंख्या (२०११)** | | | | |
| १.१ एकूण लोकसंख्या | हजारात | १,१२,३७४ | १२,१०,८५५ | ९.३ |
| (अ) पुरुष | -”- | ५८,२४३ | ६,२३,२७० | ९.३ |
| (ब) स्त्रिया | -”- | ५४,१३१ | ५,८७,५८५ | ९.२ |
| १.२ (अ) ग्रामीण लोकसंख्या | हजारात | ६१,५५६ | ८,३३,७४९ | ७.४ |
| (ब) ग्रामीण लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी प्रमाण | टक्के | ५४.८ | ६८.९ | -- |
| १.३ (अ) नागरी लोकसंख्या | हजारात | ५०,८१८ | ३,७७,१०६ | १३.५ |
| (ब) नागरी लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी प्रमाण | टक्के | ४५.२ | ३१.१ | -- |
| १.४ स्त्री-पुरुष प्रमाण | दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या | ९२९ | ९४३ | -- |
| १.५ लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धीदर (२००१-२०११) | टक्के | १६.० | १७.७ | -- |
| १.६ साक्षरतेचे प्रमाण | -”- | ८२.३ | ७३.० | -- |
| १.७ अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील लोकसंख्या | हजारात | २३,७८६ | ३,०५,९२४ | ७.८ |
| १.८ एकूण काम करणारे | -”- | ४९,४२८ | ४,८१,८८९ | १०.३ |
| १.९ भौगोलिक क्षेत्र | लाख चौ.कि.मी. | ३.०८ | ३२.९ | ९.४ |
| **२. कृषि (२०१२-१३)** | | | | |
| २.१ निव्वळ पेरणी क्षेत्र | हजार हेक्टर | १७,३४३ | १,३९,९३२ | १२.४ |
| २.२ पिकांखालील स्थूल क्षेत्र | -”- | २३,११५ | १,९४,३९९ | ११.९ |
| २.३ स्थूल सिंचित क्षेत्र | -”- | उ.ना. | ९२,५७५ | -- |
| २.४ स्थूल सिंचित क्षेत्राची एकूण पिकांखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी | टक्के | उ.ना. | ४७.६ | -- |
| २.५ प्रमुख पिकांखालील क्षेत्र (२०१०-११ ते २०१२-१३ या वर्षांची सरासरी) | | | | |
| (१) तांदूळ | हजार हेक्टर | १,५४० | ४३,२०८ | ३.६ |
| (२) गहू | -”- | ९९० | २९,६४६ | ३.३ |
| (३) ज्वारी | -”- | ३,५२६ | ६,६१४ | ५३.३ |
| (४) बाजरी | -”- | ८८७ | ८,५६२ | १०.४ |
| (५) एकूण तृणधान्ये | -”- | ७,९९७ | ९९,३६१ | ८.० |
| (६) एकूण अन्नधान्ये (तृणधान्ये व कडधान्ये) | -”- | ११,५५० | १,२४,०६८ | ९.३ |
| (७) ऊस क्षेत्र | -”- | १,०९३ | ४,९७४ | २२.० |
| तोडणी क्षेत्र | -”- | ९७५ | उ.ना. | -- |
| (८) कापूस | -”- | ४,०९९ | ११,७९७ | ३४.७ |
| (९) भूईमूग | -”- | ३४२ | ५,२८० | ६.५ |

उ.ना. उपलब्ध नाही

# महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती

| बाब<br>(१) | परिमाण<br>(२) | महाराष्ट्र<br>(३) | भारत<br>(४) | भारताशी तुलना (टक्केवारी)<br>(५) |
|---|---|---|---|---|
| **३. पशुधन गणना** | | | | |
| ३.१ एकूण पशुधन (२०१२) | हजारात | ३२,४८९ | ५,१२,०५७ | ६.३ |
| ३.२ व्हील ट्रॅक्टर्स (२००३) | -”- | १०६ | २,३६१ | ४.५ |
| ३.३ सिंचनाकरिता वापरलेली डिझेल इंजिने व इलेक्ट्रीक पंप (२००३) | -”- | १,१७४ | १५,६८४ | ७.५ |
| **४. वने** | | | | |
| ४.१ एकूण वन क्षेत्र (२०१५) | चौ.कि.मी. | ६१,५७३ | ७,६४,५६६ | ८.१ |
| **५. उद्योग** | | | | |
| ५.१ औद्योगिक गुंतवणूक $ | | | | |
| (अ) मंजूर प्रकल्प | संख्या | १९,०५३ | १,०५,९०० | १८.० |
| (ब) प्रस्तावित गुंतवणूक | ₹ कोटी | १०,९७,३३७ | १,०९,७३,७९४ | १०.० |
| **६. वीज (२०१३-१४)** | | | | |
| ६.१ एकूण निर्मिती | दशलक्ष कि. वॅ. तास | ९१,९८७ | १०,२६,६४९ | ९.० |
| ६.२ एकूण वापर^ | -”- | १,०२,९८९ | ७,६२,०८४ | १३.५ |
| ६.३ (अ) औद्योगिक वापर^ | -”- | ३८,९४९ | २,६५,८७५ | १४.६ |
| (ब) औद्योगिक वापराची एकूण वापराशी टक्केवारी | टक्के | ३७.८ | ३४.९ | -- |
| **७. बँका** (अनुसूचित वाणिज्यिक) (मार्च, २०१५) | | | | |
| ७.१ बँक कार्यालये | संख्या | ११,२८४ | १,२५,८६३ | ९.० |
| ७.२ बँक कार्यालये असलेली शहरे व गावे (मार्च, २०१४) | -”- | २,९६६ | ४२,८६४ | ६.९ |
| **८. राज्य / राष्ट्रीय उत्पन्न (२०१४-१५)** | | | | |
| ८.१ चालू किंमतीनुसार उत्पन्न | ₹ कोटी | १५,७२,०३७+ | १,१०,०७,५९२+ | १४.३ |
| ८.२ चालू किंमतीनुसार दरडोई उत्पन्न | ₹ | १,३४,०८१+ | ८६,८७९+ | -- |
| ८.३ बाजार किंमतींनुसार स्थूल राज्य उत्पन्न / बाजार किंमतींनुसार देशांतर्गत स्थूल उत्पन्न | ₹ कोटी | १७,९२,१२२+ | १,२४,८८,२०५+ | १४.४ |
| ८.४ दरडोई स्थूल राज्य उत्पन्न / देशांतर्गत स्थूल उत्पन्न | ₹ | १,५२,८५३+ | ९८,५६५+ | -- |

$ ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर, २०१५ + पहिले सुधारित अंदाज

^ भारतासाठी एकूण वीज वापर व औद्योगिक वापर केंद्रिय विद्युत प्राधिकरणाकडून उपलब्ध झालेल्या दरडोई विजेच्या अंतिम वापराच्या आकडेवारीला केंद्रिय सांख्यिकी कार्यालयाकडून उपलब्ध झालेल्या calibrated प्रक्षेपित लोकसंख्येने गुणून काढण्यात आला आहे.

# १

# राज्य अर्थव्यवस्था

# १. राज्य अर्थव्यवस्था

## राज्य उत्पन्न

१.१ सलग दोन वर्षे कृषि उत्पादन घटल्याने या क्षेत्रावर प्रामुख्याने अवलंबून असलेल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचा विपरित परिणाम झाला आहे. तथापि, सेवा व उद्योग क्षेत्रांच्या चांगल्या कामगिरीचा राज्य अर्थव्यवस्थेच्या वाढीमध्ये हातभार लागला. या पार्श्वभूमीवर पूर्वानुमानित स्थिर (२०११-१२) किंमतीनुसार स्थूल राज्य उत्पन्नात २०१५-१६ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत आठ टक्क्यांची बऱ्यापैकी चांगली वाढ झाली आहे.

१.२ पूर्वानुमानानुसार मागील वर्षाच्या तुलनेत २०१५-१६ मध्ये स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार स्थूल राज्य उत्पन्न ₹ १६,४७,०४५ कोटी होणे अपेक्षित आहे. कृषि व संलग्न कार्ये क्षेत्रामध्ये २.७ टक्के घट अपेक्षित असून उद्योग व सेवा क्षेत्रांमध्ये अनुक्रमे ५.९ टक्के व १०.८ टक्के वाढ अपेक्षित आहे.

१.३ पहिल्या सुधारित अंदाजानुसार २०१४-१५ च्या स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार स्थूल राज्य उत्पन्नात ५.८ टक्के वाढ होऊन ते ₹ १५,२४,८४६ कोटी झाले जे मागील वर्षी ₹ १४,४१,८४३ कोटी होते. चालू किंमतींनुसार २०१४-१५ चे स्थूल राज्य उत्पन्न ₹ १७,९२,१२२ कोटी आहे.

१.४ पहिल्या सुधारित अंदाजानुसार २०१४-१५ मध्ये निव्वळ राज्य उत्पन्न ₹ १५,७२,०३७ कोटी तर राज्याचे दरडोई उत्पन्न ₹ १,३४,०८१ आहे.

## किंमती

१.५ एप्रिल ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत राज्याच्या ग्रामीण व नागरी भागांचा सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे २५७.२ व २४६.७ होते. गतवर्षीच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत तो अनुक्रमे २.७ टक्के व तीन टक्के वाढला.

१.६ ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित ग्रामीण भागातील वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर एप्रिल, २०१५ मधील ४.८ टक्क्यांवरुन कमी होऊन डिसेंबर, २०१५ मध्ये २.६ टक्क्यांवर आला. तर नागरी भागात तो ४.७ टक्क्यांवरुन ३.५ टक्के झाला आहे. या कालावधीत ग्रामीण भागातील खाद्यपदार्थ गटाचा हा दर ५.७ टक्क्यांवरुन वाढून ५.९ टक्के झाला, तर नागरी भागामध्ये ६.२ टक्क्यांवरुन ७.३ टक्के झाला.

१.७ अखिल भारतीय घाऊक किंमती निर्देशांकावर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर एप्रिल, २०१५ मधील (-)२.४ टक्क्यांवरुन वाढून डिसेंबर, २०१५ मध्ये (-)०.७ टक्के झाला. तो दर सलग १४ महिने ऋण राहिला. 'प्राथमिक वस्तू' गटातील 'खाद्य पदार्थ' उपगटांचा चलनवाढीचा दर तत्सम कालावधीत ५.९ टक्क्यांवरुन ८.२ टक्क्यांपर्यंत वाढला.

## लोकवित्त

१.८ राज्य शासनाची महसुली जमा सन २०१४-१५ (सुअं) मध्ये ₹ १,८०,७९४ कोटी होती, तर सन २०१५-१६(अअं) मध्ये ती ₹ १,९८,२३१ कोटी अपेक्षित आहे. सन २०१५-१६(अअं) मध्ये कर महसूल आणि करेतर महसूल अनुक्रमे ₹ १,५९,६९७ कोटी आणि ₹ ३८,५३४ कोटी अपेक्षित आहे. एप्रिल ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत प्रत्यक्ष महसुली जमा ₹ १,२६,४५७ कोटी (अर्थसंकल्पिय अंदाजाच्या ६३.८ टक्के) असून ती गतवर्षीच्या त्याच कालावधीच्या तुलनेत १०.३ टक्के वाढ दर्शविते.

१.९ राज्य शासनाचा सन २०१५-१६(अअं) मधील महसुली खर्च ₹ २,०१,९८८ कोटी अपेक्षित असून तो २०१४-१५(सुअं) मध्ये ₹ १,९४,६७७ कोटी आहे.

१.१० अर्थसंकल्पिय अंदाजाप्रमाणे सन २०१५-१६ मध्ये महसुली तूट ₹ ३,७५७ कोटी, वित्तीय तूट ₹ ३०,७३३ कोटी आणि ऋणभार ₹ ३,३३,१६० कोटी आहे. सन २०१५-१६(अअं) मध्ये वित्तीय तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण १.५६ टक्के तसेच ऋणभाराचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण १६.९२ टक्के अपेक्षित असून ते चौदाव्या वित्त आयोगाने 'एकत्रित वित्तीय सुधारणेचा मार्गांतर्गत' निश्चित केलेल्या मर्यादेत आहे.

## संस्थांद्वारे वित्तपुरवठा

१.११ अनुसूचित वाणिज्यिक बँकांतील ३१ मार्च, २०१५ रोजी एकूण ठेवी ₹ २१.३४ लाख कोटी व एकूण कर्ज ₹ १९.७६ लाख कोटी होते तर कर्ज-ठेवी प्रमाण ९२.६ टक्के होते.

१.१२ दि. ३१ मार्च, २०१५ रोजी ७.२ लाख स्व-सहाय्यता गटांची एकूण बचत ₹ ९०३.८ कोटी होती. सुमारे दोन लाख स्व-सहाय्यता गटांकडे एकूण ₹ १,५३२.८ कोटी कर्ज थकीत होते.

१.१३ प्रधानमंत्री जन-धन योजना देशातील सर्व कुटुंबांना वित्तीय समावेशात आणणारे राष्ट्रीय अभियान असून ते २८ ऑगस्ट, २०१४ रोजी सुरु करण्यात आले. दि. ३ फेब्रुवारी, २०१६ पर्यंत राज्यात ₹ १,८६३.०६ कोटी ठेवींसह सुमारे १.३५ कोटी बँक खाती उघडण्यात आली असून १.१४ कोटी 'रुपे कार्ड' वितरित करण्यात आले.

## कृषि व संलग्न कार्ये

१.१४ सन २०१५ मध्ये राज्यात अपुरा (सरासरीच्या ५९.४ टक्के) पाऊस पडला. राज्यातील एकूण ३५५ तालुक्यांपैकी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांतील तालुके वगळून) २७८ तालुक्यांत अपुरा, ७५ तालुक्यांत सरासरी एवढा तर दोन तालुक्यांत सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडला.

१.१५ सन २०१५ च्या खरीप हंगामामध्ये १४१.४६ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली व ती मागील वर्षाच्या (१५०.९७ लाख हेक्टर) तुलनेत सहा टक्के कमी झाली आहे. यामुळे तसेच अपुऱ्या पावसामुळे एकूण अन्नधान्यांच्या उत्पादनामध्ये १८ टक्के घट अपेक्षित असून तेल बियांच्या उत्पादनामध्ये किंचीत घट (२ टक्के) अपेक्षित आहे.

१.१६ सन २०१५ च्या खरीप हंगामातील असमाधानकारक पावसामुळे रब्बी हंगामातील पिकांखालील क्षेत्रात मागील वर्षाच्या तुलनेत १६ टक्के घट अपेक्षित असून परिणामी एकूण अन्नधान्य व तेलबियांच्या उत्पादनामध्ये अनुक्रमे २७ टक्के व ५० टक्के घट अपेक्षित आहे.

१.१७ राज्यात २०१४ व २०१५ या सलग दोन वर्षांमध्ये सरासरीच्या अनुक्रमे ७०.२ टक्के व ५९.४ टक्के असा अपूरा पाऊस झाला आहे. राज्यातील उपयुक्त जलसाठ्याचे दि. १५ ऑक्टोबर रोजी संबंधित एकूण जलसाठयाच्या क्षमतेशी प्रमाण २०१४ मध्ये ७२.५ टक्के व २०१५ मध्ये ६१.४ टक्के होते. यामुळे केवळ कृषिसाठीच नव्हे तर पिण्याचे पाणी पुरविण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

१.१८ शासनाने सुरु केलेल्या जलयुक्त शिवार अभियानाचा मुख्य उद्देश महाराष्ट्राला २०१९ पर्यंत 'पाणी टंचाई मुक्त राज्य' करण्याचा आहे. या अभियानामध्ये नद्यांच्या प्रवाहाचे रुंदीकरण व खोलीकरण, सिमेंट व मातीच्या बंधाऱ्यांचे बांधकाम, कालव्यांची कामे व शेततळी खोदण्याची कामे समाविष्ट आहेत. दरवर्षी ५,००० गावे पाणी टंचाईमुक्त करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे.

१.१९ सन २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये ३४ जिल्ह्यांतील एकूण ६,२०५ गावे टंचाईमुक्त करण्यासाठी निवडण्यात आली आहेत. या निवडलेल्या गावांतून ऑक्टोबर, २०१५ अखेर जलसंधारणाची एकूण १,३०,७६१ कामे पूर्ण करण्यात आली आहेत आणि ३४,९८९ कामे प्रगतीपथावर आहेत.

१.२० सन २०१४-१५ मध्ये वाणिज्यिक बँकाकडून ₹ १७,९८६.५६ कोटी, प्रादेशिक ग्रामीण बँकांकडून ₹ १,६९०.५३ कोटी आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व भूविकास बँका यांचेकडून एकत्रित ₹ १४,४२३.३० कोटी रकमेच्या पिक कर्जाचे वाटप करण्यात आले. तसेच या सर्व बँकांनी ₹ २३,१९१.६१ कोटी रकमेच्या कृषि मुदत कर्जाचे वाटप केले . सन २०१४-१५ मध्ये प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांकडून शेतकऱ्यांना ₹ १४,०३० कोटींचे कर्जवाटप करण्यात आले. त्यापैकी, ₹ ६,३८८ कोटींची कर्जे अल्प भूधारक व सीमांतिक शेतकऱ्यांना देण्यात आली.

१.२१ शासकीय व सहकारी दुग्धसंस्थांद्वारे २०१५-१६ मध्ये डिसेंबर अखेर दैनिक सरासरी दूध संकलन ५०.५२ लाख लिटर होते, तर २०१४-१५ मध्ये ते ४५.४५ लाख लिटर होते. सन २०१४-१५ मध्ये दुधाचे एकूण उत्पादन ९.५ दशलक्ष मे. टन होते.

१.२२ सागरी व गोड्या पाण्यातील अंदाजित मत्स्य उत्पादन सन २०१५-१६ मध्ये डिसेंबर पर्यंत अनुक्रमे ३.४० लाख मे. टन व १.२५ लाख मे. टन होते, तर २०१४-१५ मध्ये ते अनुक्रमे ४.६४ लाख मे. टन व १.४४ लाख मे. टन होते.

## उद्योग

१.२३ राज्यामध्ये 'मेक इन इंडिया' कार्यक्रमादरम्यान ₹ ७,९४,०५७ कोटी प्रस्तावित गुंतवणूक व ३०.९ लाख अपेक्षित रोजगारासह २,५९४ सामंजस्य करार करण्यात आले.

१.२४ ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत राज्यात ₹ १०,९७,३३७ कोटी प्रस्तावित गुंतवणुकीच्या १९,०५३ औद्योगिक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. त्यापैकी ₹ २,६२,६३१ कोटी (२३.९ टक्के) प्रस्तावित गुंतवणुकीचे ८,४९७ प्रकल्प (४४.६ टक्के) कार्यान्वित झाले.

१.२५ राज्यात सप्टेंबर, २०१५ अखेर ₹ ५६,५५२ कोटी गुंतवणुकीचे व २९.२ लाख रोजगार असलेले सुमारे २.४४ लाख सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम कार्यरत होते.

१.२६ केंद्र शासनाने प्रकाशित केलेल्या वार्षिक उद्योग पाहणी २०१३-१४ च्या अस्थायी निष्कर्षांप्रमाणे स्थूल मूल्यवृद्धीत राज्य अग्रस्थानी आहे.

१.२७ सहाव्या आर्थिक गणनेनुसार राज्यात ६१.३ लाख आस्थापना असून ज्यामधील रोजगार १४५.१ लाख आहे.

## सहकार

१.२८ राज्यात ३१ मार्च, २०१५ रोजी सुमारे ५.३९ कोटी सभासद असलेल्या २.२६ लाख सहकारी संस्था होत्या. त्यापैकी, नऊ टक्के कृषि पतपुरवठा, १० टक्के बिगर-कृषि पतपुरवठा तर ८१ टक्के इतर संस्था होत्या. एकूण सहकारी संस्थांपैकी २४ टक्के सहकारी संस्था तोट्यात होत्या, त्यापैकी, २१.८ टक्के कृषि पतपुरवठा संस्था होत्या.

## ऊर्जा

१.२९ विजेची स्थापित क्षमता ३१ डिसेंबर, २०१५ रोजी ३२,७०६ मेगावॅट होती. डिसेंबर, २०१५ अखेर ८४,५५८ दशलक्ष युनिटस् इतकी वीज निर्मिती झाली असून मागील वर्षाच्या तत्सम कालावधी पेक्षा ती ८.१ टक्के अधिक होती. सन २०१४-१५ करिता औद्योगिक, घरगुती व कृषिक्षेत्रासाठी विजेच्या अंतिम दरडोई वापरात मागील वर्षाच्या तुलनेत अनुक्रमे ५.३ टक्के, ६.१ टक्के व २०.१ टक्के वाढ झाली असून विजेच्या अंतिम दरडोई एकूण वापरात ८.३ टक्के वाढ झाली.

१.३० कार्यक्षम घरगुती वीज दिव्यांच्या कार्यक्रमाअंतर्गत सीएफएल व इनकॅन्डेसन्ट दिवे एलईडीद्वारे बदलण्यामुळे वार्षिक ७५० दशलक्ष युनिट्स वीज बचत होणे अपेक्षित असून दि.१५ फेब्रुवारी, २०१६ पर्यंत राज्यात सुमारे ९२ लाख एलईडी घरगुती उपभोक्त्यांना वितरित करण्यात आले आहेत.

१.३१ सन २०१४-१५ मध्ये महापारेषण कंपनीची पारेषण हानी, महावितरण कंपनीची वितरण हानी व एकत्रित तांत्रिक व व्यावसायिक हानी अनुक्रमे ३.८९ टक्के, १४.१७ टक्के व १८.७१ टक्के असून सन २०१३-१४ मध्ये तत्सम आकडेवारी अनुक्रमे ४.०८ टक्के, १४.० टक्के व १७.६८ टक्के होती.

## परिवहन

१.३२ मार्च, २०१५ अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी सुमारे २.९९ लाख किमी होती. सुमारे ९९ टक्के गावे बारमाही वा हंगामी रस्त्यांनी जोडलेली होती.

१.३३ राज्यातील रस्त्यावरील वाहनांची १ जानेवारी, २०१६ रोजी एकूण संख्या २७१ लाख होती (दर लाख लोकसंख्येमागे २३,००९ वाहने आणि दर किमी रस्त्याला ९० वाहने). सन २०१५ मध्ये एकूण अपघातांची व अपघातात मृत झालेल्या व्यक्तींची संख्या अनुक्रमे ६३,८०५ व १३,२१२ होती.

१.३४ सन २०१४-१५ मध्ये मोठी बंदरे व लहान बंदरे यांच्यामार्फत झालेली एकत्रित मालवाहतूक १,५२८.१९ लाख मे. टन असून त्यामध्ये मुंबई पोर्ट ट्रस्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट यांचा हिस्सा अनुक्रमे ४०.३ टक्के व ४१.७ टक्के होता.

१.३५ सन २०१४-१५ मध्ये राज्यातील विमानतळांमार्फत झालेली देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय मालवाहतूक अनुक्रमे २.४२ लाख मे. टन व ४.८७ लाख मे. टन होती. तर देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विमानतळांमार्फत झालेली प्रवासी वाहतूक अनुक्रमे ३१२.१ लाख व ११३.७ लाख होती.

## सामाजिक क्षेत्र

१.३६ जनगणना २०११ नुसार राज्याची एकूण लोकसंख्या ११.२४ कोटी असून स्त्रियांचे प्रमाण ४८.२ टक्के आहे. नागरी लोकसंख्येचे प्रमाण ४५.२ टक्के आहे. राज्याचा दशवार्षिक लोकसंख्या वृद्धीदर सुमारे १६ टक्के असून तो मागील दशकाच्या तुलनेत ६.७ टक्के अंकांनी कमी आहे.

१.३७ राज्यातील स्त्री-पुरूष प्रमाण ९२९ असून ०-६ वर्षे वयोगटातील बालकांमध्ये ते ८९४ आहे तर अखिल भारतीय स्तरावर ते अनुक्रमे ९४३ व ९१९ आहे. राज्यातील साक्षरतेचे प्रमाण ८२.३ टक्के असून अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी ते अनुक्रमे ७९.७ टक्के व ६५.७ टक्के आहे. अखिल भारतीय स्तरावर साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ७३ टक्के, ६६.१ टक्के व ५९ टक्के आहे.

१.३८ धर्मनिहाय लोकसंख्येच्या आकडेवारीनुसार राज्यातील हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध व जैन धर्माच्या लोकसंख्येचे प्रमाण अनुक्रमे ७९.८ टक्के, ११.५ टक्के, एक टक्का, ०.२ टक्के, ५.८ टक्के व १.२ टक्के आहे तर अखिल भारतीय स्तरावर हे प्रमाण अनुक्रमे ७९.८ टक्के, १४.२ टक्के, २.३ टक्के, १.७ टक्के, ०.७ टक्के व ०.४ टक्के आहे.

१.३९ सन २०१५-१६ मध्ये एकूण १.०५ लाख प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी) शाळा होत्या व पटावरील विद्यार्थ्यांची संख्या सुमारे १.६० कोटी होती तर सन २०१४-१५ मध्ये तितक्याच शाळा होत्या व पटावरील विद्यार्थ्यांची संख्या १.६२ कोटी होती. माध्यमिक व उच्चमाध्यमिक (इयत्ता ९ वी ते १२ वी) सुमारे २५,००० शाळा होत्या व पटावरील विद्यार्थांची संख्या सुमारे ६४.१४ लाख होती तर सन २०१४-१५ मध्ये २४,४९७ शाळा होत्या व पटावरील विद्यार्थ्यांची संख्या ६१.८१ लाख होती.

१.४०	सन २०१४-१५ मध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध असणाऱ्या शाळांची टक्केवारी ९९.६, मुलींसाठी शौचालये (कार्यरत) उपलब्ध असलेल्या शाळांची टक्केवारी ९८.६ व संगणक असलेल्या शाळांची टक्केवारी ५४.३ होती.

१.४१	सन २०१३ मधील जन्म दर, अर्भक मृत्यूदर व मृत्यूदर हे अनुक्रमे १६.५, २४ व ६.२ होते, तर २०१२ मध्ये हे दर अनुक्रमे १६.६, २५ व ६.३ होते. सन २०११-२०१३ या कालावधीत माता मृत्यू प्रमाण ६८ होते.

१.४२	'महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०१२' नुसार राज्याचा मानव विकास निर्देशांक ०.७५२ आहे. बृहन्मुंबईचा मानव विकास निर्देशांक सर्वाधिक (०.८४१) आहे तर नंदूरबार जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक सर्वात कमी (०.६०४) आहे. राज्यातील एकूण जिल्ह्यांपैकी २७ जिल्ह्यांचे मानव विकास निर्देशांक राज्याच्या मानव विकास निर्देशांकापेक्षा कमी आहेत.

* * * * *

# २

# लोकसंख्या

# २.   लोकसंख्या

## राज्यातील लोकसंख्येची रचना

२.१  जनगणना, २०११ नुसार, राज्याची  लोकसंख्या ११.२४ कोटी असून देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३ टक्के आहे. लोकसंख्येनुसार उत्तर प्रदेशानंतर राज्य  दुसऱ्या क्रमांकावर आहे. राज्यातील नागरी लोकसंख्येचे प्रमाण २०११ मध्ये ४५.२ टक्के असून २००१ मध्ये ते ४२.४ टक्के होते. राज्याची सुमारे ६३ टक्के लोकसंख्या ही कार्यबल वयोगटातील (१५-५९ वर्षे) आहे.

## धर्मनिहाय लोकसंख्या

२.२  भारताचे महानिबंधक यांचे कार्यालयाकडून धर्मनिहाय लोकसंख्येबाबतची आकडेवारी प्रकाशित करण्यात आली असून त्यानुसार, सर्व धर्मांच्या लोकसंख्येचा दशवार्षिक वृध्दीदर कमी झाला आहे परिणामी, राज्य पातळीवर एकंदरीत वृद्धीदरात ६.७ टक्के अंकांची घट नोंदवली गेली आहे. राज्यातील धर्म निहाय जिल्हावार लोकसंख्येचे  प्रमाण व साक्षरता अनुक्रमे परिशिष्ट २.४ आणि २.५ मध्ये दर्शविली आहे.

२.३  राज्यातील लिंग गुणोत्तर प्रमाणामध्ये एकंदरीत सात अंकांची  सुधारणा झाली असून  २००१ मधील ९२२  वरून ते २०११ मध्ये ९२९ इतके झाले आहे.  राज्यातील  ग्रामीण भागामधील लिंग गुणोत्तर प्रमाण २००१ मधील ९६० वरून कमी होऊन २०११ मध्ये ९५२ झाले आहे तर याच कालावधीमध्ये शहरी भागात ते ८७३ वरून वाढ होऊन ९०३ झाले आहे.  सन २०११ मध्ये ख्रिश्चन लोकसंख्येकरिता लिंग गुणोत्तर प्रमाण  सर्वाधिक (१०३१) असून शीख लोकसंख्येकरिता ते सर्वात कमी (८९१) आहे.

**तक्ता २.१  धर्मनिहाय लोकसंख्येची  वैशिष्ट्ये,२०११**

| प्रमुख धर्म | क्षेत्र | लोकसंख्येचे प्रमाण | | साक्षरतेचा दर | | स्त्री-पुरूष प्रमाण# | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | राज्य | भारत | राज्य | भारत | राज्य | भारत |
| हिंदू | एकूण | ७९.८ | ७९.८ | ८१.८ | ७३.३ | ९२८ | ९३९ |
| | ग्रामीण | ४८.० | ५६.५ | ७६.७ | ६८.१ | ९५१ | ९४७ |
| | नागरी | ३१.८ | २३.३ | ८९.३ | ८५.३ | ८९४ | ९२१ |
| मुस्लीम | एकूण | ११.५ | १४.२ | ८३.६ | ६८.५ | ९११ | ९५१ |
| | ग्रामीण | ३.१ | ८.५ | ७९.१ | ६३.० | ९५९ | ९५८ |
| | नागरी | ८.४ | ५.७ | ८५.२ | ७६.५ | ८९३ | ९४२ |
| ख्रिश्चन | एकूण | १.० | २.३ | ९२.३ | ८४.५ | १,०३१ | १,०२३ |
| | ग्रामीण | ०.१ | १.४ | ८३.० | ७८.७ | ९८२ | १,००८ |
| | नागरी | ०.९ | ०.९ | ९३.३ | ९२.९ | १,०३७ | १,०४६ |
| शीख | एकूण | ०.२ | १.७ | ९०.९ | ७५.४ | ८९१ | ९०३ |
| | ग्रामीण | ०.० | १.२ | ७९.६ | ७०.९ | ८९१ | ९०५ |
| | नागरी | ०.२ | ०.५ | ९२.३ | ८६.५ | ८९१ | ८९८ |
| बौद्ध | एकूण | ५.८ | ०.७ | ८३.२ | ८१.३ | ९७० | ९६५ |
| | ग्रामीण | ३.० | ०.४ | ७९.१ | ७६.७ | ९६३ | ९६० |
| | नागरी | २.८ | ०.३ | ८७.५ | ८७.३ | ९७८ | ९७३ |
| जैन | एकूण | १.२ | ०.४ | ९५.३ | ९४.९ | ९६४ | ९५४ |
| | ग्रामीण | ०.२ | ०.१ | ९१.३ | ८८.६ | ९२२ | ९३५ |
| | नागरी | १.० | ०.३ | ९६.३ | ९६.५ | ९७४ | ९५९ |

*आधार* : भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

# स्त्रिया प्रति '००० पुरूष

## साक्षरतेचे प्रमाण

२.४ राज्यातील प्रौढ साक्षरतेच्या दरामध्ये वाढ झाली असून २००१ मधील ७६.९ टक्क्यांवरून २०११ मध्ये ते ८२.३ टक्के झाले आहे. सन २००१ व २०११ मधील महिला साक्षरता दराच्या वर्गीकरणानुसार जिल्हानिहाय गावांची संख्या परिशिष्ट २.६ मध्ये दर्शविली आहे.

## कार्य सहभाग

२.५ सन २०११ मध्ये राज्यातील ४.९४ कोटी व्यक्तींची आर्थिक कार्यात सक्रीय असल्याची नोंद झाली असून त्यापैकी ४.३७ कोटी मुख्यत: काम करणारे आहेत तर ०.५७ कोटी सीमांतीक कामगार आहेत. राज्यातील काम-न करणाऱ्या लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी असलेल्या प्रमाणात मागील दशकामध्ये घट झाली असून ते ५७.५ टक्क्यांवरून ५६ टक्के इतके झाले आहे.

२.६ जनगणनेद्वारे काम-न करणाऱ्या परंतु कामाच्या शोधात/ कामासाठी उपलब्ध असलेल्या व्यक्तींबाबतची आकडेवारीही उपलब्ध झाली आहे. ज्यानुसार २००१ मधील २७.८ लाख व्यक्तींच्या तुलनेत २०११ मध्ये ३० लाख व्यक्ति कामाच्या शोधात/ कामासाठी उपलब्ध आहेत.

## विवाह समयीचे वय

२.७ कायद्याने विवाह समयीचे किमान वय मुली व मुलांकरिता अनुक्रमे १८ व २१ वर्षे आहे. राज्यात २०११ मध्ये या वयाखालील ४.८ लाख मुलींची आणि ६.१ लाख मुलांची 'सध्या विवाहित' असल्याची नोंद झाली आहे तर २००१ मध्ये ही आकडेवारी दोन लाख मुली व २.९ लाख मुले अशी होती.

**आलेख २.१ : राज्यातील साक्षरता दर**




**आलेख २.२ : काम न करणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण**




**आलेख २.३ : कामाच्या शोधात/ कामासाठी उपलब्ध असलेल्या काम न करणाऱ्या व्यक्तींचे शैक्षणिक स्तरानुसार प्रमाण**




* * * * *

## परिशिष्ट २.१

### महाराष्ट्राची व भारताची जनगणनांवर आधारित लोकसंख्या

| वर्ष | | लोकसंख्या (कोटी) | | दशवार्षिक वृध्दीदर (टक्के) | | साक्षरतेची टक्केवारी ££ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| (१) | | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १९६१ | -- | ३.९६ | ४३.९२ | २३.६ | २१.५ | ३५.१ | २८.३ |
| १९७१ | -- | ५.०४ | ५४.८२ | २७.५ | २४.८ | ४५.८ | ३४.५ |
| १९८१ | -- | ६.२८ | ६८.५२ | २४.५ | २५.० | ५७.२ | ४३.७§ |
| १९९१ | -- | ७.८९ | ८४.६३£ | २५.७ | २३.९£ | ६४.९ | ५२.२@@ |
| २००१ | -- | ९.६९ | १०२.८७ | २२.७ | २१.५ | ७६.९ | ६४.८ |
| २०११ | -- | ११.२४ | १२१.०९ | १६.० | १७.७ | ८२.३ | ७३.० |

*आधार* – भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

£ जम्मू व काश्मीरची प्रक्षेपित लोकसंख्या धरुन

££ १९६१ व १९७१ ची साक्षरतेची टक्केवारी ५ वर्षे व त्यापेक्षा अधिक वयोगटातील लोकसंख्येसाठी आहे. १९८१, १९९१, २००१ व २०११ ची साक्षरतेची टक्केवारी ७ वर्षे व अधिक लोकसंख्येसाठी आहे.

§ साक्षरतेची टक्केवारी आसाम आणि जम्मू व काश्मीर वगळून

@@ साक्षरतेची टक्केवारी आसाम आणि जम्मू व काश्मीर वगळून

## परिशिष्ट २.२

### महाराष्ट्राची जनगणनांवर आधारित राज्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या

| वर्ष | लोकसंख्या (कोटी) | | | | | नागरी लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | स्त्री-पुरुष प्रमाण | | | लोकसंख्येची घनता (प्रति चौ.कि.मी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | एकूण | पुरुष | स्त्रिया | | एकूण | ग्रामीण | नागरी | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १९६१ | २.८४ | १.१२ | ३.९६ | २.०४ | १.९१ | २८.२ | ९३६ | ९९५ | ८०१ | १२९ |
| १९७१ | ३.४७ | १.५७ | ५.०४ | २.६१ | २.४३ | ३१.२ | ९३० | ९८५ | ८२० | १६४ |
| १९८१ | ४.०८ | २.२० | ६.२८ | ३.२४ | ३.०४ | ३५.० | ९३७ | ९६७ | ८५० | २०४ |
| १९९१ | ४.८४ | ३.०५ | ७.८९ | ४.०८ | ३.८१ | ३८.७ | ९३४ | ९७२ | ८७५ | २५७ |
| २००१ | ५.५८ | ४.११ | ९.६९ | ५.०४ | ४.६५ | ४२.४ | ९२२ | ९६० | ८७३ | ३१५ |
| २०११ | ६.१६ | ५.०८ | ११.२४ | ५.८२ | ५.४१ | ४५.२ | ९२९ | ९५२ | ९०३ | ३६५ |

*आधार* – भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

टीप – आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

## परिशिष्ट २.३

## जिल्हानिहाय लोकसंख्याविषयक निर्देशक
## जनगणना, २०११

| अनु. क्र. | जिल्हा | लोकसंख्या ('०००) | | | दशवार्षिक वृद्धिदर (टक्के) (२००१-२०११) | स्त्री - पुरुष प्रमाण | बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण (० -६ वर्षे वयोगट) | साक्षरता दर (टक्के) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | एकूण | | | | पुरुष | स्त्री | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | मुंबई शहर | १,६८५ | १,४०१ | ३,०८५ | (-)७.६ | ८३२ | ९१४ | ९१.५ | ८६.५ | ८९.२ |
| २ | मुंबई उपनगर | ५,०३१ | ४,३२६ | ९,३५७ | ८.३ | ८६० | ९१३ | ९२.९ | ८६.४ | ८९.९ |
| ३ | ठाणे # | ५,८६५ | ५,१९५ | ११,०६० | ३६.० | ८८६ | ९२४ | ८८.७ | ७९.८ | ८४.५ |
| ४ | रायगड | १,३४४ | १,२९० | २,६३४ | १९.३ | ९५९ | ९३५ | ८९.१ | ७६.९ | ८३.१ |
| ५ | रत्नागिरी | ७६१ | ८५४ | १,६१५ | (-)४.८ | १,१२२ | ९३६ | ९०.९ | ७४.५ | ८२.२ |
| ६ | सिंधुदुर्ग | ४१७ | ४३२ | ८५० | (-)२.२ | १,०३६ | ९२२ | ९१.६ | ७९.८ | ८५.६ |
| ७ | नाशिक | ३,१५७ | २,९५० | ६,१०७ | २२.३ | ९३४ | ८९० | ८८.२ | ७६.१ | ८२.३ |
| ८ | धुळे | १,०५४ | ९९७ | २,०५१ | २०.१ | ९४६ | ८९८ | ७९.५ | ६५.८ | ७२.८ |
| ९ | नंदुरबार | ८३३ | ८१५ | १,६४८ | २५.७ | ९७८ | ९४४ | ७२.२ | ५६.५ | ६४.४ |
| १० | जळगाव | २,१९७ | २,०३३ | ४,२३० | १४.९ | ९२५ | ८४२ | ८५.४ | ७०.६ | ७८.२ |
| ११ | अहमदनगर | २,३४३ | २,२०० | ४,५४३ | १२.४ | ९३९ | ८५२ | ८६.८ | ७०.९ | ७९.१ |
| १२ | पुणे | ४,९२४ | ४,५०५ | ९,४२९ | ३०.४ | ९१५ | ८८३ | ९०.८ | ८१.१ | ८६.२ |
| १३ | सातारा | १,५११ | १,४९३ | ३,००४ | ६.९ | ९८८ | ८९५ | ८९.४ | ७६.३ | ८२.९ |
| १४ | सांगली | १,४३६ | १,३८६ | २,८२२ | ९.२ | ९६६ | ८६७ | ८८.२ | ७४.६ | ८१.५ |
| १५ | सोलापूर | २,२२८ | २,०९० | ४,३१८ | १२.२ | ९३८ | ८८३ | ८५.० | ६८.५ | ८७.० |
| १६ | कोल्हापूर | १,९८१ | १,८९५ | ३,८७६ | १०.० | ९५७ | ८६३ | ८८.६ | ७४.२ | ८१.५ |
| १७ | औरंगाबाद | १,९२४ | १,७७७ | ३,७०१ | २७.८ | ९२३ | ८५८ | ८७.४ | ७०.१ | ७९.० |
| १८ | जालना | १,०११ | ९४८ | १,९५९ | २१.५ | ९३७ | ८७० | ८१.५ | ६१.० | ७१.५ |
| १९ | परभणी | ९४३ | ८९३ | १,८३६ | २०.२ | ९४७ | ८८४ | ८२.६ | ६३.६ | ७३.३ |
| २० | हिंगोली | ६०६ | ५७१ | १,१७७ | १९.३ | ९४२ | ८८२ | ८६.९ | ६९.० | ७८.२ |
| २१ | बीड | १,३४९ | १,२३६ | २,५८५ | १९.६ | ९१६ | ८०७ | ८५.६ | ६७.८ | ७७.० |
| २२ | नांदेड | १,७३० | १,६३१ | ३,३६१ | १६.९ | ९४३ | ९१० | ८४.३ | ६६.१ | ७५.५ |
| २३ | उस्मानाबाद | ८६२ | ७९६ | १,६५८ | ११.५ | ९२४ | ८६७ | ८५.८ | ७०.५ | ७८.४ |
| २४ | लातूर | १,२७३ | १,१८१ | २,४५४ | १८.० | ९२८ | ८८९ | ८४.४ | ६९.६ | ७७.३ |
| २५ | बुलढाणा | १,३३८ | १,२४९ | २,५८६ | १५.८ | ९३४ | ८५५ | ९०.५ | ७५.८ | ८३.४ |
| २६ | अकोला | ९३२ | ८८२ | १,८१४ | ११.३ | ९४६ | ९१२ | ९२.३ | ८३.५ | ८८.० |
| २७ | वाशिम | ६२० | ५७७ | १,१९७ | १७.३ | ९३० | ८६३ | ९०.५ | ७५.५ | ८३.२ |
| २८ | अमरावती | १,४८१ | १,४०८ | २,८८८ | १०.८ | ९५१ | ९३५ | ९१.५ | ८३.१ | ८७.४ |
| २९ | यवतमाळ | १,४२० | १,३५२ | २,७७२ | १२.८ | ९५२ | ९२२ | ८९.४ | ७५.९ | ८२.८ |
| ३० | वर्धा | ६६८ | ६३२ | १,३०१ | ५.२ | ९४६ | ९१९ | ९१.९ | ८१.८ | ८७.० |
| ३१ | नागपूर | २,३८५ | २,२६९ | ४,६५४ | १४.४ | ९५१ | ९३१ | ९२.१ | ८४.५ | ८८.४ |
| ३२ | भंडारा | ६०६ | ५९५ | १,२०० | ५.६ | ९८२ | ९५० | ९०.४ | ७७.१ | ८३.८ |
| ३३ | गोंदिया | ६६२ | ६६१ | १,३२३ | १०.१ | ९९९ | ९५६ | ९२.० | ७७.९ | ८५.० |
| ३४ | चंद्रपूर | १,१२४ | १,०८० | २,२०४ | ६.४ | ९६१ | ९५३ | ८६.८ | ७३.० | ८०.० |
| ३५ | गडचिरोली | ५४१ | ५३२ | १,०७३ | १०.६ | ९८२ | ९६१ | ८२.३ | ६६.३ | ७४.४ |
| **महाराष्ट्र राज्य** | | **५८,२४३** | **५४,१३१** | **१,१२,३७४** | **१६.०** | **९२९** | **८९४** | **८८.४** | **७५.९** | **८२.३** |

*आधार* - भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

\# अविभाजित ठाणे जिल्हा

# परिशिष्ट २.४

## धर्मनिहाय लोकसंख्या
## जनगणना, २०११

| अनु. क्र. | जिल्हा | धर्मनिहाय लोकसंख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | हिंदू | मुस्लिम | ख्रिश्चन | शीख | बौध्द | जैन | इतर धर्म आणि धर्ममते | धर्म न सांगितलेले |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | मुंबई शहर | १८,७३,७६२ | ७,७३,१७३ | ८४,५५५ | १३,४७१ | १,३४,२५७ | १,६६,००० | ३१,०९४ | ९,०९९ |
| २ | मुंबई उपनगर | ६३,३७,१३२ | १७,९५,७८८ | ३,२२,४७६ | ४७,२८८ | ४,६९,५६८ | ३,४३,६३९ | १८,३४५ | २२,७२६ |
| ३ | ठाणे # | ८७,१६,०५५ | १३,५५,६३० | २,८०,७०० | ३९,१४९ | ४,४९,६१७ | १,७२,०५२ | ९,८६२ | ३७,०८३ |
| ४ | रायगड | २२,३९,३७० | २,२७,४६५ | १७,४५२ | ७,४७७ | १,२१,७९१ | १२,२६० | १,१५९ | ७,२२६ |
४.५ श्रम केंद्र, भारत सरकार शेत मजुरांकरिता ग्राकिंनि, ग्रामीण मजुरांकरिता ग्राकिंनि, औद्योगिक कामगारांकरिता ग्राकिंनि असे इतर तीन ग्राकिंनि दरमहा परिगणित व प्रकाशित करते. महाराष्ट्रासह देशातील २० राज्यांकरिता दरमहा शेतमजूर आणि ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष १९८६-८७) परिगणित केले जातात. ह्या निर्देशांकांचा उपयोग कृषि क्षेत्रातील शेतमजुरीचा किमान दर निश्चित आणि सुधारित करण्यासाठी होतो. सदर निर्देशांक तयार करण्यासाठी भारतातील ६०० केंद्रांमधून किरकोळ किंमती गोळा केल्या जातात, त्यापैकी ५४ केंद्रे राज्यातील आहेत. औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांकांचा (औका-ग्राकिंनि) (पायाभूत वर्ष २००१) वापर प्रामुख्याने सार्वजनिक क्षेत्रातील लक्षावधी कर्मचाऱ्यांना देण्यात येणारा महागाई भत्ता ठरविण्यासाठी तसेच वर्गीकृत रोजगारातील किमान वेतन निश्चित व सुधारित करणे यासाठी केला जातो. हा निर्देशांक देशातील औद्योगिकदृष्ट्या विकसित अशा निवडक ७८ केंद्रांमधील जीवनावश्यक वस्तू व सेवा यांच्या किरकोळ किंमतींवर आधारित असून त्यामध्ये राज्यातील पाच केंद्रांचा समावेश आहे. सदर पाच केंद्रांव्यतिरिक्त राज्यातील पाच अतिरिक्त केंद्रांसाठी कामगार आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडून औका-ग्राकिंनि स्वतंत्रपणे तयार करण्यात येतात.

**आलेख ४.३ : महाराष्ट्रासाठी अखिल भारतीय ग्राकिंनि (एकत्रित)**




४.६ एप्रिल ते डिसेंबर, २०१५ या कालावधीतील केंद्रिय सांख्यिकी कार्यालयाने परिगणित केलेले महाराष्ट्रासाठीचे ग्रामीण, नागरी व एकत्रित सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे १२५.४, ११९.८ व १२१.७ होते.

४.७ एप्रिल ते डिसेंबर, २०१५ करिता राज्यासाठी शेतमजुरांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक आणि ग्रामीण मजुरांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे ८९३.० आणि ८८७.४ होते, जे गतवर्षीच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत अनुक्रमे ५.८ टक्के व ५.६ टक्क्यांनी जास्त होते.

## अखिल भारतीय स्तरावर किंमतीविषयक स्थिती

४.८ एप्रिल ते डिसेंबर, २०१५ या कालावधीतील केंद्रिय सांख्यिकी कार्यालयाने परिगणित केलेले अखिल भारतासाठीचे ग्रामीण, नागरी व एकत्रित सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे १२५.५, १२२.७ व १२४.२ होते.

४.९ एप्रिल ते डिसेंबर, २०१५ करिता अखिल भारतासाठी शेतमजुरांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक आणि ग्रामीण मजुरांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे ८३१.६ आणि ८३५.८ होते, जे गतवर्षीच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत अनुक्रमे ४.२ टक्के व ४.४ टक्क्यांनी जास्त होते.

**आलेख ४.४ : महाराष्ट्रासाठी शेत मजुरांकरिता ग्राकिंनि**




**आलेख ४.५ : महाराष्ट्रासाठी ग्रामीण मजुरांकरिता ग्राकिंनि**



**आलेख ४.६ : औद्योगिक कामगारांकरिता ग्राकिंनि**




४.१० एप्रिल ते डिसेंबर, २०१५ दरम्यानच्या कालावधीतील औद्योगिक कामगारांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक २६४.० होता व तो गतवर्षीच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत ५.७ टक्के वाढ दर्शवितो.

## घाऊक किंमती निर्देशांक

४.११ आर्थिक सल्लागार कार्यालय, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार घाऊक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २००४-०५) दरमहा प्रकाशित करतात. घाऊक किंमती निर्देशांक हा चलनवाढ मोजण्याचे प्रमुख साधन म्हणून वापरला जातो. घाऊक किंमती निर्देशांक 'प्राथमिक वस्तु', 'इंधन व शक्ती' आणि 'वस्तुनिर्माण' या विविध गटांतील वस्तुंच्या घाऊक किंमतीतील कल दर्शवितो. या तीन गटांचा भार अनुक्रमे २०.१२ टक्के, १४.९१ टक्के व ६४.९७ टक्के आहे.

४.१२ 'सर्व वस्तूं' साठी घाऊक किंमती निर्देशांक एप्रिल, २०१५ मधील १७६.४ वरुन डिसेंबर, २०१५ मध्ये १७७.४ पर्यंत वाढला. याच कालावधीत 'प्राथमिक वस्तू' गटाच्या निर्देशांकात २४३.६ वरुन २५७.८ पर्यंत वाढ झाली. तर 'वस्तुनिर्माण' गटात १५३.९ वरुन १५२.६ पर्यंत आणि 'इंधन व शक्ती ' या गटात १८४.३ वरुन १७६.८ पर्यंत घट झाली.

४.१२.१ घाऊक किंमती निर्देशांकावर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर एप्रिल, २०१५ मधील (-)२.४ टक्क्यांवरून डिसेंबर, २०१५ मध्ये (-)०.७ इतका वाढला. चलनवाढीचा दर सलग १४ महिने ऋण राहिला. 'प्राथमिक वस्तु' गटातील चलनवाढीचा दर ०.५ टक्क्यांवरून ५.५ टक्के इतका वाढला. 'वस्तुनिर्माण' गटात तो (-)०.५ टक्क्यांवरून (-)१.४ इतका घटला. 'इंधन व शक्ती' गटात तो (-)१३.० टक्क्यांवरून (-)९.२ टक्के वाढला. 'प्राथमिक वस्तु' गटातील 'खाद्य पदार्थ' उपगटाचा चलनवाढीचा दर एप्रिल, २०१५ मधील ५.९ टक्क्यांवरून डिसेंबर, २०१५ मध्ये ८.२ टक्के वाढला. ही वाढ प्रामुख्याने डाळी व कांद्याच्या किंमतींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने दिसून येते.

४.१३ विविध ग्राहक किंमती निर्देशांकांची मालिका परिशिष्ट ४.१ ते ४.८ मध्ये दिली आहे तर महत्त्वाच्या किंमतींच्या निर्देशांकांवर आधारित चलनवाढीचे दर परिशिष्ट ४.९ मध्ये दिले आहेत.

**आलेख ४.७ : घाकिंनि चलनवाढीचा दर**



# सार्वजनिक वितरण व्यवस्था

४.१४ सार्वजनिक वितरण व्यवस्था हे समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गांकरीता अन्न सुरक्षा प्रदान करणारे शासनाचे एक प्रमुख साधन आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये जीवनावश्यक वस्तुंची खरेदी आणि निश्चित केलेल्या लाभार्थ्यांना त्याचा अनुदानित दराने नियमित पुरवठा करणे याच्या व्यवस्थापनाचा समावेश होतो. वस्तुंचे प्रापण, साठवणूक, वाहतूक आणि ठोक नियतन ही केंद्र शासनाची जबाबदारी आहे, तर रास्त भाव दुकानांच्या प्रस्थापित जाळ्यामार्फत त्यांचे लाभार्थी कुटुंबांना वितरण करण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची निश्चिती करणे, शिधापत्रिकांचे वाटप आणि रास्त भाव दुकानांच्या कामाचे पर्यवेक्षण व संनियंत्रण यासारख्या कामांची जबाबदारीसुद्धा राज्य शासनाची आहे. रास्त भाव दुकानांद्वारे प्रामुख्याने गहू, तांदूळ, साखर आणि केरोसीन या वस्तू वितरित करण्यात येतात. शिधापत्रिकाधारकांची सोय आणि भौगोलिक संरचना विचारात घेऊन रास्त भाव दुकान सुरू करण्यात येते जेणेकरुन अतिदुर्गम भागामध्येही अन्नधान्य उपलब्ध होते.

४.१५ राज्यात ३१ डिसेंबर, २०१५ रोजी ५१,९१० रास्त भाव दुकाने कार्यरत होती. त्यापैकी ५,४२७ आदिवासी भागात व २९ फिरती रास्त भाव दुकाने होती.

४.१५.१ पुरविण्यात आलेल्या अन्नधान्याची गुणवत्ता आणि अनधिकृत गळती यांची तपासणी करण्याकरीता रास्त भाव दुकानांची नियमित निरिक्षणे केली जातात. जानेवारी ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत ८६,३९० (लक्ष्याच्या ८३ टक्के) तपासण्या करण्यात आल्या आणि २७० रास्त भाव दुकानांचे परवाने रद्द व ५२२ निलंबित करण्यात आले.

४.१५.२ डिसेंबर, २०१५ अखेर एकूण २.४७ कोटी शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले असून त्यापैकी सुमारे ०.४९ कोटी दारिद्र्य रेषेखालील आणि ०.२५ कोटी 'अंत्योदय अन्न योजना' (अंअयो) शिधापत्रिका होत्या. शिधापत्रिकाधारकांचा जिल्हानिहाय तपशील परिशिष्ट ४.१० मध्ये देण्यात आला आहे.

४.१५.३ सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गॅस जोडणी असलेले सर्व शिधापत्रिकाधारक वगळून उर्वरित शिधापत्रिकाधारकांना केरोसिनचा पुरवठा केला जातो. महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ व्यापार परवाना आदेश, १९७९ अन्वये केरोसिनचा साठा व व्यापार करण्याकरीता परवाना आवश्यक आहे. राज्यात ६१,८५८ केरोसिन परवानाधारक आहेत. त्यापैकी ७८६ घाऊक, १,५३७ अर्धघाऊक आणि ५९,५३५ किरकोळ विक्रेते आहेत.

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३

४.१६ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ राज्यात दि. १ फेब्रुवारी, २०१४ पासून अंमलात आला आहे. अधिनियमाअंतर्गत अंअयो लाभार्थी आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थी असे गट करण्यात आले असून सदर अधिनियमानुसार लाभार्थ्यांना ₹ तीन प्रति किलो दराने तांदूळ, ₹ दोन प्रति किलो दराने गहू व ₹ एक प्रति किलो दराने भरडधान्य देणे बंधनकारक आहे. अधिनियमानुसार अंअयोखालील लाभार्थ्यांना पूर्वीप्रमाणे प्रति माह प्रति कुटुंब ३५ किलो धान्य मिळते आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना प्रति व्यक्ति दरमहा पाच किलो प्रमाणे धान्य मिळते.

## अंत्योदय अन्न योजना

४.१६.१ अंअयो दारिद्र्य रेषेखालील सर्वात गरीब जनतेस दिलासा देण्याच्या उद्देशाने राज्यात १ मे, २००१ रोजी सुरु झाली. या योजनेअंतर्गत सर्व भूमिहीन शेतमजूर, अल्पभूधारक, ग्रामीण कारागीर, असंघटीत क्षेत्रात रोजंदारीवर काम करणारी कुटुंबे, विधवा किंवा दुर्धर आजारने ग्रस्त व्यक्ती किंवा अपंग व्यक्ती किंवा सामाजिक वा आर्थिक आधार नसलेली ६० वर्षे किंवा त्यावरील व्यक्ती कुटुंब प्रमुख असलेली कुटुंबे आणि सर्व आदिम जमातीतील कुटुंबे या लाभार्थी कुटुंबांचा समावेश होतो. एचआयव्ही/ एड्स ग्रस्त तसेच कुष्ठरोग बाधित व्यक्ति ज्यांची नावे दारिद्र्य रेषेखालील यादीमध्ये समाविष्ट आहेत आणि ते इतर कोणत्याही योजनेचे लाभार्थी नाहीत त्यांना प्राथम्याने अंअयो शिधापत्रिका देण्यात आल्या आहेत. भारत सरकारने राज्यासाठी २५.०५ लाख इतक्या अंअयो कुटुंबांची संख्या निश्चित केली आहे. सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये डिसेंबर पर्यंत अंअयो अंतर्गत अन्नधान्याचे विभागनिहाय नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना झालेले वाटप परिशिष्ट ४.१४ आणि ४.१५ मध्ये देण्यात आले आहे.

४.१७ पूर्वीच्या लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत सुमारे ८.७७ कोटी लाभार्थ्यांना अनुदानित दराने अन्नधान्य मिळत होते. अधिनियमानुसार राज्यातील सुमारे सात कोटी (६२.३ टक्के) लोकसंख्या अनुदानित दराने धान्य मिळण्यास पात्र आहे. यापैकी सुमारे ४.७० कोटी लोकसंख्या ग्रामीण भागात व सुमारे २.३० कोटी लोकसंख्या नागरी भागात आहे. उर्वरित १.७७ कोटी दारिद्र्य रेषेवरील (५५.५ लाख केशरी शिधापत्रिकाधारक) लाभार्थ्यांना मे ते ऑक्टोबर, २०१४ या कालावधीत पूर्वीच्या लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या दराने (तांदूळ ₹ ९.६० प्रति किलो व गहू ₹ ७.२० प्रति किलो) व परिमाणानुसार (दरमहा १५ किलो प्रति कुटुंब) राज्य शासनाच्या खर्चाने अन्नधान्य पुरविण्यात आले.

४.१८ राज्यातील पूर्वीच्या लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत समाविष्ट असलेले, परंतु भारत सरकारने घालून दिलेल्या इष्टांकांमुळे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट होऊ शकत नसलेल्या औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व १३ आणि नागपूर विभागातील वर्धा या जिल्ह्यांमधील दारिद्र्य रेषेवरील (केशरी शिधापत्रिकाधारक) शेतकऱ्यांना राज्याकडून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना निश्चित केलेल्या दराने व परिमाणानुसार २०१५-१६ मध्ये अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची संख्या सुमारे ६८ लाख आहे. प्राधान्य कुटुंब व पात्र लाभार्थी कुटुंबांसाठी अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना झालेले वाटप तक्ता ४.१ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता ४.१ प्राधान्य कुटुंब लाभार्थी व पात्र लाभार्थी कुटुंबांसाठी अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना झालेले वाटप**

(लाख मे.टन)

| वर्ष | लाभार्थ्यांचा प्रकार | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भारत सरकारकडून प्राप्त नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना झालेले वाटप | भारत सरकारकडून प्राप्त नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना झालेले वाटप |
| २०१३-१४# | प्राधान्य कुटुंब | २.४६ | २.३४ | २.२५ | ३.३२ | ३.२० | ३.०५ |
| | दारिद्र्य रेषेवरील बिगर राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम कुटुंब | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २०१४-१५ | प्राधान्य कुटुंब | १४.७५ | १३.३२ | १३.७२ | १९.९९ | १८.१६ | १८.६९ |
| | दारिद्र्य रेषेवरील बिगर राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम कुटुंब $ | १.७९ | १.५३ | १.४५ | २.१९ | १.९३ | १.८३ |
| २०१५-१६ | प्राधान्य कुटुंब ++ | ११.२८ | १०.५२ | ९.८० | १५.३२ | १४.३२ | १३.२५ |
| | दारिद्र्य रेषेवरील बिगर राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम कुटुंब @ + | ०.४२ | ०.३९ | ०.३९ | ०.६४ | ०.६० | ०.५९ |

# फेब्रुवारी व मार्च $ मे ते ऑक्टोबर ++ डिसेंबरपर्यंत @ शेतकरी + ऑगस्ट ते नोव्हेंबर

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## अन्नपूर्णा योजना

४.१९ ही योजना राज्यात १ एप्रिल, २००१ पासून राबविण्यात येत आहे. 'राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन' अथवा 'राज्य निवृत्ती वेतन' या योजनांतर्गत लाभ मिळत नसलेल्या ६५ वर्षे व त्यावरील वयाच्या निराधारांना अन्नपूर्णा योजनेअंतर्गत दरमहा १० किलो धान्य मोफत पुरविले जाते. सन २०१५-१६ मध्ये सप्टेंबर अखेर तांदूळ व गव्हाचे नियतन अनुक्रमे १,८०० मे.टन व २,९३४ मे.टन होते. त्यापैकी उचल अनुक्रमे १,७०१ मे.टन व २,०९३ मे.टन होती आणि रास्त भाव दुकानांना झालेले वाटप अनुक्रमे ६६१ मे. टन व ७९८ मे. टन होते.

## शिधापत्रिकाधारक आस्थापनांना अन्नधान्य वितरण

४.२० राज्यातील शिधापत्रिकाधारक आस्थापनांना(कल्याणकारी संस्था) केंद्र शासन तांदूळ ₹ सहा प्रति किलो आणि गहू ₹ पाच प्रति किलो या दराने अतिरिक्त अन्नधान्याचे नियतन मंजूर करते. या योजनेअंतर्गत शिधापत्रिकाधारक आस्थापनांना दरमहा प्रति रहिवासी १५ किलो अन्नधान्याचे वाटप करण्यात येते. अशा शिधापत्रिकाधारक आस्थापनांची संख्या ४,४८२ असून रहिवाशांची संख्या ५.६३ लाख आहे. शिधापत्रिकाधारक आस्थापनांकरिता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना झालेले वाटप तक्ता ४.२ मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.२ शिधापत्रिकाधारक आस्थापनांना अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना झालेले वाटप**

('००० मे.टन)

| वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | भारत सरकारकडून प्राप्त नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना झालेले वाटप | भारत सरकारकडून प्राप्त नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना झालेले वाटप |
| २०१३-१४@ | ११.४० | ५.७४ | ५.४६ | २७.०० | १०.४८ | ९.६५ |
| २०१४-१५ | २२.८० | १९.४४ | १२.१९ | ५४.०० | ४२.८४ | २४.४० |
| २०१५-१६+ | ११.४० | ७.५० | ७.०० | २७.०० | १६.०८ | १३.३१ |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन @ एप्रिल ते सप्टेंबर + सप्टेंबरपर्यंत

## सिंहस्थ कुंभमेळा

४.२१ जुलै ते सप्टेंबर, २०१५ या कालावधीत कुंभमेळा संपन्न झाला व सुमारे चार लाख साधू उपस्थित होते. साधुंना वास्तव्याकरीता साधुग्राम बांधण्यात आले होते आणि मठाकरीता तात्पुरत्या आस्थापना शिधापत्रिका देण्यात आल्या होत्या. त्यांना प्रति व्यक्ती प्रतिमाह पाच किलो याप्रमाणे अन्नधान्य दारिद्र्य रेषेवरील दराने पुरविण्याकरीता तात्पुरती पुरवठा केंद्रेही उभारण्यात आली होती. सिंहस्थ कुंभमेळादरम्यानचे अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना झालेले वाटप तक्ता ४.३ मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.३ सिंहस्थ कुंभमेळादरम्यानचे अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना झालेले वाटप**

('००० मे.टन)

| अन्नधान्य | भारत सरकारकडून प्राप्त नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना झालेले वाटप |
|---|---|---|---|
| तांदूळ | १.४० | १.१२ | १.०३ |
| गहू | २.१० | १.०७ | १.०६ |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## साखर

४.२२ दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिकाधारक आणि त्यांची लोकसंख्या यानुसार दरमहा राज्य शासनाला सुमारे १३,९१७.५ मे. टन साखरेचे नियतन केंद्र शासनाने निश्चित केले आहे. सणासुदीच्या दोन महिन्यांमध्ये (ऑगस्ट किंवा सप्टेंबर आणि ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर) राज्याला १८,३७१.१ मे. टन साखरेचे नियतन प्राप्त होते. सद्यस्थितीत साखरेची विक्रीची किंमत ₹ १३.५० प्रति किलो आहे.भारत सरकारकडून राज्यास साखर खरेदीकरीता २०१४-१५ मध्ये ₹ १७५.४८ कोटी तर २०१५-१६ मध्ये सप्टेंबरपर्यंत ₹ १३८ कोटी अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे. साखरेचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना वाटप तक्ता ४.४ मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.४ साखरेचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना वाटप**

(लाख मे.टन)

| साखर | भारत सरकारकडून प्राप्त नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना झालेले वाटप |
|---|---|---|---|
| २०१३-१४ | १.७९ | ०.८७ | ०.८२ |
| २०१४-१५ | १.४८ | १.३४ | १.३४ |
| २०१५-१६⁺ | १.३४ | १.३२ | १.३० |

+ डिसेंबरपर्यंत

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## केरोसीन

४.२३ राज्याला सन २०१४-१५ मध्ये केरोसिनचे ७.१३ लाख किलो लिटर आणि सन २०१५-१६ मध्ये डिसेंबरपर्यंत ४.६८ लाख किलो लिटर नियतन प्राप्त झाले. त्यापैकी उचल अनुक्रमे ७.१३ लाख किलो लिटर आणि ४.१५ लाख किलो लिटर होती. राज्यातील निरनिराळ्या जिल्ह्यांमध्ये केरोसीनची किरकोळ किंमत ₹ १५.१४ ते ₹ १७.२२ प्रति लिटर या दरम्यान आहे.

## गोदामे

४.२४ सन २०१५ मध्ये राज्य शासनाच्या मालकीची एकूण १,०८६ गोदामे असून त्यांची साठवणूक क्षमता ६.३१ लाख मे. टन आहे. त्यापैकी ०.८३ लाख मे. टन क्षमतेची १९२ गोदामे वापरासाठी अयोग्य असून ०.०६ लाख मे. टन क्षमतेची १४ गोदामे भाडे तत्वावर देण्यात आली होती. राज्य शासनाने ०.७२ लाख मे. टन क्षमतेची १०४ गोदामे अन्नधान्याच्या साठवणुकीसाठी भाड्याने घेतली आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गोदामांच्या साठवणूक क्षमतेत वाढ करण्यासाठी नाबार्डच्या अर्थ सहाय्याने राज्य शासनाने नवीन गोदामे (५.९५ लाख मे. टन) बांधण्याच्या कामास सुरुवात केली आहे. जिल्हानिहाय उपलब्ध गोदामांची संख्या व त्यांची क्षमता परिशिष्ट ४.१३ मध्ये देण्यात आली आहे.

## अन्नधान्याकरीता अर्थसहाय्य

४.२५ अन्नधान्याकरीता अर्थसहाय्य हे सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्याच्या वितरणासाठी देण्यात येणारे अर्थसहाय्य आणि प्रतिकूल काळासाठी ठेवावयाच्या राखीव साठ्याच्या देखभालीचा खर्च आणि अन्नधान्य प्रापणासाठीची किंमत व विक्रीची किंमत यातील तफावतीमुळे राज्य शासनास सहन करावी लागणारी तूट आहे. अर्थसंकल्पीय अंदाजानुसार सन २०१५-१६ मध्ये अन्नधान्याकरीता ₹ ९०९.७५ कोटी अर्थसहाय्य देण्यात आले आहे. वर्षनिहाय अन्नधान्यासाठीचे अर्थसहाय्य तक्ता ४.५ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता ४.५ अन्नधान्यासाठीचे अर्थसहाय्य**

(₹ कोटी)

| वर्ष | अर्थसहाय्य |
|---|---|
| २०११-१२ | २९३.३२ |
| २०१२-१३ | ३१२.६० |
| २०१३-१४ | २०१.०० |
| २०१४-१५ (सुअं) | ९०७.८० |
| २०१५-१६ (अअं) | ९०९.७५ |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण

४.२६ केवळ पात्र लाभार्थ्यांना वेळेवर व पारदर्शकतेने अन्नधान्य वितरित करण्याकरीता राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संगणकीकरणाचा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाअंतर्गत २.३७ कोटी शिधापत्रिकांची माहिती नोंदविण्यात आली आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माहितकोषामध्ये आधार क्रमांक जोडणीचे काम सुरु असून ५० टक्के काम पूर्ण झाले आहे.

* * * * *

## परिशिष्ट ४.१

## महाराष्ट्रातील ग्रामीण भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक

(पायाभूत वर्ष -२००३)

| वर्ष/ महिना | खाद्यपदार्थ | पान, सुपारी आणि तंबाखू | इंधन, वीज व दिवाबत्ती | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्व वस्तू | वार्षिक चलन वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **भारांक** | **५२.८५** | **२.१५** | **१०.६७** | **८.५३** | **२५.८०** | **१००.००** | -- |
| २००४-०५ | १०४ | १०५ | १०३ | १०२ | १०२ | १०४ | -- |
| २००५-०६ | १०९ | १०९ | १०८ | १०३ | १०५ | १०७ | ३.८ |
| २००६-०७ | ११८ | ११७ | १३२ | १०५ | १०८ | ११६ | ७.८ |
| २००७-०८ | १२८ | १२६ | १७६ | १०७ | ११५ | १२८ | १०.३ |
| २००८-०९ | १४२ | १३९ | २३८ | ११० | १२५ | १४५ | १३.२ |
| २००९-१० | १६६ | १५६ | २६१ | १११ | १३६ | १६३ | १२.८ |
| २०१०-११ | १८४ | १७४ | २९७ | ११४ | १५० | १८१ | १०.९ |
| २०११-१२ | २०१ | २०५ | ३२६ | ११९ | १६२ | १९८ | ९.१ |
| २०१२-१३ | २२२ | २४३ | ३८३ | १२५ | १७२ | २१८ | १०.५ |
| २०१३-१४ | २४२ | २६४ | ४३४ | १३१ | १९२ | २४१ | १०.२ |
| २०१४-१५ | २४९ | २९३ | ४६७ | १३३ | २०० | २५१ | ४.२ |
| २०१५-१६@ | २६२ | ३२२ | ४४५ | १३५ | २०५ | २५७ | २.७ |
| एप्रिल, २०१५ | २४५ | ३१७ | ४२३ | १३३ | २०३ | २४६ | ४.८ |
| मे, २०१५ | २५० | ३१६ | ४२७ | १३५ | २०३ | २४९ | १.९ |
| जून, २०१५ | २५९ | ३१७ | ४५२ | १३४ | २०७ | २५७ | ४.० |
| जुलै, २०१५ | २५८ | ३२१ | ४५१ | १३४ | २०७ | २५७ | २.७ |
| ऑगस्ट, २०१५ | २६७ | ३२२ | ४५० | १३५ | २०५ | २६० | ३.० |
| सप्टेंबर, २०१५ | २६६ | ३२४ | ४५३ | १३४ | २०५ | २६० | १.१ |
| ऑक्टोबर, २०१५ | २७० | ३२६ | ४५१ | १३६ | २०६ | २६२ | २.१ |
| नोव्हेंबर, २०१५ | २७१ | ३२७ | ४५० | १३६ | २०६ | २६३ | २.६ |
| डिसेंबर, २०१५ | २६९ | ३२६ | ४५० | १३६ | २०५ | २६२ | २.६ |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई. @ ९ महिन्यांची सरासरी

टीप - चलन वाढ दर = मागील वर्षाच्या तत्सम कालावधीतील निर्देशांकापेक्षा चालू कालावधीतील निर्देशांकात झालेली टक्केवारीतील वाढ

# परिशिष्ट ४.२

## महाराष्ट्रातील नागरी भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक

(पायाभूत वर्ष -२००३)

| वर्ष/ महिना | खाद्यपदार्थ | पान, सुपारी आणि तंबाखू | इंधन, वीज व दिवाबत्ती | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्व वस्तू | वार्षिक चलन वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **भारांक** | **४५.८०** | **१.५४** | **१०.२८** | **७.५१** | **३४.८७** | **१००.००** | -- |
| २००४-०५ | १०५ | १०३ | १०३ | १०२ | १०४ | १०४ | -- |
| २००५-०६ | १०९ | १०७ | १०७ | १०३ | १०७ | १०८ | ३.२ |
| २००६-०७ | १२० | ११२ | १२४ | १०५ | ११० | ११५ | ७.२ |
| २००७-०८ | १२८ | १२१ | १६२ | १०६ | ११५ | १२५ | ८.७ |
| २००८-०९ | १४२ | १३४ | २२४ | १०९ | १२३ | १४१ | १२.९ |
| २००९-१० | १६५ | १४७ | २४५ | ११३ | १३१ | १५७ | ११.४ |
| २०१०-११ | १८६ | १६९ | २७८ | ११८ | १४३ | १७५ | ११.४ |
| २०११-१२ | २०१ | २०५ | २९७ | १२६ | १५४ | १८९ | ७.९ |
| २०१२-१३ | २२४ | २३३ | ३४९ | १३२ | १६० | २०८ | १०.१ |
| २०१३-१४ | २४८ | २६२ | ३९६ | १३७ | १७५ | २३० | १०.३ |
| २०१४-१५ | २५४ | २८८ | ४२९ | १३९ | १८५ | २४० | ४.५ |
| २०१५-१६@ | २६९ | ३१९ | ४०६ | १४२ | १९१ | २४७ | ३.० |
| एप्रिल, २०१५ | २५३ | ३०९ | ३७३ | १४० | १८८ | २३५ | ४.७ |
| मे, २०१५ | २५९ | ३१३ | ३७७ | १४१ | १८९ | २३९ | १.९ |
| जून, २०१५ | २६५ | ३१४ | ४१४ | १४१ | १९१ | २४६ | ४.० |
| जुलै, २०१५ | २६७ | ३१९ | ४१४ | १४१ | १९१ | २४७ | २.० |
| ऑगस्ट, २०१५ | २७१ | ३२० | ४१३ | १४२ | १९१ | २४९ | १.४ |
| सप्टेंबर, २०१५ | २७३ | ३२१ | ४१५ | १४२ | १९१ | २५० | २.२ |
| ऑक्टोबर, २०१५ | २७६ | ३२३ | ४१५ | १४३ | १९१ | २५१ | ३.३ |
| नोव्हेंबर, २०१५ | २७८ | ३२६ | ४१५ | १४३ | १९१ | २५२ | ३.८ |
| डिसेंबर, २०१५ | २७३ | ३२७ | ४१५ | १४३ | १९१ | २५० | ३.५ |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

@ ९ महिन्यांची सरासरी

# परिशिष्ट ४.३

## महत्त्वाच्या राज्यांसाठी ग्राहक किंमती निर्देशांक (केंद्रिय)

(पायाभूत वर्ष २०१२) (एप्रिल -डिसेंबर)

| राज्ये | ग्रामीण | | | नागरी | | | एकत्रित | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१४-१५ | २०१५-१६ | टक्के वाढ | २०१४-१५ | २०१५-१६ | टक्के वाढ | २०१४-१५ | २०१५-१६ | टक्के वाढ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| आंध्र प्रदेश | ११८.३२ | १२७.८१ | ८.०२ | ११८.६४ | १२५.१६ | ५.४९ | ११८.४३ | १२६.८३ | ७.०९ |
| बिहार | १२२.९० | १२८.१३ | ४.२६ | ११८.८३ | १२२.८० | ३.३४ | १२२.३१ | १२७.३६ | ४.१२ |
| गुजरात | ११७.८३ | १२५.२३ | ६.२८ | ११६.२४ | १२०.४९ | ३.६५ | ११६.९४ | १२२.५६ | ४.८० |
| कर्नाटक | ११८.६४ | १२८.६९ | ८.४७ | १२१.९१ | १२८.२० | ५.१६ | १२०.३९ | १२८.४३ | ६.६८ |
| केरळ | १२०.२६ | १२५.१३ | ४.०६ | १२०.४७ | १२५.८० | ४.४३ | १२०.३२ | १२५.३८ | ४.२० |
| मध्य प्रदेश | ११८.४६ | १२४.१४ | ४.८० | ११८.४६ | १२३.०३ | ३.८६ | ११८.४४ | १२३.६८ | ४.४२ |
| **महाराष्ट्र** | **११७.४२** | **१२५.३७** | **६.७७** | **११६.००** | **११९.८१** | **३.२९** | **११६.४७** | **१२१.६७** | **४.४६** |
| पंजाब | ११७.३२ | १२१.६४ | ३.६८ | ११७.२८ | १२१.४७ | ३.५७ | ११७.२८ | १२१.५८ | ३.६७ |
| राजस्थान | ११९.०१ | १२६.६७ | ६.४३ | ११७.०१ | १२२.७३ | ४.८९ | ११८.३१ | १२५.२६ | ५.८७ |
| तामिळनाडू | ११८.५० | १२४.९८ | ५.४७ | ११८.८४ | १२५.६७ | ५.७४ | ११८.७० | १२५.३९ | ५.६४ |
| उत्तरप्रदेश | ११९.५४ | १२४.०८ | ३.७९ | ११८.६१ | १२२.९१ | ३.६३ | ११९.२२ | १२३.६४ | ३.७१ |
| पश्चिम बंगाल | ११९.८२ | १२३.६४ | ३.१९ | ११९.०७ | १२२.३० | २.७२ | ११९.४६ | १२३.०१ | २.९८ |
| **अखिल भारत** | **११९.१०** | **१२५.५२** | **५.३९** | **११७.९१** | **१२२.६७** | **४.०३** | **११८.५३** | **१२४.२१** | **४.७९** |

*आधार :* केंद्रिय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार

टीप : प्रत्येक राज्यासाठी आयटेम बास्केट वेगवेगळी आहे.

# परिशिष्ट ४.४

## महाराष्ट्र व अखिल भारतातील शेतमजुरांकरिता व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक

(पायाभूत वर्ष १९८६-८७)

| वर्ष / महिना | शेतमजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक | | | | ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | | अखिल भारत | | महाराष्ट्र | | अखिल भारत | |
| | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| २०००-०१ | ३१६ | ३०५ | ३०३ | ३०५ | ३१६ | ३०५ | ३०३ | ३०७ |
| २००१-०२ | ३०७ | ३०३ | ३०२ | ३०९ | ३०८ | ३०४ | ३०३ | ३११ |
| २००२-०३ | ३२२ | ३१७ | ३१२ | ३१९ | ३२२ | ३१७ | ३१३ | ३२१ |
| २००३-०४ | ३४२ | ३३२ | ३२५ | ३३१ | ३४१ | ३३२ | ३२६ | ३३३ |
| २००४-०५ | ३५७ | ३४६ | ३३३ | ३३९ | ३५६ | ३४६ | ३३४ | ३४१ |
| २००५-०६ | ३६५ | ३६२ | ३४४ | ३५३ | ३६४ | ३६२ | ३४५ | ३५५ |
| २००६-०७ | ४०२ | ३९४ | ३७६ | ३८० | ४०० | ३९२ | ३७६ | ३८२ |
| २००७-०८ | ४३७ | ४२३ | ४०६ | ४०९ | ४३४ | ४२० | ४०६ | ४०९ |
| २००८-०९ | ४८४ | ४६४ | ४५२ | ४५० | ४८० | ४६० | ४५२ | ४५१ |
| २००९-१० | ५७४ | ५४० | ५२२ | ५१३ | ५७१ | ५३५ | ५२३ | ५१३ |
| २०१०-११ | ६३३ | ६०० | ५७२ | ५६४ | ६२९ | ५९५ | ५७३ | ५६४ |
| २०११-१२ | ७०४ | ६७६ | ६०२ | ६११ | ६९७ | ६६८ | ६०३ | ६११ |
| २०१२-१३ | ७७० | ७४४ | ६५८ | ६७२ | ७६३ | ७३७ | ६६० | ६७३ |
| २०१३-१४ | ८१८ | ७९३ | ७३७ | ७५० | ७९३ | ७८६ | ७३९ | ७५१ |
| २०१४-१५ | ८७३ | ८४८ | ७७८ | ८०० | ८६१ | ८४१ | ७८२ | ८०१ |
| २०१५-१६@ | ९२३ | ८९३ | ८०१ | ८३२ | ९१२ | ८८७ | ८०७ | ८३६ |
| एप्रिल, २०१५ | ८८७ | ८६५ | ७७२ | ८०५ | ८७७ | ८६१ | ७७६ | ८०९ |
| मे, २०१५ | ८९० | ८६८ | ७८० | ८११ | ८७९ | ८६३ | ७८५ | ८१६ |
| जून, २०१५ | ९१० | ८८२ | ७९० | ८२० | ८९९ | ८७७ | ७९६ | ८२४ |
| जुलै, २०१५ | ९१० | ८८१ | ७९२ | ८२२ | ९०० | ८७७ | ७९७ | ८२७ |
| ऑगस्ट, २०१५ | ९२५ | ८९२ | ८०५ | ८३२ | ९१४ | ८८६ | ८१० | ८३६ |
| सप्टेंबर, २०१५ | ९४२ | ९०२ | ८१४ | ८३९ | ९३० | ८९६ | ८१९ | ८४३ |
| ऑक्टोबर, २०१५ | ९६० | ९१७ | ८२६ | ८४९ | ९४८ | ९१० | ८३२ | ८५३ |
| नोव्हेंबर, २०१५ | ९५८ | ९१७ | ८३१ | ८५३ | ९४७ | ९१० | ८३७ | ८५७ |
| डिसेंबर, २०१५ | उ.ना. | ९१३ | उ.ना. | ८५३ | उ.ना. | ९०७ | उ.ना. | ८५७ |

*आधार* - श्रम केंद्र, सिमला, भारत सरकार. उ.ना. उपलब्ध नाही.

@ ९ महिन्यांची सरासरी

# परिशिष्ट ४.५

## औद्योगिक कामगारांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमतींचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष -२००१)

| वर्ष/ महिना | खाद्यपदार्थ | पान, सुपारी, तंबाखू व मादक पदार्थ | इंधन व दिवाबत्ती | निवास | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्वसाधारण निर्देशांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **भारांक** | **४६.१९** | **२.२७** | **६.४३** | **१५.२७** | **६.५८** | **२३.२६** | **१००.०** |
| २००५-०६ | ११५ | ११२ | १२३ | ११८ | ११० | १२० | ११७ |
| २००६-०७ | १२६ | ११६ | १३० | १२६ | ११४ | १२६ | १२५ |
| २००७-०८ | १३६ | १२८ | १३३ | १३१ | ११८ | १३१ | १३३ |
| २००८-०९ | १५३ | १३८ | १४४ | १३७ | १२२ | १४१ | १४५ |
| २००९-१० | १७६ | १५० | १४९ | १६६ | १२८ | १४९ | १६३ |
| २०१०-११ | १९४ | १६८ | १६३ | २०१ | १३६ | १५७ | १८० |
| २०११-१२ | २०६ | १९४ | १८८ | २२२ | १५५ | १६८ | १९५ |
| २०१२-१३ | २३० | २२३ | २१४ | २३८ | १७० | १८२ | २१५ |
| २०१३-१४ | २५९ | २४९ | २३० | २५४ | १८१ | १९५ | २३६ |
| २०१४-१५ | २८० | २८४ | २४३ | २७३ | १९२ | २१० | २५४ |
| २०१५-१६@ | २९२ | ३०१ | २४८ | २८२ | १९७ | २१५ | २६४ |
| एप्रिल, २०१५ | २७८ | २९३ | २४४ | २७७ | १९५ | २१२ | २५६ |
| मे, २०१५ | २८३ | २९६ | २४५ | २७७ | १९६ | २१४ | २५८ |
| जून, २०१५ | २८८ | २९७ | २४४ | २७७ | १९६ | २१५ | २६१ |
| जुलै, २०१५ | २८९ | २९९ | २४७ | २८५ | १९६ | २१५ | २६३ |
| ऑगस्ट, २०१५ | २९२ | ३०२ | २४८ | २८५ | १९६ | २१५ | २६४ |
| सप्टेंबर, २०१५ | २९६ | ३०३ | २४९ | २८५ | १९७ | २१६ | २६६ |
| ऑक्टोबर, २०१५ | ३०१ | ३०५ | २५० | २८५ | १९७ | २१६ | २६९ |
| नोव्हेंबर, २०१५ | ३०२ | ३०७ | २५१ | २८५ | १९८ | २१७ | २७० |
| डिसेंबर, २०१५ | २९९ | ३११ | २५२ | २८५ | १९९ | २१८ | २६९ |

*आधार* - श्रम केंद्र, सिमला, भारत सरकार.

@ ९ महिन्यांची सरासरी

# परिशिष्ट ४.६

## महाराष्ट्रातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष - २००१) (केंद्रिय केंद्रे)

| वर्ष / महिना | मुंबई | | सोलापूर | | नागपूर | | पुणे | | नाशिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| **भारांक** | **४८.९** | **१००.०** | **५४.७** | **१००.०** | **४३.१** | **१००.०** | **३९.८** | **१००.०** | **४१.४** | **१००.०** |
| २००५-०६ | ११५ | ११८ | ११३ | ११५ | ११५ | ११९ | १२० | ११९ | ११९ | ११८ |
| २००६-०७ | १२६ | १२८ | १२६ | १२७ | १३३ | १३४ | १३४ | १३० | १३१ | १२६ |
| २००७-०८ | १३६ | १३६ | १४९ | १४२ | १४६ | १४२ | १४५ | १३८ | १४० | १३२ |
| २००८-०९ | १५१ | १४८ | १५९ | १५१ | १६६ | १५५ | १६० | १५० | १५५ | १४२ |
| २००९-१० | १७३ | १६३ | १७६ | १६६ | १९२ | १८३ | १८३ | १६७ | १८३ | १६५ |
| २०१०-११ | १९१ | १७८ | १८९ | १८२ | २०५ | २०७ | २०३ | १८५ | २०२ | १८६ |
| २०११-१२ | २०८ | १९६ | २१४ | २०४ | २१६ | २२४ | २२६ | २०४ | २१६ | २०८ |
| २०१२-१३ | २३२ | २१८ | २२८ | २२० | २४४ | २४६ | २४७ | २२१ | २३३ | २२८ |
| २०१३-१४ | २६० | २४२ | २६० | २४६ | २८० | २६८ | २८० | २४२ | २५८ | २४४ |
| २०१४-१५ | २८४ | २६२ | २८३ | २६५ | २९४ | २८१ | २९९ | २५७ | २८० | २६१ |
| २०१५-१६@ | ३०५ | २७९ | ३०७ | २८४ | ३१९ | २९८ | ३१५ | २६८ | २८९ | २७३ |
| एप्रिल, २०१५ | २९५ | २७२ | २९६ | २७६ | ३०० | २८६ | ३०४ | २६० | २८१ | २६६ |
| मे, २०१५ | २९६ | २७३ | २९८ | २७७ | ३०९ | २९१ | ३१२ | २६४ | २९० | २७२ |
| जून, २०१५ | ३०१ | २७५ | ३०४ | २८१ | ३१७ | २९५ | ३१० | २६६ | २८९ | २७२ |
| जुलै, २०१५ | ३०१ | २७७ | ३०८ | २८४ | ३२० | २९९ | ३०७ | २६५ | २८८ | २७३ |
| ऑगस्ट, २०१५ | ३०२ | २७८ | ३०८ | २८४ | ३२१ | २९९ | ३०६ | २६५ | २८८ | २७३ |
| सप्टेंबर, २०१५ | ३०९ | २८२ | ३०६ | २८३ | ३२२ | ३०० | ३२२ | २७१ | २९२ | २७४ |
| ऑक्टोबर, २०१५ | ३१३ | २८४ | ३१५ | २८९ | ३३३ | ३०५ | ३२९ | २७५ | २९३ | २७५ |
| नोव्हेंबर, २०१५ | ३१५ | २८५ | ३१३ | २८९ | ३२७ | ३०३ | ३२५ | २७३ | २९१ | २७४ |
| डिसेंबर, २०१५ | ३१२ | २८४ | ३१७ | २९१ | ३२१ | ३०१ | ३२३ | २७२ | २९२ | २७५ |

*आधार* - श्रम केंद्र, सिमला, भारत सरकार.

@ ९ महिन्यांची सरासरी

## परिशिष्ट ४.७

## महाराष्ट्रातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष - २००१) (राज्य केंद्रे)

| वर्ष / महिना | अकोला | | कोल्हापूर | | जळगाव | | नांदेड | | औरंगाबाद | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| **भारांक** | **४५.८८** | **१००.०** | **४८.२२** | **१००.०** | **४७.७६** | **१००.०** | **४९.०५** | **१००.०** | **४०.७९** | **१००.०** |
| २००८-०९ | १३४ | १४४ | १५० | १४९ | १५१ | १५० | १५३ | १५४ | १४८ | १५० |
| २००९-१० | १५६ | १६१ | १६९ | १६४ | १७२ | १६७ | १६९ | १७४ | १७१ | १६४ |
| २०१०-११ | १७० | १७५ | १९१ | १८४ | १९५ | १८६ | १८७ | २०० | १८८ | १८३ |
| २०११-१२ | १८३ | १८८ | २१७ | २०७ | २१८ | २०६ | २१५ | २२७ | २१२ | २०६ |
| २०१२-१३ | २१० | २१६ | २३६ | २२६ | २४१ | २३० | २३२ | २५१ | २३९ | २३४ |
| २०१३-१४* | २३१ | २३८ | २५८ | २४५ | २६२ | २५१ | २६१ | २७५ | २६६ | २५८ |
| २०१४-१५* | २२० | २४३ | २६२ | २५५ | २६६ | २६१ | २७० | २८९ | २७६ | २७३ |
| २०१५-१६@* | २५१ | २६१ | २७६ | २६९ | २७७ | २७० | ३०२ | ३११ | २९५ | २९० |
| एप्रिल, २०१५* | २३१ | २४९ | २६२ | २५९ | २६३ | २६१ | २७९ | २९७ | २७७ | २७८ |
| मे, २०१५* | २३६ | २५१ | २६६ | २६३ | २६७ | २६३ | २८४ | ३०० | २८४ | २८२ |
| जून, २०१५* | २३९ | २५४ | २७० | २६६ | २६९ | २६५ | २९२ | ३०४ | २८६ | २८४ |
| जुलै, २०१५* | २४८ | २५९ | २७३ | २६७ | २७० | २६८ | २९५ | ३०९ | २८९ | २८८ |
| ऑगस्ट, २०१५* | २५६ | २६३ | २७६ | २६९ | २७४ | २७० | ३०३ | ३१३ | २९८ | २९२ |
| सप्टेंबर, २०१५* | २६० | २६५ | २८० | २७१ | २८० | २७३ | ३१० | ३१६ | ३०२ | २९४ |
| ऑक्टोबर,२०१५* | २६६ | २६९ | २८५ | २७४ | २८९ | २७७ | ३१७ | ३२० | ३०९ | २९८ |
| नोव्हेंबर, २०१५* | २६४ | २६९ | २८५ | २७४ | २९० | २७८ | ३१८ | ३२१ | ३०८ | २९८ |
| डिसेंबर, २०१५* | २६२ | २६९ | २८३ | २७५ | २८९ | २७९ | ३१८ | ३२२ | ३०६ | २९० |

*आधार* - कामगार आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

@ ९ महिन्यांची सरासरी * अस्थायी

# परिशिष्ट ४.८

## अखिल भारतीय घाऊक किंमतींचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष - २००४-०५)

| वर्ष/ महिना | प्राथमिक वस्तू | इंधन व वीज | वस्तुनिर्माण | सर्व वस्तू |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| **भारांक** | **२०.१२** | **१४.९१** | **६४.९७** | **१००.००** |
| २००५-०६ | १०४.३ | ११३.६ | १०२.४ | १०४.५ |
| २००६-०७ | ११४.३ | १२०.९ | १०८.२ | १११.४ |
| २००७-०८ | १२३.९ | १२१.० | ११३.४ | ११६.६ |
| २००८-०९ | १३७.५ | १३५.० | १२०.४ | १२६.० |
| २००९-१० | १५४.९ | १३२.१ | १२३.१ | १३०.८ |
| २०१०-११ | १८२.४ | १४८.३ | १३०.१ | १४३.३ |
| २०११-१२ | २००.३ | १६९.० | १३९.५ | १५६.१ |
| २०१२-१३ | २२०.० | १८६.५ | १४७.१ | १६७.६ |
| २०१३-१४ | २४१.६ | २०५.४ | १५१.५ | १७७.६ |
| २०१४-१५ | २४८.८ | २०३.५ | १५५.१ | १८१.२ |
| २०१५-१६@* | २५०.३ | १८२.९ | १५३.५ | १७७.३ |
| एप्रिल, २०१५ | २४३.६ | १८४.३ | १५३.९ | १७६.४ |
| मे, २०१५ | २४४.२ | १९२.१ | १५४.३ | १७८.० |
| जून, २०१५ | २४९.१ | १९३.५ | १५४.२ | १७९.१ |
| जुलै, २०१५ | २४६.४ | १८९.८ | १५३.६ | १७७.६ |
| ऑगस्ट, २०१५ | २५०.२ | १७९.३ | १५३.० | १७६.५ |
| सप्टेंबर, २०१५ | २५१.९ | १७५.६ | १५३.३ | १७६.५ |
| ऑक्टोबर, २०१५ | २५३.४ | १७६.४ | १५३.३ | १७६.९ |
| नोव्हेंबर, २०१५ | २५६.२ | १७८.१ | १५३.० | १७७.५ |
| डिसेंबर, २०१५* | २५७.८ | १७६.८ | १५२.६ | १७७.४ |

*आधार* - आर्थिक सल्लागारांचे कार्यालय, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार.

@ ९ महिन्यांची सरासरी * अस्थायी

# परिशिष्ट ४.९

## महत्त्वाच्या किंमती निर्देशांकावर आधारित चलनवाढीचे दर

| वर्ष / महिना | चलन वाढीचे दर | | | |
|---|---|---|---|---|
| | अखिल भारतीय घाऊक किंमती निर्देशांक # | औद्योगिक कामगारांसाठी अखिल भारतीय ग्राहक किंमती निर्देशांक + | शेतमजुरांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमती निर्देशांक + | ग्रामीण मजुरांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमती निर्देशांक + |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| २०००-०१ | ७.१३ | ३.८२ | (-) ०.३३ | ०.०३ |
| २००१-०२ | ३.६२ | ४.३१ | १.०९ | १.३३ |
| २००२-०३ | ३.३८ | ३.९८ | ३.१६ | ३.१३ |
| २००३-०४ | ५.४९ | ३.८५ | ३.९० | ३.७९ |
| २००४-०५ | ६.४८ | ३.८३ | २.६० | २.५८ |
| २००५-०६ | ४.४७ | ४.४१ | ३.८५ | ३.८५ |
| २००६-०७ | ६.५९ | ६.८३ | ७.८५ | ७.५२ |
| २००७-०८ | ४.७४ | ६.४० | ७.४५ | ७.१८ |
| २००८-०९ | ८.०५ | ९.०९ | १०.२३ | १०.१९ |
| २००९-१० | ३.८० | १२.३७ | १३.९१ | १३.७६ |
| २०१०-११ | ९.५६ | १०.४५ | १०.०० | १०.०१ |
| २०११-१२ | ८.९४ | ८.३९ | ८.१९ | ८.३५ |
| २०१२-१३ | ७.३६ | १०.४४ | १०.०३ | १०.१९ |
| २०१३-१४ | ५.९८ | ९.६८ | ११.७४ | ११.४७ |
| २०१४-१५ | २.०० | ७.८६ | ६.६४ | ६.८८ |
| २०१५-१६@ | (-) ३.०० | ५.६५ | ४.१८ | ४.४० |
| एप्रिल, २०१५ | (-) २.४३ | ५.७९ | ४.४१ | ४.६६ |
| मे, २०१५ | (-) २.२० | ५.७४ | ४.३८ | ४.६२ |
| जून, २०१५ | (-) २.१३ | ६.१० | ४.४६ | ४.७० |
| जुलै, २०१५ | (-) ४.०० | ४.३७ | २.८८ | ३.२५ |
| ऑगस्ट, २०१५ | (-) ५.०६ | ४.३५ | २.९७ | ३.२१ |
| सप्टेंबर, २०१५ | (-) ४.५९ | ५.१४ | ३.४५ | ३.६९ |
| ऑक्टोबर, २०१५ | (-) ३.७० | ६.३२ | ४.४३ | ४.६६ |
| नोव्हेंबर, २०१५ | (-) २.०४ | ६.७२ | ४.९२ | ५.०० |
| डिसेंबर, २०१५ | (-) ०.७३* | ६.३२ | ५.७० | ५.८० |

*आधार* - # आर्थिक सल्लागार यांचे कार्यालय, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार.

+ श्रम केंद्र, सिमला, भारत सरकार.

@ ९ महिन्यांची सरासरी * अस्थायी

## परिशिष्ट ४.१०

## जिल्हावार शिधापत्रिकांची संख्या (३१ डिसेंबर,२०१५ रोजी)

| जिल्हा | पिवळी | | केशरी | अन्नपूर्णा | सफेद | एकूण शिधापत्रिका |
|---|---|---|---|---|---|---|
| | दारिद्र्य रेषेखालील | अंत्योदय अन्न योजना | दारिद्र्य रेषेवरील | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र | २८,३२७ | १६,८८९ | ३३,२४,६२२ | ९,२४१ | ८,४८,१५९ | ४२,२७,२३८ |
| ठाणे | ६९,००५ | ४७,४६० | ८२,६६५ | २८६ | ७,४७८ | २,०६,८९४ |
| पालघर | १,०५,९५० | ९५,२६६ | ४,१८,६९८ | १,५७० | ३७,०२६ | ६,५८,५१० |
| रायगड | ९९,८३८ | ८०,००६ | ४,२२,२७४ | १,६५८ | १,०४,८२५ | ७,०८,६०१ |
| रत्नागिरी | ७२,५६८ | ४२,८४० | २,६५,८२२ | ८४० | ४१,११८ | ४,२३,१८८ |
| सिंधुदुर्ग | ४७,६८९ | २३,६३३ | १,४०,७७२ | ३९८ | २२,१८२ | २,३४,६७४ |
| नाशिक | ३,०२,०४७ | १,७९,९२८ | ६,९७,०५८ | ८०२ | ८१,६८६ | १२,६१,५२१ |
| धुळे | १,४२,९१३ | ७६,४०९ | २,०५,३३२ | १,६८६ | १०,४५७ | ४,३६,७९७ |
| नंदुरबार | १,०४,३४७ | १,०५,९१९ | १,०९,३०१ | १,२५० | ८,५४० | ३,२९,३५७ |
| जळगाव | २,१५,७२८ | १,३६,९७४ | ५,२०,२९७ | १,९९६ | ७२,३०१ | ९,४७,२९६ |
| अहमदनगर | ६,१०,७५७ | ९३,५५८ | ३,००,२२० | २,७०१ | ५१,३५४ | १०,५८,५९० |
| पुणे | १,६१,७६६ | ७०,९४७ | १४,८६,३९४ | ९१८ | १,९३,०९३ | १९,१३,११८ |
| सातारा | १,२४,९०१ | ३५,२४० | ४,९३,२६५ | १,५९४ | ५३,६२१ | ७,०८,६२१ |
| सांगली | ६९,३२० | ३५,४३८ | ५,०१,३५८ | ९२४ | ७६,०८७ | ६,८३,१२७ |
| सोलापूर | २,२०,०८२ | ८५,०१० | ६,१८,०७० | १,०९८ | ७२,३४१ | ९,९६,६०१ |
| कोल्हापुर | १,४७,८६८ | ५६,३८५ | ६,५०,४१८ | १७३ | ९५,१११ | ९,४९,९५५ |
| औरंगाबाद | १,७६,९४२ | ७०,२०७ | ५,१२,६५१ | २,३६२ | ९,९१६ | ७,७२,०७८ |
| जालना | १,१४,५४२ | ४२,९७९ | १,८८,०१७ | २,२२० | ५,६३५ | ३,५३,३९३ |
| परभणी | ७४,८५३ | ४४,५८४ | २,४३,४५० | १,९७१ | २,४७० | ३,६७,३२८ |
| हिंगोली | १,३६,६६४ | ३२,२४८ | ७६,४९७ | ९८४ | २,४५५ | २,४८,८४८ |
| बीड | २,४८,४१३ | ४२,९४५ | ३,६८,८९९ | २,२३६ | १३,५८४ | ६,७६,०७७ |
| नांदेड | १,४२,७१० | ८२,१७३ | ४,१९,४०३ | २,०२५ | ९,७४० | ६,५६,०५१ |
| उस्मानाबाद | १,१६,७५० | ३८,५१२ | २,०८,९९४ | ८४१ | ११,६२८ | ३,७६,७२५ |
| लातूर | ८६,८७७ | ४१,१५७ | ३,१४,८५५ | १,८३२ | १८,२०५ | ४,६२,९२६ |
| बुलढाणा | १,४१,६५५ | ६६,०१८ | २,८७,४०६ | ३,०३७ | १९,८४२ | ५,१७,९५८ |
| अकोला | १,५९,१६४ | ४४,१९२ | १,३४,०७८ | १,५३९ | १५,१०७ | ३,५४,०८० |
| वाशिम | ८०,१८० | ४०,४९१ | १,५३,३७६ | १,७७० | १३,४९९ | २,८९,३१६ |
| अमरावती | २,०७,१२५ | १,३३,७९९ | २,९९,८७१ | ३,२९१ | १५,५७० | ६,५९,६५६ |
| यवतमाळ | १,४७,८१९ | १,३०,०१५ | ३,१५,२९८ | ३,४४७ | १७,१११ | ६,१३,६९० |
| वर्धा | ४७,७०० | ४४,२४१ | २,११,२२४ | १,३२० | १९,५७६ | ३,२४,०६१ |
| नागपूर | १,३४,९३३ | १,०४,५८५ | ७,३६,१०३ | ४,२६४ | ७०,८८८ | १०,५०,७७३ |
| भंडारा | ७९,५७२ | ६४,२४९ | ८९,७२१ | ७७३ | २०,३२८ | २,५४,६४३ |
| गोंदिया | ९६,७३९ | ७६,५६१ | १,०३,७०८ | १,२२० | ७,८९९ | २,८६,१२७ |
| चंद्रपुर | १,०३,८१६ | १,३२,६१२ | २,०३,५३२ | १६६ | ३७,६४५ | ४,७७,७७१ |
| गडचिरोली | ४६,१९६ | ९१,७४२ | ७५,३६४ | ० | १०,६६३ | २,२३,९६५ |
| **महाराष्ट्र** | **४८,६५,७५६** | **२५,०५,२१२** | **१,५१,७९,०१३** | **६२,४३३** | **२०,९७,१४०** | **२,४७,०९,५५४** |

*आधार* - अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट ४.११

## अधिकृत शिधावाटप / रास्त भाव दुकानांना देण्यात आलेला तांदूळ व गहू

(लाख मे.टन)

| वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई शिधावाटप क्षेत्र | इतर जिल्हे | एकूण (२) + (३) | मुंबई शिधावाटप क्षेत्र | इतर जिल्हे | एकूण (५) + (६) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| २००१-०२ (एकूण) | ०.०२ | ५.१६ | ५.१८ | ०.०५ | ८.४८ | ८.५३ |
| पैकी, लसाविव्य | ०.०२ | ५.०० | ५.०२ | ०.०४ | ८.२७ | ८.३१ |
| २००७-०८ (एकूण) | ०.१२ | ११.१६ | ११.२८ | ०.३२ | १२.६२ | १२.९४ |
| पैकी, लसाविव्य | ०.०६ | १०.९० | १०.९६ | ०.०६ | ११.८६ | ११.९२ |
| २०११-१२ (एकूण) | ०.६४ | १४.९१ | १५.५५ | १.७४ | १९.४० | २१.१४ |
| पैकी, लसाविव्य | ०.१४ | १३.३० | १३.४४ | ०.०७ | १३.९४ | १४.०१ |
| २०१२-१३ (एकूण) | १.०१ | १५.५३ | १६.५४ | १.८५ | २०.२८ | २२.१३ |
| पैकी, लसाविव्य | ०.१४ | १३.३५ | १३.४९ | ०.०६ | १४.१६ | १४.२२ |
| २०१३-१४ (एकूण) | १.६८ | १५.९२ | १७.६० | १.९५ | १८.५१ | २०.४६ |
| पैकी , लसाविव्य/राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | ०.४८ | १२.३४ | १२.८२ | ०.५५ | १३.५८ | १४.१३ |
| २०१४-१५ (एकूण) | २.१३ | १७.९२ | २०.०५ | २.९३ | २२.७२ | २५.६५ |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | १.८३ | १६.७७ | १८.६० | २.६० | २१.२२ | २३.८२ |
| २०१५-१६ (एकूण)+ | १.५० | १२.०७ | १३.५७ | २.२४ | १५.०० | १७.२४ |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | १.५० | ११.६८ | १३.१८ | २.२४ | १४.४१ | १६.६५ |

+ डिसेंबरपर्यंत

## परिशिष्ट ४.१२

## भारत सरकारकडून राज्याला मिळालेले नियतन

(लाख मे.टन)

| वर्ष | तांदूळ | गहू |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| २००१-०२ (एकूण) | ९.२३ | १७.१३ |
| पैकी, लसाविव्य | ६.५५ | १२.१६ |
| २००७-०८ (एकूण) | १३.६९ | १५.४६ |
| पैकी, लसाविव्य | १३.३५ | १४.०४ |
| २०११-१२ (एकूण) | १९.३६ | ३२.८५ |
| पैकी, लसाविव्य | १६.२३ | १६.९६ |
| २०१२-१३ (एकूण) | २०.७४ | ३१.४५ |
| पैकी, लसाविव्य | १५.५१ | १६.५४ |
| २०१३-१४ (एकूण) | २१.९६ | २५.१९ |
| पैकी , लसाविव्य/राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | १४.४१ | १५.९६ |
| २०१४-१५ (एकूण) | २१.५७ | २७.४७ |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | १९.७८ | २५.२८ |
| २०१५-१६ (एकूण) + | १५.५६ | १९.९६ |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | १५.१४ | १९.३२ |

+ डिसेंबर पर्यंत

*आधार* - अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.

टीप - १. लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्था (लसाविव्य) अंतर्गत व राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ अंतर्गत आकडेवारीमध्ये अंत्योदय अन्न योजनेची आकडेवारी समाविष्ट केलेली आहे.

२. फेब्रुवारी, २०१४ पासून प्राधान्य गट कुटुंबे व अंअयो लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत नियतन प्राप्त होत आहे.

# परिशिष्ट ४.१३

## जिल्हावार उपलब्ध गोदामांची संख्या, क्षमता, रास्त भाव दुकानांची संख्या

| जिल्हा | उपलब्ध गोदामे (जून, २०१५ पर्यंत) | | रास्त भाव दुकानांची संख्या (डिसेंबर, २०१५ पर्यंत) |
|---|---|---|---|
| | संख्या | क्षमता (मे.टन) | |
| (१) | (२) | (३) | (४) |
| मुंबई | ९ | ७,८०७ | ३,७२० |
| ठाणे | १३ | ६,५०० | ५९३ |
| पालघर | २२ | ८,९५० | १,०९२ |
| रायगड | ३१ | २५,८२५ | १,३२२ |
| रत्नागिरी | २६ | ११,५५० | ९४१ |
| सिंधुदुर्ग | १८ | ८,०९० | ४२८ |
| नाशिक | २९ | १४,७०० | २,६०० |
| धुळे | २० | ११,४९० | ९८४ |
| नंदुरबार | २६ | १३,००० | १,०४३ |
| जळगाव | ४३ | २०,९३० | १,९२१ |
| अहमदनगर | ४१ | ३२,०५० | १,६७५ |
| पुणे | ४३ | ३७,५८० | ३,०१९ |
| सातारा | ४३ | १५,४९० | १,६१४ |
| सांगली | २८ | १७,७७० | १,३५१ |
| सोलापूर | ६५ | ५३,१२४ | १,८७१ |
| कोल्हापुर | २२ | १६,७५० | १,५७७ |
| औरंगाबाद | २९ | ३०,२०६ | १,७७९ |
| जालना | २० | १८,९०० | १,२८६ |
| परभणी | २३ | १०,६०० | १,१७८ |
| हिंगोली | १० | ६,१०० | ७९५ |
| बीड | ३२ | २५,२४० | २,०२३ |
| नांदेड | ४५ | २३,२४० | १,९७३ |
| उस्मानाबाद | २७ | १६,४०० | १,०७० |
| लातूर | २३ | १९,००० | १,३५० |
| बुलढाणा | ३४ | १३,७३० | १,५३६ |
| अकोला | २५ | १२,९०० | १,०५२ |
| वाशिम | १४ | ८,१५० | ७७४ |
| अमरावती | ३५ | १५,८५० | १,९०६ |
| यवतमाळ | ३४ | १७,००० | २,०१० |
| वर्धा | १७ | ९,६८५ | ८३८ |
| नागपूर | ५३ | २९,१५५ | १,९५३ |
| भंडारा | १४ | ८,००० | ८८८ |
| गोंदिया | ११ | १०,०५० | १,००३ |
| चंद्रपुर | ३२ | १५,२५० | १,५२५ |
| गडचिरोली | २७ | २२,२०० | १,२२० |
| **महाराष्ट्र** | **९८४** | **६,१३,२६२** | **५१,९१०** |

*आधार* - अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

# परिशिष्ट ४.१४

## अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत सन २०१४-१५ करीता नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना अन्नधान्याचे वाटप

(मे.टन)

| जिल्हा | नियतन | | | उचल | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तांदूळ | गहू | एकूण | तांदूळ | गहू | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| मुंबई | ५,६२८ | २,२५६ | ७,८८४ | ५,१३३ | २,०२७ | ७,१६० |
| ठाणे @ | ४२,३८४ | १६,९५६ | ५९,३४० | ४०,९२७ | १६,००४ | ५६,९३१ |
| रायगड | २१,८७६ | ८,७४८ | ३०,६२४ | २१,०२३ | ८,७४८ | २९,७७१ |
| रत्नागिरी | १२,७९२ | ५,११२ | १७,९०४ | १२,७७३ | ५,१११ | १७,८८४ |
| सिंधुदुर्ग | ७,०४४ | २,८२० | ९,८६४ | ६,६७७ | २,८२० | ९,४९७ |
| **कोकण विभाग** | **८९,७२४** | **३५,८९२** | **१,२५,६१६** | **८६,५३३** | **३४,७१०** | **१,२१,२४३** |
| नाशिक | ३२,३५२ | ४३,१४० | ७५,४९२ | ३०,९२० | ४१,०४८ | ७१,९६८ |
| धुळे | १३,५८४ | १८,१२० | ३१,७०४ | १२,३१२ | १५,९९९ | २८,३११ |
| नंदुरबार | ३१,७७६ | १२,७०८ | ४४,४८४ | ३१,१७७ | १२,८५२ | ४४,०२९ |
| जळगाव | २४,६४८ | ३२,८६८ | ५७,५१६ | २२,९५४ | २९,७३९ | ५२,६९४ |
| अहमदनगर | १७,०४० | २२,७१६ | ३९,७५६ | १४,८८२ | २०,८३३ | ३५,७१४ |
| **नाशिक विभाग** | **१,१९,४००** | **१,२९,५५२** | **२,४८,९५२** | **१,१२,२४५** | **१,२०,४७१** | **२,३२,७१६** |
| पुणे ग्रामीण | १०,०४४ | १३,३९२ | २३,४३६ | ८,९५१ | ११,९४६ | २०,८९७ |
| पुणे शहर | २,७१२ | ३,६२४ | ६,३३६ | २,६०३ | ३,५०२ | ६,१०५ |
| सातारा | ६,३८४ | ८,५२० | १४,९०४ | ६,३५९ | ८,४९५ | १४,८५४ |
| सांगली | ६,४४४ | ८,५९२ | १५,०३६ | ६,०७९ | ८,२१७ | १४,२९५ |
| सोलापुर ग्रामीण | १४,००४ | १८,६७२ | ३२,६७६ | ११,९६० | १७,६०१ | २९,५६१ |
| सोलापुर शहर | १,२९६ | १,७२८ | ३,०२४ | १,२९६ | १,७२८ | ३,०२४ |
| कोल्हापुर | ११,२०८ | १४,९५२ | २६,१६० | १०,२०९ | १३,१५१ | २३,३६० |
| **पुणे विभाग** | **५२,०९२** | **६९,४८०** | **१,२१,५७२** | **४७,४५७** | **६४,६४०** | **१,१२,०९६** |
| औरंगाबाद | १२,५८८ | १६,७७६ | २९,३६४ | १२,४५३ | १६,५९७ | २९,०५० |
| जालना | ७,७४० | १०,३२० | १८,०६० | ७,१५१ | ९,५८७ | १६,७३८ |
| परभणी | ७,९२० | १०,५६० | १८,४८० | ७,९२० | १०,३२० | १८,२४० |
| हिंगोली | ४,९२० | ६,५५२ | ११,४७२ | ४,९२० | ६,५५२ | ११,४७२ |
| बीड | ७,७६४ | १०,३५६ | १८,१२० | ७,५५९ | १०,३२२ | १७,८८१ |
| नांदेड | १४,०७६ | १८,७५६ | ३२,८३२ | १४,०७६ | १८,४१२ | ३२,४८८ |
| उस्मानाबाद | ७,०४४ | ९,३९६ | १६,४४० | ६,६६३ | ८,८२७ | १५,४९० |
| लातुर | ७,३८० | ९,८२८ | १७,२०८ | ७,३८० | ९,८२८ | १७,२०८ |
| **औरंगाबाद विभाग** | **६९,४३२** | **९२,५४४** | **१,६१,९७६** | **६८,१२२** | **९०,४४५** | **१,५८,५६७** |
| अमरावती | २१,८५२ | २९,१२४ | ५०,९७६ | २१,८५२ | २९,१२४ | ५०,९७६ |
| अकोला | ८,४४८ | ११,२६८ | १९,७१६ | ७,७४५ | १०,२९६ | १८,०४१ |
| वाशिम | ७,२९६ | ९,७३२ | १७,०२८ | ७,२९६ | ९,६०२ | १६,८९८ |
| बुलढाणा | ११,५९२ | १५,४६८ | २७,०६० | ११,०५९ | १४,५८३ | २५,६४२ |
| यवतमाळ | २०,०४० | २६,७१२ | ४६,७५२ | १८,८३७ | २५,६५० | ४४,४८७ |
| **अमरावती विभाग** | **६९,२२८** | **९२,३०४** | **१,६१,५३२** | **६६,७८९** | **८९,२५५** | **१,५६,०४४** |
| नागपुर ग्रामीण | १२,३७२ | १६,५०० | २८,८७२ | १२,३७२ | १५,९४१ | २८,३१३ |
| नागपुर शहर | ६,००० | ८,००४ | १४,००४ | ६,००० | ८,००४ | १४,००४ |
| वर्धा | ७,७८८ | १०,३८० | १८,१६८ | ७,७८८ | १०,३८० | १८,१६८ |
| भंडारा | १२,०२० | १४,५४७ | २६,५६७ | १२,०२० | १४,५४७ | २६,५६७ |
| गोंदिया | १४,३५२ | १७,३७७ | ३१,७२९ | १४,३५२ | १६,८५३ | ३१,२०५ |
| चंद्रपुर | २३,६०४ | ३१,४६४ | ५५,०६८ | २२,९४३ | ३१,१४८ | ५४,०९१ |
| गडचिरोली | २७,२२८ | १०,८८४ | ३८,११२ | ९,८५६ | २६,०६६ | ३५,९२२ |
| **नागपुर विभाग** | **१,०३,३६४** | **१,०९,१५६** | **२,१२,५२०** | **८५,३३१** | **१,२२,९३९** | **२,०८,२७०** |
| **महाराष्ट्र** | **५,०३,२४०** | **५,२८,९२८** | **१०,३२,१६८** | **४,६६,४७७** | **५,२२,४६०** | **९,८८,९३७** |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ४.१४ (पुढे चालू)

## अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत सन २०१४-१५ करीता नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना अन्नधान्याचे वाटप

(मे.टन)

| जिल्हा | रास्तभाव दुकानांना वाटप | | |
|---|---|---|---|
| | तांदूळ | गहू | एकूण |
| (१) | (८) | (९) | (१०) |
| मुंबई | ५,१३३ | २,०२७ | ७,१६० |
| ठाणे | ४१,४२९ | १६,३०० | ५७,७२९ |
| रायगड | २१,८७६ | ८,७४८ | ३०,६२४ |
| रत्नागिरी | १२,५५५ | ५,०३१ | १७,५८६ |
| सिंधुदुर्ग | ६,९२६ | २,७६४ | ९,६९० |
| **कोकण विभाग** | **८७,९१९** | **३४,८७०** | **१,२२,७८९** |
| नाशिक | ३०,९७९ | ४०,९५६ | ७१,९३५ |
| धुळे | १३,२४२ | १७,८२५ | ३१,०६७ |
| नंदुरबार | २९,४२७ | १२,०३९ | ४१,४६६ |
| जळगाव | २३,९३१ | ३१,९३५ | ५५,८६६ |
| अहमदनगर | १६,१०८ | २१,४३० | ३७,५३८ |
| **नाशिक विभाग** | **१,१३,६८७** | **१,२४,१८५** | **२,३७,८७२** |
| पुणे ग्रामीण | ८,७३३ | ११,७३४ | २०,४६७ |
| पुणे शहर | २,६०२ | ३,५०१ | ६,१०३ |
| सातारा | ६,२०५ | ८,२९४ | १४,४९९ |
| सांगली | ६,१०५ | ८,१८३ | १४,२८८ |
| सोलापुर ग्रामीण | १३,९५० | १८,५९४ | ३२,५४४ |
| सोलापुर शहर | १,२३३ | १,६१२ | २,८४५ |
| कोल्हापुर | १०,१८७ | १३,५७९ | २३,७६६ |
| **पुणे विभाग** | **४९,०१५** | **६५,४९७** | **१,१४,५१२** |
| औरंगाबाद | १२,४५३ | १६,५९७ | २९,०५० |
| जालना | ७,१५१ | ९,५८७ | १६,७३८ |
| परभणी | ७,९२० | १०,३२० | १८,२४० |
| हिंगोली | ४,९२० | ६,५५२ | ११,४७२ |
| बीड | ७,५५९ | १०,३२२ | १७,८८१ |
| नांदेड | १४,०७६ | १८,४१२ | ३२,४८८ |
| उस्मानाबाद | ६,६६३ | ८,८२७ | १५,४९० |
| लातुर | ७,३८० | ९,८२८ | १७,२०८ |
| **औरंगाबाद विभाग** | **६८,१२२** | **९०,४४५** | **१,५८,५६७** |
| अमरावती | २१,८५२ | २९,१२४ | ५०,९७६ |
| अकोला | ७,४३६ | ९,९०१ | १७,३३७ |
| वाशिम | ७,२४१ | ९,६६२ | १६,९०३ |
| बुलढाणा | १२,०५२ | १६,०७२ | २८,१२४ |
| यवतमाळ | १९,२०४ | २६,९४७ | ४६,१५१ |
| **अमरावती विभाग** | **६७,७८५** | **९१,७०६** | **१,५९,४९१** |
| नागपुर ग्रामीण | १२,३७२ | १५,९४१ | २८,३१३ |
| नागपुर शहर | ६,००० | ८,००४ | १४,००४ |
| वर्धा | ७,६२३ | १०,३०३ | १७,९२६ |
| भंडारा | १२,०२० | १४,५४७ | २६,५६७ |
| गोंदिया | १५,६१० | १७,६७९ | ३३,२९० |
| चंद्रपुर | २२,९३१ | ३१,१३६ | ५४,०६७ |
| गडचिरोली | २६,७२० | १०,६८२ | ३७,४०२ |
| **नागपुर विभाग** | **१,०३,२७६** | **१,०८,२९२** | **२,११,५६८** |
| **महाराष्ट्र** | **४,८९,८०४** | **५,१४,९९५** | **१०,०४,७९९** |

*आधार* - अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन @ ठाणे जिल्ह्यामध्ये पालघर समाविष्ट

## परिशिष्ट ४.१५

### अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत सन २०१५-१६ करीता डिसेंबर पर्यंत नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना अन्नधान्याचे वाटप

(मे.टन)

| जिल्हा | नियतन | | | उचल | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तांदूळ | गहू | एकूण | तांदूळ | गहू | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| मुंबई | ३,३६० | २,६६५ | ६,०२५ | २,७८२ | २,१८१ | ४,९६३ |
| ठाणे | १२,८९६ | ५,१५४ | १८,०५० | १२,४९७ | ५,१५४ | १७,६५१ |
| पालघर | २१,३२४ | ८,५३० | २९,८५४ | १८,२८६ | ७,२९२ | २५,५७८ |
| रायगड | १७,०४३ | ६,८११ | २३,८५४ | १६,६९३ | ६,३१२ | २३,००५ |
| रत्नागिरी | ९,३२५ | ३,७२७ | १३,०५२ | ८,८०७ | ३,५८८ | १२,३९५ |
| सिंधुदुर्ग | ७,४९० | ५,५१० | १३,००० | ६,३५३ | ४,३८८ | १०,७४१ |
| **कोकण विभाग** | **७१,४३८** | **३२,३९७** | **१,०३,८३५** | **६५,४१८** | **२८,९१५** | **९४,३३३** |
| नाशिक | २१,५३१ | ३१,६६३ | ५३,१९४ | १८,८४६ | २५,६१० | ४४,४५६ |
| धुळे | ११,२६३ | १३,६९८ | २४,९६१ | ११,२६२ | १३,६९८ | २४,९६० |
| नंदुरबार | २३,२३८ | ११,२११ | ३४,४४९ | २२,६८२ | ११,००३ | ३३,६८५ |
| जळगाव | १६,८९३ | २२,१९४ | ३९,०८७ | १६,७२४ | १९,३८० | ३६,१०४ |
| अहमदनगर | ११,४२० | १६,७५७ | २८,१७७ | ११,१०३ | १५,२८६ | २६,३८९ |
| **नाशिक विभाग** | **८४,३४५** | **९५,५२३** | **१,७९,८६८** | **८०,६१७** | **८४,९७७** | **१,६५,५९४** |
| पुणे ग्रामीण | ६,६०७ | ९,७३४ | १६,३४१ | ६,५९० | ९,६४५ | १६,२३५ |
| पुणे शहर | २,२९१ | ३,३१५ | ५,६०६ | २,०२२ | २,९१३ | ४,९३५ |
| सातारा | ४,५८३ | ६,६९७ | ११,२८० | ४,४९२ | ६,५४२ | ११,०३४ |
| सांगली | ५,२९५ | ७,६६२ | १२,९५७ | ५,११४ | ७,४५२ | १२,५६६ |
| सोलापुर ग्रामीण | ८,४५७ | १२,४७१ | २०,९२८ | ७,७१७ | ११,८१५ | १९,५३२ |
| सोलापुर शहर | २,२०२ | ३,१३४ | ५,३३६ | १,६५५ | २,२९७ | ३,९५२ |
| कोल्हापुर | ८,०८७ | ११,८०० | १९,८८७ | ७,२५८ | १०,७१० | १७,९६८ |
| **पुणे विभाग** | **३७,५२२** | **५४,८१३** | **९२,३३५** | **३४,८४८** | **५१,३७४** | **८६,२२२** |
| औरंगाबाद | ८,९३२ | १३,१२२ | २२,०५४ | ८,२४० | ११,९९७ | २०,२३७ |
| जालना | ५,५१२ | ८,०५४ | १३,५६६ | ५,५१२ | ८,०५४ | १३,५६६ |
| परभणी | ५,४८० | ८,०४१ | १३,५२१ | ५,४८० | ८,०४१ | १३,५२१ |
| हिंगोली | ४,२०७ | ६,१३७ | १०,३४४ | ४,१८६ | ६,१०४ | १०,२९० |
| बीड | ६,०४१ | ८,७६१ | १४,८०२ | ५,९७२ | ८,६५७ | १४,६२९ |
| नांदेड | ९,८१० | १४,४२१ | २४,२३१ | ९,८१० | १४,४२१ | २४,२३१ |
| उस्मानाबाद | ५,०३८ | ७,३५६ | १२,३९४ | ५,०३८ | ७,३५६ | १२,३९४ |
| लातुर | ६,४८९ | ९,३२२ | १५,८११ | ६,४८३ | ९,३१२ | १५,७९५ |
| **औरंगाबाद विभाग** | **५१,५०९** | **७५,२१४** | **१,२६,७२३** | **५०,७२१** | **७३,९४२** | **१,२४,६६३** |
| अमरावती | १५,५०५ | १८,५६५ | ३४,०७० | १५,५०५ | १६,४१६ | ३१,९२१ |
| अकोला | ६,२४७ | ७,३९६ | १३,६४३ | ५,५२७ | ६,९१८ | १२,४४५ |
| वाशिम | ५,९४२ | ७,९२४ | १३,८६६ | ५,३८४ | ७,४०३ | १२,७८७ |
| बुलढाणा | ९,५५२ | १२,१२६ | २१,६७८ | ९,४५४ | ११,४०६ | २०,८६० |
| यवतमाळ | १४,६९९ | १९,५९६ | ३४,२९५ | १४,३९० | १९,३१३ | ३३,७०३ |
| **अमरावती विभाग** | **५१,९४५** | **६५,६०६** | **१,१७,५५१** | **५०,२६०** | **६१,४५६** | **१,११,७१६** |
| नागपुर ग्रामीण | ८,८५३ | ११,६३९ | २०,४९२ | ८,८५३ | ११,४७८ | २०,३३१ |
| नागपुर शहर | ४,७९६ | ६,३९७ | ११,१९३ | ४,७९६ | ६,३९७ | ११,१९३ |
| वर्धा | ६,८७१ | ७,६८५ | १४,५५६ | ६,८७१ | ७,६८५ | १४,५५६ |
| भंडारा | १४,७१२ | ५,८८२ | २०,५९४ | १४,७१२ | ५,८८२ | २०,५९४ |
| गोंदिया | १७,२५४ | ८,७३३ | २५,९८७ | १७,२५२ | ७,८९१ | २५,१४३ |
| चंद्रपुर | १८,१५९ | २२,०९३ | ४०,२५२ | १७,६२३ | २०,२६३ | ३७,८८६ |
| गडचिरोली | ६१,५२९ | ५०,१३१ | १,११,६६० | ६०,८०९ | ४८,०१९ | १,०८,८२८ |
| **नागपुर विभाग** | **१,३२,१७४** | **१,१२,५६०** | **२,४४,७३४** | **१,३०,९१६** | **१,०७,६१५** | **२,३८,५३१** |
| **महाराष्ट्र** | **४,२८,९३३** | **४,३६,११४** | **८,६५,०४७** | **४,१२,७८०** | **४,०८,२७९** | **८,२१,०५९** |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ४.१५ (पुढे चालू)

### अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत सन २०१५-१६ करीता डिसेंबर पर्यंत नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना अन्नधान्याचे वाटप

(मे.टन)

| जिल्हा | रास्तभाव दुकानांना वाटप | | |
|---|---|---|---|
| | तांदूळ | गहू | एकूण |
| (१) | (८) | (९) | (१०) |
| मुंबई | २,७८२ | २,१८१ | ४,९६३ |
| ठाणे | ११,७८८ | ४,७६४ | १६,५५२ |
| पालघर | १८,१०७ | ७,३०२ | २५,४०९ |
| रायगड | १६,६७१ | ६,३०३ | २२,९७४ |
| रत्नागिरी | ८,८२० | ३,५५९ | १२,३७९ |
| सिंधुदुर्ग | ६,८४७ | ४,३४० | ११,१८७ |
| **कोकण विभाग** | **६५,०१५** | **२८,४४९** | **९३,४६४** |
| नाशिक | १७,७३१ | २४,००० | ४१,७३१ |
| धुळे | ११,२२९ | १३,३०३ | २४,५३२ |
| नंदुरबार | २०,९०८ | १०,३२८ | ३१,२३६ |
| जळगाव | १६,१८९ | १८,६०४ | ३४,७९३ |
| अहमदनगर | ११,२७६ | १५,५६२ | २६,८३८ |
| **नाशिक विभाग** | **७७,३३३** | **८१,७९७** | **१,५९,१३०** |
| पुणे ग्रामीण | ६,५९० | ९,६४५ | १६,२३५ |
| पुणे शहर | १,९६८ | २,८७० | ४,८३८ |
| सातारा | ४,३९१ | ६,३६४ | १०,७५५ |
| सांगली | ४,९५२ | ७,२७१ | १२,२२३ |
| सोलापुर ग्रामीण | ८,३५४ | १२,३४१ | २०,६९५ |
| सोलापुर शहर | १,४८५ | १,८०७ | ३,२९२ |
| कोल्हापुर | ७,२५८ | १०,७९० | १८,०४८ |
| **पुणे विभाग** | **३४,९९८** | **५१,०८८** | **८६,०८६** |
| औरंगाबाद | ८,२४० | ११,९९२ | २०,२३२ |
| जालना | ५,४२४ | ७,९६० | १३,३८४ |
| परभणी | ५,४८० | ८,०४१ | १३,५२१ |
| हिंगोली | ४,०७९ | ५,८३४ | ९,९१३ |
| बीड | ५,९७२ | ८,६५७ | १४,६२९ |
| नांदेड | ९,७४१ | १४,३१७ | २४,०५८ |
| उस्मानाबाद | ५,०३८ | ७,३५६ | १२,३९४ |
| लातुर | ६,०२१ | ८,६०० | १४,६२१ |
| **औरंगाबाद विभाग** | **४९,९९५** | **७२,७५७** | **१,२२,७५२** |
| अमरावती | १४,८५८ | १५,५८२ | ३०,४४० |
| अकोला | ५,६०५ | ६,६०० | १२,२०५ |
| वाशिम | ५,६२७ | ७,५७३ | १३,२०० |
| बुलढाणा | ८,८६३ | ११,५४० | २०,४०३ |
| यवतमाळ | १३,३६६ | १७,८११ | ३१,१७७ |
| **अमरावती विभाग** | **४८,३१९** | **५९,१०६** | **१,०७,४२५** |
| नागपुर ग्रामीण | ८,२७१ | १०,७०६ | १८,९७७ |
| नागपुर शहर | ४,६७७ | ६,१४५ | १०,८२२ |
| वर्धा | ६,३०४ | ६,९८६ | १३,२९० |
| भंडारा | १३,७५६ | ५,६३० | १९,३८६ |
| गोंदिया | १६,९८३ | ८,६२६ | २५,६०९ |
| चंद्रपुर | १७,३१४ | २१,२३७ | ३८,५५१ |
| गडचिरोली | ५७,८६६ | ४६,६६३ | १,०४,५२९ |
| **नागपुर विभाग** | **१,२५,१७१** | **१,०५,९९३** | **२,३१,१६४** |
| **महाराष्ट्र** | **४,००,८३१** | **३,९९,१९०** | **८,००,०२१** |

*आधार* – अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

५

# लोकवित्त

# ५. लोकवित्त

## अर्थसंकल्प २०१५-१६

५.१ सन २०१५-१६ चा अर्थसंकल्प अनुक्रमे ₹ २,३०,१६९ कोटी व ₹ २,३०,०६२ कोटींच्या अपेक्षित एकूण जमा व खर्चासह सादर करण्यात आला. या वर्षात ₹ ३,७५७ कोटी महसुली तूट अपेक्षित आहे. सन २०१५-१६ मध्ये वित्तीय तूट राज्य उत्पन्नाच्या १.६ टक्के अपेक्षित असून ती चौदाव्या वित्त आयोगाने घालून दिलेल्या मर्यादेत आहे. दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प तक्ता ५.१ मध्ये व तपशील परिशिष्ट ५.१ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.१ दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प**

(₹ कोटी)

| बाब | २०१३-१४ (प्रत्यक्ष) | २०१४-१५ (सुअं) | २०१५-१६ (अअं) |
|---|---|---|---|
| १. महसुली जमा | १,४९,८२२ | १,८०,७९४ | १,९८,२३१ |
| २. महसुली खर्च | १,५४,९०२ | १,९४,६७७ | २,०१,९८८ |
| ३. महसुली तूट (२-१) | ५,०८१ | १३,८८३ | ३,७५७ |
| *स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी* | ०.३ | ०.८ | ०.२ |
| ४. भांडवली जमा # | २७,५१३ | ३७,६३३ | ३१,९३९ |
| ५. भांडवली खर्च # | २१,६६६ | २४,३९८ | २८,०७४ |
| ६. एकूण जमा (१+४) # | १,७७,३३५ | २,१८,४२७ | २,३०,१६९ |
| ७. एकूण खर्च (२+५) # | १,७६,५६८ | २,१९,०७५ | २,३०,०६२ |
| ८. अर्थसंकल्पीय तूट (७-६) | (-)७६७ | ६४८ | (-)१०७ |
| ९. वित्तीय तूट | २६,०१८ | ३७,२४६ | ३०,७३३ |
| *स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी* | १.६ | २.१ | १.६ |

सुअं - सुधारित अंदाज अअं-अर्थसंकल्पीय अंदाज #कर्ज परताव्याच्या निव्वळ रकमा
टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळणार नाहीत
*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

### महसुली जमा

५.२ सन २०१५-१६ साठी एकूण महसुली जमा ₹ १,९८,२३१ कोटी अपेक्षित असून त्यात मागील वर्षाच्या तुलनेत ९.६ टक्के वाढ अपेक्षित आहे.

### कर महसूल

५.३ सन २०१५-१६ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत एकूण कर महसुलात १६.९ टक्के वाढ अपेक्षित असून एकूण महसुली जमेत कर महसुलाचा ८०.६ टक्के वाटा अपेक्षित आहे. कर महसूल तक्ता ५.२ मध्ये दिला आहे.

५.४ राज्याचा स्वत:चा कर महसूल मागील पाच वर्षात ६.७ टक्के वार्षिक चक्रवाढ वृद्धीदराने (CAGR) वाढला. सन २०१५-१६ करिता कर महसुलातील व एकूण महसुली जमेमधील राज्याच्या स्वत:च्या कर महसुलाचा हिस्सा अनुक्रमे ८१.८ टक्के व ६५.९ टक्के अपेक्षित आहे. जरी मागील वर्षाच्या तुलनेत सन २०१५-१६ मध्ये राज्याच्या स्वत:च्या कर महसूलात ९.८ टक्के वाढ अपेक्षित असून त्याची राज्य उत्पन्नाशी असलेली टक्केवारी ६.६ टक्के इतकी अपेक्षित आहे. राज्याच्या स्वत:च्या कर महसुलात मूल्यवर्धित कराचा सर्वाधिक हिस्सा (५७.१ टक्के) असून त्या खालोखाल मुद्रांक व नोंदणी शुल्काचा हिस्सा १६.१ टक्के आहे. राज्याचा स्वत:च्या कर महसुलाचा तपशील परिशिष्ट ५.२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.२ कर महसूल**

(₹ कोटी)

| वर्ष | राज्याचा स्वत:चा कर महसूल | केंद्रीय करातील हिस्सा | एकूण |
|---|---|---|---|
| २०१०-११ | ७५,०२८ | ११,४१९ | ८६,४४७ |
| २०११-१२ | ८७,६४८ | १३,३०४ | १,००,९५२ |
| २०१२-१३ | १,०३,४४८ | १५,१९२ | १,१८,६४० |
| २०१३-१४ | १,०८,६४१ | १६,५८८ | १,२५,२२८ |
| २०१४-१५ (सुअं) | १,१९,००८ | १७,६०७ | १,३६,६१५ |
| २०१५-१६ (अअं) | १,३०,६३५ | २९,०६२ | १,५९,६९७ |

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळणार नाहीत
*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

५.५ चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार वाटणीयोग्य कर संकलनातील राज्याचा हिस्सा ३२ टक्क्यांवरुन ४२ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आला आहे. राज्यांना केंद्रीय करापासून प्राप्त निधीपैकी वितरणासाठी निश्चित केलेल्या (सेवाकरांव्यतिरिक्त) राज्याच्या हिश्श्यात ५.१९९ टक्क्यांवरुन ५.५२१ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे आणि राज्याचा सेवा करातील हिस्सा ५.२८१ टक्क्यांवरुन वाढून तो ५.६७४ टक्के झाला आहे. राज्याला सन २०१५-१६ करिता केंद्रीय करात मागील वर्षाच्या तुलनेत ६५.१ टक्के अधिक हिस्सा मिळणे अपेक्षित आहे.

## करेतर महसूल

५.६ सन २०१५-१६ मध्ये ₹ ३८,५३४ कोटी करेतर महसुल अपेक्षित असून एकूण महसुली जमेतील अपेक्षित हिस्सा १९.४ टक्के आहे. केंद्र पुरस्कृत योजनांच्या निधी वितरणाच्या पद्धतीत (चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार) केलेल्या बदलामुळे सन २०१५-१६ मध्ये केंद्रीय अनुदानात ४१.७ टक्के घट अपेक्षित आहे. करेतर महसूल तक्ता ५.३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.३ करेतर महसूल**

(₹ कोटी)

| वर्ष | व्याजाच्या जमा रकमा | इतर करेतर महसूल | केंद्रीय अनुदाने | एकूण करेतर महसूल |
|---|---|---|---|---|
| २०१०-११ | १,४२२ | ६,८०३ | ११,१९६ | १९,४२१ |
| २०११-१२ | १,३५९ | ६,८०९ | १२,१६६ | २०,३३४ |
| २०१२-१३ | २,४६५ | ७,५२० | १४,३२२ | २४,३०७ |
| २०१३-१४ | ३,९३४ | ७,४१८ | १३,२४१ | २४,५९३ |
| २०१४-१५ (सुअं) | २,९७४ | १०,५४६ | ३०,६५९ | ४४,१७९ |
| २०१५-१६ (अअं) | २,९७४ | १७,६९१ | १७,८६९ | ३८,५३४ |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## चौदाव्या वित्त आयोगांतर्गत सहाय्यक अनुदाने

५.७ केंद्रीय करातील वाढीव हिस्सा व केंद्र पुरस्कृत योजनांच्या निधी वितरणाच्या पद्धतीत केलेला बदल या व्यतिरिक्त चौदाव्या वित्त आयोगाने सहाय्यक अनुदानांबाबत खालील शिफारशी केल्या आहेत :

- राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राप्त होणाऱ्या अनुदानाचे ग्रामीण व नागरी लोकसंख्येस अनुसरुन मूलभूत अनुदान व कामगिरीवर आधारित अनुदान अशा दोन भागात विभाजन करण्यात आले असून ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता मूलभूत अनुदान व कामगिरीवर आधारित अनुदान यांचे प्रमाण अनुक्रमे ९०:१० व ८०:२० असे राहील.
- वस्तू व सेवा कर लागू केल्यानंतर केंद्र व राज्यांच्या राज्य आपत्ती निवारण निधीतील योगदानाचे प्रमाण ९०:१० असे राहील.

५.७.१ सन २०१५-१६ करिता राज्याला ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता अनुक्रमे ₹ १,६२३ कोटी व ₹ १,१९१ कोटी मूलभूत अनुदान प्राप्त होणे अपेक्षित आहे, तर कामगिरीवर आधारित अनुदान सन २०१६-१७ पासून देण्यात येणार आहे. सन २०१५-१६ मध्ये राज्य आपत्ती निवारण निधीतील केंद्राच्या हिश्श्यापोटी राज्याला ₹ १,११२ कोटी मिळणे अपेक्षित आहे.

## महसुली खर्च

५.८ महसुली खर्च प्रामुख्याने वेतन व मजुरी, निवृत्तीवेतन आणि व्याजप्रदाने यावर केला जातो. ऋणभारात वाढ होत असल्याने व्याज प्रदानांचा राज्याच्या महसुलावरील भार सातत्याने वाढत आहे. महसुली खर्चाचे घटक तक्ता ५.४ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ५.४ महसुली खर्चाचे घटक**

(₹ कोटी)

| वर्ष | वेतन व मजुरी | निवृत्ती वेतन | व्याज | इतर | एकूण महसुली खर्च |
|---|---|---|---|---|---|
| २०१०-११ | ४१,७४६<br>(३९.२) | ९,८८६<br>(९.३) | १५,६४८<br>(१४.७) | ३९,१७९<br>(३६.८) | १,०६,४५९<br>(१००.०) |
| २०११-१२ | ४५,४६७<br>(३६.८) | ११,६८२<br>(९.५) | १७,५०५<br>(१४.२) | ४८,९००<br>(३९.६) | १,२३,५५४<br>(१००.०) |
| २०१२-१३ | ५३,२९५<br>(३८.४) | १३,४३०<br>(९.७) | १९,०७६<br>(१३.७) | ५२,९३५<br>(३८.२) | १,३८,७३६<br>(१००.०) |
| २०१३-१४ | ५९,७३५<br>(३८.६) | १५,१८६<br>(९.८) | २१,२०७<br>(१३.७) | ५८,७७४<br>(३७.९) | १,५४,९०२<br>(१००.०) |
| २०१४-१५ (सुअं) | ६६,२१३<br>(३४.०) | १७,६३३<br>(९.१) | २४,२८३<br>(१२.५) | ८६,५४८<br>(४४.५) | १,९४,६७७<br>(१००.०) |
| २०१५-१६ (अअं) | ७३,४३८<br>(३६.४) | १९,९२९<br>(९.९) | २७,६६३<br>(१३.७) | ८०,९५८<br>(४०.१) | २,०१,९८८<br>(१००.०) |

टीप : *कंसातील आकडे महसुली खर्चाशी टक्केवारी दर्शवितात.*

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

५.९ सन २०१५-१६ साठी विकास खर्च एकूण महसुली खर्चाच्या ६३.४ टक्के इतका अपेक्षित आहे. त्यापैकी ६६.३ टक्के खर्च हा शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, इ. सामाजिक सेवांवर होणे अपेक्षित आहे. विकासेतर खर्च मागील वर्षाच्या तुलनेत १६.२ टक्क्यांनी अधिक अपेक्षित असून त्याचा एकूण महसुली खर्चातील हिस्सा ३६.६ टक्के असेल. महसुली खर्चाचा तपशील परिशिष्ट ५.३ मध्ये दिला आहे.

## अर्थसहाय्य

५.१० राज्य शासन काही विशिष्ट अत्यावश्यक वस्तू व सेवा जनतेला किफायतशीर दराने उपलब्ध होण्याकरिता अर्थसहाय्य पुरवते. सन २०१५-१६ करिता तरतूद केलेली प्रमुख अर्थसहाय्ये पुढीलप्रमाणे आहेत :

- कृषि व यंत्रमागासाठी सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.यांना भरपाईपोटी ₹ ४,९६३ कोटी.
- विशाल औद्योगिक प्रकल्पांसह औद्योगिक घटकांसाठी ₹ ३,१५० कोटी.
- जेष्ठ नागरिक, विद्यार्थी, स्वातंत्र्य सैनिक, इत्यादींना दिलेल्या प्रवास खर्चातील सवलतींमुळे होणाऱ्या तोट्याची भरपाई करण्याकरिता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास ₹ १,६१३ कोटी.
- अन्न सुरक्षा अधिनियम,२०१३ च्या अंमलबजावणीसाठी समाजातील दारिद्र्य रेषेखालील व दारिद्र्य रेषेवरील काही घटकांना अन्नधान्य खरेदी किंमतीपेक्षा कमी दरात वितरण करणेसाठी ₹ ९१० कोटी.

## कर वसुली

५.११ सन २०१३-१४ मध्ये आकारलेला परंतु वसूल न झालेला एकूण कर ₹ ४८,६६८ कोटी होता, जो मागील वर्षाच्या तुलनेत २३.७ टक्क्यांनी जास्त होता. एकूण आकारलेल्या परंतु वसूल न झालेल्या करापैकी सुमारे निम्मी रक्कम विवादास्पद होती.

५.१२ वसूल न झालेल्या करांमध्ये विक्री कर/ मूल्यवर्धित कर (मोटार स्पिरिट व वंगण यावरील करांसह) व केंद्रीय विक्रीकर यांचा प्रमुख वाटा असून तो अनुक्रमे ६७.७ टक्के व २५.८ टक्के आहे. सन २०१३-१४ मध्ये आकारलेला परंतु वसूल न झालेला कर तक्ता ५.५ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.५ आकारलेला परंतु वसूल न झालेला कर -२०१३-१४**

(₹ कोटी)

| तपशील | रक्कम | | एकूण |
|---|---|---|---|
| | विवादास्पद | निर्विवाद | |
| विक्रीकर / मूल्यवर्धित कर (मोटार स्पिरीट व वंगण यांवरील करांसह) | १७,९८८ | १४,९८१ | ३२,९६९ |
| केंद्रीय विक्री कर | ४,८६६ | ७,७०९ | १२,५७५ |
| व्यवसाय, व्यापार व रोजगारावरील कर | ५ | ८०२ | ८०७ |
| गौण खनिजे, इ. | २८३ | १२४ | ४०७ |
| विद्युत शुल्क | ४६२ | १४ | ४७६ |
| इतर | ८६१ | ५७३ | १,४३४ |
| **एकूण** | **२४,४६५** | **२४,२०३** | **४८,६६८** |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## महसुली जमा २०१५-१६

५.१३ डिसेंबर, २०१५ अखेर, एकूण महसुली जमा २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ६३.८ टक्के इतकी होती, तर २०१४-१५ (सुअं) मध्ये तत्सम कालावधीत ती ६३.४ टक्के इतकी होती. महसुली जमेचा तपशील तक्ता ५.६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.६ महसुली जमेचा तपशील**

(₹ कोटी)

| बाब | प्रत्यक्ष जमा | | शेकडा बदल | २०१५-१६ (अअं)शी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | २०१४+ | २०१५+ | | |
| **अ) कर महसूल (१ + २)** | **९६,७४९** | **१,०८,०६७** | **११.७** | **६७.७** |
| १) स्वत:चा कर महसूल (१ ते ९) | ८३,८९८ | ८९,३८६ | ६.५ | ६८.४ |
| १) मूल्यवर्धित कर | ५०,४९८ | ५२,०२८ | ३.० | ६९.७ |
| २) मुद्रांक व नोंदणी शुल्क | १४,९५० | १५,७८५ | ५.६ | ७५.२ |
| ३) राज्य उत्पादन शुल्क | ७,८२२ | ८,४६८ | ८.३ | ६२.७ |
| ४) विजेवरील कर व शुल्क | २,४७३ | ४,०६९ | ६४.५ | ५६.९ |
| ५) जमीन महसूल | ८१९ | ९०३ | १०.३ | २८.२ |
| ६) वाहनांवरील कर | ३,९२५ | ४,३३९ | १०.५ | ७६.२ |
| ७) उत्पन्न व खर्चावरील इतर कर | १,५४० | १,५४६ | ०.४ | ६७.० |
| ८) माल व प्रवासी कर | २०७ | ५९१ | १८५.५ | ५१.४ |
| ९) वस्तू व सेवा यांवरील इतर कर व शुल्क | १,६६४ | १,६५७ | (-) ०.४ | ८२.२ |
| २) केंद्रीय करांतील हिस्सा | १२,८५१ | १८,६८१ | ४५.४ | ६४.३ |
| **ब) करेतर महसूल (१ + २)** | **१७,९४४** | **१८,३९०** | २.५ | **४७.७** |
| १) करेतर महसूल | ७,३४७ | ७,४९१ | २.० | ३६.२ |
| २) केंद्रीय अनुदाने | १०,९५७ | १०,८९९ | (-) ०.५ | ६१.० |
| **एकूण ( अ+ब)** | **१,१४,६९३** | **१,२६,४५७** | **१०.३** | **६३.८** |

आधार : महालेखापाल यांचे कार्यालय, महाराष्ट्र + डिसेंबरअखेर

## महसुली खर्च २०१५-१६

५.१४ डिसेंबर, २०१५ अखेर राज्याचा एकूण महसुली खर्च ₹ १,१९,०३७ कोटी (सन २०१५-१६ (अअं) च्या ५८.९ टक्के) असून त्यापैकी, योजनांतर्गत खर्च ₹ १६,०९४ कोटी (सन २०१५-१६(अअं) च्या ३३.९ टक्के) होता. डिसेंबर, २०१५अखेर विकास खर्च आणि सामाजिक सेवांवर झालेला खर्च अनुक्रमे ₹ ७५,८३२ कोटी (२०१५-१६(अअं) च्या ५९.२ टक्के) आणि ₹ ५१,६१५ कोटी (२०१५-१६ (अअं) च्या ६०.८ टक्के) होता.

## भांडवली जमा आणि भांडवली खर्च

५.१५ भांडवली जमेचा प्रमुख स्रोत 'ऋण' (कर्जे व इतर दायित्वे) हा आहे. सन २०१५-१६ करिता अपेक्षित अंतर्गत ऋण भांडवली जमेच्या ७६.८ टक्के आहे. चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार, राष्ट्रीय अल्पबचत निधीकरिता निर्गमित केलेले विशेष रोखे यामधून राज्याने कर्ज घेण्याचे प्रमाण मर्यादित करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन सन २०१५-१६ साठी एकूण भांडवली जमेत मागील वर्षाच्या तुलनेत ९.३ टक्के घट अपेक्षित आहे.

५.१६ भांडवली खर्चामध्ये महसुली लेख्याबाहेरील भांडवली खर्च, राज्य शासनाने दिलेली कर्जे व आगाऊ रकमा आणि देशांतर्गत ऋणाची परतफेड यांचा समावेश होतो. सन २०१५-१६ मध्ये भांडवली खर्च हा ₹ ४१,०३८ कोटी अपेक्षित असून तो एकूण खर्चाच्या १६.९ टक्के आहे. सन २०१५-१६ मध्ये भांडवली खर्चात महसुली लेख्याबाहेरील भांडवली खर्चाचा ६६ टक्के इतका मोठा हिस्सा आहे. भांडवली जमा व भांडवली खर्च तक्ता ५.७ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ५.७ भांडवली जमा व भांडवली खर्च**

(₹ कोटी)

| वर्ष | भांडवली जमा | | भांडवली खर्च | | |
|---|---|---|---|---|---|
| | एकूण | त्यापैकी अंतर्गत ऋण | एकूण | त्यापैकी | |
| | | | | महसुली लेख्याबाहेरील | देशांतर्गत ऋणाची परतफेड |
| २०१०-११ | २३,७३९ | १९,९२० | २४,५४६ | १७,९६३ | ५,६२४ |
| २०११-१२ | २८,३३६ | २४,१४६ | २५,६७४ | १७,८८० | ६,९५८ |
| २०१२-१३ | २१,८४२ | २१,३६६ | २६,७३३ | १७,३९८ | ७,९१९ |
| २०१३-१४ | ३८,९२८ | २६,९२३ | ३३,०८० | २०,०२० | ११,४१४ |
| २०१४-१५ (सुअं) | ४९,४९१ | ३६,०४९ | ३६,२५५ | २३,३४२ | ११,८५८ |
| २०१५-१६ (अअं) | ४४,९०३ | ३४,५०७ | ४१,०३८ | २७,१०४ | १२,९६४ |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## खर्चाचे आर्थिक वर्गीकरण

५.१७ भारत सरकारने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार राज्याच्या अर्थसंकल्पीय खर्चाचे महत्वाच्या आर्थिक बाबींनुसार वर्गीकरण केले जाते. सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पाच्या आर्थिक वर्गीकरणांनुसार उपभोग्य बाबी व स्थूल भांडवल निर्मितीवरील अपेक्षित खर्च अनुक्रमे ₹ ७०,६६७ कोटी व ₹ २२,१५८ कोटी असून तो मागील वर्षाच्या तुलनेत अनुक्रमे १९ टक्के व ४० टक्के जास्त आहे. उपभोग्य बाबी व भांडवल निर्मितीवरील खर्चाचा तपशील परिशिष्ट ५.५ मध्ये दिला आहे.

## तुटीचा कल

५.१८ सन २०१५-१६ मध्ये वित्तीय तूटीची राज्य उत्पन्नाशी असलेली टक्केवारी १.६ इतकी अपेक्षित असून ती राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ नुसार विहीत तीन टक्क्यांपेक्षा कमी अपेक्षित आहे. तसेच ती चौदाव्या वित्त आयोगाने घालून दिलेल्या मर्यादेत (राज्य उत्पन्नाच्या २.८ टक्के) आहे.

५.१९ चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार,ज्या वर्षाची कर्ज उभारणीची मर्यादा ठरवायची आहे त्या व त्याच्या मागील वर्षात महसुली तूट नसल्यास राज्य उत्पन्नाच्या तीन टक्क्यांपेक्षा अधिक कर्ज उभारणीच्या वाढीव मर्यादा खालीलप्रमाणे उपलब्ध आहेत:

- राज्याच्या कर्जाची राज्य उत्पन्नाशी असलेली मागील वर्षातील टक्केवारी २५ टक्के अथवा त्यापेक्षा कमी असल्यास राज्याला तीन टक्क्यांच्या वार्षिक मर्यादेपेक्षा ०.२५ टक्के अधिक कर्ज उभारणी करता येईल.
- राज्याच्या व्याज प्रदानांची महसुली जमेशी असलेली मागील वर्षातील टक्केवारी १० टक्के अथवा त्यापेक्षा कमी असल्यास राज्याला राज्य उत्पन्नाच्या ०.२५ टक्के अधिक कर्ज उभारणी करता येईल.

५.१९.१ एक अथवा दोन्ही निकषांची पूर्तता केल्यानंतर राज्याला वरीलपैकी एक अथवा दोन्ही पर्याय उपलब्ध राहतील. अशा प्रकारे राज्याला जास्तीत जास्त ३.५ टक्के मर्यादेपर्यंत कर्ज उभारणी करता येईल.

५.१९.२ चौदाव्या वित्त आयोगाने सन २०१५-१६ ते २०१९-२० या कालावधीकरिता राज्यांना 'एकत्रित वित्तीय सुधारणा' अंतर्गत घालून दिलेल्या मर्यादा तक्ता ५.८ मध्ये देण्यात आल्या आहेत.

**तक्ता ५.८ राज्यांसाठी एकत्रित वित्तीय सुधारणा अंतर्गत घालून दिलेल्या मर्यादा**

(स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी$)

| वर्ष | मर्यादा | |
|---|---|---|
| | राजकोषिय तूट | ऋणभार |
| २०१५-१६ | २.८ | २१.९ |
| २०१६-१७ | २.८ | २२.१ |
| २०१७-१८ | २.८ | २२.२ |
| २०१८-१९ | २.७ | २२.३ |
| २०१९-२० | २.७ | २२.४ |

$ पायाभूत वर्ष २००४-०५ च्या चालू किंमतीनुसार

*आधार :* १४ वा वित्त आयोग, भारत सरकार

## ऋणस्थिती

५.२० राज्याच्या दायित्वामध्ये (ऋणभार) परतावा न केलेले संचित कर्ज व इतर दायित्वे यांचा समावेश होतो. सन २०१५-१६ मध्ये ऋणभारात मागील वर्षाच्या तुलनेत १०.१ टक्के वाढ अपेक्षित आहे. सन २०१५-१६ मध्ये तो ₹ ३,३३,१६० कोटी अपेक्षित असून त्याचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण १६.९ टक्के असून ते चौदाव्या वित्त आयोगाने घालून दिलेल्या मर्यादेत (२१.९ टक्के) आहे. कर्जाचे सरासरी दर सन २०१५-१६ मध्ये ९.१ टक्के राहणे अपेक्षित आहे. ऋणभार व व्याज प्रदाने तक्ता ५.९ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ५.९ ऋणभार व व्याज प्रदाने**

(₹ कोटी)

| वर्ष | ऋणभार | व्याजाची परतफेड | कर्जाचे सरासरी दर $ |
|---|---|---|---|
| २०१०-११ | २,०३,०९७ | १५,६४८ | ८.६ |
| २०११-१२ | २,२५,९७६ | १७,५०५ | ८.६ |
| २०१२-१३ | २,४६,६९२ | १९,०७६ | ८.४ |
| २०१३-१४ | २,६९,३५५ | २१,२०७ | ८.६ |
| २०१४-१५ (सुअं) | ३,०२,५७८ | २४,२८३ | ९.० |
| २०१५-१६ (अअं) | ३,३३,१६० | २७,६६३ | ९.१ |

$ कर्जाचे सरासरी दर हे त्या वर्षातील व्याज प्रदानाचे त्याअगोदरच्या वर्षातील एकूण ऋणभाराशी असणारे शेकडा प्रमाण होय.

*आधार :* वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

५.२१ राज्याच्या ऋणभारामध्ये खुल्या बाजारातील कर्जे व राष्ट्रीय अल्पबचत निधीचे रोखे यांचा वाटा सुमारे ७५ टक्के आहे. राज्याचे देशांतर्गत ऋण ₹ २,५५,७४० कोटी (ऋणभाराच्या ७६.८ टक्के) असून, त्यापैकी खुल्या बाजारातील कर्जे ₹ १,७२,६१२ कोटी आहेत. अर्थसंकल्पीय अंदाजानुसार एकूण देशांतर्गत ऋण ₹ ३४,५०७ कोटी असून त्यापैकी ₹ २८,५४२ कोटी इतके कर्ज खुल्या बाजारातून घेणे अपेक्षित आहे. या देशांतर्गत ऋणापैकी ₹ ११,८८८ कोटी इतकी रक्कम कर्जांच्या परतफेडीकरिता वापरण्यात येईल.

**आलेख ५.१ : तुटीचा कल**




**आलेख ५.२ : ऋणभाराचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण**



## राज्य योजनेची प्रगती

५.२२ बाराव्या पंचवार्षिक योजनेचा मंजूर नियतव्यय ₹ २,७५,००० कोटी असून अकराव्या पंचवार्षिक योजनेपेक्षा ७०.७ टक्क्यांनी अधिक आहे. वार्षिक योजनानिहाय नियतव्यय व खर्च तक्ता ५.१० मध्ये दिला आहे.

## वार्षिक योजना २०१५-१६

५.२३ सन २०१५-१६ साठी वार्षिक योजना नियतव्यय ₹ ५४,९९९ कोटी निश्चित करण्यात आला असून त्यापैकी जिल्हा योजनेकरिता ₹ ७,१२८ कोटी नियतव्यय आहे. क्षेत्रनिहाय पंचवार्षिक व वार्षिक योजना तक्ता ५.११ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ५.१० वार्षिक योजनानिहाय नियतव्यय व खर्च**

(₹ कोटी)

| वर्ष | नियतव्यय# | खर्च | खर्चाची नियतव्ययाशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०१२-१३ | ४५,००० | ३५,८६७ | ७९.७ |
| २०१३-१४ | ४९,००० | ३८,०४८ | ७७.६ |
| २०१४-१५ | ५१,२२३ | ५१,५७५$ | १००.७ |
| २०१५-१६ | ५४,९९९ | -- | -- |

$ अपेक्षित # प्रस्तावित नियतव्यय

*आधार* : नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन

**तक्ता ५.११ क्षेत्रनिहाय पंचवार्षिक व वार्षिक योजना**

(₹ कोटी)

| क्षेत्र | बारावी पंचवार्षिक योजना | | वार्षिक योजना २०१३-१४ प्रत्यक्ष खर्च | वार्षिक योजना २०१४-१५ | | वार्षिक योजना २०१५-१६ नियतव्यय |
|---|---|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | नियतव्ययातील हिस्सा (टक्के) | | नियतव्यय | अपेक्षित खर्च | |
| कृषि व संलग्न सेवा | २१,९१७ | ८.० | ३,६५७ | ४,४४० | ५,०८७ | ४,७०० |
| ग्रामविकास | ९,०८९ | ३.३ | १,४२३ | १,२५९ | २,८०९ | १,६०५ |
| विशेष क्षेत्र विकास | १,१४१ | ०.४ | १५९ | ३२९ | ३२९ | १५५ |
| पाटबंधारे आणि पूरनियंत्रण | ४७,९९० | १७.५ | ६,७४३ | ९,०२२ | ८,७९१ | ७,६२० |
| ऊर्जा | २०,६९५ | ७.५ | ३,३५३ | ४,०१६ | ३,१०५ | ३,७२६ |
| उद्योग व खनिजे | २,१७५ | ०.८ | १५८ | ४१० | ४२५ | ४०४ |
| परिवहन | ३३,८५५ | १२.३ | ५,२६१ | ५,५३७ | ४,९२० | ६,८७६ |
| विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण | १६९ | ०.१ | २७ | ६२ | ६१ | ६७ |
| सर्वसाधारण आर्थिक सेवा | ३,३६४ | १.२ | ८३२ | ७२४ | ६३६ | ९११ |
| सामाजिक व सामुहिक सेवा | १,२२,७७६ | ४४.६ | १५,२१२ | २२,२०९ | २०,३३७ | २३,३४९ |
| सर्वसाधारण सेवा | १०,९८९ | ४.० | ९८० | २,४०७ | १,३७७ | ४,१११ |
| इतर कार्यक्रम | ८४० | ०.३ | २४४ | ८०८ | ३,६९८ | १,४७४ |
| **एकूण** | **२,७५,०००** | **१००.०** | **३८,०४८** | **५१,२२३** | **५१,५७५** | **५४,९९९** |

*आधार* : नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळणार नाहीत

## योजनांतर्गत व योजनेतर खर्च

५.२४ सन २०१५-१६ साठी एकूण खर्चापैकी योजनेतर खर्च ७०.५ टक्के आहे. सन २०१५-१६ मध्ये एकूण योजनेतर खर्चामध्ये योजनेतर महसुली खर्चाचा हिस्सा ९०.२ टक्के अपेक्षित आहे. अर्थसंकल्पित योजनांतर्गत व योजनेतर खर्च (केंद्रीय अनुदानांसह) तक्ता ५.१२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.१२ अर्थसंकल्पित योजनांतर्गत व योजनेतर खर्च (केंद्रीय अनुदानांसह)**

(₹ कोटी)

| वर्ष | योजनांतर्गत खर्च | | | योजनेतर खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| | महसुली | भांडवली | एकूण | | |
| २०१०-११ | १७,१८५ | १६,०७१ | ३३,२५६ | ९७,७४९ | १,३१,००५ |
| २०११-१२ | २२,०३५ | १५,४७२ | ३७,५०७ | १,११,७२१ | १,४९,२२८ |
| २०१२-१३ | २४,५६८ | १५,७५५ | ४०,३२३ | १,२५,१४६ | १,६५,४६९ |
| २०१३-१४ | २५,९०७ | १९,२४६ | ४५,१५३ | १,४२,८३० | १,८७,९८२ |
| २०१४-१५ (सुअं) | ४०,५९४ | २०,९९१ | ६१,५८५ | १,६९,३४८ | २,३०,९३३ |
| २०१५-१६ (अअं) | ४७,४७९ | २४,१५८ | ७१,६३७ | १,७१,३८९ | २,४३,०२६ |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## शासकीय हमी

५.२५ सन २०१३-१४ अखेर राज्य शासनाने दिलेल्या हमींची अदत्त रक्कम ₹ ७,७०९ कोटी होती. सर्वाधिक हमी ३४.७ टक्के सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागास व त्या खालोखाल १६.७ टक्के पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास, १६.३ टक्के सार्वजनिक बांधकामास, १३.२ टक्के उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) आणि १० टक्के नियोजन विभागास देण्यात आली आहे. सन २०१३-१४ मध्ये शासनाने दिलेल्या हमी तक्ता ५.१३ मध्ये दिल्या आहेत.

**आलेख ५.३ : भांडवली खर्चाचा योजनांतर्गत खर्चातील हिस्सा**




**तक्ता ५.१३ सन २०१३-१४ मध्ये शासनाने दिलेल्या हमी**

(₹ कोटी)

| विभागाचे नाव | वर्षाच्या प्रारंभीची अदत्त रक्कम | अतिरिक्त दिलेली हमी | | वर्षात वगळलेल्या रकमा (मागणी केलेल्या रकमां व्यतिरिक्त) | वर्षात आवाहनीत व दिलेल्या रकमा | वर्षाअखेरीस अदत्त असलेल्या रकमा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | वर्षभरात | ठोक हमी देण्यात आल्यामुळे वर्षामध्ये प्राप्त झालेल्या कर्जाच्या रकमा व सुधारित व्याज दरामुळे बदललेल्या रकमा | | | |
| कृषि व पदुम | १४६.०० | १४०.०० | ०.०० | २०५.०० | ०.०० | ८१.०० |
| उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) | १३.९४ | ०.०० | ०.०० | ०.५३ | ०.०० | १३.४१ |
| सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | २९३.१८ | ५०.०० | ४१.८० | १४६.५७ | ९.०८ | २२९.३३ |
| नगरविकास | २००.८३ | ०.०० | ०.३० | ०.०० | ०.०० | २०१.१३ |
| उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) | १,२४९.०४ | ०.०० | ६८.५० | २९६.७८ | ०.०० | १,०२०.७६ |
| जलसंपदा | १५५.०९ | ०.०० | ०.०० | ५६.७३ | ०.०० | ९८.३६ |
| सार्वजनिक बांधकाम | १,३२९.१४ | ०.०० | ०.०० | ७५.३५ | ०.०० | १,२५३.७९ |
| महसूल व वन | २.१३ | ०.०० | ०.०० | २.१३ | ०.०० | ०.०० |
| आदिवासी विकास | २९.४ | ०.०० | ११.३० | ६.४२ | ०.०० | ३४.२८ |
| सहकार, पणन व वस्त्रोद्योग | ३,५७९.७५ | २८५.०० | ४३२.६७ | १,६१८.९३ | ०.०० | २,६७८.४९ |
| ग्रामविकास व जलसंधारण | ०.१८ | ०.०० | ०.०० | ०.१८ | ०.०० | ०.०० |
| पाणी पुरवठा व स्वच्छता | १,३७८.१० | ०.०० | ०.०० | ८७.१३ | ०.०० | १,२९०.९७ |
| अल्पसंख्यांक विकास | २७.९३ | १५.०० | ०.०० | ३.३३ | ०.०० | ३९.६० |
| नियोजन | ९८३.४८ | ०.०० | ०.०० | २१५.२९ | ०.०० | ७६८.१९ |
| **एकूण** | **९,३८८.१९** | **४९०.००** | **५५४.५७** | **२,७१४.३७** | **९.०८** | **७,७०९.३१** |

*आधार:* वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

* * * * *

# परिशिष्ट ५.१

## दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प

(₹ कोटी)

| | बाब | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५# | २०१५-१६## |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **१.** | **महसुली जमा (अ + ब)** | **८६,९१०** | **१,०५,८६८** | **१,२१,२८६** | **१,४२,९४७** | **१,४९,८२२** | **१,८०,७९४** | **१,९८,२३१** |
| | अ) कर महसूल | ६७,३५४ | ८६,४४७ | १,००,९५२ | १,१८,६४० | १,२५,२२८ | १,३६,६१५ | १,५९,६९७ |
| | ब) करेतर महसूल | १९,५५६ | १९,४२१ | २०,३३४ | २४,३०७ | २४,५९३ | ४४,१७९ | ३८,५३४ |
| **२.** | **महसूली खर्च** | **९४,९१६** | **१,०६,४५९** | **१,२३,५५४** | **१,३८,७३६** | **१,५४,९०२** | **१,९४,६७७** | **२,०१,९८८** |
| | **त्यापैकी** | | | | | | | |
| | अ) व्याज प्रदान | १४,८३८ | १५,६४८ | १७,५०५ | १९,०७६ | २१,२०७ | २४,२८३ | २७,६६३ |
| | ब) प्रशासकीय सेवा | ८,१७३ | ९,७९८ | १०,८४८ | १२,४७२ | १४,००८ | १६,८७१ | २०,७३९ |
| | क) निवृत्ती वेतन आणि संकीर्ण सर्वसाधारण सेवा | ६,२२९ | ८,९५७ | १०,५८१ | ११,६४९ | १३,१६३ | १४,६२० | १८,५०२ |
| **३.** | **महसुली तूट (२ - १)** | **८,००६** | **५९१** | **२,२६८** | **(-)४,२११** | **५,०८१** | **१३,८८३** | **३,७५७** |
| **४.** | **भांडवली जमा** | **३०,३८३** | **२३,७३९** | **२८,३३६** | **२१,८४२** | **३८,९२८** | **४९,४९१** | **४४,९०३** |
| | **त्यापैकी** | | | | | | | |
| | अ) कर्जाची वसूली | ५१५ | ६४० | ५५९ | ८६३ | ७२८ | १,०३५ | १,०९८ |
| | ब) इतर भांडवली जमा | २५ | १७ | ४५६ | ० | ८५० | ० | ० |
| | क) कर्जे व इतर दायित्वे | २६,०१८ | १८,३०८ | २०,८६३ | १३,९३५ | २६,७८५ | ३६,५९९ | ३०,८४० |
| **५.** | **भांडवली खर्च** | **२२,८६५** | **२४,५४६** | **२५, ६७४** | **२६,७३३** | **३३,०८०** | **३६,२५५** | **४१,०३८** |
| **६.** | **एकूण जमा (१ + ४)** | **१,१७,२९३** | **१,२९,६०७** | **१,४९,६२३** | **१,६४,७८९** | **१,८८,७४९** | **२,३०,२८५** | **२,४३,१३३** |
| **७.** | **एकूण खर्च (२ + ५)** | **१,१७,७८१** | **१,३१,००५** | **१,४९,२२८** | **१,६५,४६९** | **१,८७,९८२** | **२,३०,९३३** | **२,४३,०२६** |
| **८.** | **आकस्मिकता निधीकडे विनियोजन** | **३५०** | **८५०** | **५००** | **८७५** | **०** | **०** | **०** |
| **९.** | **अर्थसंकल्पीय तूट (७ - ६- ८)** | **१३८** | **५४९** | **(-)८९४** | **(-)१९५** | **(-) ७६७** | **६४८** | **(-) १०७** |
| **१०.** | **वित्तीय तूट (९ + ४ क)** | **२६,१५६** | **१८,८५७** | **१९,९६९** | **१३,७४०** | **२६,०१८** | **३७,२४६** | **३०,७३३** |
| | **स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी (पायाभूत वर्ष = २०११-१२)** | | | | | | | |
| **१.** | **महसुली जमा (अ + ब)** | **१०.८** | **१०.२** | **९.५** | **९.९** | **९.१** | **१०.१** | **१०.१** |
| | अ) कर महसूल | ८.० | ७.९ | **७.९** | **८.२** | **७.६** | **७.६** | **८.१** |
| | ब) करेतर महसूल | २.८ | २.३ | **१.६** | **१.७** | **१.५** | **२.५** | **२.०** |
| **२.** | **महसूली खर्च** | **१०.०** | **११.१** | **९.७** | **९.६** | **९.४** | **१०.९** | **१०.३** |
| | **त्यापैकी** | | | | | | | |
| | अ) व्याज प्रदान | १.७ | १.७ | १.४ | १.३ | १.३ | १.४ | १.४ |
| | ब) प्रशासकीय सेवा | ०.९ | १.० | ०.९ | ०.९ | ०.९ | ०.९ | १.१ |
| | क) निवृत्ती वेतन आणि संकीर्ण सर्वसाधारण सेवा | ०.७ | ०.७ | ०.८ | ०.८ | ०.८ | ०.८ | ०.९ |
| **३.** | **महसुली तूट (२ - १)** | **(-)०.७** | **०.९** | **०.२** | **(-) ०.३** | **०.३** | **०.८** | **०.२** |
| **४.** | **भांडवली जमा** | **२.५** | **३.६** | **२.२** | **१.५** | **२.४** | **२.८** | **२.३** |
| | **त्यापैकी** | | | | | | | |
| | अ) कर्जाची वसूली | ०.१ | ०.१ | ०.० | ०.१ | ०.० | ०.१ | ०.१ |
| | ब) इतर भांडवली जमा | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.१ | ०.० | ०.० |
| | क) कर्जे व इतर दायित्वे | १.९ | ३.० | १.६ | १.० | १.६ | २.० | १.६ |
| **५.** | **भांडवली खर्च** | **३.२** | **२.७** | **२.०** | **१.८** | **२.०** | **२.०** | **२.१** |
| **६.** | **एकूण जमा (१ + ४)** | **१३.३** | **१३.७** | **११.८** | **११.४** | **११.५** | **१२.८** | **१२.३** |
| **७.** | **एकूण खर्च (२ + ५)** | **१३.३** | **१३.८** | **११.७** | **११.४** | **११.४** | **१२.९** | **१२.३** |
| **८.** | **आकस्मिकता निधीकडे विनियोजन** | **०.०** | **०.०** | **०.०** | **०.१** | **०.०** | **०.०** | **०.०** |
| **९.** | **अर्थसंकल्पीय तूट (७ - ६- ८)** | **०.०** | **०.०** | **(-) ०.१** | **०.०** | **०.०** | **०.०** | **०.०** |
| **१०.** | **वित्तीय तूट (९ + ४ क)** | **१.९** | **३.१** | **१.६** | **०.९** | **१.६** | **२.१** | **१.६** |

*आधार* - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

\# सुधारित अंदाज ## अर्थसंकल्पीय अंदाज

टीप - १. २००९-१० व २०१०-११ करीता स्थूल राज्य उत्पन्नाची आकडेवारी पायाभूत वर्ष २००४-०५ नुसार आहे.

२. आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

# परिशिष्ट ५.२

## अर्थसंकल्प : महसुली व भांडवली लेख्यांवरील जमेतील कल

(₹ कोटी)

| | बाब | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५# | २०१५-१६## |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **(अ)** | **एकूण महसुली जमा (१ + २ + ३ + ४)** | **८६,९१०** | **१,०५,८६८** | **१,२१,२८६** | **१,४२,९४७** | **१,४९,८२२** | **१,८०,७९४** | **१,९८,२३१** |
| **(१)** | ***राज्याचा स्वत:चा कर महसूल (१ ते ९) -*** | **५९,१०६** | **७५,०२८** | **८७,६४८** | **१,०३,४४८** | **१,०८,६४१** | **१,१९,००८** | **१,३०,६३५** |
| | (१) विक्रीकर | ३२,६७६ | ४२,४८३ | ५०,५९६ | ६०,०८० | ६२,५३० | ६९,०९० | ७४,६१७ |
| | (२) मुद्रांक व नोंदणी शुल्क | १०,७७४ | १३,५१६ | १४,४०८ | १७,५४८ | १८,६७६ | १९,४२१ | २१,००० |
| | (३) राज्य उत्पादन शुल्क | ५,०५७ | ५,९६२ | ८,६०६ | ९,२९७ | १०,१०१ | ११,५०० | १३,५०० |
| | (४) विजेवरील कर व शुल्क | ३,२८९ | ४,७३० | ४,८३१ | ५,८९६ | ६,०८४ | ६,८७४ | ७,१५० |
| | (५) उत्पन्न व खर्च यावरील इतर कर | १,६१२ | १,६८६ | १,८३० | १,९६१ | २,१६५ | २,१३८ | २,३०९ |
| | (६) वाहनांवरील कर | २,६८२ | ३,५३३ | ४,१३७ | ५,०२७ | ५,०९६ | ५,२४४ | ५,६९४ |
| | (७) विक्रेय वस्तू व सेवा यावरील इतर कर व शुल्क | १,३२५ | १,४२३ | १,७०२ | १,८७४ | १,६५९ | १,७७० | २,०१५ |
| | (८) माल व प्रवासी कर | ९७७ | ६०० | ५७४ | ६९१ | १,२४१ | १,०९८ | १,१५० |
| | (९) जमीन महसूल | ७१४ | १,०९५ | ९६४ | १,०७४ | १,०८९ | १,८७३ | ३,२०० |
| **(२)** | ***कराव्यतिरिक्त महसूल (१ + २) -*** | **८,३५३** | **८,२२५** | **८,१६८** | **९,९८५** | **११,३५२** | **१३,५२०** | **२०,६६५** |
| | (१) व्याजाच्या जमा रकमा | १,३४२ | १,४२२ | १,३५९ | २,४६५ | ३,९३४ | २,९७४ | २,९७४ |
| | (२) इतर करेतर महसूल | ७,०११ | ६,८०३ | ६,८०९ | ७,५२० | ७,४१८ | १०,५४६ | १७,६९१ |
| **(३)** | ***केंद्रिय करांतील हिस्सा (१ ते ६) -*** | **८,२४८** | **११,४१९** | **१३,३०४** | **१५,१९२** | **१६,५८८** | **१७,६०७** | **२९,०६२** |
| | (१) निगम करांव्यतिरिक्त इतर उत्पन्नावरील कर | १,८९१ | २,३५९ | २,६६० | ३,२६७ | ३,६७३ | ४,३५१ | ७,१०० |
| | (२) निगम कर | ३,३९४ | ४,४६३ | ५,२३६ | ५,४५७ | ५,५७८ | ५,८३४ | ९,६१७ |
| | (३) संपत्ती कर | ८ | ९ | २० | ९ | १५ | १६ | ० |
| | (४) जकात | १,१५४ | १,९९७ | २,३०७ | २,५२५ | २,७०६ | २,८९७ | ४,४६४ |
| | (५) केंद्रिय उत्पादन शुल्क | ९३० | १,४५२ | १,४९३ | १,७१६ | १,९११ | १,७५० | २,९०३ |
| | (६) सेवा कर | ८७१ | १,१३९ | १,५८८ | २,२१८ | २,७०३ | २,७५९ | ४,९७७ |
| **(४)** | ***केंद्र शासनाकडून सहायक अनुदाने*** | **११,२०३** | **११,१९६** | **१२,१६६** | **१४,३२२** | **१३,२४१** | **३०,६५९** | **१७,८६९** |
| **(ब)** | **एकूण भांडवली जमा (१ + २ + ३ + ४)** | **३०,३८३** | **२३,७३९** | **२८,३३६** | **२१,८४२** | **३८,९२८** | **४९,४९१** | **४४,९०३** |
| **(१)** | ***सरकारी ऋण लेख्यांकडून जमा (अ + ब) -*** | **२१,५६४** | **२०,७४०** | **२४,४५३** | **२२,११७** | **२७,८८७** | **३९,१२२** | **३९,०५२** |
| | (अ) राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण | २०,८१२ | १९,९२० | २४,१४६ | २१,३६६ | २६,९२३ | ३६,०४९ | ३४,५०७ |
| | (ब) केंद्र सरकारकडून कर्जे व आगाऊ रकमा | ७५२ | ८२० | ३०६ | ७५१ | ९६४ | ३,०७३ | ४,५४५ |
| **(२)** | ***राज्य शासनाकडून कर्जे व आगाऊ रकमा (वसुली)*** | **५१५** | **६४०** | **५५९** | **८६३** | **७२८** | **१,०३५** | **१,०९८** |
| **(३)** | ***इतर भांडवली जमा (निव्वळ) ‡*** | **२४** | **९** | **४६७** | **(-)१०** | **८५०** | **०** | **०** |
| **(४)** | ***लोक लेखा (निव्वळ) (अ + ब + क + ड)*** | **८,२८०** | **२,३५०** | **२,८५८** | **(-)१,१२८** | **९,४६३** | **९,३३४** | **४,७५३** |
| | (अ) अल्पबचत, भविष्य निर्वाह निधी इ. (निव्वळ) | १,७९० | २,०२२ | २,२६० | २,१८८ | १,८९४ | २,६८९ | १,९४९ |
| | (ब) राखीव निधी (निव्वळ) (१ + २) | (-)३५१ | (-)१२६ | (-)४०० | ३८ | (-) ३८१ | (-)८३२ | १,७७० |
| | (१) व्याजी | ५१ | १०६ | ११४ | (-)१४१ | (-) ८० | (-)६६४ | (-)१,८०६ |
| | (२) बिनव्याजी | (-)४०२ | (-)२३२ | (-)५१३ | १७९ | (-)३०१ | (-)१६८ | ७५ |
| | (क) नागरी ठेवी (निव्वळ) (१ + २) | ३,५०२ | ६,२५९ | ४,५३२ | ६,४४२ | ६,७७२ | ६,५७८ | ७,१६३ |
| | (१) व्याजी | १,८९९ | ३,९४६ | ३,७३७ | ४,२६४ | ४,५९० | ४,१५२ | ४,३५२ |
| | (२) बिनव्याजी | १,६०३ | २,३१३ | ७९४ | २,१७८ | २,१८२ | २,४२६ | २,८११ |
| | (ड) इतर | ३,३३९ | (-)५,८०५ | (-)३,५३४ | (-)९,७९५ | १,१७८ | ८९९ | (-)२,६२८ |
| | **एकूण जमा (अ + ब)** | **१,१७,२९३** | **१,२९,६०७** | **१,४९,६२३** | **१,६४,७८९** | **१,८८,७४९** | **२,३०,२८५** | **२,४३,१३३** |

*आधार* - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

‡ यात आंतरराज्यीय तडजोड (निव्वळ), आकस्मिकता निधीमध्ये केलेले विनियोजन (निव्वळ) आणि आकस्मिकता निधी (निव्वळ) यांचा समावेश आहे.

\# सुधारित अंदाज ## अर्थसंकल्पीय अंदाज

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

# परिशिष्ट ५.३

## अर्थसंकल्प : महसुली व भांडवली लेख्यांवरील खर्चाचे कल

(₹ कोटी)

| | बाब | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५# | २०१५-१६## |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **(अ)** | **महसूली खर्च (१ + २)** | **९४,९१६** | **१,०६,४५९** | **१,२३,५५४** | **१,३८,७३६** | **१,५४,९०२** | **१,९४,६७७** | **२,०१,९८८** |
| **(१)** | **विकास खर्च (अ + ब + क)** | **६२,८४५** | **६८,७५५** | **८०,७०१** | **९१,०७०** | **१,००,९२३** | **१,३१,०७२** | **१,२८,१०५** |
| | **(अ) सामाजिक सेवा (१ ते ८)** | **४१,००५** | **४८,२८२** | **५४,८१२** | **६२,०३९** | **७०,८७९** | **८७,२७१** | **८४,९४४** |
| | (१) शिक्षण, क्रिडा, कला व संस्कृती | २२,२०८ | २६,९४४ | २९,८७९ | ३३,८५७ | ३८,२३८ | ४१,४९० | ४५,४९५ |
| | (२) आरोग्य व कुटुंब कल्याण | ३,६९६ | ४,४७४ | ५,००२ | ५,९३६ | ६,८१६ | १०,३०७ | ९,४९० |
| | (३) पाणीपुरवठा, स्वच्छता, गृहनिर्माण व नगरविकास | ६,९३९ | ६,५०९ | ७,४३८ | ७,११४ | ६,९५२ | १०,७५८ | ११,०८५ |
| | (४) माहिती व प्रसारण | ४० | ४७ | ४७ | ५७ | ६८ | १६९ | ९० |
| | (५) अ.जा., अ.ज. व इ.मा.व. यांचे कल्याण | ४,१४५ | ४,५१८ | ५,११७ | ६,४१७ | ७,९५१ | ९,०२६ | १०,२४३ |
| | (६) कामगार व कामगार कल्याण | ५९९ | ६४६ | ७२१ | ७३० | ७६७ | १,०९२ | १,०१७ |
| | (७) समाज कल्याण व पोषण | ३,३२५ | ५,०७६ | ६,५४१ | ७,८५४ | ९,९९६ | १४,२८७ | ७,३४९ |
| | (८) इतर | ५३ | ६८ | ६८ | ७४ | ९२ | १४० | १७५ |
| | **(ब) आर्थिक सेवा (१ ते ९)** | **२०,३७२** | **१९,२८५** | **२४,८६९** | **२७,५५१** | **२७,९११** | **४१,०७४** | **४०,८३३** |
| | (१) कृषि व संलग्न सेवा | ६,४६० | ५,६३६ | ६,१४५ | ७,२१८ | ७,८२१ | ९,४७८ | ८,६१४ |
| | (२) ग्राम विकास | २,४९३ | २,२४३ | २,५२४ | ४,३९९ | ३,१३० | ७,३४६ | १२,८२३ |
| | (३) विशेष क्षेत्र कार्यक्रम | २८ | ५९ | ४४ | ४८ | ३३ | ४५ | ५ |
| | (४) पाटबंधारे व पूर नियंत्रण | २,३४० | २,५२२ | २,७०१ | २,५७४ | २,७४२ | २,६८८ | २,८४८ |
| | (५) ऊर्जा | ४,१३८ | ३,६१९ | ५,५२७ | ५,४७१ | ५,७२६ | १०,९२८ | ६,३०६ |
| | (६) उद्योग व खनिजे | ९९८ | ८७० | २,५४६ | २,६०० | २,५४९ | २,९९५ | ३,७२० |
| | (७) वाहतूक आणि दळणवळण | ३,२२७ | ३,४१८ | ४,१९९ | ४,२१६ | ४,७२९ | ६,०८५ | ४,६४३ |
| | (८) विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण | ७२ | ६१ | ६७ | ७२ | ८४ | ७८ | ९६ |
| | (९) सर्वसाधारण आर्थिक सेवा | ६१६ | ८५६ | १,११६ | ९५३ | १,१७७ | १,४३१ | १,७७९ |
| | **(क) स्थानिक संस्था आणि पंचायत राज्य संस्था यांना सहायक अनुदाने व अंशदाने** | **१,४६८** | **१,१८८** | **१,०२०** | **१,४८१** | **२,०५३** | **२,७२८** | **२,३२८** |
| **(२)** | **विकासेतर खर्च (अ + ब)** | **३२,०७१** | **३७,७०४** | **४२,८५३** | **४७,६६६** | **५३,९७९** | **६३,६०५** | **७३,८८३** |
| | **(अ) सर्वसाधारण सेवा (१ ते ५)** | **१७,१२९** | **२१,१५५** | **२४,३४०** | **२७,३४६** | **३१,१८०** | **३७,४३२** | **४४,०००** |
| | (१) राज्यांची अंगे | १,१४९ | १,०८८ | १,२४९ | १,२६६ | १,४३५ | २,८४८ | १,९८५ |
| | (२) करवसुली खर्च | १,४८६ | १,२२१ | १,५७० | १,८५३ | २,३७१ | २,८७८ | २,४९८ |
| | (३) प्रशासकीय सेवा | ८,१७३ | ९,७९८ | १०,८४८ | १२,४७२ | १४,००८ | १६,८७१ | २०,७३९ |
| | (४) निवृत्ती वेतन आणि संकीर्ण सर्वसाधारण सेवा | ६,२२९ | ८,९५६ | १०,५८१ | ११,६४९ | १३,१६३ | १४,६२० | १८,५०२ |
| | (५) राखीव निधीकडे हस्तांतरण | ९२ | ९२ | ९२ | १०६ | २०४ | २१४ | २७७ |
| | **(ब) व्याज प्रदाने व ऋण सेवा** | **१४,९४२** | **१६,५४९** | **१८,५१३** | **२०,३२०** | **२२,७९९** | **२६,१७३** | **२९,८८३** |
| **(ब)** | **भांडवली खर्च (१ + २)** | **२२,८६५** | **२४,५४६** | **२५,६७४** | **२६,७३३** | **३३,०८०** | **३६,२५५** | **४१,०३८** |
| **(१)** | **विकास खर्च (अ + ब)** | **१८,६९०** | **१८,९२२** | **१८,७१६** | **१८,८१४** | **२१,६६६** | **२४,३९८** | **२८,०७४** |
| | (अ) महसुली लेख्याबाहेरील भांडवली खर्च | १७,४२९ | १७,९६३ | १७,८८० | १७,३९८ | २०,०२० | २३,३४२ | २७,१०४ |
| | (ब) राज्य शासनाने दिलेली कर्जे व आगाऊ रकमा | १,२६१ | ९५९ | ८३६ | १,४१६ | १,६४५ | १,०५५ | ९७० |
| **(२)** | **विकासेतर खर्च (अ + ब + क) (सरकारी ऋणाची परतफेड)** | **४,१७५** | **५,६२४** | **६,९५८** | **७,९१९** | **११,४१४** | **११,८५८** | **१२,९६४** |
| | (अ) राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण | ३,३९८ | ४,२९१ | ५,८३८ | ६,३५१ | १०,५४३ | १०,९४३ | ११,८८८ |
| | (ब) केंद्र शासनाकडून घेतलेली कर्जे व आगाऊ रकमा | ४२७ | ४८३ | ६२० | ६९३ | ८७१ | ९१४ | १,०७६ |
| | (क)आकस्मिकता निधीकडे विनियोजन | ३५० | ८५० | ५०० | ८७५ | ० | ० | ० |
| | **एकूण खर्च (अ + ब)** | **१,१७,७८१** | **१,३१,००५** | **१,४९,२२८** | **१,६५,४६९** | **१,८७,९८२** | **२,३०,९३३** | **२,४३,०२६** |

*आधार* - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

\# सुधारित अंदाज ## अर्थसंकल्पीय अंदाज

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

# परिशिष्ट ५.४

## वर्षभरातील कर्जे व इतर दायित्वे

(₹ कोटी)

| | बाब | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५# | २०१५-१६## |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **(एक)** | **ऋण प्राप्ती (१ + २ + ३) (व्याजी)** | **२१,४७९** | **२२,०४०** | **२४,१०६** | **२१,३८३** | **२२,८७६** | **३३,४४१** | **३०,५८२** |
| | १) राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण (निव्वळ) | १७,४१४ | १५,६२९ | १८,३०८ | १५,०१५ | १६,३७९ | २५,१०६ | २२,६१९ |
| | २) केंद्र शासनाकडून कर्जे व आगाऊ रकमा (निव्वळ) | ३२५ | ३३७ | (-)३१४ | ५८ | ९४ | २,१५९ | ३,४६९ |
| | ३) व्याजी बंधने (अ + ब + क) | ३,७४० | ६,०७४ | ६,११२ | ६,३११ | ६,४०३ | ६,१७६ | ४,४९४ |
| | अ) भविष्य निर्वाह निधी (निव्वळ) | १,७९० | २,०२२ | २,२६० | २,१८८ | १,८९४ | २,६८९ | १,९४९ |
| | ब) राखीव निधी (निव्वळ) | ५१ | १०६ | ११४ | (-)१४१ | (-)८० | (-)६४४ | (-)१,८०६ |
| | क) नागरी ठेवी (निव्वळ) | १,८९९ | ३,९४६ | ३,७३७ | ४,२६४ | ४,५९० | ४,१५२ | ४,३५२ |
| **(दोन)** | **ऋण प्राप्ती (१ + २) (बिनव्याजी)** | **४,५३९** | **(-)३,७३२** | **(-)३,२४२** | **(-)७,४४८** | **३,९०९** | **३,१५८** | **२५८** |
| | १) लोकलेख्यातील निव्वळ जमा@ | ४,५४० | (-)३,७२४ | (-)३,२५४ | (-)७,४३८ | ३,०५९ | ३,१५८ | २५८ |
| | २) इतर भांडवली जमा (निव्वळ)$ | (-)१ | (-)८ | ११ | (-)१० | ८५० | ० | ० |
| | **एकूण कर्जे व इतर दायित्वे (एक + दोन)** | **२६,०१८** | **१८,३०८** | **२०,८६३** | **१३,९३५** | **२६,७८५** | **३६,५९९** | **३०,८४०** |

*आधार* - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

@ लोकलेख्याच्या निव्वळ प्राप्तीमध्ये राखीव निधी, ठेवी, निलंबन व संकीर्ण आणि वित्त प्रेषणे लेखा यांचा अंतर्भाव आहे.

$ यामध्ये आंतरराज्यीय तडजोड (निव्वळ), आकस्मिकता निधीमध्ये केलेले विनियोजन (निव्वळ) आणि आकस्मिकता निधी (निव्वळ) यांचा समावेश आहे.

# सुधारित अंदाज ## अर्थसंकल्पीय अंदाज

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

# परिशिष्ट ५.५

## शासनाच्या उपभोग्य बाबींवरील अंतिम खर्च व भांडवल निर्मितीवरील खर्च

(₹ कोटी)

| विवरण | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५# | २०१५-१६## |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **अ. उपभोग्य बाबींवरील खर्च** | | | | | | | |
| १ कर्मचाऱ्यांची भरपाई (१.१ +१.२) | १८,३२२ | २३,७८८ | २६,३५५ | २९,७९१ | ३३,५९१ | ३९,५४५ | ४४,०९२ |
| १.१ वेतन आणि मजूरी | १२,९१५ | १४,८९८ | १५,७६१ | १७,६०७ | १९,७८० | २३,३१६ | २५,७९६ |
| १.२ निवृत्तीवेतन | ५,४०७ | ८,८९० | १०,५९४ | १२,१८५ | १३,८११ | १६,२२९ | १८,२९६ |
| २ वस्तू आणि सेवांची निव्वळ खरेदी (२.१ + २.२ -२.३) | ९,९९२ | ११,७३५ | १४,०४१ | १३,४३७ | १४,४३४ | १९,८४८ | २६,५७४ |
| २.१ खरेदी | ८,६१४ | १०,२३१ | १२,८७६ | ११,४५९ | ८,४९८ | १२,०५४ | १९,९०३ |
| २.२ देखभाल | २,९३८ | ३,४६५ | ३,०८८ | ३,६७८ | ४,३३४ | ५,५०८ | ४,०९९ |
| २.३ विक्री | १,५६० | १,९६१ | १,९२३ | १,७०० | १,६०२ | २,२८७ | २,५७२ |
| **एकूण उपभोग्य बाबींवरील खर्च** | **२८,३१४** | **३५,५२३** | **४०,३९६** | **४३,२२८** | **४८,०२४** | **५९,३९३** | **७०,६६७** |
| **ब. भांडवल निर्मितीवरील खर्च** | | | | | | | |
| १. इमारती | १,१३९ | १,०९२ | १,७५८ | १,७९१ | २,०८० | २,७७५ | ९,३१८ |
| २. रस्ते व पूल | २,९७४ | २,३४७ | २,७४२ | २,८४१ | ४,२१० | ३,८२२ | ३,८४९ |
| ३. इतर भांडवली खर्च | २,४४८ | २,८९७ | ३,४७७ | ३,८७० | २,५२७ | ८,१८२ | ७,८५८ |
| ४. दळणवळणाची साधनसामग्री | ६३ | १७१ | ५५ | १४४ | १२० | १७० | १२१ |
| ५. यंत्रसामग्री आणि साधनसामग्री | ७०४ | ४७२ | ४५४ | ५४६ | ५५० | ८७९ | १,००९ |
| ६. लागवडीखालील मत्ता | ८६ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७. पशुधन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **८. एकूण नवीन भांडवल निर्मिती (१ ते ७)** | **७,४१४** | **६,९७९** | **८,४८५** | **९,१९३** | **९,४८७** | **१५,८२८** | **२२,१५५** |
| ९. साठ्यातील बदल | (-)७ | (-)२ | २ | २ | ३ | ४ | ४ |
| **१०. स्थूल भांडवल निर्मिती (८+९)** | **७,४०७** | **६,९७७** | **८,४८७** | **९,१९५** | **९,४८९** | **१५,८३२** | **२२,१५८** |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

# सुधारित अंदाज ## अर्थसंकल्पिय अंदाज

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळणार नाही.

# ६

# संस्थांद्वारे वित्त पुरवठा व भांडवली बाजार

# ६. संस्थांद्वारे वित्त पुरवठा व भांडवली बाजार

६.१ वित्तीय संस्था समाजातील सर्व घटकांना तसेच पायाभूत सुविधा प्रकल्पांना वित्तीय सहाय्य पुरवितात. बँका या प्रमुख वित्तीय संस्था आहेत. बिगर बँकींग वित्तीय संस्था विविध वित्तीय उत्पादने व सेवा पुरवितात. या संस्था कॉर्पोरेट क्षेत्राच्या वाढत्या वित्तीय गरजा भागविण्यात बँकींग क्षेत्रास पूरक भूमिका निभावतात.

## अनुसूचित वाणिज्यिक बँका

६.२ अनुसूचित वाणिज्यिक बँकांमध्ये भारतीय स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका, राष्ट्रीयीकृत बँका, खाजगी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व विदेशी बँका यांचा समावेश आहे. राज्यात ३१ मार्च, २०१५ रोजी एकूण (११,२८४) अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या शाखा कार्यालयांपैकी सुमारे २७ टक्के कार्यालये ग्रामीण भागात होती. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी व कर्जे तक्ता ६.१ मध्ये दिले आहेत, तर याबाबतची मालिका परिशिष्ट ६.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी व कर्जे**

(३१ मार्च रोजी)

| तपशील | २०१४ | | | | २०१५ | | | | मागील वर्षाच्या तुलनेत एकूणशी शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | निम-नागरी | नागरी | एकूण | ग्रामीण | निम-नागरी | नागरी | एकूण | |
| शाखा कार्यालयांची संख्या | २,८५५ | २,३०७ | ५,४७८ | १०,६४० | ३,०९३ | २,४६२ | ५,७२९ | ११,२८४ | ६.१ |
| ठेवी (₹ '००० कोटी) | ४८.१ | ८५.३ | १,९१९.१ | २,०५२.४ | ५६.२ | ९५.७ | १,९८१.८ | २,१३३.७ | ४.० |
| कर्ज (₹ '००० कोटी) | ३९.० | ५१.५ | १,७२२.६ | १,८१३.५ | ४४.६ | ६०.५ | १,८७१.० | १,९७६.१ | ९.० |
| कर्ज-ठेवी प्रमाण (टक्के) | ८१.१ | ६०.४ | ८९.८ | ८८.४ | ७९.३ | ६३.२ | ९४.४ | ९२.६ | - |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक

६.३ मार्च, २०१५ अखेर अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या देशातील एकूण शाखा कार्यालयांपैकी सुमारे नऊ टक्के कार्यालये राज्यात कार्यरत होती. प्रति बँक शाखेद्वारे सेवा पुरविण्यात आलेली लोकसंख्या राष्ट्रीय पातळीवर १०,०७० च्या तुलनेत राज्यात १०,३९० इतकी होती. भारतातील या बँकांच्या एकूण ठेवी व स्थूल कर्जे यामध्ये राज्याचा हिस्सा अनुक्रमे सुमारे २४ टक्के व २८.७ टक्के होता. राज्यातील कर्ज-ठेवी प्रमाण ९२.६ टक्के होते, तर अखिल भारताकरिता हे प्रमाण ७७.४ टक्के होते.

**आलेख ६.१ : अनुसूचित वाणिज्यिक बँकांचे कर्ज-ठेवी प्रमाण**




६.४ मार्च, २०१५ अखेर राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या एकूण ठेवी व कर्जांमध्ये भारतीय स्टेट बँक व तिच्या संलग्न बँकांसह राष्ट्रीयीकृत बँकांचा हिस्सा अनुक्रमे सुमारे ६५ टक्के व ६६ टक्के होता. अनुसूचित वाणिज्यिक बँकांचे दरडोई ठेवी व दरडोई कर्ज अनुक्रमे ₹ १,८१,९८८ व ₹ १,६८,५४१ होते. अखिल भारतासाठी तत्सम आकडेवारी अनुक्रमे ₹ ७०,१५१ व ₹ ५४,२९१ होती. भारतीय स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका यांचे कर्ज-ठेवी प्रमाण सर्वाधिक (१३२.९ टक्के) होते. बँक गटनिहाय राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी व कर्जे तक्ता ६.२ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ६.२ बँक गटनिहाय राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी व कर्जे**

(३१ मार्च रोजी)

| बँक गट | २०१४ | | | | २०१५ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शाखा कार्यालयांची संख्या | ठेवी (₹ '००० कोटी) | कर्ज (₹ '००० कोटी) | कर्ज-ठेवी प्रमाण (टक्के) | बँक कार्यालयांची संख्या | ठेवी (₹ '००० कोटी) | कर्ज (₹ '००० कोटी) | कर्ज-ठेवी प्रमाण (टक्के) |
| भारतीय स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका | १,७८० | २५१.६ | ३२६.३ | १२९.७ | १,८७३ | २५५.३ | ३३९.२ | १३२.९ |
| राष्ट्रीयीकृत बँका | ६,०५८ | १,१२८.७ | ९१७.६ | ८१.३ | ६,३८९ | १,१३७.० | ९६१.० | ८४.५ |
| विदेशी बँका | ८७ | २०३.४ | १२३.८ | ६०.९ | ९५ | २२५.५ | १४७.५ | ६५.४ |
| प्रादेशिक ग्रामीण बँका | ६८० | ७.२ | ५.० | ६९.४ | ६९९ | ८.४ | ५.९ | ७०.७ |
| खाजगी बँका | २,०३५ | ४६१.७ | ४४०.४ | ९५.४ | २,२२८ | ५०७.६ | ५२२.४ | १०२.९ |
| **एकूण** | **१०,६४०** | **२,०५२.६** | **१,८१३.१** | **८८.४** | **११,२८४** | **२,१३३.७** | **१,९७६.१** | **९२.६** |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक

६.५ सन २०१४ मध्ये राज्यात अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या चालू, बचत व मुदत खात्यांच्या संख्येत अनुक्रमे सुमारे ४२ टक्के, १६ टक्के व ११ टक्के वाढ झाली. सन २०१४ मध्ये मुदत ठेवींच्या एकूण रकमेमध्ये सुमारे १५ टक्के वाढ झाली. खाते प्रकारानुसार राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी तक्ता ६.३ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ६.३ खाते प्रकारानुसार राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी**

(३१ मार्च रोजी)

| खाते प्रकार | २०१३ | | २०१४ | |
|---|---|---|---|---|
| | खात्यांची संख्या ('०००) | ठेवी (₹'००० कोटी) | खात्यांची संख्या ('०००) | ठेवी (₹'००० कोटी) |
| चालू | ४,२४२ | २०५.७ | ६,००९ | २१८.० |
| बचत | ९१,८५० | २३३.१ | १,०६,५७२ | २६३.१ |
| मुदत ठेवी | २१,२३९ | १,३४०.१ | २३,४८१ | १,५४७.७ |
| **एकूण** | **१,१७,३३१** | **१,७७८.९** | **१,३६,०६२** | **२,०२८.८** |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक

६.६ भारतीय रिझर्व्ह बँकेने सर्व अनुसूचित वाणिज्यिक बँकांना प्राधान्य क्षेत्रास कर्ज देण्याचे निर्देश दिले आहेत. मार्च २०१५ अखेर राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी प्राधान्य क्षेत्रास दिलेल्या एकूण कर्जापैकी सर्वाधिक (४० टक्के) येणे कर्ज 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्राकडे, तर त्याखालोखाल सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांकडे (३१.७ टक्के) होते. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी प्राधान्य क्षेत्रास दिलेल्या कर्जांपैकी येणे कर्जांची विगतवारी तक्ता ६.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.४ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी प्राधान्य क्षेत्रास दिलेल्या कर्जांपैकी येणे कर्जांची विगतवारी**

(३१ मार्च रोजी)

| प्राधान्य क्षेत्र | २०१४ | | २०१५ | |
|---|---|---|---|---|
| | खात्यांची संख्या ('०००) | येणे कर्ज (₹ '००० कोटी) | खात्यांची संख्या ('०००) | येणे कर्ज (₹ '००० कोटी) |
| कृषि व संलग्न कार्ये | ४,००१ | १७५.० | ४,५११ | १७६.८ |
| सूक्ष्म व लघु उपक्रम | १,५०९ | १३४.६ | १,६५३ | १४०.० |
| शिक्षण | १७९ | ४.१ | १८९ | ४.५ |
| गृहनिर्माण | ९११ | ८८.१ | ९४९ | ८८.४ |
| इतर | १९६ | २०.१ | २४८ | १२.० |
| निर्यात | १ | १७.१ | १ | २२.८ |
| **एकूण** | **६,८०५** | **४३९.०** | **७,५५१** | **४४४.५** |
| स्व-सहाय्यता गट/सहदायित्व गट | २४७ | २.४ | ३७४ | १.४ |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक

६.७ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडील एकूण येणे कर्जामध्ये सन २०१४ मध्ये सुमारे १५ टक्के वाढ झाली. एकूण येणे कर्जापैकी सुमारे ५५ टक्के कर्ज ही राष्ट्रीयीकृत बँकांकडे (भारतीय स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका वगळून) होती. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडे येणे कर्जे तक्ता ६.५ मध्ये दिले आहेत.

६.८ ३१ मार्च, २०१५ रोजी राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडील एकूण येणे कर्जापैकी सर्वाधिक (२७.७ टक्के) येणे कर्ज वस्तुनिर्माण क्षेत्रातील घटकांकडे होते. वैयक्तिक कर्जे क्षेत्राकडे ते १३.८ टक्के तर बांधकाम घटकांकडे येणे कर्ज ११.८ टक्के होते. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडील क्षेत्रनिहाय येणे कर्ज तक्ता ६.६ मध्ये दिले आहेत.

## वार्षिक कर्ज योजना

६.९ भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रत्येक गावात कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी 'सेवा क्षेत्र पद्धत' स्वीकारली असून जिल्हा हे सेवा क्षेत्राचे एकक आहे. त्या अनुषंगाने राज्यस्तरीय बँकर समितीची निमंत्रक बँक राज्याची वार्षिक कर्ज योजना तयार व संनियंत्रित करते. बँक ऑफ महाराष्ट्र (अग्रणी बँक) ही राज्याची निमंत्रक बँक आहे. सन २०१५-१६ साठी राज्याची प्राधान्य क्षेत्रासाठी वार्षिक कर्ज योजना ₹ १.८७ लाख कोटींची आहे. या योजनेमध्ये 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्राचा वाटा ३६ टक्के आहे तर 'ग्रामीण कारागीर, ग्राम व कुटीर उद्योग आणि लघु उद्योग' क्षेत्राचा वाटा ५३ टक्के आहे. वार्षिक कर्ज योजनेंतर्गत प्राधान्य क्षेत्रासाठी राज्यात वितरीत केलेले कर्ज तक्ता ६.७ मध्ये तर जिल्हानिहाय वार्षिक कर्ज योजना परिशिष्ट ६.२ मध्ये दिले आहे.

**तक्ता ६.५ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडे येणे कर्ज**

(३१ मार्च रोजी)

| बँक गट | येणे कर्ज (₹ '००० कोटी) | | मागील वर्षाच्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१३ | २०१४ | |
| भारतीय स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका | २८२.१ | ३२५.० | १५.२ |
| राष्ट्रीयीकृत बँका | ७९८.६ | ९१३.२ | १४.४ |
| विदेशी बँका | ९७.५ | ११०.६ | १३.४ |
| प्रादेशिक ग्रामीण बँका | ४.५ | ५.० | ११.१ |
| खाजगी बँका | २५५.३ | २९५.८ | १५.९ |
| **एकूण** | **१,४३८.०** | **१,६४९.६** | **१४.७** |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक

**तक्ता ६.६ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडील क्षेत्रनिहाय येणे कर्ज**

(३१ मार्च रोजी)

| क्षेत्र | येणे कर्ज (₹ '००० कोटी) | | मागील वर्षाच्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१४ | २०१५ | |
| कृषि व संलग्न कार्ये | ७३.७ | ७६.६ | ३.९ |
| खाण व दगड खाणकाम | २०.१ | २०.० | (-) ०.५ |
| वस्तुनिर्माण | ५२१.५ | ५२७.६ | १.२ |
| वीज, वायू व पाणीपुरवठा | ८१.६ | ९५.५ | १७.० |
| बांधकाम | १९१.० | २२४.१ | १७.३ |
| परिवहन | ६०.१ | ६४.७ | ७.७ |
| व्यावसायिक व इतर सेवा | १६२.१ | १६६.२ | २.५ |
| व्यापार | १५२.८ | १७७.९ | १६.४ |
| वैयक्तिक कर्जे | २३३.६ | २६२.२ | २०.४ |
| इतर @ | ३१९.७ | ३५६.५ | ११.५ |
| **एकूण** | **१,८१६.३** | **१,९०४.३** | **४.८** |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक @ गृहकर्जाव्यतिरिक्त इतर वैयक्तिक कर्जे समाविष्ट

**तक्ता ६.७ वार्षिक कर्ज योजनेंतर्गत प्राधान्य क्षेत्रासाठी राज्यात वितरीत केलेले कर्ज**

(₹ '००० कोटी)

| प्राधान्य क्षेत्र | २०१४-१५ | | | | २०१५-१६ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | साध्याची लक्ष्याशी टक्केवारी | लाभधारक (लाखात) | लक्ष्य | साध्य + | साध्याची लक्ष्याशी टक्केवारी | लाभधारक + (लाखात) |
| कृषि व संलग्न कार्ये | ५७.३ | ५६.० | ९७.७ | ४९.७ | ६६.७ | ४२.४ | ६३.६ | ४१.० |
| ग्रामीण कारागीर, ग्राम व कुटीर उद्योग आणि लघु उद्योग | ७७.२ | ८४.६ | १०९.६ | ८.९ | ९८.७ | ६१.९ | ६२.७ | ६.२ |
| इतर क्षेत्रे | २२.८ | ५.५ | २४.१ | १.८ | २१.२ | ११.१ | ५२.९ | ५.२ |
| **एकूण** | **१५७.३** | **१४६.१** | **९२.९** | **६०.४** | **१८६.६** | **११५.४** | **६१.८** | **५२.४** |

*आधार* : बँक ऑफ महाराष्ट्र, राज्यस्तरीय बँकर्स समितीचे निमंत्रक + सप्टेंबर पर्यंत

## सूक्ष्म वित्तपुरवठा

६.१० सूक्ष्म वित्तपुरवठा हा दारिद्र्य निर्मुलन आणि गरीबांच्या सक्षमीकरणाच्या प्रभावी कार्यक्रमांपैकी एक आहे. यामध्ये कर्जे, बचत, निधी हस्तांतरण व विमा या सारख्या विविध वित्तीय सेवा समाविष्ट आहेत. नाबार्ड या संस्थेने सुरू केलेला 'स्व-सहाय्यता गट बँक दुवा कार्यक्रम' औपचारिक ग्रामीण बँकींग व्यवस्था व अनौपचारिक स्व-सहाय्यता गट यांच्यात होणाऱ्या वित्तीय व्यवहारास चालना देतो. मार्च, २०१५ अखेर राज्यातील स्व-सहाय्यता गटांच्या एकूण बचतीमध्ये, केवळ महिला स्व-सहाय्यता गटांद्वारे झालेल्या बचतींचा हिस्सा सुमारे ८७ टक्के होता. बँकांकडील प्रति स्व-सहाय्यता गट सरासरी थकीत कर्ज ₹ ७५,७०५ होते तर मागील वर्षी ते ₹ ६४,६०६ होते. राज्यातील स्व-सहायता गटांच्या बचती, कर्जवाटप व थकीत कर्जे तक्ता ६.८ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ६.८ राज्यातील स्व-सहायता गटांच्या बचती, कर्जवाटप व थकीत कर्जे**

(३१ मार्च, २०१५ रोजी)

| बँक प्रकार | तपशील | एकूण स्व-सहाय्यता गट | | एकूण पैकी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | राग्राजीअ /स्वजग्रास्वयो अंतर्गत स्व-सहाय्यता गट | | केवळ महिलांचे स्व-सहाय्यता गट | |
| | | संख्या | रक्कम (₹ कोटी) | संख्या | रक्कम (₹ कोटी) | संख्या | रक्कम (₹ कोटी) |
| **सहकारी** | **एकूण** | **३,५०,७६०** | **६८३.५८** | **४५,६९३** | **११४.०१** | **३,१३,६७२** | **२५७.४८** |
| | बचत | २,९३,६७९ | ४५३.५३ | ३९,०६२ | ५३.१४ | २,६१,७७७ | ४३२.९६ |
| | कर्जवाटप@ | १४,८८६ | ९६.४५ | २,४५९ | १९.७० | १४,६४० | ९३.०१ |
| | थकीत कर्ज | ४२,१९५ | १३३.६० | ४,१७२ | ४१.१७ | ३७,२५५ | १२१.५१ |
| **प्रादेशिक ग्रामीण** | **एकूण** | **१,६०,६४८** | **५४१.८५** | **२७,५३८** | **८५.७४** | **१,३८,१५०** | **४८१.२२** |
| | बचत | १,१५,३२९ | १५६.६४ | १८,६२७ | १६.८५ | ९९,८८९ | १३५.११ |
| | कर्जवाटप@ | ९,४६७ | ११५.०७ | १,९५८ | २२.०३ | ८,५१२ | १०६.३९ |
| | थकीत कर्ज | ३५,८५२ | २७०.१४ | ६,९५३ | ४६.८६ | २९,७४९ | २३९.७२ |
| **खाजगी वाणिज्यिक** | **एकूण** | **१,४३,१७२** | **१,०६४.१२** | **३७** | **०.१८** | **१,४३,०३९** | **१,०६३.६१** |
| | बचत | ६०,८४५ | ६०.११ | ११ | ०.०० | ६०,७२४ | ५९.९० |
| | कर्जवाटप@ | ३२,२०५ | ४५२.७१ | ० | ०.०० | ३२,२०१ | ४५२.५८ |
| | थकीत कर्ज | ५०,१२२ | ५५१.३० | २६ | ०.१८ | ५०,११४ | ५५१.१३ |
| **सार्वजनिक वाणिज्यिक** | **एकूण** | **३,३९,९२४** | **१,०३७.६१** | **१,६२,१५१** | **३४०.४८** | **२,६१,६६६** | **७७२.३२** |
| | बचत | २,४८,००७ | २३३.५३ | १,३०,२८२ | ६८.२२ | १,९२,५९८ | १६२.५० |
| | कर्जवाटप@ | १७,६१४ | २२६.३० | ७,१६५ | ८३.८४ | १३,२८२ | १७६.३८ |
| | थकीत कर्ज | ७४,३०३ | ५७७.७८ | २४,७०४ | १८८.४२ | ५५,७८६ | ४३३.४४ |

*आधार* : नाबार्ड @ वर्ष २०१४-१५ मधील राग्राजीअ - राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान स्वजग्रास्वयो -स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना

## वित्तीय समावेश

६.११ 'वित्तीय समावेश' म्हणजे समाजातील वंचित घटक व अल्प उत्पन्न गट यांना बचत, कर्ज, प्रदाने, परतावे व विमा अशा सेवा त्यांना परवडण्याजोग्या दरात उपलब्ध करुन देणे. भारत सरकार व भारतीय रिझर्व्ह बँक यांचेकडून विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहेत जेणेकरुन खात्रीशीररित्या वित्तीय समावेश साधता येईल. राज्यात ३ फेब्रुवारी, २०१६ पर्यंत प्रधानमंत्री जन-धन योजनेअंतर्गत एकूण १.३५ कोटी बँक खाती उघडण्यात आली असून त्यामधील एकूण ठेवी ₹ १,८६३.०६ कोटी होत्या. खाते उघडल्यापासून किमान सहा महिन्यांच्या बचत/कर्ज पूर्ववृत्ताच्या आधारे ₹ ५,००० पर्यंतची ओव्हरड्राफ्ट सुविधा बँक खातेधारकांना उपलब्ध होते. मार्च २०१५ अखेर किमान शिलकीची मर्यादा नसलेल्या एकूण खात्यांपैकी २.१ टक्के खात्यांनी ही सुविधा वापरली. दिनांक ३ फेब्रुवारी, २०१६ पर्यंत एकूण १.१४ कोटी 'रुपे कार्ड' देण्यात आली. अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी वित्तीय समावेशांतर्गत पुरविलेल्या विविध बँकिंग सुविधांचा तपशील तक्ता ६.९ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.९ अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी वित्तीय समावेशांतर्गत पुरविलेल्या विविध बँकिंग सुविधा**

(३१ मार्च रोजी)

| तपशील | २०१४ | २०१५ |
|---|---|---|
| **ग्रामीण भागात असलेल्या बँकींग केंद्रांची एकूण संख्या** | २१,२१५ | ३३,६०० |
| **किमान शिलकीची मर्यादा नसलेली खाती** | | |
| संख्या ('०००) | १४,९६२ | २६,६४४ |
| रक्कम (₹ कोटी) | १,६३४.९ | २,७१६.८ |
| **ओव्हरड्राफ्ट सुविधा वापरलेली किमान शिलकीची मर्यादा नसलेली खाती** | | |
| रक्कम (₹ कोटी) | ५८.१ | १४०.२ |
| **किसान क्रेडिट कार्ड** | | |
| खात्यांची संख्या ('०००) | २,७५९ | २,९५३ |
| येणे रक्कम (₹ कोटी) | २३,१५९.० | २८,४९७.८ |

*आधार :* भारतीय रिझर्व्ह बँक

६.१२ केंद्र शासनाने ८ एप्रिल,२०१५ पासून प्रधानमंत्री मुद्रा योजना कार्यान्वित केली. या योजनेअंतर्गत उत्पन्न निर्मितीसंबंधातील अ-कृषिक कार्यात गुंतलेल्या सर्व सूक्ष्म व लघुउद्योगांना ₹ १० लाखापर्यंत सुलभरित्या कर्ज देण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थी घटकांच्या विकास अवस्था व आर्थिक निकडीनुसार कर्जाची 'शिशु' (₹ ५०,००० पर्यंत), 'किशोर' (₹ ५०,००० ते ₹ ५ लाख) आणि 'तरुण' (₹ ५ लाख ते ₹ १० लाख) अशाप्रकारे विगतवारी केली आहे. योजनेच्या आरंभापासून १९ फेब्रुवारी, २०१६ पर्यंत सुमारे २६.४ लाख लाभार्थ्यांना ('शिशु' अंतर्गत २४.९ लाख, 'किशोर'अंतर्गत १.२ लाख व 'तरुण' अंतर्गत ०.३ लाख) एकूण ₹ ९,७७६ कोटींचे कर्ज वितरित करण्यात आले.

## ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी

६.१३ भारत सरकारने ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अल्प दराने कर्ज पुरवठा करण्यासाठी नाबार्ड या संस्थेत ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधीची(ग्रापासुविनि) स्थापना केली आहे. ग्रापासुविनि मध्ये एकूण ३४ कार्यांचा समावेश केला असून त्यांची विभागणी कृषि व संलग्न कार्ये, सामाजिक क्षेत्र आणि ग्रामीण दळणवळण या प्रमुख तीन गटात केली आहे. या कार्यांतर्गत प्रकल्पांना एकूण प्रकल्पमूल्याच्या अनुक्रमे ९५ टक्के, ८५ टक्के व ८० टक्के पर्यंत कर्ज घेण्याची मुभा आहे. मार्च, २०१५ अखेर ग्रापासुविनि अंतर्गत ₹ ८,१२५ कोटी कर्ज वितरीत करण्यात आले. ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी अंतर्गत राज्यातील मंजूर प्रकल्प व वितरीत झालेले कर्ज तक्ता ६.१० मध्ये दिले आहे.

**तक्ता ६.१० ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी अंतर्गत राज्यातील मंजूर प्रकल्प व वितरीत झालेले कर्ज**

(₹ कोटी)

| टप्पा क्र. | वर्ष | मंजूर प्रकल्पांची संख्या | वितरित झालेले कर्ज |
|---|---|---|---|
| XVIII | २०१२-१३ | ८२७ | २८९ |
| XIX | २०१३-१४ | ६४५ | २६० |
| XX | २०१४-१५ | ८१८ | १५८ |
| XXI | २०१५-१६ | २६१ | ० |

*आधार* : नाबार्ड

## संयुक्त भांडवली संस्था

६.१४ संयुक्त भांडवली संस्था विविध संलग्न उद्योग, व्यापार व व्यापाराशी संलग्न उद्योगांना प्रोत्साहन देतात. मार्च, २०१५ अखेर भारतातील एकूण १०,१५,६०१ संयुक्त भांडवली संस्थांपैकी, सुमारे २१ टक्के संस्था राज्यात कार्यरत होत्या. भरणा केलेल्या एकूण भांडवलामध्ये या संस्थांचा हिस्सा सुमारे २३ टक्के होता. राज्यातील संयुक्त भांडवली संस्थांचे भरणा केलेले भांडवल तक्ता ६.११ मध्ये दिले आहे.

**तक्ता ६.११ राज्यातील संयुक्त भांडवली संस्थांचे भरणा केलेले भांडवल**

(३१ मार्च रोजी)

| बाब | २०१४ | | | | २०१५* | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | | भारत | | महाराष्ट्र | | भारत | |
| | संस्थांची संख्या | भरणा केलेले भांडवल (₹'००० कोटी) | संस्थांची संख्या | भरणा केलेले भांडवल (₹'००० कोटी) | संस्थांची संख्या | भरणा केलेले भांडवल (₹'००० कोटी) | संस्थांची संख्या | भरणा केलेले भांडवल (₹'००० कोटी) |
| खाजगी | १,५७,१०५ | १९२.८ | ७,९१,८३१ | ७८५.४ | २,०२,१९६ | २११.३ | ९,५२,४९० | ८७४.३ |
| सार्वजनिक | १०,८१९ | २९९.३ | ५९,४१८ | १,३३२.८ | ११,३६१ | ३२७.४ | ६३,१११ | १,४२१.७ |
| **एकूण** | **१,६७,९२४** | **४९२.१** | **८,५१,२४९** | **२,११८.२** | **२,१३,५५७** | **५३८.७** | **१०,१५,६०१** | **२,२९६.०** |

*आधार :* मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स, भारत सरकार * अस्थायी

## भांडवली बाजार

६.१५ भांडवली बाजार ही बचतींना परिणामकारक दीर्घकालीन गुंतवणुकीत वळविणारी यंत्रणा आहे. राज्यात मुंबई शेअर बाजार व राष्ट्रीय शेअर बाजार हे प्रमुख शेअर बाजार कार्यरत आहेत. याशिवाय, ओटीसी एक्स्चेंज ऑफ इंडिया, इंटर कनेक्टेड स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड, युनायटेड स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड, पुणे स्टॉक एक्स्चेंज लिमिटेड व एमसीएक्स् स्टॉक एक्स्चेंज लिमिटेड असे पाच शेअर बाजार कार्यरत आहेत.

## प्राथमिक बाजार

६.१५.१ सन २०१४-१५ मध्ये राज्यात २६ समभागांद्वारे (२० सार्वजनिक व सहा हक्क समभाग) ₹ ५,६०५ कोटींची तर मागील वर्षी १६ समभागांद्वारे (११ सार्वजनिक व पाच हक्क समभाग) ₹ ४,५६० कोटींची रक्कम उभारण्यात आली. सन २०१५-१६ मध्ये नोव्हेंबर पर्यंत राज्यात १९ समभागांद्वारे (१३ सार्वजनिक व सहा हक्क समभाग) ₹ १०,२९६ कोटींची रक्कम उभारण्यात आली.

## दुय्यम बाजार

६.१५.२ राष्ट्रीय शेअर बाजार व मुंबई शेअर बाजारात सन २०१४-१५ मध्ये उलाढाल झालेल्या एकूण समभागांचे भांडवली मूल्य अनुक्रमे ₹ ९९,३०,१२२ कोटी व ₹ १,०१,४९,२९० कोटी इतके होते. सन २०१३-१४ मध्ये तत्सम आकडेवारी अनुक्रमे ₹ ७२,७७,७२० कोटी व ₹ ७४,१५,२९६ कोटी होती. राष्ट्रीय व मुंबई शेअर बाजाराची उलाढाल तक्ता ६.१२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१२ शेअर बाजारातील उलाढाल**

(₹ '००० कोटी)

| शेअर बाजार | २०१४-१५ | २०१५-१६+ |
|---|---|---|
| राष्ट्रीय | ४,३३० | २,८४७ |
| मुंबई | ८५५ | ४९२ |

आधार : सेबी + नोव्हेंबर पर्यंत

## म्युच्युअल फंड

६.१५.३ अनेक गुंतवणुकदारांना त्यांची संसाधने एकत्रित करून समभाग, वस्तू व इतर रोखे खरेदीस सहाय्य करणारे म्युच्युअल फंड हे गुंतवणुकीचे साधन आहे. सन २०१४-१५ मध्ये म्युच्युअल फंडाद्वारे भारतात झालेल्या ₹ १,०३,४३३ कोटींच्या उलाढालीच्या तुलनेत राज्यात ₹ ५३,८८४ कोटी इतकी उलाढाल झाली. म्युच्युअल फंडाद्वारे झालेली उलाढाल तक्ता ६.१३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१३ म्युच्युअल फंडाद्वारे झालेली उलाढाल**

(₹ '००० कोटी)

| वर्ष | नवीन म्युच्युअल फंड | अस्तित्वातील म्युच्युअल फंड |
|---|---|---|
| २०१३-१४ | १३६.३ | ९,६३२.१ |
| २०१४-१५ | ५९.० | ११,०२७.३ |
| २०१५-१६+ | २१.३ | ७,९१०.६ |

*आधार* : असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंडस् इन इंडिया + ऑक्टोबर पर्यंत

## विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्र

६.१५.४ किरकोळ गुंतवणूकदारांना सुलभ व्हावे म्हणून मल्टी कमोडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एमसीएक्स), नॅशनल कमोडिटी अँड डेरिव्हेटिव्हज् एक्स्चेंज लिमिटेड (एनसीडीईएक्स) व नॅशनल मल्टी कमोडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएमसीई) ही तीन विक्रेय वस्तू विनिमय व्यापार केंद्रे कार्यरत आहेत. एमसीएक्स व एनसीडीईएक्स यांची उलाढाल तक्ता ६.१४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१४ एमसीएक्स व एनसीडीईएक्स यांची उलाढाल**

(₹ '००० कोटी)

| विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्र | समाविष्ट विक्रेय वस्तूंची संख्या | | उलाढाल | |
|---|---|---|---|---|
| | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१३-१४ | २०१४-१५ |
| एमसीएक्स | ३५ | २९ | १७,२२३ | १०,३६७ |
| एनसीडीईएक्स | २७ | २८ | १,१४६ | ९०४ |

*आधार* : एमसीएक्स व एनसीडीईएक्स

## विमा

६.१६ विम्याद्वारे उपक्रमांना व व्यक्तींना सुरक्षा कवच मिळते, तसेच विकास कामासाठी लागणारा दीर्घकालीन निधी निर्माण होतो. सध्या जीवन विमा क्षेत्रात २४ कंपन्या कार्यरत आहेत. वर्ष २०१४-१५ मध्ये राज्यातील एकूण जीवन विमा व्यवसायामध्ये भारतीय जीवन विमा निगमचा हिस्सा गतवर्षाच्या ७२.३ टक्क्यांच्या तुलनेत ६८.८ टक्के होता. नव्याने काढण्यात आलेल्या वैयक्तिक जीवन विमा पॉलिसी तक्ता ६.१५ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ६.१५ नवीन वैयक्तिक जीवन विमा पॉलिसी**

(₹ कोटी)

| तपशील | | २०१३-१४ | | २०१४-१५ | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या ('०००) | हप्ता | संख्या ('०००) | हप्ता |
| महाराष्ट्र | खाजगी | १,००६ | ३,२२२ | ९४० | ९,१८४ |
| | जीविनि | ४,२६१ | ८,४१६ | २,४७६ | २०,२८७ |
| | **एकूण** | **५,२६७** | **११,६३८** | **३,४१६** | **२९,४७१** |
| भारत | खाजगी | ६,३५५ | १९,१७९ | ५,७३७ | ३४,८२० |
| | जीविनि | ३४,४८० | ४१,७७८ | २०,१७१ | ७८,५०८ |
| | **एकूण** | **४०,८३५** | **६०,९५७** | **२५,९०८** | **१,१३,३२८** |

*आधार :* विमा नियामक व विकास प्राधिकरण जीविनि - भारतीय जीवन विमा निगम

६.१७ सध्या बिगर-जीवन विमा क्षेत्रात २८ संस्था कार्यरत असून त्यापैकी सहा सार्वजनिक क्षेत्रातील आहेत. सन २०१४-१५ मध्ये बिगर-जीवन विम्यापोटी प्राप्त झालेल्या स्थूल विमा हप्त्याच्या रकमेत ८.७ टक्के वाढ झाली. बिगर-जीवन विमा अंतर्गत आरोग्य विम्यापोटी सर्वाधिक (३० टक्के) व त्या खालोखाल मोटार स्व-हानी विम्यापोटी (१७ टक्के) हप्ता गोळा झाला. राज्यात क्षेत्रनिहाय बिगर-जीवन विम्याच्या हप्त्याद्वारे प्राप्त झालेले स्थूल उत्पन्न तक्ता ६.१६ मध्ये दिले आहे.

**तक्ता ६.१६ राज्यात क्षेत्रनिहाय बिगर-जीवन विम्याच्या हप्त्याद्वारे प्राप्त झालेले स्थूल उत्पन्न**

(₹ कोटी)

| वर्ष | अग्नी | सागरी | | अभियांत्रिकी | मोटार | | दायित्व विमा | वैयक्तिक अपघात | आरोग्य विमा | पीक विमा | संकीर्ण# | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मालवाहू | जहाज | | स्व-हानी | तृतीय पक्ष | | | | | | |
| २०१३-१४ | २,००६ | ५७८ | ८१० | ५६४ | २,८६९ | २,२४० | ५१६ | ६२९ | ५,५१९ | २२७ | १,८२७ | १७,७८५ |
| २०१४-१५ | १,९५२ | ५४५ | ६९७ | ४६४ | ३,२८२ | १,०९८ | ५१७ | ७१८ | ५,८४२ | २,३०६ | १,९२० | १९,३४१ |

*आधार* : विमा नियामक व विकास प्राधिकरण # कर्ज विमा, विदेशी वैद्यकीय विमा, इत्यादिंचा समावेश

* * * * *

## परिशिष्ट ६.१

## सर्व अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्ज

(₹ कोटी)

| वर्ष | वर्षाच्या जून महिन्यातील अखेरच्या शुक्रवारची स्थिती | | | | | | एकूण ठेवी | एकूण कर्ज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | | निमनागरी | | नागरी / महानगर | | | |
| | ठेवी | कर्ज | ठेवी | कर्ज | ठेवी | कर्ज | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १९७१ | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | १,४६० | १,२९१† |
| १९८१ | ३०९ | २२६ | ७१४ | ३८४ | ६,५६८ | ५,३२१ | ७,५९० | ५,९३१ |
| १९९१ | १,७०१ | १,३५७ | २,३४७ | १,३५४ | ३६,१८१ | २६,९३६ | ४०,२३० | २९,६४७ |
| २००१ | ६,७६९ | ५,०२९ | १०,०३४ | ४,१३८ | १,५९,१९९ | १,३४,३४० | १,७६,००१ | १,४३,५०७ |
| २००६ | १२,४११ | ११,६०९ | २१,७०५ | १४,१११ | ६,५१,४२३ | ६,०८,००६ | ६,८५,५३८ | ६,३३,७२५ |
| २०१० | २३,५५५ | १७,४३७ | ४०,५२६ | २१,८७८ | ११,०३,४२३ | ९,५३,७९९ | ११,६७,५०४ | ९,९३,११४ |
| २०११ | २९,२३१ | २२,७०३ | ४९,१७४ | २७,६०४ | १३,२५,५५० | ११,२५,७८० | १४,०३,९५५ | ११,७६,०८७ |
| २०१२ | ३४,४५४ | २६,७१२ | ५८,५८६ | ३१,८२९ | १५,००,६५४ | १३,२९,२८७ | १५,९३,६९४ | १३,८७,८२७ |
| २०१३# | ४१,११९ | ३१,५२७ | ७०,०५२ | ४१,१३५ | १६,७३,८७२ | १५,०३,८२७ | १७,८५,०४३ | १५,७६,४९० |
| २०१४# | ४८,११५ | ३९,००९ | ८५,३२२ | ५१,५१० | १९,१९,०९० | १७,२२,६०४ | २०,५२,५२७ | १८,१३,१२३ |
| २०१५# | ५६,२१४ | ४४,५७८ | ९५,६८८ | ६०,४७९ | १९,८१,८१५ | १८,७१,००० | २१,३३,७१८ | १९,७६,०५७ |

| वर्ष | दरडोई ठेवी (₹) | दरडोई कर्ज (₹) | एकूण बँक कार्यालयांची संख्या | | | दर लाख लोकसंख्येमागे बँकींग कार्यालयांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ग्रामीण व निमनागरी | नागरी / महानगर क्षेत्रातील | एकूण | |
| (१) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) |
| १९७१ | २९० | २५६ | २५६ | उ. ना. | १,४७१ | २.९ |
| १९८१ | १,२०४ | ९४० | उ. ना. | उ. ना. | ३,६२७ | ५.८ |
| १९९१ | ५,३४४ | ३,५८० | ३,३५३ | २,२३८ | ५,५९१ | ७.४ |
| २००१ | १८,१०६ | १४,७६३ | ३,३८० | २,९१४ | ६,२९४ | ६.५ |
| २००६ | ६४,११७ | ५९,२१७ | ३,२९५ | ३,४२५ | ६,७२० | ६.३ |
| २०१० | १,०४,५७१ | ८८,९७८ | ३,७१८ | ४,३१९ | ८,०३७ | ७.२ |
| २०११ | १,२४,०४८ | १,०३,९११ | ३,९०२ | ४,६१३ | ८,५१५ | ७.५ |
| २०१२ | १,३९,५७२ | १,२१,५४३ | ४,१९६ | ४,८५७ | ९,०५३ | ७.९ |
| २०१३# | १,५४,२८६ | १,३६,२६० | ४,५८५ | ५,१८९ | ९,७७४ | ८.५ |
| २०१४# | १,७५,१४७ | १,५४,७१८ | ५,१६२ | ५,४७८ | १०,६४० | ९.१ |
| २०१५# | १,८१,९८८ | १,६८,५४१ | ५,५५५ | ५,७२९ | ११,२८४ | ९.६ |

*आधार* - भारतीय रिझर्व्ह बँक

† आकडे जून, १९७१ च्या दुसऱ्या शुक्रवारचे आहेत.   # ३१ मार्च रोजी   उ. ना. उपलब्ध नाही

टीप - आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

# परिशिष्ट ६.२

## जिल्हानिहाय वार्षिक कर्ज योजना (२०१५-१६)

(₹ कोटी)

| अ. क्र. | जिल्हा | प्राधान्य क्षेत्र: कृषि व संलग्न कार्ये: एकूण कर्ज | प्राधान्य क्षेत्र: कृषि व संलग्न कार्ये: त्यापैकी, पीक कर्ज | प्राधान्य क्षेत्र: बिगर शेती क्षेत्र | प्राधान्य क्षेत्र: इतर प्राधान्य क्षेत्र | प्राधान्य क्षेत्र: एकूण | बिगर प्राधान्य क्षेत्र | एकूण योजना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | मुंबई शहर | ४,०२१ | ० | ४६,७९७ | ३,५९९ | ५४,४१६ | १,१४,४५० | १,६८,८६६ |
| २ | मुंबई उपनगर | ८५ | ० | १६,००० | १,२५० | १७,३३५ | ३३,७५० | ५१,०८५ |
| ३ | ठाणे | ३७३ | २१० | ३,६४९ | १,३४० | ५,३६२ | १,५७९ | ६,९४१ |
| ४ | पालघर | ३८० | २०० | ७६७ | ३६९ | १,५१६ | २९८ | १,८१४ |
| ५ | रायगड | ३२३ | १५० | १,११७ | ३५ | १,४७५ | ६६४ | २,१३९ |
| ६ | रत्नागिरी | ६५३ | ३२९ | ५४८ | ५२२ | १,७२२ | ३०५ | २,०२७ |
| ७ | सिंधुदुर्ग | ४२४ | २२० | ५०० | ४६ | ९७० | ३६८ | १,३३८ |
| ८ | नाशिक | ४,३७९ | २,६३२ | २,६२३ | ८६१ | ७,८६२ | ६४२ | ८,५०४ |
| ९ | धुळे | १,४४२ | ९८९ | ३१८ | २५६ | २,०१५ | १०० | २,११५ |
| १० | नंदुरबार | ६९० | ५९० | १८३ | ४५ | ९१८ | ८२ | १,००० |
| ११ | जळगाव | ३,१५५ | २,५११ | १,३६५ | २७० | ४,७८९ | १३९ | ४,९२८ |
| १२ | अहमदनगर | ४,६५२ | ३,०६८ | ८९५ | १,७४६ | ७,२९३ | ९०८ | ८,२०० |
| १३ | पुणे | ४,९५६ | २,७५२ | १०,७५७ | ५,८१७ | २१,५३० | ६,०८९ | २७,६१९ |
| १४ | सातारा | ३,२३४ | १,९९९ | १,०८७ | ८३० | ५,१५० | ६५० | ५,८०० |
| १५ | सांगली | ३,१०० | १,५६७ | ४४२ | ५५७ | ४,०९९ | ५८४ | ४,६८३ |
| १६ | सोलापूर | ७,००० | ५,००० | २,५०० | १०० | ९,६०० | ४०० | १०,००० |
| १७ | कोल्हापूर | २,५१७ | १,७८८ | २,१५५ | ३६७ | ५,०४० | १,६४५ | ६,६८५ |
| १८ | औरंगाबाद | १,५६९ | १,०९७ | १,६६३ | ९८८ | ४,२२० | ८४३ | ५,०६२ |
| १९ | जालना | १,३२९ | १,०९७ | ४६७ | १७९ | १,९७५ | १०३ | २,०७८ |
| २० | परभणी | १,५७० | १,३४२ | ३२७ | ८२ | १,९७९ | १५० | २,१२९ |
| २१ | हिंगोली | ९२६ | ७९१ | ४८ | ९७ | १,०७० | ५० | १,१२० |
| २२ | बीड | २,०६९ | १,८०६ | १७२ | ३४३ | २,५८५ | ० | २,५८५ |
| २३ | नांदेड | १,८३७ | १,५५३ | ४१८ | ५३ | २,३०८ | ० | २,३०८ |
| २४ | उस्मानाबाद | १,७१० | १,१३१ | ४९० | १३९ | २,३३९ | ० | २,३३९ |
| २५ | लातूर | १,५५९ | १,२५८ | ५८४ | २०८ | २,३५१ | ३३७ | २,६८८ |
| २६ | बुलढाणा | १,५५० | १,३२५ | २२० | ५० | १,८२० | ८७ | १,९०७ |
| २७ | अकोला | १,२११ | ९२२ | १८४ | ३९४ | १,७९० | १७५ | १,९६५ |
| २८ | वाशिम | १,०८० | ८८८ | २३२ | ० | १,३१२ | ४६ | १,३५८ |
| २९ | अमरावती | २,४२१ | २,०६३ | ३३७ | १६१ | २,९१८ | १७३ | ३,०९१ |
| ३० | यवतमाळ | २,१४९ | १,७०४ | ३५५ | ३२४ | २,८२८ | २६२ | ३,०९० |
| ३१ | वर्धा | ९५२ | ६०५ | २२९ | ० | १,१८१ | १३६ | १,३१७ |
| ३२ | नागपूर | १,४५३ | १०७३ | ३०४ | ० | १,७५७ | ४६२ | २,२१९ |
| ३३ | भंडारा | ५४७ | ५२१ | २५५ | ४४ | ८४५ | १५९ | १,००४ |
| ३४ | गोंदिया | ३२७ | २४७ | १३६ | ४२ | ५०४ | ६७ | ५७२ |
| ३५ | चंद्रपूर | ८५९ | ६८९ | ४५७ | ४० | १,३५६ | १४४ | १,५०० |
| ३६ | गडचिरोली | २४९ | २०० | १४१ | ० | ३९० | १६ | ४०६ |
| | **महाराष्ट्र** | **६६,७४८** | **४४,३१९** | **९८,७२१** | **२१,१५१** | **१,८६,६२०** | **१,६५,८६२** | **३,५२,४८१** |

*आधार* - राज्यस्तरीय बँकर्स समिती, बँक ऑफ महाराष्ट्र

टीप - आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

# ७

# कृषि व संलग्न कार्ये

# ७. कृषि व संलग्न कार्ये

७.१ अर्थव्यवस्थेत कृषि क्षेत्र हे नेहमीच केंद्रस्थानी राहिले आहे. या क्षेत्रामध्ये सर्वसमावेशक वृद्धीस चालना, ग्रामीण भागातील उत्पन्नात वाढ व शाश्वत अन्न सुरक्षा या तीन महत्वाच्या बाबींचा समावेश होतो. देशात १९६० पासून 'हरित क्रांती' नंतर कृषि क्षेत्रात कोणताही महत्वाचा तांत्रिक शोध लागलेला नाही. सकस अन्नाची गरज भागविण्यासाठी आवश्यक असलेली कडधान्ये, तेलबिया, फळे व भाज्यांकडे विशेष लक्ष देऊन कृषि उत्पादनात व उत्पादकतेत वाढ होणे लक्षावधी नागरिकांच्या अन्न सुरक्षेच्या दृष्टीने गरजेचे आहे. कृषि क्षेत्राची प्रगती होण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

७.१.१ कृषि उत्पादनांच्या वाढीस योग्य वेळेस पाणी उपलब्ध होणे अत्यंत महत्वाचे आहे. सिंचनाखालील क्षेत्रात वाढ करण्याकरिता तसेच सध्याची सिंचन व्यवस्था सुधारण्याकरिता वेगवेगळ्या योजना राबविण्यात येत आहेत. शासनाने राज्यास '२०१९ सालापर्यंत पाणी टंचाईमुक्त राज्य' करण्याकरिता 'जलयुक्त शिवार अभियान' हा महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यास सुरुवात केली आहे. पाण्याच्या तीव्र टंचाईवर मात करण्यासाठी, विशेषतः ऊस पिकाकरिता, ठिबक सिंचनासही प्रोत्साहन दिले जात आहे.

७.१.२ कृषि उत्पादन व उत्पादकतेत सुधारणा घडवून शेतकऱ्यांना दिलासा देणारे कृषि पतपुरवठा हे एक साधन आहे. केंद्र शासनाने 'प्रधानमंत्री फसल बीमा योजना' या महत्वाकांक्षी पीक विमा योजनेअंतर्गत येत्या दोन-तीन वर्षात सुमारे ५० टक्के शेतकऱ्यांना सामावून घेण्याचे लक्ष्य ठेवले आहे. कृषि क्षेत्रातील अनिश्चिततेला तोंड देण्यासाठी पीक विमा योजना उपयुक्त आहेत.

## मान्सून २०१५

७.२ मान्सूनचे आगमन कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांत ८ जून, २०१५ रोजी झाले व १४ जून, २०१५ पर्यंत तो राज्यात सर्वदूर पोहोचला. राज्यात जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर या महिन्यांत सरासरीच्या तुलनेत अनुक्रमे १०३.५ टक्के, ३२.३ टक्के, ५४.९ टक्के, ७४.७ टक्के व ४९.९ टक्के पाऊस पडला. सन २०१५ मध्ये राज्यात अपुरा (सरासरीच्या ५९.४ टक्के) पाऊस पडला. राज्याच्या कृषि विभागाकडून मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील तालुके वगळता सर्व ३५५ तालुक्यांतील पावसाची नोंद करण्यात येते. राज्यातील ३५५ तालुक्यांपैकी २७८ तालुक्यांत अपुरा, ७५ तालुक्यांत सरासरी एवढा आणि २ तालुक्यांमध्ये (अकोले व महाबळेश्वर) प्रमाणाबाहेर पाऊस पडला. पावसाच्या स्थूल वर्गवारीनुसार जिल्हे व तालुक्यांचे वर्गीकरण तक्ता ७.१ मध्ये तर पावसाच्या प्रमाणानुसार तालुक्यांचे महिनानिहाय वर्गीकरण तक्ता ७.२ मध्ये दिले आहे.




**तक्ता ७.१ पावसाच्या स्थूल वर्गवारीनुसार जिल्हे व तालुक्यांचे वर्गीकरण**

| पावसाची स्थूल वर्गवारी (सरासरीशी टक्केवारी) | जिल्ह्यांची संख्या# | | | तालुक्यांची संख्या# | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१३ | २०१४ | २०१५ | २०१३ | २०१४ | २०१५ |
| प्रमाणाबाहेर (१२० व अधिक) | १८ | ० | ० | १८६ | १७ | २ |
| सरासरी (८० - १२०) | १५ | १० | ५ | १५३ | ११२ | ७५ |
| अपुरा (४० - ८०) | ० | २३ | २८ | १६ | २१३ | २५४ |
| तुरळक (० - ४०) | ० | ० | १ | ० | १३ | २४ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन # मुंबई शहर व मुंबई उपनगर हे जिल्हे आणि त्यांच्यातील तालुके वगळून

**तक्ता ७.२ पावसाच्या प्रमाणानुसार तालुक्यांचे महिनानिहाय वर्गीकरण**

| पावसाची वर्गवारी (सरासरीशी टक्केवारी) | तालुक्यांची संख्या# | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जून | | जुलै | | ऑगस्ट | | सप्टेंबर | | ऑक्टोबर | |
| | २०१४ | २०१५ | २०१४ | २०१५ | २०१४ | २०१५ | २०१४ | २०१५ | २०१४ | २०१५ |
| १२० व अधिक | २ | १३२ | ८६ | ३ | ९४ | ४२ | ७६ | ४६ | १४ | १० |
| १०० — १२० | १ | ५८ | ६६ | ३ | २६ | २४ | ४८ | ४६ | १६ | २० |
| ८० — १०० | ६ | ६३ | ६१ | ७ | ६२ | ३२ | ६१ | ८३ | १४ | ३८ |
| ६० — ८० | १० | ५४ | ६१ | २५ | ७७ | ६७ | ४९ | ९० | २७ | ४० |
| ४० — ६० | ५० | ३६ | ४३ | ६५ | ७२ | ८२ | ४६ | ६३ | ५१ | ३९ |
| २० — ४० | १२६ | १२ | ३७ | १०८ | २३ | ७० | ४९ | २४ | ७५ | ४४ |
| ० — २० | १६० | ० | १ | १४४ | १ | ३८ | २६ | ३ | १५८ | १६४ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन # मुंबई शहर व मुंबई उपनगर हे जिल्हे आणि त्यांच्यातील तालुके वगळून

## संभाव्य कृषि उत्पादन २०१५-१६




७.३.१ **खरीप पिके:** सन २०१५ च्या खरीप हंगामामध्ये १४१.४६ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली जी मागील वर्षाच्या (१५०.९७ लाख हेक्टर) तुलनेत सहा टक्के कमी होती. या वर्षाच्या खरीप हंगामात अंदाजित उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात घट अपेक्षित आहे. प्रमुख खरीप पिकांचे क्षेत्र व उत्पादन तक्ता ७.३ मध्ये दिले आहे.

७.३.२ **रब्बी पिके:** सन २०१५ च्या खरीप हंगामातील अपुऱ्या पावसामुळे रब्बी पिकांखालील क्षेत्रात मागील वर्षाच्या तुलनेत १६ टक्के घट अपेक्षित असून अंदाजित उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात घट अपेक्षित आहे. प्रमुख रब्बी पिकांचे क्षेत्र व उत्पादन तक्ता ७.४ मध्ये दिले आहे.

७.३.३ **उन्हाळी पिके:** प्रमुख उन्हाळी पिकांचे क्षेत्र व उत्पादनाचे लक्ष्य मागील पाच वर्षांच्या सरासरीवर आधारित असते. तृणधान्य लागवडीखालील क्षेत्र मागील वर्षाच्या ०.९७ लाख हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत सन २०१५-१६ मध्ये ०.४८ लाख हेक्टर असेल. तेलबिया लागवडीखालील क्षेत्र मागील वर्षाच्या ०.८५ लाख हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत सन २०१५-१६ मध्ये ०.९० लाख हेक्टर असेल. सन २०१५-१६ मध्ये तृणधान्य व तेलबिया यांचे अंदाजित उत्पादन १.०५ लाख मे. टन व १.४० लाख मे. टन असून ते मागील वर्षी अनुक्रमे १.८१ लाख मे.टन व १.२८ लाख मे. टन होते.

७.३.४ **सन २०१५-१६ मधील एकूण उत्पादन:** द्वितीय पूर्वानुमानानुसार २०१५-१६ मध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत प्रमुख पिकांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणावर घट अपेक्षित आहे. ही घट प्रामुख्याने राज्याच्या सर्व भागांत पेरणीच्या कालावधीत तसेच खरीप पिकांच्या वाढीच्या वेळेस झालेल्या अत्यंत अपुऱ्या पावसामुळे झाली आहे. प्रमुख पिकांचे अंदाजित उत्पादन तक्ता ७.५ मध्ये दिले आहे. प्रमुख पिकांचे क्षेत्र, उत्पादन व प्रति हेक्टर उत्पादकता यांची समय मालिका परिशिष्ट ७.१ मध्ये दिली आहे.

## तक्ता ७.३ प्रमुख खरीप पिकांचे क्षेत्र व उत्पादन

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | | उत्पादन ('००० मे. टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१४-१५ | २०१५-१६ (अस्थायी) | शेकडा बदल | २०१४-१५ | २०१५-१६ (अस्थायी) | शेकडा बदल |
| तांदूळ | १,५०८ | १,४९७ | (-)१ | २,८३५ | २,५४८ | (-)१० |
| ज्वारी | ६८० | ४४१ | (-)३५ | ५८५ | ३१४ | (-)४६ |
| बाजरी | ८६५ | ६३९ | (-)२६ | ५३८ | ३०४ | (-)४३ |
| नाचणी | ११२ | ९७ | (-)१३ | ११९ | ९४ | (-)२१ |
| मका | ८०१ | ७६६ | (-)४ | १,४९६ | १,१८४ | (-)२१ |
| इतर तृणधान्ये | ६४ | ४८ | (-)२५ | २४ | १६ | (-)३३ |
| **एकूण तृणधान्ये** | **४,०३०** | **३,४८८** | **(-)१३** | **५,५९७** | **४,४६०** | **(-)२०** |
| तूर | १,२१० | १,०३९ | (-)१४ | ३५३ | ४०७ | १५ |
| मूग | ३१५ | ३८५ | २२ | ८४ | ७४ | (-)१२ |
| उडीद | २७७ | २८० | १ | ९२ | ५९ | (-)३६ |
| इतर कडधान्ये | ७७ | ११८ | ५३ | २९ | ३६ | २४ |
| **एकूण कडधान्ये** | **१,८७९** | **१,८२२** | **(-)३** | **५५८** | **५७६** | **३** |
| **एकूण अन्नधान्ये** | **५,९०९** | **५,३१०** | **(-)१०** | **६,१५५** | **५,०३६** | **(-)१८** |
| सोयाबीन | ३,६४० | ३,७७४ | ४ | १,८२१ | १,८५३ | २ |
| भुईमुग | २४४ | १८६ | (-)२४ | २५३ | १८९ | (-)२५ |
| तीळ | २० | २१ | ५ | ४ | ३ | (-)२५ |
| कारळे | १६ | १४ | (-)१३ | ३ | ३ | ० |
| सूर्यफूल | ३२ | १२ | (-)६३ | १० | २ | (-)८० |
| इतर तेलबिया | १७ | ११ | (-)३५ | ४ | २ | (-)५० |
| **एकूण तेलबिया** | **३,९६९** | **४,०१८** | **१** | **२,०९५** | **२,०५२** | **(-)२** |
| कापूस (रुई) @ | ४,१९० | ३,८२७ | (-)९ | ३,५७७ | ४,२०२ | १७ |
| ऊस ** | १,०३० | ९८७ | (-)४ | ९१,५३८ | ७२,०८९ | (-)२१ |
| **एकूण** | **१५,०९८** | **१४,१४६** | **(-)६** | -- | -- | -- |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन    @ १७० किलोची एक गासडी याप्रमाणे कापसाचे उत्पादन '००० गासड्यांमध्ये    ** तोडणी क्षेत्र

## तक्ता ७.४ प्रमुख रब्बी पिकांचे क्षेत्र व उत्पादन

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | | उत्पादन ('००० मे. टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१४-१५ | २०१५-१६ (अस्थायी) | शेकडा बदल | २०१४-१५ | २०१५-१६ (अस्थायी) | शेकडा बदल |
| ज्वारी | २,६०८ | २,३२२ | (-)११ | १,५२४ | १,३८३ | (-)९ |
| गहू | १,०६७ | ५९३ | (-)४४ | १,३०८ | ७२० | (-)४५ |
| मका | २४० | २१० | (-)१२ | ६५२ | ३३६ | (-)४८ |
| इतर तृणधान्ये | १७ | १५ | (-)१४ | ६ | ४ | (-)३३ |
| **एकूण तृणधान्ये** | **३,९३२** | **३,१४०** | **(-)२०** | **३,४९०** | **२,४४३** | **(-)३०** |
| हरभरा | १,४२७ | १,४०४ | (-)२ | १,०८८ | ८७३ | (-)२० |
| इतर कडधान्ये | १०३ | ८२ | (-)२० | ३४ | ३७ | १० |
| **एकूण कडधान्ये** | **१,५३०** | **१,४८६** | **(-)३** | **१,१२२** | **९११** | **(-)१९** |
| **एकूण अन्नधान्ये** | **५,४६२** | **४,६२६** | **(-)१५** | **४,६१२** | **३,३५३** | **(-)२७** |
| तीळ | १ | १ | ९४ | ०.२ | ०.४ | ११० |
| करडई | ७४ | ४७ | (-)३६ | २६ | १५ | (-)४२ |
| सूर्यफूल | ४८ | १७ | (-)६५ | २१ | ७ | (-)६७ |
| जवस | २४ | १६ | (-)३५ | ५ | ४ | (-)३० |
| सरसू व मोहरी | १० | ७ | (-)२४ | २ | १ | (-)३३ |
| **एकूण तेलबिया** | **१५७** | **८८** | **(-)४४** | **५५** | **२८** | **(-)५०** |
| **एकूण** | **५,६१९** | **४,७१४** | **(-)१६** | -- | -- | -- |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता ७.५ प्रमुख पिकांचे अंदाजित उत्पादन**

(लाख मे. टन)

| प्रमुख पिके | २०१४-१५ (अंतिम अंदाज) | २०१५-१६ (अस्थायी) | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| तृणधान्ये | ९२.६७ | ७०.०६ | (-)२४ |
| कडधान्ये | १६.८० | १४.८७ | (-)११ |
| **एकूण अन्नधान्ये@** | **१०९.४७** | **८४.९३** | **(-)२२** |
| तेलबिया@ | २२.७८ | २२.२१ | (-)३ |
| कापूस$ | ३५.७७ | ४२.०२ | १७ |
| ऊस ** | ९१५.३८ | ७२०.८९ | (-)२१ |

@ खरीप, रब्बी व उन्हाळी पिकांचा समावेश

$ लाख गासड्या (प्रत्येकी १७० किग्रॅ)  ** तोडणी क्षेत्र

*आधार :* कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता ७.६ कृषि उत्पादनाचे निर्देशांक**

(पाया: त्रैवार्षिक १९७९-८२)

| पीक | भार | २०१३-१४ | २०१४-१५ | शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| तृणधान्ये | ४२.२२ | १२०.६ | ९८.५ | (-)१८.३ |
| कडधान्ये | १०.४४ | ३१६.१ | १४४.६ | (-)५४.३ |
| **एकूण अन्नधान्ये** | **५२.६६** | **१५९.४** | **१०७.६** | **(-)३२.५** |
| तेलबिया | ९.१६ | ६०.१ | ५६.१ | (-)६.६ |
| तंतू पिके | ९.९३ | ६०३.२ | २४४.२ | (-)५९.५ |
| संकीर्ण | २८.२५ | २६६.५ | ३१७.३ | (-)१९.० |
| **एकूण अन्नधान्येतर** | **४७.३२** | **२९७.२** | **२५१.४** | **(-)१५.४** |
| **सर्व** | **१००.००** | **२२४.६** | **१७५.७** | **(-)२१.८** |

*आधार :* कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## कृषि उत्पादनाचे निर्देशांक

७.४ कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन यांच्याद्वारे राज्याकरिता परिगणित करण्यात आलेले कृषि उत्पादनाचे निर्देशांक (पाया: १९७९-८२ त्रैवार्षिक) तक्ता ७.६ मध्ये व समय मालिका परिशिष्ट ७.२ मध्ये दिली आहे.

## तृणधान्ये व कडधान्यांची गरज

७.५ राष्ट्रीय नमुना पाहणीच्या (रानपा) ६८ व्या फेरीनुसार (२०११-१२) तृणधान्यांचा व कडधान्यांचा अंदाजित दरडोई मासिक घरगुती वापर अनुक्रमे ९.०८ किलो व ०.९८ किलो आहे. राज्यातील सन २०१५-१६ च्या मध्यवार्षिक प्रक्षेपित लोकसंख्येकरिता तृणधान्यांची व कडधान्यांची घरगुती वापरासाठी अंदाजित वार्षिक गरज अनुक्रमे सुमारे १३१ लाख मे.टन व १४ लाख मे.टन आहे. रानपा ६८ व्या फेरीतील (२०११-१२) राज्य नमुन्यातील आकडेवारीवर आधारित तृणधान्यांचा व कडधान्यांचा दरडोई मासिक घरगुती वापर तक्ता ७.७ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.७ तृणधान्यांचा व कडधान्यांचा अंदाजित दरडोई घरगुती वापर**

| पीक | दरडोई घरगुती वापर | | वार्षिक गरज २०१५-१६# (लाख मे.टन) |
|---|---|---|---|
| | मासिक (किलो) | वार्षिक (किलो) | |
| तांदूळ | २.९६ | ३६.०१ | ४२.७३ |
| गहू | ४.७५ | ५७.७९ | ६८.५७ |
| ज्वारी | ०.९४ | ११.४४ | १३.५७ |
| बाजरी | ०.३८ | ४.६२ | ५.४९ |
| इतर तृणधान्ये | ०.०५ | ०.६१ | ०.७२ |
| **एकूण तृणधान्ये** | **९.०८** | **११०.४७** | **१३१.०७** |
| **एकूण कडधान्ये** | **०.९८** | **११.९२** | **१४.१५** |

# मध्यवार्षिक प्रक्षेपित लोकसंख्येकरीता (१ ऑक्टोबर, २०१५ रोजी)

*आधार :* अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

## वहिती खातेदार

७.६ कृषि गणना २०१०-११ नुसार, राज्यात एकूण १.३७ कोटी वहिती खातेदार होते, त्यापैकी ७८.६ टक्के वहिती खातेदार दोन हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी जमीनधारणा असलेले अत्यल्प व अल्प भूधारक शेतकरी होते. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या वहिती खातेदारांचे प्रमाण अनुक्रमे ७.५ टक्के व ६.३ टक्के होते आणि त्यांनी धारण केलेले क्षेत्र अनुक्रमे ६.६ टक्के व ७.९ टक्के होते. एकूण वहिती खातेदारांच्या जमीनधारणेचा सरासरी आकार १.४४ हेक्टर असून त्या तुलनेत अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या वहिती खातेदारांचा जमीन धारणेचा सरासरी आकार १.२७ हेक्टर व १.८० हेक्टर होता. कृषि गणना २०१०-११ नुसार राज्यातील वहिती खातेदार व क्षेत्र तक्ता ७.८ मध्ये आणि समय मालिका परिशिष्ट ७.३ मध्ये दिली आहे.

## जमिनीचा वापर

७.७ जमीन वापराबाबतच्या २०१३-१४ च्या आकडेवारीनुसार राज्याच्या एकूण ३०७.५८ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी, पिकांखालील स्थूल क्षेत्र २३३.८० लाख हेक्टर तर निव्वळ पेरणी क्षेत्र १७३.६८ लाख हेक्टर (५६.४ टक्के) होते. वनांखालील क्षेत्र ५२.०५ लाख हेक्टर (१६.९ टक्के), मशागतीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र ३१.८३ लाख हेक्टर (१०.३ टक्के), मशागत न केलेले इतर क्षेत्र २४.०६ लाख हेक्टर (७.८ टक्के) आणि पडीत जमिनीखालील क्षेत्र २५.९३ लाख हेक्टर (८.४ टक्के) होते. जमीन वापराची समय मालिका परिशिष्ट ७.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.८ कृषि गणना २०१०-११ नुसार वहिती खातेदार व क्षेत्र**

| आकार वर्ग (हेक्टर) | वहिती खातेदारांची संख्या ('०००) | वहितीचे क्षेत्र ('००० हेक्टर) | वहितीचे सरासरी क्षेत्र (हेक्टर) २००५-०६ | वहितीचे सरासरी क्षेत्र (हेक्टर) २०१०-११ |
|---|---|---|---|---|
| १.० पर्यंत | ६,७०९ | ३,१८६ | ०.४६ | ०.४७ |
| १.० - २.० | ४,०५२ | ५,७३९ | १.२६ | १.४२ |
| २.० - ५.० | २,४७३ | ७,१५५ | २.७३ | २.८९ |
| ५.० - १०.० | ३९६ | २,६०३ | ६.१६ | ६.५७ |
| १०.० - २०.० | ५९ | ७५२ | १०.८९ | १२.७५ |
| २०.० व अधिक | ९ | ३३२ | ३२.५२ | ३६.८९ |
| **एकूण** | **१३,६९८** | **१९,७६७** | **१.४६** | **१.४४** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## सिंचन प्रकल्प

७.८ महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील लाभक्षेत्रातील सिंचित क्षेत्र २०१४-१५ मध्ये ३१.३७ लाख हेक्टर झाले. पाटबंधारे प्रकल्पांची संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र तक्ता ७.९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.९ पाटबंधारे प्रकल्पांची संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र**

| बाब | जलसंपदा विभागाचे प्रकल्प | | | लघु प्रकल्प (स्थानिक स्तर) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मोठे व मध्यम | लघु (राज्य स्तर) | एकूण | कोल्हापूर बंधारे | पाझर तलाव | उपसा जलसिंचन | लघु पाट बंधारे | इतर | एकूण लघु (स्थानिक) |
| **(अ) ३० जून, २०१५ रोजी प्रकल्पांची संख्या** | | | | | | | | | |
| (i) पूर्ण | ४०३*$ | ३,५०६*$ | ३,९०९*$ | ११,००६ | २१,३१७ | २,६५२ | २,६०८ | ३७,७१४ | ७५,२९७ |
| (ii) प्रगतीपथावरील | | | | १,६५८ | १,१७८ | ८९ | ५६६ | ४,४४० | ७,९३१ |
| **(ब) सिंचन क्षमता (लाख हेक्टर)** | | | | | | | | | |
| (i) जून, २०१४ पर्यंत निर्मित | ३४.३०*@ | १४.३६*@ | ४८.६६*@ | ३.१३ | ६.४८ | ०.३९ | २.२९ | ३.९६ | १६.२५ |
| (ii) २०१४-१५ मधील कालव्याद्वारे सिंचित क्षेत्र | १५.५३++ | ४.८१++ | २०.३४++ | १.०९ | -- | ०.१४ | ०.८० | -- | २.०३ |
| (iii) लाभ क्षेत्रातील विहिरींद्वारे २०१४-१५ मधील सिंचन क्षेत्र | ९.८८ | १.१५ | ११.०३ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **एकूण वापरलेली सिंचन क्षमता** | **२५.४१*** | **५.९६*** | **३१.३७*** | **१.०९** | **--** | **०.१४** | **०.८०** | **--** | **२.०३** |

$ पूर्ण व प्रगतीपथावरील घटकांची संख्या * अस्थायी

@ चितळे समितीच्या शिफारशींनुसार मजविकें यांनी मुख्य अभियंता, जसंवि यांचेकडून प्राप्त माहितीवर आधारित केलेल्या परिगणनेनुसार.

++ प्रकल्प कालव्यांवरील उपसा व धरणातून नदी नाल्यांमध्ये सोडलेल्या पाण्यामुळे प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र समाविष्ट

*आधार* : १) जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन २) मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक), महाराष्ट्र शासन

## पाटबंधारे क्षेत्रातील सुधारणा

७.९ सप्टेंबर, २०१५ अखेर एकूण ५,०७७ पाणी वापर संस्था स्थापन झाल्या आहेत. पाणीपट्टी आकारणी, वसुली व थकबाकी यांची समय मालिका परिशिष्ट ७.६ मध्ये दिली आहे.

## जलाशयांतील साठा

७.१० मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे (राज्यक्षेत्र) जलाशयांमध्ये मिळून एकत्रितपणे १५ ऑक्टोबर, २०१४ रोजीचा एकूण उपयुक्त जलसाठा २५,००१ दशलक्ष घनमीटर होता व तो प्रकल्प आराखड्यानुसार उपयुक्त जलसाठा क्षमतेच्या सुमारे ६१.४ टक्के होता. जलाशयातील उपयुक्त साठा तक्ता ७.१० मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१० जलाशयातील उपयुक्त साठा**

(दलघमी)

| वर्ष | प्रकल्प आराखड्यानुसार जलसाठा क्षमता | १५ ऑक्टोबर रोजीचा उपयुक्त जलसाठा | उपयुक्त जलसाठ्याची टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०१२-१३ | ३५,८३८ | २०,४०६ | ५६.९ |
| २०१३-१४ | ४०,३१३ | २९,२३२ | ७२.५ |
| २०१४-१५* | ४०,७२९ | २५,००१ | ६१.४ |

*आधार* : जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन * अस्थायी दलघमी : दशलक्ष घनमीटर

## जलयुक्त शिवार अभियान

७.११ शासनाने सुरू केलेल्या 'जलयुक्त शिवार अभियानाचा' मुख्य उद्देश महाराष्ट्राला '२०१९ पर्यंत पाणी टंचाई मुक्त राज्य' करण्याचा आहे. या अभियानामध्ये जलप्रवाहांचे रुंदीकरण व खोलीकरण, सिमेंट व मातीच्या बंधाऱ्यांचे बांधकाम, कालव्यांची कामे व शेततळी खोदण्याची कामे समाविष्ट आहेत. सिंचित क्षेत्र वाढविण्यासाठी पाण्याचा कार्यक्षम वापर होण्याच्या दृष्टीने सूक्ष्मसिंचन पद्धतीसही प्रोत्साहन देण्यात येत आहे. दरवर्षी ५,००० गावे पाणी टंचाईमुक्त करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. विविध विभागांकडील जलसंधारणाच्या विविध योजना, जिल्हा वार्षिक योजना, स्वयंसेवी संस्था, लोक वर्गणी व खाजगी उद्योजक यांच्याकडील निधी एकत्रित करून हा कार्यक्रम अभियान स्वरूपात राबविण्यात येत आहे.

७.११.१ सन २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये ३४ जिल्ह्यातील एकूण ६,२०५ गावे पाणी टंचाईमुक्त करण्यासाठी निवडण्यात आली आहेत. ऑक्टोबर, २०१५ अखेर या निवडलेल्या गावांतून जलसंधारणाची एकूण १,३०,७६१ कामे पूर्ण करण्यात आली आहेत, ३४,९८९ कामे प्रगतीपथावर आहेत आणि ₹ १,५४४.२० कोटी खर्च झाले आहेत.

## मृद व जलसंधारण

७.१२ पूर्ण झालेली व प्रगतीपथावरील पाणलोटांची कामे तक्ता ७.११ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ७.११ प्रगतीपथावरील व पूर्ण झालेली पाणलोटांची कामे**

(₹ कोटी)

| योजना | पाणलोट कामांची संख्या | | | निवडलेल्या पाणलोट कामांवरील खर्च | |
|---|---|---|---|---|---|
| | निवडलेले | पूर्ण | प्रगतीपथावरील | अपेक्षित | झालेला + |
| राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम (सूक्ष्म पाणलोट) | ३२४ | २३५ | २७० | # | १३७.८४ |
| नदी खोरे विकास कार्यक्रम (सूक्ष्म पाणलोट) | २७१ | २२६ | ४५ | @ | २९४.२९ |
| पश्चिम घाट विकास कार्यक्रम (अतिविशाल पाणलोट) | १६ | ० | १६ | @ | १३६.५६ |
| एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम (सूक्ष्म पाणलोट) | ३२,७३४ | १२,४२६ | २६,२४३ | ८६१.८९ | ६,६८२.७० |
| नाबार्ड सहाय्यित पाणलोट (अतिविशाल पाणलोट) | ४३ | ० | ३२ | १७.५० | ५३.४३ |
| एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम (आयडब्लूएमपी) | १,१७१ | ० | १,१७१ | १,०८०.०० | २,०२०.८५ |
| **एकूण** | **३४,५५९** | **१२,८८७** | **२७,७७७** | **१,९५९.३९** | **९,३२५.६७** |

+ सुरुवातीपासून ऑक्टोबर, २०१५ पर्यंत @ अनुदान अप्राप्त # २०१४-१५ या योजनेचे शेवटचे वर्ष होते

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## तुषार व ठिबक सिंचन

७.१३ राज्य शासन तुषार व ठिबक सिंचन संच खरेदी करण्यासाठी अल्पभूधारक व सीमांतिक शेतकऱ्यांना ६० टक्के व इतर शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदान देते. वर्षनिहाय तुषार व ठिबक सिंचन संचांचे वितरण आणि झालेला खर्च तक्ता ७.१२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१२ वर्षनिहाय तुषार व ठिबक सिंचन संचांचे वितरण आणि झालेला खर्च**

(₹ कोटी)

| वर्ष | तुषार | | ठिबक | | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| | संचांची संख्या | क्षेत्र (हेक्टर) | संचांची संख्या | क्षेत्र (हेक्टर) | |
| २०१२-१३ | ७९,६३० | ७९,६३० | १,७८,३१० | १,६२,१०० | ५७४.८५ |
| २०१३-१४ | ३०,२९६ | ३०,२९६ | ८९,१०८ | ८१,००८ | ३०५.५७ |
| २०१४-१५ | ५२,१८० | ४३,०९८ | २,००,४९६ | १,७०,७१९ | ६८८.४१ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## कृषि पंपांना अनुदान

७.१४ राज्यात सुमारे ३८.८२ लाख कृषि पंप आहेत. कृषि पंपांना सवलतीच्या दरात वीजपुरवठा करण्याकरिता मागील वर्षाच्या ₹ ३,५५२.९९ कोटीच्या तुलनेत २०१५-१६ मध्ये ₹ ४,५१९.१० कोटींची तरतूद प्रस्तावित केली आहे.

## कृषि पंपांचे विद्युतीकरण

७.१५ सन २०१४-१५ मध्ये महावितरण कंपनीने १.४८ लाख कृषि पंपांना वीज जोडणी उपलब्ध करुन दिली. सन २०१५-१६ मध्ये कृषि पंपांच्या विद्युतीकरणाच्या २.०४ लाख उद्दिष्टापैकी डिसेंबरपर्यंत ०.८३ लाख कृषि पंपांचे विद्युतीकरण करण्यात आले. अनुशेष-अधिसूचित जिल्ह्यांमधील कृषि पंपांच्या विद्युतीकरणाचा अनुशेष दूर करण्यासाठी शासनाकडून २०१५-१६ करिता ₹ २२० कोटी नियतव्यय मंजूर करण्यात आला असून तो २०१४-१५ मध्ये ₹ १५० कोटी होता.

## सुधारित बियाणांचा वापर

७.१६ महाबीज व राष्ट्रीय बीज निगम या दर्जेदार बियाणांचे उत्पादन व वितरण करणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील प्रमुख संस्था आहेत. याशिवाय, विविध पिकांच्या बियाणांची किरकोळ विक्री खाजगी बियाणे उत्पादकांकडून केली जाते. सार्वजनिक व खाजगी क्षेत्रांमार्फत ४२:५८ या प्रमाणात बियाणे वितरीत करण्यात येत आहे. केंद्र शासनाने स्वपरागसिंचित (तांदुळ, गहू, तूर, मूग, उडीद, इ.), पिकांच्या बाबतीत ३५ टक्के, परपरागसिंचित (मका, ज्वारी, बाजरी, सूर्यफूल, इ.) पिकांसाठी ५० टक्के व संकरित पिकांसाठी १०० टक्के याप्रमाणे बियाणे बदलाचे लक्ष्य निर्धारित केले आहे. सुधारित बियाणांचे वितरण तक्ता ७.१३ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१३ सुधारित बियाणांचे वितरण**

('००० क्विंटल)

| क्षेत्र | पीक | वर्ष | | | | | २०१४ च्या तुलनेत २०१५मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५* | |
| सार्वजनिक | खरीप | ८५९ | ७४७ | ७७८ | २८४ | ५०० | ७६.० |
| | रब्बी | २४२ | ३४१ | ३७० | २६३ | २५५ | (-)३.० |
| | **एकूण** | **१,१०१** | **१,०८८** | **१,१४८** | **५४७** | **७५५** | **३८.०** |
| खाजगी | खरीप | १,०६१ | १,१२८ | १,२८३ | ९११ | ५०८ | (-)४४.२ |
| | रब्बी | ३१० | २८९ | ४०१ | १२१ | १५० | २३.९ |
| | **एकूण** | **१,३७१** | **१,४१७** | **१,६८४** | **१,०३२** | **६५८** | **(-)३६.२** |
| **एकूण** | खरीप | १,९२० | १,८७५ | २,०६१ | १,१९५ | १,००८ | (-)१५.६ |
| | रब्बी | ५५२ | ६३० | ७७१ | ३८४ | ४०५ | (-)२३.४ |
| | **एकूण** | **२,४७२** | **२,५०५** | **२,८३२** | **१,५७९** | **१,४१३** | **(-)१८.०** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन * रब्बी हंगामासाठी अस्थायी

## खतांचा व किटकनाशकांचा वापर

७.१७ सन २०१५-१६ करिता राज्यातील रासायनिक खतांचा एकूण वापर ५८.२५ लाख मे.टन असून प्रति हेक्टर वापर १०७ किलो अपेक्षित आहे. सन २०१४-१५ मध्ये रासायनिक खतांचा एकूण वापर ६०.१३ लाख मे. टन व प्रति हेक्टर वापर १२५.९ किलो होता.सन २०१४-१५ मध्ये सुमारे ०.५ लाख खत वितरण केंद्रांमार्फत विविध रासायनिक खतांचे वितरण करण्यात आले. त्यापैकी ८.१ टक्के सहकारी क्षेत्रात, ०.३ टक्के सार्वजनिक क्षेत्रात व ९१.६ टक्के केंद्रे खाजगी क्षेत्रात होती. रासायनिक खतांचा वर्षनिहाय वापर तक्ता ७.१४ मध्ये दिला आहे. रासायनिक व जैविक किटकनाशकांचा वापर तक्ता ७.१५ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१४ रासायनिक खतांचा वर्षनिहाय वापर**

| वर्ष | एकूण वापर (लाख मे. टन) | प्रति हेक्टर वापर (किलो) |
|---|---|---|
| २०१३-१४ | ५९.९० | ११९.४ |
| २०१४-१५ | ६०.१३ | १२५.९ |
| २०१५-१६$ | ५८.२५ | १०७.० |

*आधार*: कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन $ अपेक्षित वापर

**तक्ता ७.१५ रासायनिक व जैविक किटकनाशकांचा वापर**

(मे.टन)

| वर्ष | किटकनाशके | |
|---|---|---|
| | रासायनिक | जैविक |
| २०१३-१४ | १०,९६९ | १,४३३ |
| २०१४-१५ | ११,२३९ | १,१२४ |
| २०१५-१६$ | ११,२८० | ४,२९२ |

*आधार*: कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन $ अंदाजित

## फ्लॅगशिप कार्यक्रम

७.१८ तत्कालीन नियोजन आयोगाने केंद्र पुरस्कृत नऊ योजना व अतिरिक्त केंद्रिय सहाय्य/केंद्रिय योजनांच्या माध्यमातून सहा योजना मिळून १५ फ्लॅगशिप कार्यक्रम जाहीर केले होते. राष्ट्रीय कृषि विकास योजना अतिरिक्त केंद्रिय सहाय्याद्वारे राबविण्यात येते. राष्ट्रीय कृषि विकास योजनेव्यतिरिक्त राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान, राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियान आणि राष्ट्रीय कृषि विस्तार व तंत्रज्ञान प्रसार अभियान हे पाच कार्यक्रम मंजूर केले आहेत. राष्ट्रीय कृषि विकास योजनेची वित्तीय प्रगती तक्ता ७.१६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.१६ राष्ट्रीय कृषि विकास योजनेची वित्तीय प्रगती**

(₹ कोटी)

| वर्ष | राज्यस्तरीय मंजूरी समितीने मंजूर केलेल्या प्रकल्पांची किंमत | केंद्र सरकारने दिलेल्या प्रशासकीय मान्यता | केंद्र शासनाकडून प्राप्त अनुदान | खर्च |
|---|---|---|---|---|
| २०१३-१४ | ९४८.२२ | १,१५४.५४ | ९५९.६९ | ९५९.६९ |
| २०१४-१५ | १,०१३.४९ | १,०२५.९९ | ९४२.०९ | ९३४.४५ |
| २०१५-१६+ | ६२३.२४ | ३८६.६२ | ३८६.६२ | ७०.१७ |

*आधार*: कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबर अखेर

## राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान

७.१८.१ 'राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान' अंतर्गत उत्पादकतेत सुधारणा व क्षेत्र विस्ताराकरिता सन २०१४-१५ मध्ये तांदळासाठी ₹ ३७.९८ कोटी, गव्हासाठी ₹ ५.६५ कोटी, कडधान्यांसाठी ₹ २२४.४९ कोटी व भरडधान्यांसाठी ₹ ३९.४१ कोटी खर्च झाले. सन २०१५-१६ मध्ये नोव्हेंबरपर्यंत तांदळासाठी ₹ ७.९० कोटी, गव्हासाठी ₹ ०.३१ कोटी, कडधान्यांकरिता ₹ २८.४० कोटी आणि भरडधान्यांसाठी ₹ ५.१७ कोटी खर्च झाले.

## फलोत्पादन

७.१८.२ एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत फलोत्पादनाखालील क्षेत्र व उत्पादकता वाढविण्याच्या आणि काढणीपश्चात व्यवस्थापन करण्याच्या मुख्य उद्देशाने राष्ट्रीय फलोत्पादन अभियान राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय फलोत्पादन अभियान आणि राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळाच्या योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. हे अभियान 'एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान' म्हणून राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळाला तिच्या स्थापनेपासून नोव्हेंबर, २०१५ पर्यंत ₹ १,४६२.९० कोटी अनुदान प्राप्त झाले त्यापैकी ₹ १,४६२.६५ कोटी खर्च झाले.

७.१८.३ राज्यात २०१४-१५ मध्ये अंदाजित १८.४६ लाख हेक्टर क्षेत्र विविध फळपिकांखाली होते. त्यापैकी आंब्याखाली ५.२७ लाख हेक्टर, संत्र्याखाली १.६९ लाख हेक्टर, मोसंबीखाली १.४६ लाख हेक्टर, डाळिंबाखाली १.७८ लाख हेक्टर, केळीखाली ०.८३ लाख हेक्टर, चिकूखाली ०.८५ लाख हेक्टर आणि द्राक्षांखाली ०.९० लाख हेक्टर क्षेत्र होते.

७.१८.४ राज्य शासनाने फलोत्पादन विकासाला चालना देण्यासाठी फळरोपवाटिकांची स्थापना करणे आणि सीमांतिक व अल्पभूधारक तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे शेतकरी यांना निवडक प्रकारची फळझाडे वाढविण्यासाठी भांडवली सहाय्य देणे हा कार्यक्रम हाती घेतला आहे. फळांखालील क्षेत्रात वाढ होऊन ते मार्च, २०१५ पर्यंत १८.४६ लाख हेक्टर झाले. माहे मार्च, २०१५ अखेर या योजने अंतर्गत ₹ १,९१३.०० कोटी खर्च झाले.

## सेंद्रिय शेती

७.१८.५ राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानामध्ये सेंद्रिय शेतीच्या प्रसारासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन, प्रमाणीकरणासाठी सहाय्य, विक्री व्यवस्थेच्या अनुषंगाने सहाय्य अशा विविध बाबींचा अंतर्भाव आहे. राज्यातील सुमारे ७.५१ लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रिय शेतीखाली आले आहे. सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे १७,७०४ पेक्षा जास्त समूह असून त्यापैकी प्रमाणित केलेले (४४,५५१ पेक्षा जास्त शेतकऱ्यांचा समावेश असलेले) १,६८३ सेंद्रिय शेतीचे गट आहेत.

## कृषि वित्तपुरवठा

७.१९ शेतकऱ्यांना शासनाकडून विविध बँका तसेच सहकारी संस्थांमार्फत अल्प मुदतीची कर्जे, पतपुरवठा, इत्यादींच्या माध्यमातून वित्तीय सहाय्य केले जाते. देशातील राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) ही संस्था कृषि व ग्रामीण विकासासाठी कार्य करणारी शिखर बँक आहे. वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (मरासबँ), जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (जिमसबँ) आणि भूविकास बँका यांच्यामार्फत कर्ज वितरित केले जाते. वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व मरासबँ/जिमसबँ/भूविकासबँकांनी दिलेले कर्ज तक्ता ७.१७ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१७ वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व मरासबँ/जिमसबँ/भूविकास बँकांनी दिलेली कर्ज**

(₹ कोटी)

| कार्य | वाणिज्यिक बँका$ | | प्रादेशिक ग्रामीण बँका | | मरासबँ/ जिमसबँ/ भूविकास बँक | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१३-१४ | २०१४-१५ |
| पीक कर्ज | १६,४६१.६१ | १७,९८६.५६ | १,६१०.९० | १,६९०.५३ | १३,३५३.६२ | १४,४२३.३० | ३१,४२६.१३ | ३४,१००.३९ |
| कृषि मुदत कर्ज | १४,२१७.९६ | १८,३५८.६५ | ६४३.७७ | ९४८.१० | ३,८४१.१० | ३,८८४.८६ | १८,७०२.८३ | २३,१९१.६१ |
| **एकूण** | **३०,६७९.५७** | **३६,३४५.२१** | **२,२५४.६७** | **२,६३८.६३** | **१७,१९४.७२** | **१८,३०८.१६** | **५०,१२८.९६** | **५७,२९२.००** |

*आधार* : राज्यस्तरीय बँकर समिती, महाराष्ट्र राज्य          $ राष्ट्रीयकृत बँका धरुन

७.२० राज्यात सर्वात निम्न स्तरावर कृषि वित्तपुरवठा करण्याशी थेट संबंधित अशा वित्तीय संस्था म्हणजे शेतकरी सभासदांना अल्पमुदतीची पीक कर्जे देणाऱ्या प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्था आहेत. प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांकडून सन २०१४-१५ मध्ये एकूण ₹ १४,०३० कोटी कर्जवाटप करण्यात आले त्यापैकी लहान व सीमांतिक शेतकऱ्यांना ₹ ६,३८८ कोटी कर्जवाटप करण्यात आले. सन २०१३-१४ मध्ये ही आकडेवारी अनुक्रमे ₹ १२,८२६ कोटी व ₹ ४,८२९ कोटी होती.

## किसान क्रेडिट कार्ड योजना

७.२१ राज्यात मार्च, २०१५ अखेर ९०.८० लाख किसान क्रेडिट कार्ड वाटप करण्यात आली. त्यापैकी ६५.३० लाख सहकारी बँकांमार्फत, ४.२५ लाख प्रादेशिक ग्रामीण बँकांमार्फत व २१.२५ लाख वाणिज्यिक बँकांमार्फत वाटप करण्यात आली आणि त्यांचेकडून अनुक्रमे ₹ ९,४७८ कोटी, ₹ ९१३ कोटी व ₹ १७,१३५ कोटी रकमेचे कर्ज मंजूर करण्यात आले. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने शेतकऱ्यांना दिलेली किसान क्रेडिट कार्ड संलग्नित कृषि कर्जे तक्ता ७.१८ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ७.१८ महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने शेतकऱ्यांना दिलेली किसान क्रेडीट कार्ड संलग्नित कृषि कर्जे**

(₹ कोटी)

| वर्ष | लघु मुदतीचे कर्ज | | दीर्घ मुदतीचे कर्ज | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या ('०००) | रक्कम | लाभार्थ्यांची संख्या ('०००) | रक्कम |
| २०१३-१४ | ३,२९९ | १२,१२४ | ३.६ | १८ |
| २०१४-१५ | ३,४६७ | १३,१६६ | २६.५ | ३५३ |
| २०१५-१६+ | ३,१९० | १२,२८६ | १४.८ | २४३ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या.     + ऑक्टोबर पर्यंत

## कृषि पणन

७.२२ महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांच्याकडे मुख्यत्वे राज्यातील बाजार समित्यांच्या कामांमध्ये आवश्यक समन्वय साधणे, कृषि उत्पन्न बाजार समितीचा विकास व प्रसार, कृषि निर्यात क्षेत्राची स्थापना, फलोत्पादन प्रशिक्षण केंद्र आणि प्रतवारी व संवेष्टन सुविधांची स्थापना करणे, इत्यादि कार्ये सोपविली आहेत. सर्व बाजार समित्यांमध्ये झालेली आवक व त्यांचे मूल्य तक्ता ७.१९ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१९ सर्व बाजार समित्यांमध्ये झालेली आवक व त्यांचे मूल्य**

| वर्ष | आवक (लाख मे. टन) | मूल्य (₹ कोटी) |
|---|---|---|
| २०१२-१३ | ३६०.५० | ३८,८९५.१९ |
| २०१३-१४ | २४२.६५ | ४४,९७७.४८ |
| २०१४-१५ | २१९.५८ | ६५,३६७.६३ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

७.२२.१ महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियमांतर्गत डिसेंबर, २०१५ पर्यंत २३६ थेट पणन परवाने दिले असून त्यापैकी १२८ कार्यरत आहेत. याव्यतिरिक्त, ४१ खाजगी बाजारांना परवाने देण्यात आले असून त्यापैकी ३२ बाजार कार्यरत आहेत, तर नॅशनल कमोडिटी अँन्ड डेरिव्हेटिव्हज् एक्सचेन्ज यांचे कामकाज इंटरनेटच्या माध्यमातून सुरु आहे.

## किमान आधारभूत किंमत योजना

७.२३ नैसर्गिक आपत्ती व व्यापारी देऊ करत असलेल्या कमी किंमतींपासून शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण करण्यासाठी तसेच कृषि कार्ये आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी केंद्र शासन काही निवडक पिकांसाठी किमान आधारभूत किंमती जाहीर करते. या योजनेअंतर्गत शेतमालाची खरेदी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, राष्ट्रीय

कृषि सहकारी पणन महासंघ आणि महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक महासंघ यांच्यामार्फत केली जाते. प्रमुख पिकांच्या किमान आधारभूत किंमती तक्ता ७.२० मध्ये दिल्या आहेत.

## राष्ट्रीय कृषि विमा योजना

७.२४ राष्ट्रीय कृषि विमा योजनेमध्ये १६ खरीप आणि आठ रब्बी पिकांचा समावेश आहे. वर्षनिहाय राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत समाविष्ट शेतकरी तक्ता ७.२१ मध्ये देण्यात आले आहेत.

## गोपीनाथ मुंडे शेतकरी जनता अपघात विमा योजना

७.२५ अपघातग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या दु:खी कुटुंबियांना आर्थिक मदत करण्यासाठी राज्य शासनाने २००५-०६ मध्ये शेतकरी जनता अपघात विमा योजना सुरु केली. या योजनेअंतर्गत १३ प्रकारच्या अपघातांसाठी विमा संरक्षण देण्यात येते. २०१५-१६ पासून या योजनेस 'गोपीनाथ मुंडे शेतकरी जनता अपघात विमा योजना' असे नाव देण्यात आले आहे. विमा संरक्षणाची रक्कम ₹ एक लाख वरून ₹ दोन लाख एवढी वाढविण्यात आली आहे. सन २०१५-१६ मध्ये विमा हप्त्यापोटी शासनाने ₹ २७.२५ कोटी रक्कम विमा कंपन्यांना अदा केली. या योजनेचा तपशील तक्ता ७.२२ मध्ये दिलाआहे.

## टंचाई व नैसर्गिक आपत्ती

७.२६ अवकाळी पाऊस व गारपीट या नैसर्गिक आपत्तींमुळे फेब्रुवारी ते मार्च, २०१५ या कालावधीत राज्यातील सुमारे २.७८ लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाले व सुमारे ₹ ५०२.५ कोटी रकमेचे नुकसान झाले. त्याकरिता ₹ ४८१.७४ कोटी नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली. सन २०१५-१६ च्या खरीप हंगामामध्ये टंचाई परिस्थितीमुळे बाधित झालेल्या सुमारे ५३.११ लाख हेक्टर क्षेत्रावर सुमारे ₹ ३,५७८.४३ कोटी रकमेचे नुकसान झाले व त्यासाठी ₹ २,००० कोटी नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली. माहे एप्रिल ते नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत अवकाळी पाऊस, गारपीट, वादळीवारा, अतिवृष्टी व पूर परिस्थिती, इ. नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या सुमारे १.४५ लाख हेक्टर क्षेत्राचे सुमारे ₹ १६०.१७ कोटी रकमेचे नुकसान झाले.

**तक्ता ७.२० प्रमुख पिकांच्या किमान आधारभूत किंमती**

| पीक | किमान आधारभूत किंमती (₹/क्विंटल) | |
|---|---|---|
| | २०१३-१४ | २०१४-१५ |
| तांदुळ / धान(साधारण वाजवी प्रत) | १,३१० | १,४१० |
| तांदुळ / धान (प्रत-अ) | १,४०० | १,४५० |
| ज्वारी (संकरित) | १,५३० | १,५७० |
| ज्वारी (मालदांडी) | १,५५० | १,५९० |
| गहू | १,४५० | १,४५० |
| मका | १,३१० | १,३२५ |
| बाजरी | १,२५० | १,२७५ |
| हरभरा | ३,१७५ | ३,१७५ |
| तूर | ४,३५० | ४,६२५ |
| मूग | ४,५०० | ४,८५० |
| उडीद | ४,३५० | ४,६२५ |
| सूर्यफूल | ३,७५० | ३,८०० |
| सोयाबीन (पिवळा) | २,५६० | २,५०० |
| सोयाबीन (काळा) | २,५०० | २,५०० |
| भुईमुगाच्या शेंगा | ४,००० | ४,०३० |
| कापूस (मध्यम धागा) | ३,७५० | ३,८०० |
| कापूस (लांब धागा) | ४,०५० | ४,१०० |
| करडई | ३,०५० | ३,०५० |
| मसूर | ३,०७५ | ३,०७५ |
| नाचणी | १,५५० | १,५५० |
| तीळ | ४,५०० | ४,७०० |
| कारळे | ३,५०० | ३,६५० |
| मोहरी | ३,१०० | ३,१०० |

*आधार*: दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड

**तक्ता ७.२१ वर्षनिहाय राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत समाविष्ट शेतकरी**

(₹ कोटी)

| वर्ष | समाविष्ट शेतकरी | | | नुकसान भरपाई | |
|---|---|---|---|---|---|
| | शेतकरी संख्या (लाख) | विमा रक्कम | विमा हप्ता | शेतकरी संख्या (लाख) | रक्कम |
| २०१२-१३ | २३.२२ | २,४१०.४९ | ९२.९१ | १३.१७ | ७६७.२७ |
| २०१३-१४ | १७.४२ | २,२४७.५१ | ११७.०० | ३.५५ | १०३.२४ |
| २०१४-१५ | ५५.९५ | ५,४८४.०३ | १९८.०६ | ४१.७१ | १,८०६.५७ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता ७.२२ गोपीनाथ मुंडे शेतकरी जनता अपघात विमा योजनेचा तपशील**

(₹ कोटी)

| वर्ष | शासनाने भरलेला | एकूण प्राप्त | मंजूर | शेतकऱ्यांना दिलेली |
|---|---|---|---|---|
| २०१०-११ | १९.१८ | ३,२४४ | २,६०४ | २५.९० |
| २०११-१२ | १९.१८ | ३,१०७ | २,२८६ | २२.७३ |
| २०१२-१३ | ३७.५२ | ३,५७२ | २,४३५ | २४.२८ |
| २०१३-१४ | २०.३६ | २,८०५ | २,२६९ | २२.५६ |
| २०१४-१५ | १६.४७ | २,१९८ | १,१९० | ११.८८ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

# पशुसंवर्धन

७.२७ कृषिप्रधान ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात पशुधन महत्त्वाची भूमिका बजावते. पशुधन शेती उत्पन्नासदेखील पूरक असून त्याद्वारे रोजगाराच्या संधी निर्माण होऊन परिणामी ग्रामीण अर्थव्यवस्थेत वृध्दी होते. पशुधन उत्पादनामुळे पशुधारकांच्या उत्पन्नाचा प्रवाह कोणत्याही ॠतूत वर्षभर सातत्याने सुरू राहतो. अशा प्रकारे पशुसंवर्धन आणि पशुधन उत्पादन हे आवश्यक प्रथिनयुक्त पोषक आहार परवडण्याजोग्या किंमतीत पुरविण्याबरोबरच ग्रामीण भागाच्या अर्थव्यवस्थेच्या शाश्वत उन्नतीमध्ये महत्वाची भूमिका बजावते.

## पशुधन गणना

७.२८ पशुधन गणना दर पाच वर्षांनी केली जाते. पशुगणना २०१२ नुसार (१९ वी गणना) सुमारे ३२५ लाख पशुधनासह राज्याचा देशात सहावा क्रमांक आहे व १८ वी पशुगणना २००७ च्या आकडेवारीच्या तुलनेत ते ९.७ टक्क्यांनी कमी आहे. राज्यात कुक्कुटपक्षांची संख्या सुमारे ७७८ लाख असून ती भारतातील एकूण कुक्कुटपक्षांच्या संख्येच्या १०.७ टक्के आहे व देशपातळीवर राज्याचा तिसरा क्रमांक आहे. पशुगणना २००७ (१८ वी गणना) च्या तुलनेत १९ वी पशुगणना २०१२ मध्ये कुक्कुट पक्षांच्या संख्येत २०.१ टक्के वाढ झाली आहे. पशुगणना २०१२ (१९ वी गणना) नुसार पशुधन तक्ता ७.२३ मध्ये व विस्तृत आकडेवारी परिशिष्ट ७.७ मध्ये दिली आहे

**आलेख ७.१ : दर लाख लोकसंख्येमागे एकूण पशुधन**




**आलेख ७.२ : विविध गणनांमधील पशुधनाचा प्रकारनिहाय हिस्सा**




**तक्ता ७.२३ एकोणिसावी पशुधन गणना २०१२ नुसार पशुधन**

('०००)

| पशुवैद्यकीय विभाग | गाई व बैल | म्हशी व रेडे | शेळ्या व मेंढ्या | इतर पशुधन | एकूण पशुधन | एकूण कुक्कुटादी पक्षी |
|---|---|---|---|---|---|---|
| कोकण | १,१०६ | ३९७ | ३६५ | १६ | १,८८४ | १०,५१२ |
| नाशिक | ३,६८८ | ८८९ | ३,२६८ | १२६ | ७,९७१ | २७,५७५ |
| पुणे | २,४८८ | २,२०२ | २,९१३ | ५६ | ७,६५९ | ३०,९९७ |
| औरंगाबाद | १,९३६ | ५१० | १,१६३ | ५९ | ३,६६८ | २,२०७ |
| लातूर | १,६४३ | ६८३ | ७८१ | ३९ | ३,१४६ | १,५०७ |
| अमरावती | २,२४८ | ४५३ | १,३३८ | ४४ | ४,०८३ | १,७७३ |
| नागपूर | २,३७५ | ४६१ | १,१८८ | ५४ | ४,०७८ | ३,२२४ |
| **एकूण** | **१५,४८४** (८.१) | **५,५९५** (५.१) | **११,०१६** (५.५) | **३९४** (३.३) | **३२,४८९** (६.३) | **७७,७९५** (१०.७) |
| **भारत** | **१,९०,९०४** | **१,०८,७०२** | **२,००,२४२** | **११,८३४** | **५,१२,०५७** | **७,२९,२०९** |
| **राज्याचा क्रमांक** | **४** | **८** | **६** | **२५** | **६** | **३** |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन     टिप : कंसातील आकडे अखिल भारताशी टक्केवारी दर्शवितात.

## पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा

७.२९ राज्यातील पशुधनाच्या आरोग्याची निगा राखण्याकरिता राज्य शासनाने पायाभूत सुविधा निर्माण केल्या आहेत. विभागनिहाय पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा तक्ता ७.२४ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ७.२४ विभागनिहाय पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा**

(३१ मार्च, २०१५ रोजी)

| पशुवैद्यकीय विभाग | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्रे | बहुचिकित्सालये$ | लघु बहुचिकित्सालये | पशुवैद्यकीय दवाखाने | | फिरते पशुवैद्यकीय दवाखाने |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | श्रेणी I | श्रेणी II | |
| कोकण | ४ | ४ | २० | १४२ | ३५४ | १२ |
| नाशिक | ५ | ५ | २५ | ३४५ | ५१५ | ६ |
| पुणे | ५ | ५ | २६ | ४६० | ५५९ | ७ |
| औरंगाबाद | ४ | ३ | २० | १६० | २८८ | २ |
| लातूर | ४ | ४ | २० | १६५ | २९० | ३ |
| अमरावती | ५ | ५ | २७ | १९३ | ३७९ | १७ |
| नागपूर | ६ | ६ | ३० | २८३ | ४६३ | १८ |
| **एकूण** | **३३** | **३२** | **१६८** | **१,७४८** | **२,८४८** | **६५** |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन $ महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठाच्या सहा बहुचिकित्सालयांसह

७.३० राज्यात विविध पशुआजारांकरिता वैद्यकीय सुविधा पुरविल्या जाण्याबरोबरच लसीकरण कार्यक्रमही राबविले जातात. सन २०१५-१६ मध्ये डिसेंबरपर्यंत पशुवैद्यकीय विभागनिहाय उपचार व लसीकरणाबाबतची माहिती तक्ता ७.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.२५ पशुवैद्यकीय विभागनिहाय उपचार व लसीकरण २०१५-१६+**

('०००)

| पशुवैद्यकीय विभाग | उपचार केलेले (संख्या) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सामान्य उपचार | खच्चीकरण | शस्त्रक्रिया | | लसीकरण (कुक्कुटांसह) |
| | | | मोठी | गौण | |
| कोकण | ९८८ | ५३ | १ | ४७ | ४,९९६ |
| नाशिक | २,७१६ | १५७ | ६ | १४९ | १२,९८९ |
| पुणे | २,९६२ | ८९ | १० | १२२ | ११,३७४ |
| औरंगाबाद | १,०४७ | ५८ | २ | ४० | ५,०४१ |
| लातूर | ९०६ | ६२ | ६ | ६४ | ४,९१८ |
| अमरावती | १,४६८ | ७० | ३ | ६६ | ५,५२८ |
| नागपूर | १,५१३ | ८० | ४ | ६८ | ६,७५२ |
| **एकूण** | **११,६००** | **५६९** | **३२** | **५५६** | **५१,५९८** |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## कृत्रिम रेतन

७.३१ कृत्रिम रेतनाची सुविधा ४,८६१ केंद्रांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. पुणे, नागपूर आणि औरंगाबाद येथील तीन गोठीत वीर्य प्रयोगशाळांमध्ये वीर्यनळ्यांची निर्मिती केली जाते आणि राज्यातील ३३ जिल्हा कृत्रिम रेतन केंद्रांना व इतर कृत्रिम रेतन केंद्रांना त्यांचा पुरवठा केला जातो. सन २०१५-१६ मध्ये डिसेंबर पर्यंत पशुवैद्यकीय विभागनिहाय करण्यात आलेले कृत्रिम रेतन तक्ता ७.२६ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.२६ विभागनिहाय करण्यात आलेले कृत्रिम रेतन २०१५-१६+**

('०००)

| पशुवैद्यकीय विभाग | केलेले कृत्रिम रेतन | | | | | जन्मलेल्या वासरांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गायी | | | म्हैस | एकूण | संकरित | देशी | म्हैस | एकूण |
| | विदेशी | संकरित | देशी | | | | | | |
| कोकण | १७ | १८ | १ | २७ | ६३ | १५ | नगण्य | ११ | २६ |
| नाशिक | ८९ | १९१ | १० | ५४ | ३४४ | ११४ | ३ | २१ | १३८ |
| पुणे | ४६ | २९१ | ५४ | २५८ | ६४९ | १४१ | २२ | ९८ | २६१ |
| औरंगाबाद | २९ | ६९ | १८ | ३५ | १५१ | ३२ | ५ | ११ | ४८ |
| लातूर | १३ | ३९ | ५५ | ६१ | १६८ | १४ | १८ | १९ | ५१ |
| अमरावती | ३० | २६ | १६ | ३४ | १०६ | १९ | ५ | १२ | ३६ |
| नागपूर | ३२ | ६० | ९ | ११ | ११२ | ३४ | ३ | ६ | ४३ |
| **महाराष्ट्र** | **२५६** | **६९४** | **१६३** | **४८०** | **१,५९३** | **३६९** | **५६** | **१७८** | **६०३** |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## राष्ट्रीय गुरे व म्हैस पैदास प्रकल्प

७.३२ राष्ट्रीय गुरे व म्हैस पैदास प्रकल्प हा १०० टक्के केंद्र पुरस्कृत कार्यक्रम असून तो पशू प्रजनन सेवेचे बळकटीकरण व विस्तारीकरण, देशी जातीचे संवर्धन तसेच ग्रामीण युवकांसाठी स्वयंरोजगार निर्मितीकरिता महाराष्ट्र पशुधन विकास मंडळामार्फत राबविण्यात येत आहे.

७.३३ सन २०१४-१५ मध्ये गतवर्षीच्या अखर्चित रकमेपैकी ₹ ४२.७० लाख खर्च झाला. हा खर्च मुख्यत: दोन गोठीत वीर्य प्रयोगशाळा, तीन वळू-माता प्रक्षेत्र व चार जिल्हा कृत्रिम रेतनकेंद्रांचे आधुनिकीकरण व बळकटीकरण यावर करण्यात आला. या प्रकल्पांतर्गत देशी जातींच्या जतन व संवर्धनाकरिता, जनावरांच्या नैसर्गिक संयोगासाठी शेतकऱ्यांना ४२ नर वासरांचे १०० टक्के अनुदानातून वाटप करण्यात आले. कृत्रिम रेतनाशी निगडीत सध्या कार्यरत २७२ कर्मचारी /शेतकरी/ पशुधारकांना अधिक चांगली कृत्रिम रेतन सेवा, दुग्ध उत्पादन व पशुव्यवस्थापन याकरिता प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. सन २०१५-१६ मध्ये ऑक्टोबर पर्यंत ₹ १.९५ लाख खर्च झाला. सन २०१४-१५ पासून केंद्र शासनाने राष्ट्रीय गुरे व म्हैस पैदास प्रकल्प बंद करून त्याऐवजी राष्ट्रीय गुरे पैदास व दुग्ध विकास हा नवीन कार्यक्रम सुरू केला असून महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला यांचेमार्फत राबविण्यात येत आहे.

७.३४ राष्ट्रीय गुरे पैदास व दुग्ध विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाने देशी गायी व म्हैस जातीच्या वंश सुधारणेसाठी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळास तीन वर्षाच्या कालावधीकरिता ₹ ५४.३९ कोटी निधी मंजूर केला आहे. केंद्र शासनाने ₹ १०० लाख निधी वितरीत केला असून त्यापैकी ₹ ८० लाख राष्ट्रीय गोकुळ अभियानाकरिता व ₹ २० लाख व्यवस्थापकीय अनुदानाकरिता आहेत.

## राष्ट्रीय पशुधन अभियान

७.३५ सन २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाने सामाजिक व आर्थिकदृष्टया मागासवर्गीयांकरिता शेळी, मेंढी, कुक्कुट आणि डुक्कर यांच्या विविध योजना एकत्रित करुन राष्ट्रीय पशुधन अभियानाची सुरूवात केली. यामध्ये केंद्र व राज्य शासनाचा ७५:२५ असा हिस्सा आहे. केंद्र शासनाकडे ₹ १३७.२४ कोटी रकमेचे सात प्रस्ताव सादर केले असून त्यापैकी तीन प्रस्तावास (परसातील ग्रामीण कुक्कुट पालन, पशुधन विमा आणि गवत कापणी यंत्राचे वाटप) मान्यता दिली आहे व ₹ १३.२७ कोटी निधी केंद्र शासनाने वितरीत केला आहे.

## पशुधन विमा योजना

७.३६ पशुधन विमा ही केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्र पशुधन विकास मंडळामार्फत राज्यात २००६-०७ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेचा प्रमुख उद्देश पशुधारकांकडे उपलब्ध असलेल्या जनावरांचा नैसर्गिक आपत्ती, अपघात अथवा रोगामुळे आकस्मिक मृत्यू झाल्यास होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण देणे हा आहे. सुरूवातीला ही योजना सहा जिल्हयांकरिता राबविण्यात आली होती आणि सन २०१०-११ मध्ये १८ जिल्हयांसाठी विस्तारित करण्यात आली व सन २०१४-१५ मध्ये विम्याच्या दाव्यापोटी ₹ १३.६३ लाख खर्च करण्यात आले.

७.३७ सन २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाने ही योजना सर्व जिल्ह्यात (मुंबई व मुंबई उपनगर वगळून) राबविण्यासाठी मान्यता दिली व ₹ ८९२.३२ लाख निधी (अनुसूचित जाती उपयोजनेकरिता ₹ ४७२.८६ लाख आणि सर्वसाधारण योजनेकरिता ₹ ४१९.४६ लाख) प्राप्त झाला आहे. या योजनेंतर्गत नक्षलग्रस्त भागातील दारिद्र्यरेषेखालील तसेच अनुसूचित जाती/जमातीच्या लाभार्थ्यांसाठी ८० टक्के अनुदान तर दारिद्र्यरेषेवरील लाभार्थ्यांसाठी ६० टक्के अनुदान दिले जाते. नक्षलग्रस्त क्षेत्र वगळून इतर क्षेत्राकरिता दारिद्र्यरेषेखालील आणि अनुसूचित जाती/जमातीच्या लाभार्थ्यांसाठी ७० टक्के अनुदान तर दारिद्र्यरेषेवरील लाभार्थ्यांसाठी ५० टक्के अनुदान दिले जाते. राज्यात सदर योजना १ डिसेंबर, २०१५ पासून राबविण्यात येत आहे.

## कुक्कुट विकास

७.३८ राज्यात कुक्कुटपालन प्रामुख्याने खाजगी कुक्कुटपालकांकडून केले जाते. राष्ट्रीय पोषण संस्थेने प्रति वर्ष प्रति व्यक्ति १८० अंडी व ११ किलो मांस सेवनाची शिफारस केली आहे. यादृष्टीने राज्य शासनाने *नाविन्यपूर्ण योजनेव्दारे* कुक्कुट पालनास चालना देण्याचे ठरविले आहे. सन २०१४-१५ मध्ये या योजनेअंतर्गत १,०२१ लाभार्थ्यांवर ₹ १४.०५ कोटी खर्च झाला. राज्याच्या मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रांमधून पुरवठा केलेले कुक्कुटवर्गीय पक्षी आणि अंड्यांची प्रति वर्ष दरडोई उपलब्धता तक्ता ७.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.२७ मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रांमधून पुरवठा केलेले कुक्कुटवर्गीय पक्षी व अंड्यांची उपलब्धता**

| वर्ष | पुरवठा करण्यात आलेल्या कुक्कुटवर्गीय पक्षांची संख्या (लाख) | अंड्यांची उपलब्धता (प्रति वर्ष दरडोई) | |
|---|---|---|---|
| | | राज्य | भारत |
| २०१०-११ | ३.८७ | ३८ | ५३ |
| २०११-१२ | ८.८४ | ३९ | ५५ |
| २०१२-१३ | ८.६८ | ४० | ५७ |
| २०१३-१४ | ९.८७ | ४१ | ५८ |
| २०१४-१५ | १५.७९ | ४३ | ६१ |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## दुग्ध विकास

७.३९ दुग्ध व्यवसाय हा एक कृषीपूरक व्यवसाय आहे, ज्यामुळे ग्रामीण कुटूंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन अतिरिक्त उत्पन्नासह त्यांच्या आहाराच्या पोषण मुल्यात वृध्दी होते. दूध उत्पादनामध्ये राज्याचा राष्ट्रीय स्तरावर सातवा क्रमांक आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजनेअतंर्गत सन २०१५-१६ मध्ये डिसेंबर, २०१५ पर्यंत राज्यातील चार दुध प्रकल्पांना ₹ ९.९० कोटी अर्थ सहाय्य देण्यात आले. दुधाचे उत्पादन व दरडोई उपलब्धता तक्ता ७.२८ मध्ये दिले आहेत.

**आलेख ७.३ : सहकारी व शासकीय दुग्धशाळांकडून एकत्रित सरासरी दैनिक दूध संकलन**




**तक्ता ७.२८ दुधाचे उत्पादन व दरडोई उपलब्धता**

| वर्ष | दुधाचे उत्पादन (दशलक्ष मे टन) | | दरडोई उपलब्धता (ग्रॅम प्रति दिन) | |
|---|---|---|---|---|
| | राज्य | भारत | राज्य | भारत |
| २०११-१२ | ८.५ | १२७.९ | २०६ | २९० |
| २०१२-१३ | ८.७ | १३२.० | २१० | २९५ |
| २०१३-१४ | ९.१ | १३७.७ | २१५ | २९६ |
| २०१४-१५ | ९.५ | १४६.३ | २२३ | ३०७ |
| २०१५-१६# | ९.९ | १६०.४ | २२८ | उ ना |

\# अपेक्षित उ ना उपलब्ध नाही

*आधार* : पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन

७.४० राज्यात सन २०१४-१५ मध्ये शासकीय व सहकारी क्षेत्रात एकूण ९९ दूधप्रक्रिया प्रकल्प व १५९ दूधशीतकरण केंद्रे कार्यरत होती व त्यांची प्रतिदिन क्षमता अनुक्रमे ८८.०८ लाख लिटर व २६.९८ लाख लिटर होती. राज्यातील शासकीय व सहकारी दुग्धशाळांचे एकत्रित सरासरी दैनिक दूधसंकलन २०१४-१५ मध्ये ४५.४५ लाख लिटर आणि २०१५-१६ मध्ये डिसेंबरपर्यंत, ५०.५२ लाख लिटर होते. राज्यात १९२ शीतगृहे असून त्यांची क्षमता ७,६१८.७७ मे.टन इतकी आहे, त्यापैकी १६७ शीतगृहे खाजगी क्षेत्रात असून त्यांची क्षमता ७,१७२.१२ मे टन आहे. शासकीय दुग्ध शाळांमधील दुग्ध उपउत्पादनांची माहिती तक्ता ७.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.२९ शासकीय दुग्ध शाळांमधील दुग्ध उपउत्पादने**

| उप उत्पादन | परिमाण | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६+ |
|---|---|---|---|---|
| दूध भुकटी | मे टन | १३८.४६ | ९४४.४८ | ४,४९९.९३ |
| पांढरे लोणी | मे टन | ८२.०४ | ४८३.२० | २,३९१.९८ |
| तूप | मे टन | ४७.८० | ४७.९८ | २.१७ |
| एनर्जी | लाख बाटल्या | ४४.३३ | ०.५० | १.०३ |
| लस्सी | लाख बाटल्या | ३०.६६ | ९.३४ | १.४९ |
| मसाला दूध | लाख बाटल्या | १४.७१ | १.५६ | ०.३८ |

*आधार* : दुग्धव्यवसाय विकास आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## मत्स्यव्यवसाय

७.४१ राज्यास ७२० किलोमीटरचा सागरी किनारा लाभला असून सागरी मासेमारीसाठी १.१२ लाख चौरस किलोमीटर क्षेत्र योग्य आहे तसेच सागरी किनाऱ्यावर मासळी उतरविण्याची १७३ केंद्रे आहेत. सागरी मासेमारीसाठी १५,६८६ नौका कार्यरत असून त्यापैकी १२,८३१ यांत्रिकी नौका आहेत. या व्यतिरिक्त, राज्यात ३.१७ लाख हेक्टर क्षेत्र गोड्या पाण्यातील व ०.१० लाख हेक्टर क्षेत्र निमखाऱ्या पाण्यातील मासेमारीस योग्य आहे. राज्यात ३० मत्स्यबीज उत्पादन केंद्रे असून त्यांची गोड्या पाण्यातील मत्स्यबीज उत्पादन क्षमता २,४१४ लाख प्रतिवर्ष आहे. सन २०१४-१५ मध्ये देशाच्या सागरी, गोड्या पाण्यातील आणि एकूण मत्स्य उत्पादनात (अस्थायी) राज्याचे योगदान अनुक्रमे १३.१ टक्के, २.२ टक्के व ६.० टक्के होते. मत्स्य उत्पादन व निर्यातीबाबतचा तपशील तक्ता ७.३० मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.३० मत्स्य उत्पादन व निर्यात**

| बाब | परिमाण | २०१३-१४ | २०१४-१५ | शेकडा बदल | २०१५-१६*+ |
|---|---|---|---|---|---|
| **मत्स्य उत्पादन** | लाख मे.टन | | | | |
| सागरी | | ४.६७ | ४.६४ | (-)०.६ | ३.४० |
| गोड्या पाण्यातील | | १.३५ | १.४४ | ६.७ | १.२५ |
| **एकूण** | | **६.०२** | **६.०८** | १.० | **४.६५** |
| **मत्स्य उत्पादनाचे स्थूल मूल्य** | ₹ कोटी | | | | |
| सागरी | | ३,६०६ | ४,४८२ | २४.३ | ३,२३० |
| गोड्या पाण्यातील | | १,१७३ | १,४१८ | २०.९ | १,२५० |
| **एकूण** | | **४,७७९** | **५,९००** | २३.५ | **४,४८०** |
| **मत्स्य उत्पादनाची निर्यात** | | | | | |
| उत्पादन | लाख मे.टन | १.४७ | १.५२ | ३.४ | उना |
| मूल्य | ₹ कोटी | ३,९८६ | ४,२७३ | ७.२ | उना |

*आधार* : मत्स्यव्यवसाय आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी + डिसेंबरपर्यंत उना उपलब्ध नाही

७.४२ राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सन २०११-१२ पासून ₹ ७० कोटी किंमतीच्या १९ धक्क्यांच्या विकासाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला असून त्यापैकी ७ धक्क्यांचे काम पूर्ण झाले आहे. सन २०१४-१५ पर्यंत ₹ ५६.८३ कोटी निधी पतन अभियंता, कोकण भवन, रत्नागिरी व सिंधुदुर्ग यांना वितरीत करण्यात आला आहे.

## रेशीम उत्पादन

७.४३.१ तुती रेशीम विकास कार्यक्रम राज्यातील २५ जिल्ह्यांत राबविला जातो. तुती लागवडी खालील क्षेत्र व रेशीम उत्पादनाची माहिती तक्ता ७.३१ मध्ये दिली आहे.

७.४३.२ टसर रेशीम विकास कार्यक्रम गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा व गोंदिया या चार जिल्ह्यांमध्ये राबविला जातो. टसर रेशीम किड्यांच्या संवर्धनासाठी आवश्यक ऐन व अर्जुन वृक्षाचे या चार जिल्ह्यांतील लागवडीखालील क्षेत्र १८,८६६ हेक्टर आहे. सन २०१४-१५ मध्ये कच्च्या टसर रेशमाचे उत्पादन १८.९७ मे.टन झाले, तर सन २०१५-१६ मध्ये डिसेंबरपर्यंत ते ५.४१ मे.टन होते.

**तक्ता ७.३१ तुती लागवडी खालील क्षेत्र व रेशीम उत्पादन**

| बाब | परिमाण | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६*+ |
|---|---|---|---|---|
| लागवडी खालील नविन क्षेत्र | हेक्टर | ६०३ | १,५८१ | १,५३१ |
| लागवडी खालील जूने क्षेत्र | हेक्टर | ९०२ | १,२२५ | २,९७७ |
| लागवडी खालील एकूण क्षेत्र | हेक्टर | १,५०५ | २,८०६ | ४,५०८ |
| लाभार्थी (शेतकरी) | संख्या | ३,०५७ | ५,३९७ | ८,६७७ |
| अंडीपुंज पुरवठा | लाख | १३.५३ | २३.०५ | १८.२६ |
| कोष उत्पादन | मे टन | ७६१ | १,३१८ | १,०२७ |
| रेशीम सुत उत्पादन | मे टन | ११२ | २०३ | १५८ |
| शासनाकडून कोष खरेदी | मे टन | ७.८६ | १.१५ | ३.९५ |
| रोजगार निर्मिती मनुष्य दिवस | लाख | १२.३२ | २२.३३ | १७.३७ |

*आधार* : रेशीम संचालनालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी + डिसेंबरपर्यंत

## वने

७.४४ राज्यात कृषि क्षेत्राखालोखाल दुसरे मोठे क्षेत्र वनांखाली आहे. सन २०१४-१५ अखेर राज्याचे एकूण वनक्षेत्र ६१,५७३ चौ किमी (अस्थायी) असून राष्ट्रीय वन धोरण, १९८८ नुसार वनक्षेत्राचे प्रमाण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के असावे या उद्दिष्टाच्या तुलनेत राज्याचे वनक्षेत्र २०.०१ टक्के आहे. राज्यातील एकूण वनक्षेत्रापैकी (अस्थायी) वन विभाग (५५,२५० चौ किमी), महाराष्ट्र वन विकास महामंडळ (मवविम) (३,६९० चौ किमी), वन विभागाच्या अधिपत्याखाली आणण्यात आलेले खाजगी वनक्षेत्र (१,१८० चौ किमी) व महसूल विभाग (१,४५३ चौ किमी) यांच्या अधिपत्याखाली आहे. "भारताचा वनस्थिती अहवाल - २०१५" नुसार राज्याच्या एकूण वनाच्छदनात अति घनदाट वने १५.९ टक्के, मध्यम घनदाट वने ३७.९ टक्के, खुले वन ३८.६ तर खुरटे ७.६ टक्के होते. एकूण वनक्षेत्रापैकी ५१,१७० चौ किमी राखीव, ६,६८१ चौ किमी संरक्षित आणि ३,७२२ चौ किमी अवर्गीकृत वनक्षेत्र होते. विभागनिहाय राज्याचे वनक्षेत्र तक्ता ७.३२ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.३२ विभागनिहाय राज्याचे वनक्षेत्र**

(क्षेत्र चौ.किमी.)

| विभाग | राखीव | संरक्षित | अवर्गीकृत | एकूण वनक्षेत्र | एकूण वनक्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| विदर्भ | २७,७२७.२५ | ४,५९९.४० | १,५४१.७५ | ३३,८६८.४० | ५५.० |
| मराठवाडा | २,७९२.४१ | १२९.२३ | १७०.५६ | ३,०९२.२० | ५.० |
| पश्चिम महाराष्ट्र | २०,६५०.४६ | १,९५१.९८ | २,००९.९९ | २४,६१२.४३ | ४०.० |
| **एकूण** | **५१,१७०.१२** | **६,६८०.६१** | **३,७२२.३०** | **६१,५७३.०३** | **१००** |

*आधार* : प्रधान मुख्य वन संरक्षक यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## वन्यजीव आणि राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये

७.४५ राज्यात सहा राष्ट्रीय उद्याने, ४८ अभयारण्ये आणि चार संवर्धन राखीव क्षेत्रे आहेत. सन २०१४-१५ मध्ये विविध संरक्षित क्षेत्रांना सुमारे २५ लाख पर्यटकांनी भेटी दिल्या असून त्यातून राष्ट्रीय उद्याने व अभयारण्यांना ₹ १०.११ कोटी महसूल मिळाला. 'भारतातील वाघांची स्थिती, २०१४' या अहवालानुसार राज्यातील वाघांची अंदाजित संख्या १९० होती, जी सन २०१० मध्ये १६९ होती. व्याघ्रप्रकल्प आणि राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये यांचे क्षेत्र व त्यावर झालेला खर्च तक्ता ७.३३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.३३ व्याघ्रप्रकल्प आणि राष्ट्रीय उद्याने,अभयारण्ये यांचे क्षेत्र व त्यावरील खर्च**

(₹ कोटी)

| प्रकल्प | क्षेत्र (चौ किमी) | | खर्च | | |
|---|---|---|---|---|---|
| | गाभा (कोअर) | बफर | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६+ |
| **व्याघ्र प्रकल्प** | | | | | |
| मेळघाट | १,५००.४९ | १,२६८.०३ | २१.०४ | २७.३७ | १७.११ |
| ताडोबा अंधारी | ६२५.८२ | १,१०१.७७ | ३१.५२ | ६.६२ | ५.६० |
| पेंच | २५७.२६ | ४८३.९५ | ६.४९ | ४.८२ | ३.५६ |
| सह्याद्री | ६९०.६४ | १,६२६.७६ | १.७३ | ४.८१ | ६.६८ |
| नवेगाव-नागझिरा | ६५३.६७ | अना | ०.८३ | १.६९ | २.६७ |
| बोर | १३८.१२ | अना | ०.३८ | ०.७७ | ०.३१ |
| **राष्ट्रीय उद्याने/अभयारण्ये यांचा विकास** | | ६,१८५.५५ | १४०.९५$ | १३६.६४$ | उना |
| हत्ती प्रकल्प कोल्हापूर | | अना | ०.२० | ०.३८ | ०.०६ |

उना उपलब्ध नाही अना अद्याप अधिसूचित नाही +जानेवारीपर्यंत $ राज्य पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन व नियोजन प्राधिकरणाचा खर्च अंतर्भूत आहे.

*आधार :* प्रधान मुख्य वन संरक्षक यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## वन उत्पादने

७.४६ वनांद्वारे इमारती लाकूड, जळाऊ लाकूड ही प्रमुख व बांबू, तेंदू पत्ता, डिंक, गवत, इत्यादि सारखी गौण वन उत्पादने मिळतात. ही सर्व वन उत्पादने राज्याचा महसूल वाढविण्यासाठी व स्थानिकांना उपजीविका पुरविण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. वन उत्पादने व त्यांचे मूल्य तक्ता ७.३४ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.३४ वन उत्पादने व त्यांचे मूल्य**

(मूल्य ₹ कोटी)

| वन उत्पादने | उत्पादनाचे परिमाण | २०१३-१४ | | २०१४-१५* | | २०१५-१६++ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उत्पादन | मूल्य | उत्पादन | मूल्य | उत्पादन | मूल्य |
| **(अ) मुख्य वन उत्पादने** | | | | | | | |
| इमारती लाकूड | लाख घन मीटर | १.१२ | २९३.३० | १.११ | १८७.५२ | १.१४ | २४५.६१ |
| जळाऊ लाकूड | लाख घन मीटर | ३.४३ | ५५.१४ | १.८९ | २०.५७ | १.९५ | ३५.३८ |
| **एकूण (अ)** | | ४.५५ | ३४८.४४ | ३.०० | २०८.०९ | ३.०९ | २८०.९९ |
| **(ब) गौण वन उत्पादने** | | | | | | | |
| बांबू | लाख मे टन | ०.३४ | १८.९० | ०.२३ | ३०.२६ | १.५८ | ३०.२४ |
| तेंदू | लाख स्टँडर्ड बॅग्ज | ४.५४ | ६२.९२ | ४.६२ | ५६.२१ | २.१४ | ६४.७२ |
| गवत | मे टन | ६५६ | ०.११ | ४८३ | ०.१३ | ४०३ | ०.०४ |
| डिंक | क्विंटल | ४,२३१ | १.३४ | २,०२२ | २.७६ | २,२७२ | २.९४ |
| इतर (लाख, हिरडा, शिकेकाई, इ.) | | -- | १०.७६ | -- | ९.५९ | -- | १०.५७ |
| **एकूण (ब)** | | | ९४.०३ | | ९८.९५ | | १०८.५१ |
| **एकूण (अ+ब)** | | | **४४२.५०** | | **३०७.०४** | | **३८९.५०** |

*आधार* : प्रधान मुख्य वन संरक्षक यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन, * अस्थायी ++ अपेक्षित

## वृक्षारोपण

७.४७ वृक्षारोपण हा २० कलमी कार्यक्रमाचा एक भाग असून त्याची अंमलबजावणी मुख्यत: वन विभाग, मवविम व सामाजिक वनीकरण संचालनालय यांचेमार्फत करण्यात येते. राज्य शासनाने सन २०१२ पासून दरवर्षी १०० कोटी वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सन २०१४-१५ मध्ये या योजनेंतर्गत वन विभाग व वन विकास महामंडळामार्फत ₹ १११.७७ कोटी एवढा खर्च करण्यात आला. वृक्षरोपणांतर्गत क्षेत्र व खर्च तक्ता ७.३५ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.३५ वृक्षरोपणांतर्गत क्षेत्र व खर्च**

| वर्ष | वन विभाग | | मवविम | | सामाजिक वनीकरण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्षेत्र (हेक्टर) | खर्च (₹ कोटी) | क्षेत्र (हेक्टर) | खर्च (₹ कोटी) | क्षेत्र (हेक्टर) | खर्च (₹ कोटी) | पुरवलेली रोपे (कोटी) |
| २०११-१२ | ३१,३६९ | ६७.९० | ४,०११ | ९.४७ | ३,९१६ | १३.६७ | १.३२ |
| २०१२-१३ | ७०,१५७ | १३३.९७ | ४,८४७ | १०.३६ | २,१०६ | १४.२९ | ०.७७ |
| २०१३-१४ | ५८,६४६ | १०९.७६ | ३,९६९ | ८.५७ | २,५२८ | १६.०६ | २.१४ |
| २०१४-१५ | ८५,३५६ | १०२.९० | ३,३१४ | ८.८७ | १,४५३ | २१.३७ | ०.८९ |
| २०१५-१६*+ | ५१,८६६ | २९.४७ | २,८९८ | ८.५५ | १,०२९ | १२.२४ | ०.३८ |

*आधार* : प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन *अस्थायी +डिसेंबरपर्यंत

## संत तुकाराम वनग्राम योजना

७.४८ वने आणि वन्यजीव यांचे महत्व याविषयी जागरुकता निर्माण करणे या हेतूने तसेच बेकायदेशीर वृक्षतोड, अतिक्रमण, इ. पासून वनांचे संरक्षण करण्याकरिता संत तुकाराम वनग्राम योजना सन २००६-०७ मध्ये सुरु करण्यात आली. या योजनेंतर्गत १५,५०० गावांमध्ये सुमारे २९.७० लाख सभासद असलेल्या एकूण १२,५१७ संयुक्त वन व्यवस्थापन समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांकडून २७.०४ लाख हेक्टर वनक्षेत्राचे व्यवस्थापन केले जाते.

## सामाजिक वनीकरण

७.४९ सन २०१४-१५ मध्ये २० कलमी कार्यक्रमांतर्गत सामाजिक वनीकरण विभागाकडून सुमारे ५३० हेक्टर व १,७१६ किमी सामुहिक जमिनीवर १६.१२ लाख रोपांची लागवड करण्यात आली असून खाजगी जमिनीवरील वृक्षारोपणासाठी सुमारे ७३.१६ लाख रोपे पुरविण्यात आली. सन २०१५-१६ मध्ये डिसेंबरपर्यंत सामाजिक वनीकरण विभागाकडून २२ लाख रोपांची लागवड सुमारे ४३२ हेक्टर व १,११० किमी सामुहिक जमिनीवर करण्यात आली असून खाजगी जमिनीवरील लागवडीकरिता १६ लाख रोपे पुरविण्यात आली. प्रमुख योजनांखालील वर्षनिहाय वृक्षारोपणाची माहिती तक्ता ७.३६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३६ प्रमुख योजनांखालील वर्षनिहाय वृक्षारोपण**

(क्षेत्र हेक्टर)

| योजना | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६+ |
|---|---|---|---|---|
| महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना-गट लागवड | ६२९ | ६३१ | २३४ | २११ |
| महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना रस्त्यांच्या बाजूला वृक्षारोपण (किमी) | १,१७९ | १,३४६ | १,६७२ | ९२८ |
| एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम | १८५ | ५७३ | ० | ० |
| राष्ट्रीय बांबू अभियान | १३० | २४१ | ३९ | ३० |
| निवडक पाणलोट क्षेत्रातील वनेतर सामुहिक जमिनीवर वृक्ष लागवड कार्यक्रम | २३१ | ३३८ | १२५ | १४७ |

*आधार* : प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन +डिसेंबरपर्यंत

* * * * *

## परिशिष्ट ७.१

## राज्यातील मुख्य पिकांखालील क्षेत्र, उत्पादन आणि प्रति हेक्टर उत्पादकता

क्षेत्र '००० हेक्टर
उत्पादन '००० मे.टन
उत्पादकता प्रति हेक्टर किलो

**अन्नधान्ये**

| अ. क्र. | वर्ष | तांदूळ | | | गहू | | | ज्वारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | १९६०-६१ | १,३०० | १,३६९ | १,०५४ | ९०७ | ४०१ | ४४२ | ६,२८४ | ४,२२४ | ६७२ |
| २ | १९७०-७१ | १,३५२ | १,६६२ | १,२२९ | ८१२ | ४४० | ५४२ | ५,७०३ | १,५५७ | २७३ |
| ३ | १९८०-८१ | १,४५९ | २,३१५ | १,५८७ | १,०६३ | ८८६ | ८३४ | ६,४६९ | ४,४०९ | ६८१ |
| ४ | १९९०-९१ | १,५९७ | २,३४४ | १,४६७ | ८६७ | ९०९ | १,०४९ | ६,३०० | ५,९२९ | ९४१ |
| ५ | २०००-०१ | १,५१२ | १,९३० | १,२७७ | ७५४ | ९४८ | १,२५६ | ५,०९४ | ३,९८८ | ७८३ |
| ६ | २०१०-११ | १,५१६ | २,६९१ | १,७७५ | १,३०७ | २,३०१ | १,७६१ | ४,०६० | ३,४५२ | ८५० |
| ७ | २०१२-१३ | १,५५९ | ३,०७८ | १,९७४ | ७८५ | १,१९९ | १,५२७ | ३,२९० | २,१०८ | ६४१ |
| ८ | २०१३-१४ | १,६०५ | ३,१०८ | १,९३६ | १,०२८ | १,४८० | १,४३९ | ३,५८५ | २,८४८ | ७९४ |
| ९ | २०१४-१५ | १,५५१ | २,९४६ | १,९०० | १,०६७ | १,३०८ | १,२२५ | ३,२८८ | २,१०९ | ६४१ |

| अ. क्र. | वर्ष | बाजरी | | | इतर तृणधान्ये | | | सर्व तृणधान्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) | (२०) |
| १ | १९६०-६१ | १,६३५ | ४८९ | २९९ | ४८० | २७२ | ५६७ | १०,६०६ | ६,७५५ | ६३७ |
| २ | १९७०-७१ | २,०३९ | ८२४ | ४०४ | ४१४ | २५४ | ६१४ | १०,३२० | ४,७३७ | ४५९ |
| ३ | १९८०-८१ | १,५३४ | ६९७ | ४५४ | ४५१ | ३४० | ७५४ | १०,९७६ | ८,६४७ | ७८८ |
| ४ | १९९०-९१ | १,९४० | १,११५ | ५७५ | ४३२ | ४४३ | १,०२५ | ११,१३६ | १०,७४० | ९६४ |
| ५ | २०००-०१ | १,८०० | १,०८७ | ६०४ | ६६४ | ५४४ | ८१९ | ९,८२४ | ८,४९७ | ८६५ |
| ६ | २०१०-११ | १,०३५ | १,१२३ | १,०८६ | १,०६८ | २,७४९ | २,५७५ | ८,९८५ | १२,३१७ | १,३७१ |
| ७ | २०१२-१३ | ७८८ | ५०२ | ६३७ | १,०२० | १,९९३ | १,९५४ | ७,४४२ | ८,८८२ | १,१९३ |
| ८ | २०१३-१४ | ७६२ | ७८८ | १,०३५ | १,१२९ | ३,२९५ | २,९१९ | ८,१०९ | ११,५१९ | १,४२१ |
| ९ | २०१४-१५ | ८६५ | ५३८ | ६२२ | १,२८८ | २,३६६ | १,८३८ | ८,०५९ | ९,२६७ | १,१५० |

| अ. क्र. | वर्ष | तूर | | | हरभरा | | | मूग | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (२१) | (२२) | (२३) | (२४) | (२५) | (२६) | (२७) | (२८) | (२९) |
| १ | १९६०-६१ | ५३० | ४६८ | ८८३ | ४०२ | १३४ | ३३३ | ० | ० | ० |
| २ | १९७०-७१ | ६२७ | २७१ | ४३२ | ३१० | ८७ | २८१ | ० | ० | ० |
| ३ | १९८०-८१ | ६४४ | ३१९ | ४९५ | ४१० | १३७ | ३३५ | ० | ० | ० |
| ४ | १९९०-९१ | १,००४ | ४१९ | ४१७ | ६६८ | ३५५ | ५३२ | ० | ० | ० |
| ५ | २०००-०१ | १,०९६ | ६६० | ६०२ | ६७६ | ३५१ | ५१९ | ७१४ | २४४ | ३४१ |
| ६ | २०१०-११ | १,३०२ | ९७६ | ७५० | १,४३८ | १,३०० | ९०४ | ५५४ | ३७२ | ६७२ |
| ७ | २०१२-१३ | १,२१४ | १,००६ | ८२९ | १,१३५ | ८६८ | ७६५ | ४३१ | २११ | ४९० |
| ८ | २०१३-१४ | १,१४१ | १,०३४ | ९०६ | १,५२० | १,४०१ | ९२२ | ४३१ | २०० | ४६५ |
| ९ | २०१४-१५ | १,२१० | ३५३ | २९२ | १,४२७ | १,०८८ | ७६२ | ३१५ | ८४ | २६८ |

(पुढे चालू)

# परिशिष्ट ७.१ (पुढे चालू)

क्षेत्र '००० हेक्टर
उत्पादन '००० मे.टन
उत्पादकता प्रति हेक्टर किलो

**अन्नधान्ये**

| अ. क्र. | वर्ष | उडीद | | | इतर कडधान्ये | | | सर्व कडधान्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (३०) | (३१) | (३२) | (३३) | (३४) | (३५) | (३६) | (३७) | (३८) |
| १ | १९६०-६१ | ० | ० | ० | १,४१७ | ३८७ | २७३ | २,३४९ | ९८९ | ४२१ |
| २ | १९७०-७१ | ० | ० | ० | १,६२९ | ३१९ | १९६ | २,५६६ | ६७७ | २६४ |
| ३ | १९८०-८१ | ० | ० | ० | १,६६१ | ३६९ | २२२ | २,७१५ | ८२५ | ३०४ |
| ४ | १९९०-९१ | ० | ० | ० | १,५८५ | ६६७ | ४२१ | ३,२५७ | १,४४१ | ४४२ |
| ५ | २०००-०१ | ५७४ | २०५ | ३५७ | ४९७ | १७७ | ३५६ | ३,५५७ | १,६३७ | ४६० |
| ६ | २०१०-११ | ४८२ | ३२९ | ६८२ | २६२ | ११९ | ४५५ | ४,०३८ | ३,०९६ | ७६७ |
| ७ | २०१२-१३ | ३६० | २१४ | ५९३ | १८२ | ६१ | ३३५ | ३,३२३ | २,३६० | ७१० |
| ८ | २०१३-१४ | ३३४ | २०६ | ६१७ | २२७ | १०० | ४३८ | ३,६५३ | २,९४१ | ८०५ |
| ९ | २०१४-१५ | २७७ | ९२ | ३३३ | १८४ | ६४ | ३४६ | ३,४१३ | १,६८१ | ४९३ |

| अ. क्र. | वर्ष | सर्व अन्नधान्ये | | | भूईमूग | | | सोयाबीन | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (३९) | (४०) | (४१) | (४२) | (४३) | (४४) | (४५) | (४६) | (४७) |
| १ | १९६०-६१ | १२,९५५ | ७,७४४ | ५९८ | १,०८३ | ८०० | ७३९ | ० | ० | ० |
| २ | १९७०-७१ | १२,८८६ | ५,४१४ | ४२० | ९०४ | ५८६ | ६४९ | ० | ० | ० |
| ३ | १९८०-८१ | १३,६९१ | ९,४७२ | ६९२ | ६९५ | ४५१ | ६४८ | ० | ० | ० |
| ४ | १९९०-९१ | १४,३९३ | १२,१८१ | ८४६ | ८६४ | ९७९ | १,१३२ | २०१ | १९० | ९४७ |
| ५ | २०००-०१ | १३,३८२ | १०,१३३ | ७५७ | ४९० | ४७० | ९५८ | १,१४२ | १,२६६ | १,१०९ |
| ६ | २०१०-११ | १३,०२३ | १५,४१३ | १,१८३ | ३९५ | ४७० | १,२९० | २,७२९ | ४,३१६ | १,५८१ |
| ७ | २०१२-१३ | १०,७६५ | ११,२४२ | १,०४४ | ३०८ | ३३७ | १,०९४ | ३,०६४ | ४,६९० | १,५३१ |
| ८ | २०१३-१४ | ११,७६२ | १४,४६० | १,२२९ | ३२६ | ४१७ | १,२८० | ३,५२० | ४,२७३ | १,२१४ |
| ९ | २०१४-१५ | ११,४७२ | १०,९४८ | ९५४ | ३२७ | ३७९ | १,१६० | ३,६४० | १,८२१ | ५०० |

| अ. क्र. | वर्ष | करडई | | | इतर तेलबिया | | | सर्व तेलबिया | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (४८) | (४९) | (५०) | (५१) | (५२) | (५३) | (५४) | (५५) | (५६) |
| १ | १९६०-६१ | ३३१ | ० | ० | ४५४ | ० | ० | १,८६८ | ० | ० |
| २ | १९७०-७१ | ४०६ | १०२ | २५२ | ४०८ | ६५ | १५९ | १,७१८ | ७५३ | ४३८ |
| ३ | १९८०-८१ | ४८० | १७४ | ३६३ | ६०५ | १०३ | १७० | १,७८० | ७२८ | ४२६ |
| ४ | १९९०-९१ | ६३४ | २५८ | ४०८ | १,१२७ | ४५५ | ४०४ | २,८२६ | १,८८२ | ६६६ |
| ५ | २०००-०१ | २९६ | १२२ | ४१२ | ६३१ | २४१ | ३८२ | २,५५९ | २,०९९ | ८२० |
| ६ | २०१०-११ | १७३ | ९४ | ५४४ | ३३१ | १७६ | ५३२ | ३,६२८ | ५,०५६ | १,३९४ |
| ७ | २०१२-१३ | १०५ | ५८ | ५४९ | २१४ | ७४ | ३४९ | ३,६९१ | ५,१०६ | १,३९८ |
| ८ | २०१३-१४ | १२६ | ८२ | ६५४ | २०९ | ९४ | ४५० | ४,१८२ | ४८६६ | १,१६३ |
| ९ | २०१४-१५ | ७४ | २६ | ३५३ | १६९ | ५१ | ३०२ | ४,२११ | २,२७८ | ५४१ |

(पुढे चालू)

# परिशिष्ट ७.१ (समाप्त)

क्षेत्र '००० हेक्टर
उत्पादन '००० मे.टन
उत्पादकता प्रति हेक्टर किलो

**नगदी पिके**

| अ. क्र. | वर्ष | ऊस | | | | कापूस (रुई) | | | तंबाखू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तोडणी क्षेत्र | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता (मे. टनांत) | क्षेत्र | उत्पादन (गासड्यात ) | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (५७) | (५८) | (५९) | (६०) | (६१) | (६२) | (६३) | (६४) | (६५) | (६६) |
| १ | १९६०-६१ | १५५ | १५५ | १०,४०४ | ६६.९२ | २,५०० | १,६७३ | ११४ | २५ | १२ | ४८० |
| २ | १९७०-७१ | १६७ | २०४ | १४,४३३ | ८६.५३ | २,७५० | ४८४ | ३० | १२ | ५ | ४४८ |
| ३ | १९८०-८१ | २५८ | ३१९ | २३,७०६ | ९१.७४ | २,५५० | १,२२४ | ८२ | १२ | ८ | ६४८ |
| ४ | १९९०-९१ | ४४२ | ५३६ | ३८,१५४ | ८६.४० | २,७२१ | १,८७५ | ११७ | ८ | ८ | १,०३९ |
| ५ | २०००-०१ | ५९५ | ६८७ | ४९,५६९ | ८३.२७ | ३,०७७ | १,८०३ | १०० | ८ | ९ | १,१४८ |
| ६ | २०१०-११ | ९६५ | १,०४१ | ८५,६९१ | ८८.८५ | ३,९४२ | ७,४७३ | ३२२ | १ | १ | ९९४ |
| ७ | २०१२-१३ | ९३८ | १,०६७ | ७५,३३५ | ८०.०० | ४,१८७ | ६,७९३ | २७६ | १ | १ | १,०५० |
| ८ | २०१३-१४ | ९३७ | १,०४८ | ८३,९५४ | ९०.०० | ४,१६० | ८,८३५ | ३६१ | २ | २ | १,१४७ |
| ९ | २०१४-१५ | १,०३० | ९८७ | ९१,५३८ | ८९.०० | ४,१९० | ३,५७७ | १४५ | १ | २ | १,६०८ |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

टीप - (१) माहिती अंतिम अनुमानावर आधारित आहे.
(२) कापसाचे उत्पादन १७० किलो/गासडी याप्रमाणे '००० गासड्यांमध्ये.

# परिशिष्ट ७.२

## राज्यातील कृषि उत्पादनाचे पीकनिहाय निर्देशांक

(त्रैवर्षीय सरासरी - पाया : १९७९-८२ = १००)

| गट/पिके | भार | १९८२-८३ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| **१. अन्नधान्ये** | | | | | | | | |
| **(अ) तृणधान्ये** | | | | | | | | |
| (१) तांदुळ | ९.४९ | ८७.४ | १०६.१ | ८७.४ | १२२.१ | १३८.४ | १४१.३ | १३३.४ |
| (२) गहू | ५.९२ | ८०.६ | ९३.९ | ९७.९ | २३७.७ | १२३.९ | १६५.५ | १३५.१ |
| (३) ज्वारी | २२.१६ | ९५.५ | १२१.१ | ८१.४ | ७०.५ | ४३.० | ५०.७ | ४३.१ |
| (४) बाजरी | ३.०८ | ६४.२ | १५४.३ | १५०.५ | १५५.५ | ६९.५ | १०९.१ | ७४.५ |
| (५) बार्ली | ०.०२ | ३७.७ | १७.० | १३.२ | १८८.७ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| (६) मका | ०.४६ | ३६.९ | १०५.२ | २५३.८ | २,१८०.५ | १,५२८.५ | २,७१५.१ | १,८४४.६ |
| (७) नाचणी | ०.८५ | ९२.० | ९८.४ | ६०.८ | ५५.५ | ६५.७ | ६७.१ | ५६.३ |
| (८) कोद्रा | ०.०५ | ७३.७ | ६६.६ | ४३.६ | २३.६ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| (९) इतर तृणधान्ये | ०.१९ | ७६.७ | १५०.८ | १६२.५ | २६.१ | ४८.२ | ४६.६ | ७०.८ |
| **एकूण - तृणधान्ये** | **४२.२२** | **८८.५** | **११५.७** | **९१.९** | **१३४.२** | **९४.३** | **१२०.६** | **९८.५** |
| **(ब) कडधान्ये** | | | | | | | | |
| (१) हरभरा | १.४७ | ७८.४ | २१५.८ | २१३.३ | ७९०.७ | ५२७.९ | ९८६.४ | ६६१.४ |
| (२) तूर | ५.४५ | ९६.१ | १०५.२ | १६६.० | २४५.३ | २५२.९ | २५९.९ | ८८.८ |
| (३) इतर कडधान्ये | ३.५२ | ११२.५ | १६०.० | १५०.० | १९६.५ | ११६.५ | १२३.२ | १५.१ |
| **एकूण - कडधान्ये** | **१०.४४** | **९९.२** | **१३९.२** | **१६७.३** | **३०५.६** | **२४५.६** | **३१६.१** | **१४४.६** |
| **एकूण - अन्नधान्ये** | **५२.६६** | **९०.६** | **१२०.४** | **१०६.८** | **१६८.२** | **१२४.३** | **१५९.४** | **१०७.६** |
| **२. अन्नधान्येतर** | | | | | | | | |
| (अ) तेलबिया | | | | | | | | |
| (१) भूईमूग | ७.२३ | ७१.४ | १५८.९ | ७६.२ | ७४.३ | ३८.३ | १६३.८ | ६१.५ |
| (२) तीळ | ०.५७ | ९४.२ | २२३.७ | ८८.९ | ५८.९ | ३२.४ | ३२.४ | १२.२ |
| (३) मोहरी, राई आणि जवस | ०.७८ | ७३.४ | ८६.५ | ३०.८ | ५.१ | ३.४ | २०.३ | ९.० |
| (४) एरंडी | ०.०१ | २५.० | १६६.७ | ३५८.३ | ३३३.३ | ४१६.७ | ४१६.७ | ५२५.६ |
| (५) सूर्यफूल | ०.५७ | ७६.८ | ६०९.८ | ३५२.३ | २६७.३ | ६८.३ | ८८.४ | ८८.४ |
| **एकूण - तेलबिया** | **९.१६** | **७३.३** | **१८४.८** | **९०.६** | **७९.८** | **३७.३** | **६०.१** | **५६.१** |
| **(ब) तंतू पिके** | | | | | | | | |
| (१) कापूस | ९.८९ | ११०.४ | १२८.६ | १२३.६ | ५१२.३ | ४६५.७ | ६०५.६ | २४५.२ |
| (२) अंबाडी | ०.०४ | ४४.५ | ३८.० | ३६.५ | २६.४ | २९.२ | उ.ना. | उ.ना. |
| **एकूण - तंतू पिके** | **९.९३** | **११०.१** | **१२८.२** | **१२३.२** | **५१०.४** | **४६३.९** | **६०३.२** | **२४४.२** |
| **(क) संकीर्ण** | | | | | | | | |
| (१) ऊस | २५.९७ | ११४.३ | १५८.२ | १८६.९ | २९७.२ | २९२.५ | २८९.९ | ३४५.१ |
| (२) तंबाखू | ०.१४ | ६८.३ | ११७.३ | १३८.१ | ३२.७ | ०.० | उ.ना. | उ.ना. |
| (३) बटाटा | ०.२२ | ८४.२ | १२०.९ | १२१.९ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| (४) मिरची | १.९२ | १०७.१ | १०२.२ | ८२.० | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| **एकूण - संकीर्ण** | **२८.२५** | **११३.३** | **१५३.९** | **१७९.०** | **२७३.४** | **२६८.९** | **२६६.५** | **३१७.३** |
| **एकूण - अन्नधान्येतर** | **४७.३४** | **१०४.९** | **१५४.५** | **१५०.२** | **२८५.६** | **२६५.०** | **२९७.२** | **२५१.४** |
| **सर्व पिके** | **१००.००** | **९७.४** | **१३६.५** | **१२७.४** | **२२३.८** | **१९०.९** | **२२४.६** | **१७५.७** |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, मुंबई                उ.ना. उपलब्ध नाही.

टीप - २०१०-११ ते २०१४-१५ चे निर्देशांक अस्थायी आहेत.

## परिशिष्ट ७.३

## कृषि गणनांनुसार राज्यातील एकूण वहिती खातेदार, वहितीचे एकूण क्षेत्र व सरासरी क्षेत्र

| अ. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती खातेदारांची संख्या ('००) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | ६,८३४ | ९,९१४ | १६,६७२ | २२,४०९ | २७,४६२ | ३१,६५८ | ३६,४५७ |
| २ | ०.५ - १.० | ५,५८५ | ९,३४५ | १६,०७५ | २०,२५२ | २५,५९५ | २९,५२५ | ३०,६३३ |
| ३ | १.० - २.० | ८,७८३ | १५,४०९ | २७,२७६ | ३१,७५५ | ३६,०५६ | ४१,५०३ | ४०,५२३ |
| ४ | २.० - ३.० | ६,२६६ | १०,२७५ | १३,९६९ | १४,७४५ | १५,७९१ | १७,०२० | १५,४६३ |
| ५ | ३.० - ४.० | ४,६०६ | ६,५८३ | ७,२८९ | ६,७७४ | ६,९४९ | ७,४९६ | ६,१२८ |
| ६ | ४.० - ५.० | ३,५७६ | ४,६०१ | ४,४६९ | ३,८७४ | ३,७८० | ४,०३७ | ३,१४२ |
| ७ | ५.० - १०.० | ८,७१५ | ९,३१६ | ७,२४१ | ५,५५८ | ४,८७३ | ५,२१४ | ३,९६४ |
| ८ | १०.० - २०.० | ४,१८० | २,८१९ | १,५३० | १,०२९ | ७७३ | ६२२ | ५९० |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | ९६१ | ३६३ | १७६ | १३२ | ९७ | ८१ | ८९ |
| | **एकूण** | **४९,५०६** | **६८,६२५** | **९४,६९७** | **१,०६,५२८** | **१,२१,३७६** | **१,३७,१५६** | **१,३६,९८९** |

| अ. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती एकूण क्षेत्र ('०० हेक्टर) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ |
| (१) | (२) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | १,६३४ | २,६३० | ४,११९ | ५,७४६ | ७,३२८ | ७,७४० | ९,१८० |
| २ | ०.५ - १.० | ४,१४२ | ७,१०३ | १२,०५७ | १५,१२० | १९,१५९ | २०,२७४ | २२,६८० |
| ३ | १.० - २.० | १२,८४२ | २३,३३७ | ३९,८३३ | ४६,०५९ | ५१,२७१ | ५२,४७६ | ५७,३९० |
| ४ | २.० - ३.० | १५,३८६ | २५,३६३ | ३३,६८९ | ३५,४२० | ३७,४१४ | ३७,५४२ | ३६,६८१ |
| ५ | ३.० - ४.० | १५,९२० | २२,८१५ | २५,१०८ | २३,३०३ | २३,६७६ | २३,७५६ | २०,९७४ |
| ६ | ४.० - ५.० | १५,९६१ | २०,५५६ | १९,८६४ | १७,२१० | १६,७१७ | १६,७१७ | १३,९०१ |
| ७ | ५.० - १०.० | ६१,२१३ | ६३,९३७ | ४८,७०० | ३७,१५० | ३२,०८४ | ३२,१३५ | २६,०२७ |
| ८ | १०.० - २०.० | ५६,३०२ | ३७,२१३ | १९,७४९ | १३,५१४ | ९,९६१ | ६,७७६ | ७,५२४ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | २८,३९४ | १०,६६२ | ६,१२९ | ५,२७४ | ३,४१८ | २,६३४ | ३,३१४ |
| | **एकूण** | **२,११,७९४** | **२,१३,६१६** | **२,०९,२४८** | **१,९८,७९६** | **२,०१,०२८** | **२,००,०५०** | **१,९७,६७१** |

| अ. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती सरासरी क्षेत्र (हेक्टर) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ |
| (१) | (२) | (१७) | (१८) | (१९) | (२०) | (२१) | (२२) | (२३) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | ०.२४ | ०.२७ | ०.२५ | ०.२६ | ०.२७ | ०.२४ | ०.२५ |
| २ | ०.५ - १.० | ०.७४ | ०.७६ | ०.७५ | ०.७५ | ०.७५ | ०.६९ | ०.७४ |
| ३ | १.० - २.० | १.४६ | १.५१ | १.४६ | १.४५ | १.४२ | १.२६ | १.४२ |
| ४ | २.० - ३.० | २.४६ | २.४७ | २.४१ | २.४० | २.३७ | २.२१ | २.३७ |
| ५ | ३.० - ४.० | ३.४६ | ३.४७ | ३.४४ | ३.४४ | ३.४१ | ३.१७ | ३.४२ |
| ६ | ४.० - ५.० | ४.४६ | ४.४७ | ४.४४ | ४.४४ | ४.४२ | ४.१४ | ४.४२ |
| ७ | ५.० - १०.० | ७.०२ | ६.८६ | ६.७३ | ६.६८ | ६.५८ | ६.१६ | ६.५७ |
| ८ | १०.० - २०.० | १३.४७ | १३.२० | १२.९१ | १३.१३ | १२.८९ | १०.८९ | १२.७५ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | २९.५५ | २९.३७ | ३४.८२ | ३९.९५ | ३५.२४ | ३२.५२ | ३७.२४ |
| | **एकूण** | **४.२८** | **३.११** | **२.२१** | **१.८७** | **१.६६** | **१.४६** | **१.४४** |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट ७.४

## राज्यातील जमिनीच्या वापराची आकडेवारी

(क्षेत्र '००० हेक्टर)

| वर्ष | भौगोलिक क्षेत्र | वनां-खालील क्षेत्र | मशागतीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | मशागत न केलेले इतर क्षेत्र | | | पडीत जमिनी | | पिकांखालील क्षेत्र | | पिकां-खालील स्थूल क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नापीक व मशागतीस अयोग्य जमीन | बिगर-शेती वापराखाली आणलेली जमीन | मशागती-योग्य पडीत जमीन | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | किरकोळ झाडे, झुडपे यांच्या समूहा खालील क्षेत्र | चालू पड | इतर पड | निव्वळ पेरणी क्षेत्र | दुसोटा / तिसोटा क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १९८६-८७ | ३०,७५८ | ५,३५० | १,६७९ | १,१५२ | १,०४४ | १,३६७ | १९६ | ९०९ | १,०५७ | १८,००४ | २,३२० | २०,३२४ |
| १९९०-९१ | ३०,७५८ | ५,१२८ | १,६२२ | १,०९१ | ९६६ | १,१२५ | ३०१ | ८९८ | १,०६३ | १८,५६५ | ३,२९५ | २१,८५९ |
| १९९५-९६ | ३०,७५८ | ५,१४८ | १,५४४ | १,३४९ | ९६० | १,१६६ | २९२ | १,०७२ | १,२४८ | १७,९८० | ३,५२४ | २१,५०४ |
| २०००-०१ | ३०,७५८ | ५,१५० | १,५४४ | १,३६४ | ९५९ | १,१६८ | ३२७ | १,१२६ | १,२७६ | १७,८४४ | ३,७७५ | २१,६१९ |
| २००५-०६ | ३०,७५८ | ५,२१२ | १,७२० | १,४०७ | ९१४ | १,२५२ | २४९ | १,३२७ | १,२०४ | १७,४७३ | ५,०८३ | २२,५५६ |
| २०१०-११ | ३०,७५८ | ५,२१६ | १,७३१ | १,४४९ | ९१९ | १,२४२ | २५० | १,३६६ | १,१७९ | १७,४०६ | ५,७६९ | २३,१७५ |
| २०११-१२ | ३०,७५८ | ५,२११ | १,७२८ | १,४५१ | ९१९ | १,२४४ | २५० | १,३७८ | १,१९२ | १७,३८६ | ५,७२० | २३,१०६ |
| २०१२-१३ | ३०,७५८ | ५,२०७ | १,७२२ | १,४५६ | ९१६ | १,२४५ | २५१ | १,४१८ | १,२०० | १७,३४४ | ५,७७२ | २३,११६ |
| २०१३-१४ | ३०,७५८ | ५,२०५ | १,७२३ | १,४६० | ९१५ | १,२४२ | २४९ | १,४०१ | १,१९२ | १७,३६८ | ६,०१२ | २३,३८० |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

टीप - २०१०-११ ते २०१३-१४ चे आकडे अस्थायी आहेत.

## परिशिष्ट ७.५

## राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र

('००० हेक्टर)

| अ. क्र. | वर्ष | सिंचित क्षेत्र | | | | ओलिताखालील पिकांची सघनता | सिंचन विहिरींची संख्या (हजारात) | दर विहिरीमागे सिंचित निव्वळ क्षेत्र (हेक्टरमध्ये) | पिकांखालील एकूण क्षेत्र | स्थूल सिंचित क्षेत्राची पिकांखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विहिरी | इतर साधने | निव्वळ क्षेत्र | एकूण क्षेत्र | | | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | १९६०-६१ | ५९५ | ४७७ | १,०७२ | १,२२० | ११४ | ५४२ | १.१० | १८,८२३ | ६.५ |
| २ | १९७०-७१ | ७६८ | ५७९ | १,३४७ | १,५७० | ११७ | ६९४ | १.११ | १८,७३७ | ८.४ |
| ३ | १९८०-८१ | १,०५५ | ७८० | १,८३५ | २,४१५ | १३२ | ८२६ | १.२८ | १९,६४२ | १२.३ |
| ४ | १९९०-९१ | १,६७२ | ९९९ | २,६७१ | ३,३१९ | १२४ | १,०१७ | १.६४ | २१,८५९ | १५.२ |
| ५ | २०००-०१ | २,२६२ | ९८७ | ३,२४९ | ३,८५२ | ११९ | १,३१८ | १.७२ | २१,६१९ | १७.८ |
| ६ | २००१-०२ | २,१४६ | ९९० | ३,१३६ | ३,७२७ | ११९ | १,३२२ | १.५२ | २०,९९१ | १७.८ |
| ७ | २००२-०३ | २,१४५ | १,०७१ | ३,२१६ | ३,८०६ | ११८ | १,३३१ | १.६१ | २०,९१५ | १८.२ |
| ८ | २००३-०४ | १,९१४ | १,०३० | २,९४४ | ३,६३६ | १२३ | उ.ना. | उ.ना. | २२,१९० | १६.४ |
| ९ | २००४-०५ | १,९४२ | १,००१ | २,९९३ | ३,६६५ | १२५ | उ.ना. | उ.ना. | २२,३७६ | १६.४ |
| १० | २००५-०६ | २,०७७ | १,०७० | ३,१४७ | ३,८१० | ११८ | उ.ना. | उ.ना. | २२,५५६ | १६.९ |
| ११ | २००६-०७ | २,१०९ | १,१३७ | ३,२४६ | ३,९५८ | १२२ | उ.ना. | उ.ना. | २२,५५७ | १७.६ |
| १२ | २००७-०८ | २,१५१ | १,१६० | ३,३११ | ४,०३७ | १२२ | उ.ना. | उ.ना. | २२,६५५ | १७.८ |
| १३ | २००८-०९ | २,११५ | १,१४० | ३,२५५ | ३,९७० | १२२ | उ.ना. | उ.ना. | २२,४५४ | १७.७ |
| १४ | २००९-१० | २,१५९ | १,१६२ | ३,३२१ | ४,०५० | १२२ | उ.ना. | उ.ना. | २२,६१२ | १७.९ |
| १५ | २०१०-११ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २३,१७५ | उ.ना. |
| १६ | २०११-१२ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २३,१०६ | उ.ना. |
| १७ | २०१२-१३ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २३,११५ | उ.ना. |
| १८ | २०१३-१४ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २३,३८० | उ.ना. |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

टीप - (१) आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

(२) स्तंभ क्र.७ मध्ये (स्तंभ क्र.६ ÷ स्तंभ क्र.५) x १०० हे सूत्र वापरून सघनता काढली आहे.

(३) २००३ -०४ ते २०१३-१४ चे आकडे अस्थायी आहेत.

(४) विशेष तपासणी पथकाच्या शिफारशींनुसार पुढील कार्यवाही ठरविण्यासाठी विविध समित्या / उपसमित्या गठित करण्यात आल्या आहेत.

उ.ना. उपलब्ध नाही.

## परिशिष्ट ७.६

## सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी आकारणी, वसुली व थकबाकी

(₹ कोटी)

| वर्ष | पाणीपट्टी आकारणी | | | वसुली | | | वर्ष अखेर शिल्लक थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सिंचन | बिगर सिंचन | एकूण | सिंचन | बिगर सिंचन | एकूण | सिंचन | बिगर सिंचन | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| २०००-०१ | ७४.४८ | ३६२.६० | ४३७.०८ | ४१.२३ | १५३.९९ | १९५.२२ | २२३.३९ | ५७१.३० | ७९४.६९ |
| २००१-०२ | ८४.७२ | ३६८.८३ | ४५३.५५ | ४३.५७ | २०८.१२ | २५१.६९ | २६४.५४ | ७३२.०१ | ९९६.५५ |
| २००२-०३ | ८३.१७ | ३६०.६८ | ४४३.८५ | ४२.०२ | ३३५.५० | ३७७.५२ | ३०३.७९ | ७५१.९९ | १,०५५.७८ |
| २००३-०४ | ९३.०३ | ३६०.२६ | ४५३.२९ | ४२.८९ | ३३५.२० | ३७८.०९ | ३७६.६३ | ३५३.०६ | ७२९.६९ |
| २००४-०५ | ७८.६९ | ४१८.४४ | ४९७.१३ | ४५.७८ | ४०२.५७ | ४४८.३५ | ४१५.५९ | ३७८.५९ | ७९४.१८ |
| २००५-०६ | ६८.२५ | ३५०.२८ | ४१८.५३ | ६४.०३ | ३४९.४५ | ४१३.४८ | ४१०.१८ | २८२.०९ | ६९२.२७ |
| २००६-०७ | ९०.७० | ४०८.७५ | ४९९.४५ | ७४.७२ | ४२०.२६ | ४९४.९८ | ४२७.०१ | २४५.८२ | ६७२.८२ |
| २००७-०८ | ११०.३५ | ५६३.८९ | ६७४.२४ | ७०.४७ | ५५६.५४ | ६२७.०१ | ४७३.७० | २७५.२० | ७४८.९० |
| २००८-०९ | ११२.९५ | ६९५.३७ | ८०८.३२ | ७१.०५ | ६०२.११ | ६७३.१६ | ५३१.१० | ४६६.३८ | १,००४.६१ |
| २००९-१० | ९५.०० | ७१५.११ | ८१०.११ | ६९.९४ | ७३२.६९ | ८०२.६३ | ५६१.७७ | ४६६.३८ | १,०२८.१५ |
| २०१०-११ | ९६.२४ | ६७०.४६ | ७६६.७० | ७९.०३ | ६६६.८७ | ७४५.९० | ७४५.९० | ४६८.६२ | १,०४७.९० |
| २०११-१२ | १०९.७३ | ५४१.०६ | ६५०.७९ | ७९.१३ | ५४१.१३ | ६२०.२६ | ६०८.८७ | ४६१.७४ | १,०७०.६१ |
| २०१२-१३ | ८२.९८ | ६७०.१२ | ७५३.१० | ६३.१० | ४४३.०५ | ५०६.१५ | ६१८.७८ | ६५६.५२ | १,२७५.३० |
| २०१३-१४ | ७०.३७ | ५३६.६७ | ६०७.०४ | ५७.५७ | ४५७.२० | ५१४.७७ | ६३१.४९ | ७२८.२४ | १,३५९.७३ |
| २०१४-१५ | ७८.१५ | ५९३.५९ | ६७१.७४ | ६१.९७ | ५७४.५३ | ६३६.५० | ६४८.२९ | ६९५.८० | १,३४४.०९ |

*आधार* - जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

# परिशिष्ट ७.७

## महाराष्ट्र राज्यातील पशुधन आणि कोंबड्या व बदके

('०००)

| अनु. क्रमांक | पशुधन गणना वर्ष | गाई-बैल | म्हशी - रेडे | मेंढ्या व शेळ्या | इतर पशुधन + | एकूण पशुधन | दर शंभर हेक्टर चराई व कुरण क्षेत्रामागे शेळ्या, मेंढ्या (संख्या) | पिकांखालील दर शंभर हेक्टर निव्वळ क्षेत्रामागे पशुधन (संख्या) | दर लाख लोकसंख्ये- मागे पशुधन | एकूण कोंबड्या व बदके $ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | १९६१ | १५,३२८ | ३,०८७ | ७,२७३ | ३६० | २६,०४८ | ५१२ | १४४ | ६६ | १०,५७८ |
| २ | १९६६ | १४,७२९ | ३,०४२ | ७,३२६ | ३५२ | २५,४४९ | ५२२ | १४० | ५७ | ९,९०२ |
| ३ | १९७२ | १४,७०५ | ३,३०१ | ८,०३८ | ३१७ | २६,३६१ | ४९१ | १६४ | ५२ | १२,२१७ |
| ४ | १९७८ | १५,२१८ | ३,८९९ | १०,१९९ | ३२६ | २९,६४२ | ६५० | १६२ | ५१ | १८,७५१ |
| ५ | १९८२ | १६,१६२ | ३,९७२ | १०,३७६ | ४०९ | ३०,९१९ | ६७३ | १७५ | ४८ | १९,८४५ |
| ६ | १९८७ | १६,९८३ | ४,७५५ | १२,०६८ | ४४९ | ३४,२५५ | ९५० | १८९ | ४८ | २४,८३० |
| ७ | १९९२ | १७,४४१ | ५,४४७ | १३,०१६ | ४८९ | ३६,३९३ | ९४० | २०२ | ४६ | ३२,१८७ |
| ८ | १९९७ | १८,०७१ | ६,०७३ | १४,८०२ | ६९२ | ३९,६३८ | १,१०४ | २२३ | ५० | ३५,३९२ |
| ९ | २००३ | १६,७३८ | ६,०८४ | १३,६२४ | ६१२ | ३७,०५८ | १,०१६ | २१३ | ३६ | ३४,५९६ |
| १० | २००७ | १६,१८४ | ६,०७३ | १३,३०१ | ३९७ | ३५,९५४ | १,०६४ | २०६ | ३७ | ६४,८००@ |
| ११ | २०१२ | १५,४८४ | ५,५९४ | ११,०१६ | ३९५ | ३२,४८९ | ८८५ | १८७ | २९ | ७७,७९५@ |

*आधार* - पशुधन गणना

टीप - आकडे सांक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही.

+ इतर पशुधन या बाबीमध्ये डुकरे, घोडे व शिंगरे, खेचरे, उंट, गाढवे यांचा समावेश करण्यात आला आहे.

$ एकूण कोंबड्या व बदके या बाबींमध्ये तुर्की ,क्वेल व इतर कुक्कुटपक्षी यांचाही समावेश करण्यात आला आहे.

@ एकूण कोंबड्या व बदके संख्येमध्ये पोल्ट्रीफार्म मधील पक्षी समाविष्ट आहे.

# ८

# उद्योग आणि सहकार

# ८. उद्योग आणि सहकार

## उद्योग

८.१ महाराष्ट्र हे देशामधील मोठ्या प्रमाणात औद्योगिकरण झालेल्या राज्यांपैकी एक आहे. राज्याने देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय कल आणि राज्यातील साधनसंपत्तीची क्षमता विचारात घेऊन वाहन, अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स, वस्त्र आणि संरक्षण या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले आहे. राज्याने नुकतेच किरकोळ व्यापार धोरण-२०१६, इलेक्ट्रॉनिक्स धोरण-२०१६, एक खिडकी धोरण-२०१६, अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीच्या उद्योजकांसाठी धोरण आणि माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा धोरण-२०१५ जाहीर केले आहे. मुंबई येथे औद्योगिक घटकांच्या मंजुरी प्रक्रियेचे सुलभीकरण व त्यांच्या स्थापनेस चालना देण्यासाठी मैत्री (महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सहाय्य) केंद्राची उभारणी केली आहे. तसेच प्रत्येक विभागीय मुख्यालयी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांना मदत करण्यासाठी असे केंद्र स्थापित करण्यात आले आहे.

८.१.१ उद्योग स्थापित व कार्यरत करणे याच्या मंजूरी प्रक्रियेस आणि सुधारणांना गती देण्यासाठी राज्याने पुढाकार घेतला आहे. भारतामधील वस्तुनिर्माण क्षेत्राच्या क्षमतांची आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख होण्यासाठी 'मेक इन इंडिया' कार्यक्रमाचे आयोजन मुंबई येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमामुळे राज्यामध्ये गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहन मिळून गुंतवणुकदारांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

### वार्षिक उद्योग पाहणी

८.२ वार्षिक उद्योग पाहणी (वाउपा) ही उद्योगांसंबधी माहितीचा प्रमुख स्त्रोत असून सदर पाहणीवरुन संघटित वस्तूनिर्माण क्षेत्रातील स्थिर व खेळते भांडवल, निविष्टी, उत्पादन, मूल्यवृद्धी, रोजगार इत्यादी बाबतचे अंदाज उपलब्ध होतात. वार्षिक उद्योग पाहणीत कारखाना अधिनियम, १९४८ च्या विभाग-२ एम् (एक) आणि २ एम् (दोन) खाली नोंद झालेल्या सर्व कारखान्यांचा आणि विडी व सिगारेट कामगार (रोजगाराच्या अटी) अधिनियम, १९६६ खाली नोंद झालेल्या विडी व सिगारेट आस्थापनांचा समावेश आहे.

८.२.१ वार्षिक उद्योग पाहणी २०१३-१४ च्या अस्थायी निष्कर्षावरुन निदर्शनास येते की देशाच्या स्थूल मूल्यवृद्धी व कामगार वेतन यामध्ये राज्याचा वाटा २१.२ टक्के व १६.१ टक्के असून राज्य अग्रस्थानी आहे. एकूण उद्योग, एकूण कामगार व स्थिर भांडवल या बाबतीत राज्य दुसऱ्या क्रमांकावर असून या बाबतीत राज्याचा वाटा अनुक्रमे १३ टक्के, १२.६ टक्के व १३.८ टक्के आहे.

८.२.२ देशातील एकूण उत्पादन मूल्य, खेळते भांडवल व निव्वळ मूल्यवृद्धी मध्ये राज्याचा वाटा अनुक्रमे १६.२ टक्के, १८.२ टक्के व २२ टक्के होता. उद्योगांचे निवडक निर्देशक तक्ता ८.१ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ८.१ उद्योगांचे निवडक निर्देशक**

(₹ कोटी)

| तपशील | २०१२-१३ | | | २०१३-१४* | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | भारताशी टक्केवारी | महाराष्ट्र | भारत | भारताशी टक्केवारी |
| उद्योग (संख्या) | २८,९४९ | २,२२,१२० | १३.० | २९,१२३ | २,२४,५७४ | १३.० |
| स्थिर भांडवल | ३,४४,९३० | २१,८०,२६० | १५.८ | ३,२६,३६२ | २३,७४,३८३ | १३.८ |
| खेळते भांडवल | १,०१,६९२ | ६,०३,४११ | १६.९ | १,२०,४१८ | ६,६२,९८० | १८.२ |
| एकूण उत्पादन | १०,२२,०३२ | ६०,२५,९४५ | १७.० | १०,६५,९२५ | ६५,७१,०५२ | १६.२ |
| एकूण निविष्टी | ८,१९,४५४ | ५०,१८,६६५ | १६.३ | ८,३७,४२७ | ५४,९१,०३१ | १५.३ |
| स्थूल मूल्यवृद्धी | २,०२,५७८ | १०,०७,२७९ | २०.१ | २,२८,४९८ | १०,८०,०२१ | २१.२ |
| निव्वळ मूल्यवृद्धी | १,७८,७२९ | ८,५१,९४९ | २१.० | २,००,४४० | ९,०९,६२९ | २२.० |
| रोजगार (लाखात) | १२.३३ | १००.५२ | १२.३ | १३.१२ | १०४.२८ | १२.६ |
| नफा | १,०१,६४० | ४,४४,२६२ | २२.९ | १,१९,५३७ | ४,५३,७८९ | २६.३ |

*आधार :* केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार * अस्थायी

८.२.३ एकूण उत्पादन मूल्याच्या बाबतीत २०१३-१४ मध्ये कोळसा, शुध्द पेट्रोलियम यांची उत्पादने (१५.२ टक्के), खाद्य उत्पादने (११.४ टक्के), मूलभूत धातू (१०.९ टक्के), रसायने आणि रासायनिक उत्पादने (९ टक्के) आणि मोटार वाहने, ट्रेलर्स (७.५ टक्के) हे प्रमुख उद्योग होते. या उद्योग गटांचे २०१३-१४ मध्ये एकूण उत्पादन मूल्यामधील प्रमाण ५४ टक्के होते, तर स्थिर भांडवलातील प्रमाण ४७.७ टक्के होते. वार्षिक उद्योग पाहणीनुसार राज्यातील उद्योगांबाबतची महत्वाची वैशिष्ट्ये परिशिष्ट ८.१ मध्ये दिली आहेत.

८.२.४ राज्यातील २०१३-१४ मधील प्रति कारखाना उत्पादित वस्तू व सेवा यांचे मूल्य आणि निव्वळ मूल्यवृद्धी यांचे मूल्य मागील वर्षाच्या तुलनेत अनुक्रमे ३.७ व ११.५ टक्क्यांनी जास्त आहे. महत्वाचे निर्देशक तक्ता ८.२ मध्ये दिले आहे.

**तक्ता ८.२ महत्त्वाचे निर्देशक**

(₹ लाख)

| निर्देशक | २०१२-१३ | | २०१३-१४* | |
|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| **अ) प्रति कारखाना** | | | | |
| स्थिर भांडवलातील गुंतवणूक | १,१९२ | ९८२ | १,१२१ | १,०५७ |
| उत्पादित वस्तू व सेवा यांचे मूल्य | ३,५३० | २,७१३ | ३,६६० | २,९२६ |
| निव्वळ मूल्यवृद्धी | ६१७ | ३८४ | ६८८ | ४०५ |
| रोजगार (संख्या) | ४३ | ४५ | ४५ | ४६ |
| **ब) प्रति कामगार** | | | | |
| निव्वळ मूल्यवृद्धी | १४.५ | ८.५ | १५.३ | ८.७ |
| वार्षिक मजुरी | १.४ | १.१ | १.६ | १.२ |

*आधार* : केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार * अस्थायी

**आलेख ८.१ : महाराष्ट्रामधील स्थिर व खेळते भांडवल, स्थूल मूल्यवृध्दी**




**आलेख ८.२ : महाराष्ट्र व भारतातील प्रति कारखाना निव्वळ मूल्य वृध्दीदर**




## औद्योगिक उत्पादन निर्देशांक

८.३ औद्योगिक क्षेत्राची वाढ औद्योगिक उत्पादन निर्देशांकाद्वारे मोजली जाते. सध्याच्या औद्योगिक उत्पादन निर्देशांकामध्ये खाणकाम, वस्तुनिर्माण व विद्युत या क्षेत्रांचा समावेश आहे. केंद्रीय सांख्यिकी कार्यालय अखिल भारतीय स्तरावर मासिक औद्योगिक उत्पादन निर्देशांक परिगणित करुन जाहीर करते. अखिल भारतीय स्तरावरील औद्योगिक उत्पादन निर्देशांक (पायाभूत वर्ष २००४-०५) एप्रिल-डिसेंबर, २०१४ मधील १७२.७ वरुन एप्रिल-डिसेंबर, २०१५ मध्ये १७८.१ पर्यंत वाढला. या निर्देशांकानुसार एप्रिल-डिसेंबर, २०१५ या कालावधीतील सरासरी वाढ ३.१ टक्के होती, जी गतवर्षीच्या तत्सम कालावधीत २.६ टक्के होती. अखिल भारतीय औद्योगिक निर्देशांकांचा तपशील परिशिष्ट ८.२ मध्ये दिला आहे. गटनिहाय अखिल भारतीय औद्योगिक उत्पादन निर्देशांकांचा तपशील तक्ता ८.३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.३ गटनिहाय अखिल भारतीय औद्योगिक उत्पादन निर्देशांक**

(पायाभूत वर्ष २००४-०५ = १००)

| बाब | भार | एप्रिल ते डिसेंबर | | शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | | २०१४-१५ | २०१५-१६@ | |
| सर्वसाधारण निर्देशांक | १००.०० | १७२.७ | १७८.१ | ३.१ |
| खाणकाम | १४.१६ | १२२.५ | १२५.३ | २.३ |
| वस्तुनिर्माण | ७५.५३ | १८१.० | १८६.६ | ३.१ |
| विद्युत | १०.३१ | १८०.४ | १८८.५ | ४.५ |

*आधार* : केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार @ शीघ्र अंदाज

# औद्योगिक गुंतवणूक

८.४ 'मेक इन इंडिया' कार्यक्रमा दरम्यान राज्याने ₹ ७,९४,०५७ कोटी प्रस्तावित गुंतवणुकीच्या, ३०.९ लाख अपेक्षित रोजगाराच्या २,५९४ प्रकल्पांच्या प्रस्तावांचे सामंजस्य करार केले. ऊर्जा क्षेत्रामध्ये सर्वात जास्त ₹ २,३०,६२७ कोटी (२९ टक्के), तर त्या पाठोपाठ वस्तूनिर्माण क्षेत्रामध्ये ₹ १,६५,९०९ कोटी (२०.९ टक्के) गुंतवणुकीचे प्रस्ताव प्राप्त झाले.

८.४.१ राज्याने रोजगार निर्मितीची सर्वाधिक क्षमता असलेले सर्वात जास्त औद्योगिक प्रस्ताव प्राप्त केले आहेत. ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत एकूण ₹ १०,९७,३३७ कोटी गुंतवणुकीच्या १९,०५३ औद्योगिक प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. यापैकी ₹ २,६२,६३१ कोटी गुंतवणुकीचे (२३.९ टक्के) व ११.२४ लाख प्रस्तावित रोजगार निर्मितीचे ८,४९७ प्रकल्प (४४.६ टक्के) कार्यान्वित झाले आहेत, तर ₹ ८७,७०१ कोटी गुंतवणुकीच्या २,१०८ प्रकल्पांचे काम सुरु असून त्यामधून ३.९८ लाख रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे. देशामध्ये प्राप्त झालेल्या एकूण औद्योगिक प्रस्ताव आणि गुंतवणुकीमध्ये राज्याचा अनुक्रमे १८ टक्के आणि १० टक्के वाटा आहे. सन २०१४-१५ मध्ये ₹ ४५,०१० कोटी गुंतवणुकीच्या व ०.७ लाख प्रस्तावित रोजगार निर्मितीच्या २७९ प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. सन २०१५-१६ मध्ये ऑक्टोबरपर्यंत ₹ १८,७५९ कोटी गुंतवणुकीच्या २१८ प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असून त्यापैकी ₹ १,०६९ कोटी गुंतवणुकीचे १६ प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत.

८.४.२ माहिती तंत्रज्ञान उद्योगाने ४५३ प्रस्ताव प्राप्त केले असून त्यामधील गुंतवणूक सर्वात जास्त ₹ ३,८६,७११ कोटी (३५.२ टक्के) आहे, तर त्या पाठोपाठ इंधन उद्योगामध्ये ₹ १,४२,८३९ कोटी (१३ टक्के) आहे. एकूण मंजूर गुंतवणुकीपैकी सुमारे ५० टक्के गुंतवणूक या दोन उद्योगांमध्ये आहे.

८.४.३ मंजूर केलेल्या एकूण प्रस्तावांमध्ये रसायने व खते (१४.९ टक्के), वस्त्रोद्योग (१०.५ टक्के), धातू (१० टक्के), साखर (८ टक्के), विद्युत व इलेक्ट्रॉनिक्स (६.२ टक्के), प्रक्रिया केलेले अन्न (५.५ टक्के) आणि फोटोग्राफीक फिल्म्स् व कागद (५.२ टक्के) हे प्रस्तावांच्या संख्येनुसार महत्त्वाचे उद्योग आहेत. एकूण मंजूर व कार्यान्वित प्रकल्पांमध्ये या सात उद्योगांचा एकत्रित वाटा जवळपास ६१ टक्के आहे. तथापि, त्यांच्या गुंतवणुकीचा मंजूर प्रस्तावांमध्ये २९.२ टक्के व कार्यान्वित प्रस्तावांमध्ये ४२.६ टक्के वाटा आहे.

८.४.४ कार्यान्वित झालेल्या प्रकल्पांमधील एकूण गुंतवणूक ₹ २,६२,६३१ कोटी असून त्यामध्ये माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योगांचा गुंतवणुकीमधील वाटा सर्वात जास्त (२०.७ टक्के), त्याखालोखाल धातू (१४ टक्के), इंधन (१०.७ टक्के), परिवहन (९.४ टक्के) आणि रसायने व रासायनिक खते (८.५ टक्के) होता. या पाच उद्योगांचा एकूण गुंतवणुकीमध्ये एकत्रित वाटा ६३.३ टक्के आहे. उद्योग गटनिहाय राज्यातील मंजूर व कार्यान्वित प्रकल्पांची माहिती तक्ता ८.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.४ उद्योग गटनिहाय मंजूर प्रस्ताव व कार्यान्वित प्रकल्प**

(ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर, २०१५)

| उद्योग गट | मंजूर प्रस्ताव | | कार्यान्वित प्रकल्प | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | गुंतवणूक (₹ कोटी) | संख्या | गुंतवणूक (₹ कोटी) |
| माहिती व तंत्रज्ञान | ४५३ | ३,८६,७११ | २४३ | ५४,२५१ |
| इंधन | ८१५ | १,४२,८३९ | १९५ | २८,०२५ |
| धातू | १,९०९ | १,००,९९७ | ९३५ | ३६,७०९ |
| रसायने व खते | २,८३९ | ५९,९०१ | १,३८६ | २२,२४८ |
| वस्त्रोद्योग | १,९९८ | ४९,९८१ | ९३३ | १६,९३९ |
| साखर | १,५३२ | ३८,४२४ | २३५ | ८,४०२ |
| परिवहन | ४२१ | ३२,१४९ | २८५ | २४,५५४ |
| फोटोग्राफीक फिल्म्स् व कागद | ९८१ | २८,४१९ | ५७० | १३,९८८ |
| सिमेंट जिप्सम | ३६८ | २४,५७८ | १४८ | ५,५९७ |
| औद्योगिक यंत्रसामग्री | ८५१ | २४,२०४ | ५०९ | ८,८०२ |
| विद्युत आणि इलेक्ट्रॉनिक्स | १,१७४ | २२,४२९ | ६८३ | ७,८१४ |
| प्रक्रिया केलेले अन्न | १,०४६ | २०,२५८ | ४४० | ५,७८२ |
| वनस्पती तेल आणि वनस्पती | ३७३ | १६,०९१ | २०३ | २,३३२ |
| औषधी | ८५४ | १६,०२८ | ४९६ | ४,३४१ |
| कागद व कागद उत्पादने | ५३८ | १५,८२६ | २७१ | ७,५८६ |
| अभियांत्रिकी | ३४४ | १२,३६७ | १९३ | ४,१४४ |
| यंत्रसामग्री/सिरॅमिक/संकीर्ण उद्योग | ४५७ | ७,९६१ | २८२ | ४,१६१ |
| **इतर** | २,१०० | ९८,१७४ | ४९० | ६,९५६ |
| **एकूण** | **१९,०५३** | **१०,९७,३३७** | **८,४९७** | **२,६२,६३१** |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## मोठ्या प्रकल्पांमधील गुंतवणूक

८.४.५ राज्यामध्ये २००५ ते ३१ ऑक्टोबर, २०१५ पर्यंत ₹ ३,५४,६८० कोटी गुंतवणुकीच्या ३.८८ लाख प्रस्तावित रोजगार निर्मितीच्या ४५४ प्रकल्पांना स्विकृती पत्राच्या माध्यमातून मान्यता देण्यात आली. यापैकी ₹ ५३,०१८ कोटी गुंतवणूक व ०.८४ लाख प्रस्तावित रोजगार निर्मितीच्या १३७ प्रकल्पांना पात्रता प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

## सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांमधील गुंतवणूक

८.४.६ वस्तुनिर्माण आणि सेवा पुरविणाऱ्या उपक्रमांपैकी वस्तुनिर्माण उपक्रमांचे त्यांच्या यंत्रसामग्रीतील गुंतवणुकीच्या आधारे व सेवा पुरविणाऱ्या उपक्रमांचे साधनसामग्रीच्या मूल्याच्या आधारे सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम असे वर्गीकरण करण्यात आले आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम चौथी गणना २००६-०७ अनुसार राज्यात ३१ मार्च, २००७ रोजी एकूण ८६,६३५ उद्योग कार्यरत होते, त्यामधील गुंतवणूक ₹ १४,८५९ कोटी होती व १०.९५ लाख रोजगार होता. सप्टेंबर, २०१५ पर्यंत एकूण ₹ ५६,५५२ कोटी गुंतवणुकीचे २,४३,७२१ सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम कार्यरत असून त्यामधून २९.१९ लाख रोजगार निर्माण झाला आहे. वर्षनिहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांमधील गुंतवणूक व रोजगार आणि विभागनिहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची माहिती तक्ता ८.५ व तक्ता ८.६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.५ वर्षनिहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांमधील गुंतवणूक व रोजगार**

| वर्ष | सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | गुंतवणूक (₹ कोटी) | रोजगार (लाख) |
|---|---|---|---|
| २००७-०८ | १०,२४४ | २,२८१ | १.३९ |
| २००८-०९ | ११,६८२ | ३,२९५ | १.७१ |
| २००९-१० | ११,८९६ | ३,०२८ | १.५० |
| २०१०-११ | १४,४९६ | ५,५६३ | १.८७ |
| २०११-१२ | १५,६०६ | ४,४४३ | २.०७ |
| २०१२-१३ | १६,१३६ | ५,४५५ | २.०६ |
| २०१३-१४ | १९,८१४ | ६,३५८ | २.४८ |
| २०१४-१५ | ३६,९९२ | ७,१८० | ३.५० |
| २०१५-१६+ | २०,२२० | ४,०९० | १.६६ |

*आधार*: उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन + सप्टेंबरपर्यंत

**तक्ता ८.६ विभागनिहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची माहिती**

(सप्टेंबर, २०१५ पर्यंत)

| विभाग | सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | टक्केवारी | रोजगार (लाख) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| मुंबई | २४,७८६ | १०.२ | ४.०५ | १३.९ |
| कोकण (मुंबई वगळून) | ३९,२६९ | १६.१ | ६.३२ | २१.७ |
| नाशिक | २७,४५८ | ११.३ | ३.१५ | १०.८ |
| पुणे | ९२,२३३ | ३७.८ | १०.०५ | ३४.४ |
| औरंगाबाद | १८,७५१ | ७.७ | १.९३ | ६.६ |
| अमरावती | १४,५१० | ५.९ | १.१४ | ३.९ |
| नागपूर | २६,७१४ | ११.० | २.५५ | ८.७ |
| **एकूण** | **२,४३,७२१** | **१००.०** | **२९.१९** | **१००.०** |

*आधार*: उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्रातून निर्यात

८.५ राज्यातून मुख्यत्वे रत्ने व आभूषणे, पेट्रोकेमिकल्स, तयार कपडे, सुती धागे, धातू व धातू उत्पादने, शेतमालावर आधारित उत्पादने, अभियांत्रिकी उपकरणे, औषधे व औषधी द्रव्ये आणि प्लास्टिक व प्लास्टिकच्या वस्तू यांची निर्यात होते. निर्यातदारांनी केलेल्या प्रयत्नांची दखल घेऊन राज्यातील निर्यात वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी निर्यातदारांना निर्यात कामगिरीवर आधारित पुरस्कार देणे, आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या लघु उद्योग घटकांना भुई भाडे अनुदान देणे याबाबत शासन पुढाकार घेत आहे. महाराष्ट्र आणि भारतातून झालेली निर्यात तक्ता ८.७ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता ८.७ महाराष्ट्र आणि भारतातून निर्यात**

(₹ कोटी)

| वर्ष | महाराष्ट्र | भारत |
|---|---|---|
| २०११-१२ | ३,९४,००५ | १४,५९,२८० |
| २०१२-१३ | ३,६१,४६० | १५,४६,७६६ |
| २०१३-१४ | ४,३४,५९१ | १८,३१,००९ |
| २०१४-१५ | ४,४५,३४९ | १८,६५,५८९ |
| २०१५-१६+ | २,८७,००७ | ११,१२,६१६ |

*आधार*: उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

## उद्योगांना वित्तीय सहाय्य

८.६ सिकॉम लि., महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यासारख्या राज्यस्तरीय वित्तीय संस्था आणि भारतीय आयुर्विमा महामंडळ, भारतीय साधारण विमा महामंडळ, आयएफसीआय लि., भारतीय लघु उद्योग विकास बँक यासारख्या केंद्रस्तरीय वित्तीय संस्थांद्वारे राज्यातील उद्योगांना वित्तीय सहाय्य पुरविले जाते. याबाबतची माहिती परिशिष्ट ८.३ मध्ये दिली आहे.

## विशेष आर्थिक क्षेत्रे

८.७ राज्याने फेब्रुवारी, २००६ पासून विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) धोरण स्विकारले असून ऑक्टोबर, २०१५ पर्यन्त राज्यात २४१ विशेष आर्थिक क्षेत्रांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. राज्यामध्ये ३१ ऑक्टोबर, २०१५ पर्यंत ७० विशेष आर्थिक क्षेत्रांची अधिसूचना रद्द झाली किंवा मागे घेण्यात आली आणि ३,०५९ हेक्टर क्षेत्रावर ₹ ३२,२५५ कोटी गुंतवणुकीच्या २५ विशेष आर्थिक क्षेत्रांची

अंमलबजावणी झाली व त्यामधून सुमारे ३.५९ लाख रोजगार निर्मिती झाली आहे. मंजूर व अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रे याबाबतची माहिती तक्ता ८.८ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ८.८ मंजूर व अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रे**

(ऑक्टोबर, २०१५ पर्यंत)

| विभाग | विशेष आर्थिक क्षेत्रांची संख्या | | | क्षेत्र (हेक्टर) | | | रोजगार (लाख) | | | गुंतवणूक (₹ कोटी) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित |
| कोकण | ३१ | २२ | ६ | ८,९७७ | २,५१७ | २६१ | १४.८५ | ८.२२ | १.६४ | ४९,५५७ | ३३,८६८ | ७,३६६ |
| पुणे | २२ | १९ | १४ | ७९७ | ७६७ | ७२४ | ७.६१ | ७.०८ | १.७८ | ३५,१३१ | ३४,४२६ | १२,७०२ |
| नाशिक | २ | १ | ० | १,१०७ | १,००७ | ० | १.७५ | १.२५ | ० | १,८४३ | १,३८० | ० |
| औरंगाबाद | ६ | ५ | २ | ५७६ | ४७४ | २२५ | ०.६३ | ०.२३ | ०.१६ | १,७७४ | १,२७५ | ४,२५२ |
| अमरावती | २ | १ | १ | २०० | १५० | १५० | ०.४५ | ०.०५ | ० | ८०० | ३०० | २३५ |
| नागपूर | ६ | ४ | २ | २,८५० | १,७४० | १,६९९ | ५.४१ | ३.८७ | ०.०१ | ८,५१९ | ३,८७१ | ७,७०० |
| **एकूण** | **६९** | **५२** | **२५** | **१४,५०७** | **६,६५५** | **३,०५९** | **३०.७०** | **२०.७०** | **३.५९** | **९७,६२४** | **७५,१२०** | **३२,२५५** |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## माहिती तंत्रज्ञान संकुले

८.८ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (मऔविम), सिडको व सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया यांनी ३७ सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान संकुले विकसित केली. त्यामध्ये ₹ १८,००० कोटींची गुंतवणूक असून २.६८ लाख रोजगाराची निर्मिती झाली आहे.

८.८.१ खाजगी क्षेत्राला सहभागी करुन माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता ४७२ खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुले मंजूर करण्यात आली. त्यापैकी १६० संकुले कार्यरत असून त्यामधील गुंतवणूक ₹ ३,६४२ कोटी असून त्यामधून ४.८६ लाख रोजगार निर्मिती झाली आहे. उर्वरित ३१२ माहिती तंत्रज्ञान संकुलामधून ₹ ८,९६२ कोटी गुंतवणूक प्रस्तावित असून ११.९५ लाख रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे. खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुले पुणे (१७२), बृहन्मुंबई (१५८), ठाणे (१२९), नागपूर (५), नाशिक (४), औरंगाबाद (३) आणि वर्धा (१) येथे आहेत.

## जैव-तंत्रज्ञान संकुले

८.९ राज्याने २००१ मध्ये जैव-तंत्रज्ञान धोरण जाहीर केले. राज्यात मऔविम परिसरात जालना आणि हिंजेवाडी (पुणे) येथे सार्वजनिक क्षेत्रातील दोन जैव-तंत्रज्ञान संकुले विकसित करण्यात आली आहेत. ऑक्टोबर, २०१५ अखेर राज्यात सहा जैव-तंत्रज्ञान विशेष आर्थिक क्षेत्रे अधिसूचित करण्यात आली आहेत आणि अनुक्रमे ₹ २६१ कोटी व ₹ १,१२० कोटी गुंतवणुकीच्या ५० सूक्ष्म, लघु व मध्यम आणि १६ मोठ्या घटकांची नोंदणी झालेली आहे.

## सहकारी औद्योगिक वसाहती

८.१० मऔविम क्षेत्राव्यतिरिक्त सहकारी तत्वावर औद्योगिक वसाहती विकसित करण्याचा कार्यक्रम राज्याने हाती घेतला आहे. उद्योग स्थापित करण्यासाठी भाग भांडवलातील हिस्सा व तांत्रिक सल्ला राज्य शासनाकडून देण्यात येतो. सहकारी औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी राज्य शासनाकडून एकूण प्रकल्प खर्चाच्या २० टक्के भांडवल, बँक/वित्तीय संस्थांकडून ६० टक्के कर्ज उभारणी आणि उर्वरित २० टक्के रक्कम उद्योग स्थापन करणाऱ्या सभासदांचे भाग भांडवल असे जमा केले जातात. नोव्हेंबर,२०१५ अखेर एकूण १४२ सहकारी औद्योगिक वसाहतींना मंजूरी दिली असून त्यापैकी १०२ वसाहती कार्यरत आहेत तर ३४ वसाहती अद्याप कार्यान्वित व्हावयाच्या आहेत आणि उर्वरीत सहा अवसायनात गेल्या आहेत. एकूण १०२ सहकारी औद्योगिक वसाहतींमध्ये ७,७४५ घटक कार्यरत असून त्यामधील रोजगार १.६४ लाख आहे. शासनाने ९३ सहकारी वसाहतींना अर्थसहाय्य पुरविले आहे. सहकारी औद्योगिक वसाहतींची स्थिती तक्ता ८.९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.९ सहकारी औद्योगिक वसाहतींची स्थिती**

( नोव्हेंबर, २०१५ पर्यंत)

| विभाग | मंजूर | कार्यरत | कार्यरत उद्योग घटक | भाग भांडवल (₹ कोटी) | रोजगार |
|---|---|---|---|---|---|
| बृहन्मुंबई | ४ | ३ | ४७९ | नगण्य | २४,४०० |
| कोकण (बृहन्मुंबई वगळून) | १४ | १२ | ६०२ | १.०१ | १२,८८८ |
| नाशिक | ३३ | २९ | २,१०९ | ४.९२ | ३८,५७३ |
| पुणे | ४५ | ३८ | ३,३२१ | ७.८७ | ७७,९७८ |
| औरंगाबाद | २६ | १३ | ६३१ | १.०३ | ५,९४६ |
| अमरावती | १० | ३ | १६१ | ०.०३ | ५९९ |
| नागपूर | १० | ४ | ४४२ | ०.९७ | ३,९४० |
| **महाराष्ट्र** | **१४२** | **१०२** | **७,७४५** | **१५.८३** | **१,६४,३२४** |

*आधार* :उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## सामुहिक प्रोत्साहन योजना

८.११ औद्योगिकदृष्ट्या कमी विकसित भागात उद्योगांच्या प्रसारास उत्तेजन देऊन या भागात नवीन / विस्तारीत उद्योग घटक स्थापन करण्यासाठी राज्य शासन सामुहिक प्रोत्साहन देत आहे. सदर योजनेमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आली असून राज्याने 'सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१३' जाहीर केली आहे व ती एप्रिल, २०१३ ते मार्च, २०१८ पर्यंत अंमलात राहील. राज्यातील पात्र असलेले खाजगी, सार्वजनिक / संयुक्त, सहकारी क्षेत्रातील आणि केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील फक्त विशाल उद्योग घटक 'सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१३' अंतर्गत विचारात घेतले जातात. या योजनेअंतर्गत २०१५-१६ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ २,३०५ कोटी इतकी प्रोत्साहन रक्कम पात्र असलेल्या सूक्ष्म, लघु व मध्यम, मोठे आणि विशाल उद्योगांना वितरीत करण्यात आली. सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत निधी वितरण अनुदान तक्ता ८.१० मध्ये दिले आहे.

**तक्ता ८.१० सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत निधी वितरण**

(₹ कोटी)

| वर्ष | वितरण |
|---|---|
| २०१०-११ | ७०० |
| २०११-१२ | २,३६६ |
| २०१२-१३ | २,४८० |
| २०१३-१४ | २,२५० |
| २०१४-१५ | २,५०० |
| २०१५-१६+ | २,३०५ |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

८.११.१ सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत विशाल, मोठ्या आणि सूक्ष्म, लघु व मध्यम प्रकल्पांना गेल्या तीन वर्षात वितरीत केलेले औद्योगिक प्रोत्साहन अनुदान व इतर प्रोत्साहने तक्ता ८.११ मध्ये दिले आहे.

**तक्ता ८.११ सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत औद्योगिक प्रोत्साहन अनुदान व इतर प्रोत्साहने**

(₹ कोटी)

| बाब | वितरण | | |
|---|---|---|---|
| | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६+ |
| **औद्योगिक प्रोत्साहन अनुदान** | | | |
| विशाल प्रकल्प | २,००७ | २,१५९ | १,९७२ |
| मोठे उद्योग | ५१ | ११३ | ८९ |
| सूक्ष्म, लघु व मध्यम | ८४ | १०० | १३४ |
| **इतर प्रोत्साहने** | | | |
| मोठे उद्योग | ४७ | ६३ | ५१ |
| सूक्ष्म, लघु व मध्यम | ६१ | ६५ | ५९ |
| **एकूण** | **२,२५०** | **२,५००** | **२,३०५** |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## औद्योगिक समूह विकास कार्यक्रम

८.१२ सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांची उत्पादकता व स्पर्धा क्षमता उंचावण्यासाठी सक्षम समूहांच्या विकासासाठी केंद्र शासनाने योजना जाहीर केली असून त्यामध्ये उपलब्ध साधनसंपत्तीचा वापर करुन मध्यम ते दीर्घ कालावधीत प्रभावी अंमलबजावणी व शाश्वत परिणाम साधण्यावर भर दिला आहे.

८.१२.१ **सूक्ष्म, लघु उपक्रम - औद्योगिक समूह विकास कार्यक्रम :** या कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने १६ समूह प्रकल्पांना मंजुरी दिली असून त्यापैकी दोन पूर्ण झाले आहेत. आतापर्यंत केंद्र शासनाने एकूण ₹ ७३.७३ कोटी निधी वितरीत केला आहे.

८.१२.२ **औद्योगिक पायाभूत सुविधा श्रेणीवाढ योजना :** दर्जेदार पायाभूत सुविधा सार्वजनिक खाजगी भागीदारीमधून पुरवून निवडलेल्या कार्यरत उद्योग समुहांची स्पर्धात्मक क्षमता वृद्धिंगत करण्याचे योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक मंजूर प्रकल्पासाठी प्रकल्प किंमतीच्या ७५ टक्के प्रमाणे जास्तीत जास्त ₹ ६० कोटी पर्यंत केंद्रीय सहाय्य देण्यात येते. केंद्र शासनाने पाच समूह प्रकल्प मंजूर केले असून त्यापैकी तीन प्रकल्प पूर्ण तर दोन अंमलबजावणीच्या विविध टप्प्यांवर आहेत. केंद्र शासनाने या योजनेखाली मार्च, २०१५ पर्यंत ₹ १८९.५५ कोटी निधी वितरीत केला आहे.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

८.१३ मार्च, २०१५ अखेर विकसित भूखंडाच्या ९० टक्के भूखंड उद्योजकांना वितरीत करण्यात आले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटकांची माहिती तक्ता ८.१२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१२ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटक**

(३१ मार्च, २०१५ रोजी)

| विभाग | घटक (संख्या) | गुंतवणूक (₹ कोटी) | रोजगार (लाख) | भूखंड (संख्या) | | वितरीत भूखंडांची विकसित भूखंडांशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | विकसित | वितरीत | |
| मुंबई | १०१२ | ८,३७८ | १.३२ | ३४२ | ३३९ | ९९.१ |
| कोकण (मुंबई वगळून) | १२,०७६ | ३४,८२९ | ३.५९ | १९,७१५ | १७,९८० | ९१.२ |
| नाशिक | ७,५९८ | ५,८४६ | ०.७३ | ११,२९६ | १०,४२६ | ९२.३ |
| पुणे | ११,०६७ | ५३,९४८ | ४.३८ | १९,१७६ | १७,२३१ | ८९.९ |
| औरंगाबाद | ६,४९५ | ७,४८४ | ०.६५ | ११,४४३ | १०,३०४ | ९०.० |
| अमरावती | १,९३७ | ६,२०८ | ०.२६ | ४,८२० | ३,६१० | ७४.९ |
| नागपूर | ३,४८६ | १४,७५५ | ०.७९ | ७,१६८ | ६,३८६ | ८९.१ |
| **एकूण** | **४३,६७१** | **१,३१,४४८** | **११.७२** | **७३,९६०** | **६६,२७६** | **८९.६** |

आधार : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ

८.१४ महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ लघु उद्योगांचा विकास करण्यासाठी उद्योजकांना मदत करते. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची उलाढाल तक्ता ८.१३ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ८.१३ महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची उलाढाल**

(₹ कोटी)

| बाब | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६+ |
|---|---|---|---|
| पणन सहाय्य | १५५.२४ | ८०.२४ | ४९.६२ |
| इतर | ३.७८ | २.९३ | १.९८ |
| **एकूण** | **१५९.०२** | **८३.१७** | **५१.६०** |

*आधार*: महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ + नोव्हेंबरपर्यंत

## महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ

८.१५ राज्यातील खादी आणि ग्रामोद्योग उपक्रमांचे संघटन, विकास व विस्तार करणे हे महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे प्रमुख कार्य आहे. राज्यातील खादी व ग्रामोद्योग घटकांना २०१४-१५ मध्ये ₹ २८.४३ कोटी वित्तीय सहाय्य अनुदानाच्या स्वरुपात देण्यात आले आणि २०१५-१६ मध्ये ₹ २९.०२ कोटी वाटप करणे प्रस्तावित आहे. खादी व ग्रामोद्योग घटकांची प्रगती तक्ता ८.१४ मध्ये दिली आहे.

८.१५.१ कारागीर रोजगार हमी योजनेअंतर्गत २०१४-१५ मध्ये २.३२ लाख कारागीरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. सन २०१५-१६ मध्ये २.४५ लाख कारागीरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

**तक्ता ८.१४ खादी व ग्रामोद्योग घटकांची प्रगती**

| वर्ष | सहाय्यित घटक (लाख) | उत्पादन मूल्य (₹ कोटी) | रोजगार (लाख) |
|---|---|---|---|
| २०१०-११ | २.१८ | १,४७० | ४.३ |
| २०११-१२ | २.१५ | १,५०६ | ४.३ |
| २०१२-१३ | १.९१ | १,३७६ | ३.७ |
| २०१३-१४ | १.९३ | १,४९५ | ३.४ |
| २०१४-१५ | १.६० | ३,१६१ | १.३ |

*आधार*: महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ

## खनिजे

८.१६ राज्यातील खनिज साठा क्षेत्र विदर्भातील अमरावती, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर व यवतमाळ, पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा तसेच कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व ठाणे या जिल्ह्यांमध्ये विखुरलेले असून तेथे कोळसा, चुनखडी, कच्चे मँगनिज, बॉक्साईट, कच्चे लोखंड, डोलोमाईट, लॅटराईट, कायनाईट, फ्लोराईट (ग्रेडेड), क्रोमाईट, सिलीका वाळू, क्वार्टझ्, इत्यादी खनिजांचे साठे आढळून येतात. राज्यात उत्पादनक्षम खनिज साठा असणारे सुमारे ५८ हजार चौ किमी इतके क्षेत्र असून ते राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या १९ टक्के आहे. मार्च, २०१५ अखेर राज्यात ०.६ लाख रोजगार असलेल्या प्रमुख खनिजांच्या २९० खाणी कार्यरत आहेत. राज्यातील २०१४-१५ मध्ये उत्खनन केलेल्या खनिजांचे एकूण मूल्य ₹ ७,३८१ कोटी होते, यापैकी उत्खनन केलेल्या कोळशाचे मूल्य ₹ ६,०८३ कोटी (८२.४ टक्के) होते. राज्यातील महत्वाच्या खनिजांचे उत्पादन व मूल्य परिशिष्ट ८.४ मध्ये दिले आहे.

## महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ

८.१७ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ पर्यटन धोरण राबविणारी राज्यातील प्रमुख संस्था आहे. सन २०१३-१४ मध्ये केंद्र पुरस्कृत (१०० टक्के) पाच प्रकल्पांकरिता ₹ ६७.७० कोटी मंजूर केले असून तेंव्हापासून ₹ ४.५७ कोटी इतका खर्च झाला आहे. सन २०१३-१४ मध्ये राज्य शासनाने सहा प्रकल्पांसाठी ₹ २८२.४५ कोटी मंजूर केले असून तेंव्हापासून ₹ ४०.९३ कोटी इतका खर्च झाला आहे. सन २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाने एकही प्रकल्प मंजूर केला नाही.

# सहकार

८.१८ राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासात, विशेषत: रोजगार निर्मिती आणि सामाजिक ऐक्य साधण्यात, सहकार चळवळ विशेष व महत्वाची भूमिका बजावते. ही चळवळ सुरवातीला कृषि पतपुरवठा क्षेत्रापुरती मर्यादित होती परंतु कालांतराने ती अकृषि पतपुरवठा, कृषि प्रक्रिया व पणन, उद्योग, कामगार, वाहतुक, इ. क्षेत्रांमध्ये जलदगतीने पसरली. तथापि, जागतिकीकरणानंतर या क्षेत्रास बहुराष्ट्रीय कंपन्यांशी करावी लागणारी स्पर्धा, व्यावसायिक कौशल्यांचा अभाव, साधनसंपत्तीची मर्यादा, इ. सारख्या गंभीर आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. याकरीता राज्य शासनाने सहकारी संस्थांवर संबंधित क्षेत्रातील तज्ञ व्यक्ति संचालक नेमणे, भ्रष्टाचाराचे आरोप होऊन सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त झाले असल्यास त्यांना पुढील दोन कालावधींसाठी निवडणूक लढविण्यास बंदी, कामगिरीवर आधारित पुरस्कार, इ. निर्णय घेतले आहेत.

**आलेख ८.३ : सहकारी संस्थांतील खेळते भांडवल व येणे कर्ज**




८.१९ राज्यात ३१ मार्च, २०१५ रोजी सुमारे २.२६ लाख सहकारी संस्था कार्यरत होत्या व त्यामध्ये सुमारे ५३९.३० लाख सभासद होते. दृष्टीक्षेपात सहकारी संस्था तक्ता ८.१५ मध्ये दिल्या आहेत व दशवार्षिक मालिका परिशिष्ट ८.५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१५ दृष्टीक्षेपात सहकारी संस्था**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | शेकडा बदल २०१४ च्या तुलनेत |
|---|---|---|---|---|
| | २०१३ | २०१४ | २०१५* | |
| संस्था (संख्या) | २,३०,६७३ | २,३०,२९५ | २,२५,७२१ | (-)२.० |
| सभासद (लाख) | ५२३ | ५२३.९९ | ५३९.३० | २.९ |
| भरणा भाग भांडवल | १७,४१९ | १८,८९२ | २२,११९ | १७.१ |
| *यापैकी,* राज्य शासनाचे | ३,१७७ | ५,८०८ | ४,२१४ | (-)२७.४ |
| खेळते भांडवल | २,६८,७१३ | ३,१४,९२२ | ३,३८,०७४ | ७.४ |
| ठेवी | १,५०,३४४ | १,५९,३२२ | १,७०,७३९ | ७.२ |
| स्थूल कर्ज | १,२२,८१३ | १,३१,२४२ | १,३५,०७८ | २.९ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ५९,८०१ | ५९,३५५ | ५३,२४२ | (-)१०.३ |
| तोट्याची रक्कम | ५,०८७ | ५,६७७ | ६,२०८ | ९.४ |
| येणे कर्जे | १,२९,९४१ | १,३३,०६४ | १,४८,४८९ | ११.६ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन     * अस्थायी

**आलेख ८.४ : गटनिहाय सहकारी संस्थांचे वर्गीकरण व त्यांचे खेळते भांडवल**



## कृषि पतपुरवठा

८.२० राज्यातील कृषि पतपुरवठा सहकारी बँकांची संरचना त्रिस्तरीय असून, कृषि व संलग्न कार्यांना चालना देण्यात त्या प्रमुख भूमिका बजावतात. कृषि सहकारी बँकांची कामगिरी तक्ता ८.१६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१६ कृषि सहकारी बँकांची कामगिरी**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | शेकडा बदल २०१४ च्या तुलनेत |
|---|---|---|---|---|
| | २०१३ | २०१४ | २०१५* | |
| **महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या.** | | | | |
| सभासद ( संख्या) | २,००० | २,१२२ | २,११५ | (-)०.३ |
| खेळते भांडवल | २३,९२३ | २३,६५७ | २०,९४७ | (-) ११.५ |
| ठेवी | १५,४२६ | १३,४७५ | ९,९९३ | (-)२५.८ |
| स्थूल कर्ज | १३,७३३ | १६,०६० | ११,७४३ | (-)२६.९ |
| येणे कर्ज | ११,६०५ | १०,७३१ | १२,००७ | ११.९ |
| थकीत कर्ज | १,८२५ | १,४३६ | १,२५९ | (-)१२.३ |
| **जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (३१)** | | | | |
| सभासद (लाखात) | १.६३ | १.७३ | १.८२ | ५.२ |
| खेळते भांडवल | ७२,६१० | ७७,७८२ | ८४,५२८ | ८.७ |
| ठेवी | ५३,३८२ | ५७,३७८ | ६१,५२९ | ७.२ |
| स्थूल कर्ज | ४०,८७२ | ४०,४६३ | ४४,२३१ | ९.३ |
| येणे कर्ज | ४०,१९५ | ४०,३५७ | ४८,१४७ | १९.३ |
| थकीत कर्ज | ७,१६६ | ९,९०७ | १०,६७४ | ७.७ |
| **महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्या.@** | | | | |
| सभासद (संख्या) | ८२७ | ८२७ | ८२७ | ०.० |
| खेळते भांडवल | २,२०८ | २,०९९ | २,११० | ०.५ |
| ठेवी | ०.०१ | ०.०० | ०.०० | ०.० |
| स्थूल कर्ज | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.० |
| येणे कर्ज | १,१५५ | १,०४३ | १,०६५ | २.१ |
| थकीत कर्ज | १,१३९ | १,०४२ | १,०६५ | २.२ |
| **जिल्हास्तरीय सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका (२९)@** | | | | |
| सभासद (लाखात) | ११.४३ | ११.२३ | ६.८१ | (-)३९.४ |
| खेळते भांडवल | १,३१५ | १,०२३ | १,५१२ | ४७.८ |
| ठेवी | ०.३९ | ०.३ | ०.३ | ०.० |
| स्थूल कर्ज | - | - | - | - |
| येणे कर्ज | ३०४ | २९० | २८६ | (-)१.४ |
| थकीत कर्ज | २७८ | २८५ | २८४ | (-)०.४ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी @ अवसायनात गेल्याने कर्ज देणे बंद केले आहे

८.२१ प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्था (प्राकृपसं) मुख्यत: शेतीच्या हंगामी कामांकरिता अल्प मुदतीसाठी कृषि पतपुरवठा करतात. यांमध्ये कृषि सेवा संस्था व आदिवासी सहकारी संस्थांचाही समावेश आहे. मार्च, २०१५ अखेर सुमारे ५५.२ टक्के प्राकृपसं तोट्यात होत्या. तोट्यातील प्राकृपसंच्या संख्येत गतवर्षीच्या तुलनेत ३.४ टक्क्यांनी घट झाली असून कर्ज घेणाऱ्यांच्या संख्येतही २.७ टक्क्यांनी घट झाली आहे. प्राकृपसंची कामगिरी तक्ता ८.१७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१७ प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थांची कामगिरी**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | शेकडा बदल २०१४ च्या तुलनेत |
|---|---|---|---|---|
| | २०१३ | २०१४ | २०१५* | |
| संस्था (संख्या) | २१,२३८ | २१,१८५ | २१,०६४ | (-)०.६ |
| सभासद (लाख) | १६१ | १५१ | १४४ | (-)४.६ |
| खेळते भांडवल | १६,६१७ | २०,३०९ | २२,६०३ | ११.३ |
| स्वनिधी | २,९०१ | ३,४८८ | ४,६९६ | ३४.६ |
| भाग भांडवल | १,९७३ | २,४०७ | २,६३६ | ९.५ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | ६ | ७ | ६ | (-)१४.३ |
| कर्जदार सभासद (लाख) | ३६.४१ | ३७.९५ | ३६.९१ | (-)२.७ |
| *त्यापैकी,* १) अत्यल्प भूधारक (१ हेक्टर पर्यंत) @ | २८.३ | २८.८ | ३१.५ | लागू नाही |
| २) अल्पभूधारक (१ ते २ हेक्टर पर्यंत) @ | २४.३ | २३.९ | २५.१ | लागू नाही |
| स्थूल कर्ज | ८,५४७ | १२,८२६ | १४,०३० | ९.४ |
| *त्यापैकी,* लहान व सीमांतिक शेतकऱ्यांना दिलेले | ४,२२१ | ४,८२९ | ६,३८८ | ३२.३ |
| येणे कर्ज | १०,७१० | १३,६०४ | १४,५८४ | ७.२ |
| कर्ज वसुली | ७,७३० | ९,९३१ | १०,७६९ | ८.४ |
| थकीत कर्ज | ४,०९४ | ४,८९३ | ५,४१४ | १०.७ |
| तोट्यातील संस्था | ११,४३५ | १२,०३७ | ११,६२९ | (-)३.४ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन @ एकूण कर्जदार सभासदांशी टक्केवारी * अस्थायी

## डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना

८.२२ अल्प मुदतीच्या पीक कर्जाचा परतावा वेळेवर करण्यासाठी व्याज सवलत देवून शेतक-यांना प्रेरित केले जाते. या योजनेअंतर्गत ₹ एक लाखापर्यंतच्या कर्जावर तीन टक्के व ₹ एक लाखापेक्षा अधिक व ₹ तीन लाखांपर्यंतच्या कर्जावर एक टक्का व्याज सवलत दिली जाते. शेतकऱ्यांनी दरवर्षी ३० जून पर्यंत कर्जाची परतफेड करणे आवश्यक आहे. या योजनेंवर २०१४-१५ मध्ये एकूण ₹ १२७.९९ कोटी खर्च झाला आणि ११.८४ लाख शेतकऱ्यांना लाभ झाला, तर २०१५-१६ मध्ये (जानेवारीपर्यंत) ₹ ६७.२९ कोटी खर्च झाला आणि १.०८ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळाला.

## कृषि प्रक्रिया सहकारी संस्था

८.२३ कृषि प्रक्रिया सहकारी संस्था शेतकऱ्यांना उत्पादनाचा वाजवी मोबदला व ग्रामीण उद्योगांच्या वाढीला चालना देऊन त्याद्वारे रोजगार निर्मिती करून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात महत्वाची भूमिका पार पाडतात. राज्य शासन सहकारी संस्थांना कृषि प्रक्रिया केंद्र स्थापन करण्यासाठी अर्थ सहाय्य पुरविते. कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांचे सहकारी साखर कारखाने, कापूस पिंजणी व गासड्या बांधणी, सूत गिरण्या, हातमाग व यंत्रमाग संस्था, दुग्ध संस्था व दुग्ध संघ आणि मत्स्य संस्था यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

**आलेख ८.५ : कृषि प्रक्रिया सहकारी संस्थेतील सभासद**




**२०१४-१५**

८.२४ राज्यात ३१ मार्च, २०१५ रोजी ११९ कापूस पिंजणी व गासड्या बांधणा-या सहकारी संस्था होत्या. या संस्थांच्या भाग भांडवलामध्ये राज्य शासनाचा १६.७ टक्के हिस्सा होता. सुमारे ६३ टक्के संस्था तोट्यात होत्या. कापूस पिंजणी व गासड्या बांधणाऱ्या सहकारी संस्थांची कामगिरी तक्ता ८.१८ मध्ये दिली आहे.

८.२५ राज्यात ३१ मार्च, २०१५ रोजी १३१ सहकारी सूत गिरण्या होत्या. या सूत गिरण्यांच्या भाग भांडवलामध्ये राज्य शासनाचा ८४.९ टक्के हिस्सा होता. उत्पादन चालू असलेल्या सूत गिरण्यांपैकी सुमारे ८१.८ टक्के तोट्यात होत्या. सहकारी सूत गिरण्यांची कामगिरी तक्ता ८.१९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१८ कापूस पिंजणी व गासड्या बांधणाऱ्या सहकारी संस्थांची कामगिरी**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१४ | २०१५* | |
| संस्था (संख्या) | १४२ | ११९ | (-)१६.२ |
| *त्यापैकी,* उत्पादन चालू असलेल्या | १०५ | १०५ | ०.० |
| सभासद ('००) | १,७६५ | १,५८६ | (-)१०.१ |
| भाग भांडवल | ७ | ६ | (-)१४.३ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | १ | १ | ०.० |
| खेळते भांडवल | ९१ | ६१ | (-)३३.० |
| पिंजणी केलेला कापूस (मे. टन) | १३९ | १११ | (-)२०.१ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ९५ | ७५ | (-)२१.१ |
| तोटा | २ | १ | (-)५०.० |

* अस्थायी

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता ८.१९ सहकारी सूत गिरण्यांची कामगिरी**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१४ | २०१५* | |
| गिरण्यांची संख्या | १४९ | १३१ | (-)१२.१ |
| *त्यापैकी,* उत्पादन चालू असलेल्या | ६५ | ६६ | १.५ |
| सभासद ('००) | ५,३९८ | ५,३७५ | (-)०.४ |
| भाग भांडवल | १,९४० | १,९८३ | २.२ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | १,६१६ | १,६८३ | ४.१ |
| चात्यांची संख्या (लाख) | १४.६३ | १४.७२ | ०.६ |
| उत्पादित सूताचे मूल्य | २,६६५ | ३,१५४ | १८.३ |
| तोट्यातील गिरण्या (संख्या) | ५६ | ५४ | (-)३.६ |
| तोटा | ७७३ | ३२३ | (-)५८.२ |

* अस्थायी

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

८.२६ राज्यात ३१ मार्च, २०१५ रोजी ६४६ सहकारी हातमाग व २,०९१ यंत्रमाग संस्था होत्या. सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्थांमधील भाग भांडवलात राज्य शासनाचा हिस्सा अनुक्रमे ६.५ व ७७.७ टक्के होता. सुमारे ४६.६ टक्के सहकारी हातमाग व ५५.९ टक्के यंत्रमाग संस्था तोट्यात होत्या. सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्थांची कामगिरी तक्ता ८.२० मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२० सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्थांची कामगिरी**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हातमाग | | शेकडा बदल | यंत्रमाग | | शेकडा बदल |
| | २०१४ | २०१५* | | २०१४ | २०१५* | |
| संस्था (संख्या) | ६७२ | ६४६ | (-)३.९ | २,१३६ | २,०९१ | (-)२.१ |
| सभासद ('००) | ३५७ | ३३९ | (-)५.० | ६१९ | ६२५ | १.० |
| भाग भांडवल | ८४.४ | ८०.१ | (-)५.१ | १२४.६ | १२३.१ | (-)१.२ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | ५.०० | ५.१७ | ३.४ | ९५.७ | ९५.७ | ० |
| मागांची संख्या ('०००) | २५७ | २४२ | (-)५.८ | १८२ | १८२ | ० |
| उत्पादनाचे मूल्य | ७५ | ७२ | (-)४.० | ७०.५ | ६८.० | (-)३.५ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ३१७ | ३०१ | (-)५.० | ११७५ | ११७० | (-)०.४ |
| तोटा | १२.०९ | ११.४८ | (-)५.० | ४१.२५ | ४२.३ | २.५ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## साखर कारखाने

८.२७ देशातील एकूण साखर कारखान्यांपैकी ३३ टक्के कारखाने राज्यात असून त्या खालोखाल २२ टक्के कारखाने उत्तर प्रदेशात आहेत. मार्च, २०१५ अखेर देशातील एकूण साखरेच्या उत्पादनात राज्याचा हिस्सा ३७ टक्के होता, त्या खालोखाल उत्तर प्रदेशाचा हिस्सा २५ टक्के होता. सहकारी साखर कारखान्यांची कामगिरी तक्ता ८.२१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२१ सहकारी साखर कारखान्यांची कामगिरी**

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | शेकडा बदल २०१४ च्या तुलनेत |
|---|---|---|---|---|
| | २०१३ | २०१४ | २०१५* | |
| नोंदणीकृत सहकारी कारखाने (संख्या) | २०२ | २०२ | २०२ | ० |
| उत्पादन चालू असलेले कारखाने (संख्या) | १०८ | ९६ | ९९ | ३.१ |
| सभासद ('००) | २४,५०० | २६,३४० | २६,१२० | (-)०.८ |
| राज्य शासनाचे भाग भांडवल (₹ कोटी) | १,२११.६९ | १,२४४.३० | १,२५३.८३ | ०.८ |
| प्रतिदिन सरासरी गाळप क्षमता (लाख मे. टन) | ३.३४ | ३.२२ | ३.४० | ५.६ |
| गाळप झालेला ऊस (लाख मे. टन) @ | ५०४.६३ | ४८६.७२ | ५८९.४७ | २१.१ |
| ऊसाची सरासरी किंमत (₹ प्रति मे. टन ) | | | | |
| अ) खरेदी (रास्त दराने मोबदला) | १,७०० | २,१०० | २,२०० | ४.८ |
| ब) कारखान्यांनी प्रत्यक्षात अदा केलेली | २,४५० | २,४६७ | २,३१५ | (-)६.२ |
| साखर उत्पादन (लाख मे. टन) @ | ५८.४० | ५६.५२ | ६७.७९ | १९.९ |
| सरासरी उतारा (टक्के) | ११.५७ | ११.६१ | ११.५० | (-)०.९ |
| मळी (लाख मे. टन) | ३६.४० | २७.०४ | ३७.२० | ३७.६ |
| कारखान्यांची संख्या | | | | |
| अ) आसवनी प्रकल्प असलेल्या | ६८ | ६९ | ६९ | ० |
| ब) सह-वीज निर्मिती प्रकल्प असलेल्या | ३९ | ४६ | ४७ | २.२ |
| सह वीज निर्मिती क्षमता (मेगावॅट) | ६२८ | ८२७ | ८४३ | १.९ |
| तोट्यातील कारखाने (संख्या) | ३८ | २९ | उना | -- |

* अस्थायी @ ऑक्टोबर ते सप्टेंबरकरिता उना - उपलब्ध नाही

*आधार* : साखर आयुक्त, निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## दुग्ध व्यवसाय

८.२८ राज्यात मार्च, २०१५ अखेर २४,७६२ सहकारी दुग्ध संस्था व ८८ सहकारी दुग्ध संघ होते. सुमारे ४३ टक्के सहकारी दुग्ध संस्था व ५१ टक्के दुग्ध संघ तोट्यात होते. सहकारी दुग्ध संस्था व दुग्ध संघ यांची कामगिरी तक्ता ८.२२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२२ सहकारी दुग्ध संस्था व दुग्ध संघ यांची कामगिरी**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सहकारी दुग्ध संस्था | | | सहकारी दुग्ध संघ | | |
| | २०१४ | २०१५* | शेकडा बदल | २०१४ | २०१५* | शेकडा बदल |
| संस्था (संख्या) | २६,५७७ | २४,७६२ | (-)६.८ | ७८ | ८८ | १२.८ |
| सभासद (लाख) | ११.१८ | १०.६० | (-)५.२ | ०.८२ | १.१० | ३४.१ |
| भाग भांडवल | १०.३५ | १०.१० | (-)२.४ | ८९.६० | ९४.१० | ५.० |
| खेळते भांडवल | २७.७१ | २६.६७ | (-)३.८ | ८६.०८ | ९७.१० | १२.८ |
| दूध खरेदी (किंमत) | ३०६.९६ | ३०१.९१ | (-)१.६ | ७१२.०२ | ७६५.३० | ७.५ |
| दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री (किंमत) | ४०५.२३ | ३९९.१० | (-)१.५ | ९३०.७० | १,०१०.२० | ८.५ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | १२,३१० | १०,६५३ | (-)१३.५ | ३४ | ४५ | ३२.४ |
| तोटा | २२.०३ | २०.१० | (-)८.८ | ८६.३० | ११६.२२ | ३४.७ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## मत्स्यव्यवसाय

८.२९ राज्यात मार्च, २०१५ अखेर ३,४८४ प्राथमिक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था, ३७ मत्स्यव्यवसाय सहकारी संघ आणि दोन महासंघ कार्यरत होते. या संस्थांतील सभासदांची संख्या ३.४५ लाख असून त्यांचेकडील खेळते भांडवल ₹ २६८.१५ कोटी आहे. या संस्थांनी २०१४-१५ मध्ये ₹ ५५९.२५ कोटी तर सन २०१३-१४ मध्ये ₹ ४५३.५६ कोटी किंमतीचे मासे व मत्स्योत्पादनाची विक्री केली.

## सहकारी पणन संस्था

८.३० सहकारी पणन संस्थांची संरचना त्रिस्तरीय आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. ही शिखर संस्था असून जिल्हास्तरावर जिल्हा सहकारी पणन संस्था तर ग्रामस्तरावर प्राथमिक सहकारी पणन संस्था कार्यरत आहेत. मार्च, २०१५ अखेर सुमारे ३६ टक्के सहकारी पणन संस्था तोट्यात होत्या तर मार्च, २०१४ अखेर सुमारे ३९ टक्के संस्था तोट्यात होत्या. सहकारी पणन संस्थांची कामगिरी तक्ता ८.२३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२३ सहकारी पणन संस्थांची कामगिरी**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | |
|---|---|---|---|
| | २०१४ | २०१५* | शेकडा बदल |
| संस्था (संख्या) | १,६०२ | १,५१८ | (-)५.२ |
| सभासद (लाखात) | १४.६९ | १४.६१ | (-)०.५ |
| भाग भांडवल | ८९ | ८६ | (-)३.४ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | २५ | २५ | ०.० |
| खेळते भांडवल | १,३४३ | १.३७२ | २.२ |
| विक्री | | | |
| (अ) शेतमाल | ७१६ | ६४४ | (-)१०.१ |
| (ब) खते | ६५२ | ७२१ | १०.६ |
| (क) बियाणे | ५० | ४५ | (-)१०.० |
| (ड) ग्राहकोपयोगी वस्तू | ३२० | ३३६ | ५ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ६७९ | ५९९ | (-)११.८ |
| तोटा | २२ | २० | (-)९.१ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## बिगर कृषि पतसंस्था

८.३१ राज्यात मार्च, २०१५ अखेर ५१७ नागरी सहकारी बँका, १४,५७७ नागरी सहकारी पतपुरवठा संस्था व ७,२३२ पगारदार नोकरांच्या सहकारी संस्था होत्या. एकूण बिगर कृषि पतपुरवठा संस्थांपैकी सूमारे २२ टक्के संस्था तोट्यात होत्या. बिगर कृषि पतपुरवठा संस्थांची कामगिरी तक्ता ८.२४ मध्ये दिली आहे.

८.३१.१ देशातील एकूण १,५८३ नागरी सहकारी बँकांपैकी ३२ टक्के बँका राज्यात स्थित आहेत. दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी एकूण १०९ बँका अवसायनात आहेत. विमा उतरविलेल्या १०२ बँकांतील ₹ एक लाखा पेक्षा कमी रकमेच्या ठेवींना परतावा देण्यासाठी 'ठेवी विमा पत हमी महामंडळ' यांनी मान्यता दिली असून ठेवीच्या वितरणाची प्रक्रिया सुरू आहे. एका बँकेने केंद्र सरकारकडे अपिल केले आहे तर उर्वरित बँकांचे दावे सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

## इतर सहकारी संस्था

८.३२ राज्यात ३१ मार्च, २०१५ रोजी १,०२,२६५ सहकारी गृहनिर्माण संस्था होत्या, त्यातील सभासद संख्या २५.२९ लाख होती. तसेच ११,३६५ कंत्राटी मजूर संस्था होत्या त्यातील सभासद संख्या ८.१४ लाख होती. एकूण ७३,१३८ सदस्य संख्या असलेल्या ३०७ श्रमिक वन संस्था होत्या, त्यापैकी १७६ संस्था (५७.३ टक्के) नफ्यात होत्या.

**तक्ता ८.२४ बिगर कृषि पतपुरवठा संस्थांची कामगिरी**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | |
|---|---|---|---|
| | २०१४ | २०१५* | शेकडा बदल |
| संस्था (संख्या) | २२,७३७ | २२,३२६ | (-)१.८ |
| सभासद (लाख) | २३१.१२ | २४०.६४ | ४.१ |
| ठेवी | ८५,९७० | ९५,२६४ | १०.८ |
| स्वनिधी | २३,५२८ | २६,०५७ | १०.७ |
| भाग भांडवल | ७,८७६ | ८,४२३ | ६.९ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | ०.७ | ०.७ | ०.० |
| खेळते भांडवल | १,४२,८४३ | १,५९,९३५ | १२.० |
| कर्ज वाटप | ६०,२३२ | ६२,९२६ | ४.५ |
| येणे कर्ज | ६०,९९३ | ६४,७९२ | ६.२ |
| थकित कर्ज | ९,१८९ | १०,०९१ | ९.८ |
| कर्ज वसुली | ६२,९४९ | ६९,३५९ | १०.२ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ४,९५८ | ४,९६३ | ०.१ |
| तोटा | १,३४० | १,३९३ | ४.० |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ

८.३३ महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्या. ही राज्यातील गृहनिर्माण पतपुरवठा करणारी मध्यवर्ती संस्था आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्या. संस्थेची कामगिरी तक्ता ८.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२५ महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्या. संस्थेची कामगिरी**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा |
|---|---|---|---|
| | २०१४ | २०१५* | बदल |
| सभासद (संख्या) | १०,५७८ | ६,५१८ | (-)३८.४ |
| ठेवी | ०.०२ | ०.०० | (-)१०० |
| खेळते भांडवल | ९५.१९ | ९२.७३ | (-)२.६ |
| स्थूल कर्ज | ६४४ | ६४४ | ०.० |
| येणे कर्ज | ६५.०६ | ५९.४९ | (-)८.६ |
| थकीत कर्ज | २२.७८ | २१.९० | (-)३.९ |
| कर्ज वसुली | ६.६५ | ५.५७ | (-)१६.२ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण महामंडळ मर्यादित * अस्थायी

## सहकारी ग्राहक महासंघ

८.३४ महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ ही शिखर संस्था असून ती जिल्हास्तरावर कार्यरत असलेल्या घाऊक ग्राहक भांडारांच्या कार्यावर नियंत्रण ठेवते. ही घाऊक ग्राहक भांडारे गाव पातळीवर कार्यरत असणाऱ्या प्राथमिक ग्राहक भांडारांना माल वितरीत करतात. राज्यात ३१ मार्च, २०१५ रोजी शिखर ग्राहक महासंघाव्यतिरिक्त १५३ घाऊक ग्राहक भांडारे व २,३८६ प्राथमिक ग्राहक भांडारे कार्यरत होती. ग्राहक महासंघ, घाऊक व प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारांची कामगिरी तक्ता ८.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२६ ग्राहक महासंघ, घाऊक व प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारांची कामगिरी**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्राहक महासंघ | | घाऊक ग्राहक भांडार | | प्राथमिक ग्राहक भांडार | |
| | २०१४ | २०१५* | २०१४ | २०१५* | २०१४ | २०१५* |
| संख्या | १ | १ | १६० | १५३ | २,६०१ | २,३८६ |
| सभासद ('००) | ६ | ६ | ३,४८० | ३,२२७ | १७,१६१ | १५,४०१ |
| भाग भांडवल | १.६५ | १.६५ | १९.४४ | १७.१५ | ३१.७६ | २८.९७ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | १.१४ | १.१४ | ३.८८ | ३.४१ | १.५६ | १.१६ |
| तोटा | १.१७ | ०.०९ | ३.९१ | ४.२० | ६.५३ | ५.६० |
| तोट्यातील ग्राहक भांडारे (संख्या) | ३# | ३# | ६० | ७५ | १,१८५ | ९४२ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी # शाखा १९ पैकी

## खाजगी सावकार

८.३५ कृषि व बिगर कृषि पतपुरवठा संस्थांव्यतिरिक्त खाजगी सावकारांना, वैयक्तिक कर्जाचे वाटप करण्यास राज्य शासनाने अनुमती दिली आहे. यासाठी सहकार आयुक्तालयामार्फत परवाने दिले जातात. खाजगी सावकारांची माहिती तक्ता ८.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२७ खाजगी सावकारांची माहिती**

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा |
|---|---|---|---|
| | २०१४ | २०१५* | बदल |
| परवाना धारक (संख्या) | १०,७६१ | १२,०२२ | ११.७ |
| नवीन परवाने (संख्या) | १,८०४ | १,६२८ | (-)९.८ |
| नुतनीकरण केलेले परवाने (संख्या) | ८,९२५ | ७,९५२ | (-)१०.९ |
| रद्द केलेले परवाने (संख्या) | ४५० | ६८६ | ५२.४ |
| कर्जदार सभासद (व्यापारी / बिगर व्यापारी / शेतकरी ) | ८,५१,५६४ | ५,४७,२०४ | (-)३५.७ |
| वाटप केलेले कर्ज (₹ कोटी) | ७१९.८१ | ६९१.८५ | (-)३.९ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

* * * * *

## परिशिष्ट ८.१

## महाराष्ट्रातील उद्योगांच्या महत्त्वाच्या बाबी

(₹ कोटी)

| कार्य (दोन अंकी) एनआयसी २००८ | वर्ष | उद्योगांची संख्या | स्थिर भांडवल | खेळते भांडवल | कामगारांचे वेतन | एकूण उत्पादन | वापरलेला माल | एकूण निविष्टी | निव्वळ मूल्यवृद्धी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| (१) सरकी काढणे, वटणी, सफाई | २०१२-१३ | ९४४ | १,०२० | ९४९ | ६२ | १३,७२१ | १०,६२७ | ११,८९२ | १,७२१ |
| इत्यादी (०१) | २०१३-१४* | ५९४ | ८८२ | १,८०५ | ७५ | १५,०७९ | ११,६७६ | १३,९२३ | १,०५९ |
| (२) मिठाचे उत्पादन (०८) | २०१२-१३ | ५० | ७ | ७ | १ | २८ | ४ | २५ | २ |
| | २०१३-१४* | ४३ | २ | ७ | ६ | १४ | २ | ५ | ९ |
| (३) खाद्य उत्पादने व पेये (१०, ११) | २०१२-१३ | ३,०७७ | २७,५७७ | ९,३०१ | १,७८३ | १,२०,४०७ | ८६,३०३ | १,०९,७१० | ८,७०२ |
| | २०१३-१४* | ३,०३८ | ३२,४४५ | ११,२३५ | २,०४६ | १,३०,५५६ | ८२,१९७ | १,१६,२३७ | ११,९४१ |
| (४) तंबाखू उत्पादने (१२) | २०१२-१३ | १२४ | १,४१० | ९८२ | १५३ | ४,५३९ | १,४३९ | १,८३९ | २,५७५ |
| | २०१३-१४* | ११० | १,३०१ | १,८४२ | १५६ | ५,०३२ | १,४०८ | २,३४४ | २,५४५ |
| (५) वस्त्रोद्योग (१३) | २०१२-१३ | २,००० | १५,२२४ | ३,७३८ | १,१७९ | ३९,०७० | १७,७४० | २७,०७० | १०,४६८ |
| | २०१३-१४* | २,०६८ | १२,२१३ | ४,०१७ | १,३३४ | ३७,५०३ | २१,४९५ | ३१,७०७ | ४,५१२ |
| (६) परिधान करण्याची वस्त्रे (१४) | २०१२-१३ | १,०९३ | ६,६३१ | १,०५४ | ३५० | ६,१०६ | २,६०४ | ४,५८७ | १,३५९ |
| | २०१३-१४* | १,०४५ | १,७०५ | १,९९६ | ४८० | ११,१७६ | ६,१६६ | ८,८९० | २,१३३ |
| (७) कातडी कमावणे व चामड्याची | २०१२-१३ | १२६ | ११५ | १०७ | ३३ | ६५२ | ३३३ | ४९७ | १४२ |
| उत्पादने (१५) | २०१३-१४* | ११६ | १८२ | ४९० | ३६ | १,७४७ | ७२१ | १,१३८ | ५८५ |
| (८) लाकूड व लाकडाची उत्पादने (१६) | २०१२-१३ | २९० | २६२ | (-) १०८ | २९ | ८३१ | ३७६ | ६४० | १६९ |
| | २०१३-१४* | २५९ | २५३ | २१८ | २९ | ९२७ | ४४५ | ६५८ | २४५ |
| (९) कागद व कागदाची उत्पादने (१७) | २०१२-१३ | ९४१ | ७,६९४ | १,४८९ | २५९ | १०,४६५ | ६,६११ | ८,५९५ | १,४४६ |
| | २०१३-१४* | १,००० | ८,५२८ | ६९३ | ३३१ | १४,०८१ | ८,५४३ | ११,४६५ | २,१०४ |
| (१०) मुद्रण आणि रेकॉर्डेड मिडियाचे | २०१२-१३ | ९९५ | ३,७१३ | ४८० | ३०७ | ७,७४२ | ३,६२९ | ५,८७५ | १,४८२ |
| पुनरुत्पादन (१८) | २०१३-१४* | ९८८ | ३,४६५ | (-) ११,७७८ | ३६६ | ६,४६७ | ३,६९७ | ५,४९० | ६२४ |
| (११) कोळसा, शुद्ध पेट्रोलियमची | २०१२-१३ | २०४ | १२,३७९ | ४,१३५ | ४५६ | १,५०,४१४ | १,०१,२०८ | १,०५,२७५ | ४४,३८८ |
| उत्पादने इत्यादि (१९) | २०१३-१४* | १९७ | २१,३७५ | ४,५४९ | ४५७ | १,६२,३१६ | १,०२,४५६ | १,०७,५५५ | ५३,८४२ |
| (१२) रसायने व रासायनिक उत्पादने | २०१२-१३ | २,७८९ | ३७,१०९ | २०,३३४ | १,९६५ | १,२०,९८१ | ६६,८६५ | ८९,३५७ | २८,४७० |
| (२०,२१) | २०१३-१४* | २,७५२ | ४५,६८२ | ४३,६१९ | २,४५६ | १,४६,०३७ | ७३,८७० | १,०४,७४० | ३६,५६० |
| (१३) रबर आणि प्लॅस्टिक उत्पादने (२२) | २०१२-१३ | १,७३१ | १३,७५२ | ११,७०४ | ८६४ | ३७,३६५ | २३,६०६ | ३१,८१४ | ४,५८० |
| | २०१३-१४* | १,९१२ | २१,९२४ | ९,४८८ | १,०६४ | ४८,०९७ | २९,५१७ | ३६,२०० | १०,४९२ |
| (१४) इतर अधातू खनिज उत्पादने (२३) | २०१२-१३ | १,०७३ | ७,७५२ | २,७१४ | ३६२ | १७,१२४ | ९,२०१ | १३,०५० | ३,३६० |
| | २०१३-१४* | ९९२ | ७,८९६ | १,९८७ | ३६६ | १२,८०१ | ६,०४० | ९,६९३ | २,४६४ |
| (१५) मूलभूत धातू (२४) | २०१२-१३ | १,५१४ | ७३,२८६ | १०,१८३ | १,४१६ | १,२५,२६० | ९३,३५९ | १,१८,४५२ | ३,७८९ |
| | २०१३-१४* | १,५१७ | ५०,२७० | १३,५३२ | १,४७२ | १,१६,३४८ | ७८,०८१ | १,००,९४८ | १२,२३५ |
| (१६) धातूच्या तयार वस्तू (२५) | २०१२-१३ | ३,५७१ | १२,२६९ | ७,९६५ | १,४२३ | ४०,१५३ | २३,०८३ | ३१,६०७ | ७,४५९ |
| | २०१३-१४* | ३,५८० | ११,४८६ | (-) १,०४१ | १,३९४ | ३८,९६२ | २२,१८८ | २९,४२१ | ८,४१२ |

(पुढे चालू)

# परिशिष्ट ८.१ (समाप्त)

| | कार्य (दोन अंकी) (एनआयसी २००८ ) | वर्ष | उद्योगांची संख्या | स्थिर भांडवल | खेळते भांडवल | कामगारांचे वेतन | एकूण उत्पादन | वापरलेला माल | एकूण निविष्टी | निव्वळ मूल्यवृद्धी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| (१७) | कार्यालयीन लेखांकन व संगणना यंत्रसामग्री , रेडिओ, दूरदर्शन, दळणवळण सामग्री व उपकरणे, वैद्यकीय, अचूक मोजमापनाची व ऑप्टीकल साधने (२६) | २०१२-१३ | ४८९ | ४,५५५ | ८,८०५ | ३४४ | १८,७४४ | ११,१२७ | १४,३७५ | ३,८२१ |
| | | २०१३-१४* | ५७० | ५,३११ | १०,२८२ | ५२६ | २०,७९६ | ११,००४ | १६,७०७ | ३,७३३ |
| (१८) | विद्युत यंत्रसामग्री व उपकरणे (२७) | २०१२-१३ | १,३३५ | ८,०८० | ६,०२३ | ८४४ | ४२,८३२ | २५,५८५ | ३३,८१५ | ८,०६३ |
| | | २०१३-१४* | १,३३४ | ८,९९८ | ६,०३१ | ९४५ | ४१,७८१ | २६,३११ | ३२,७०९ | ८,०१८ |
| (१९) | यंत्रे व यंत्रसामग्री दुरुस्ती व उभारणी (२८,३३) | २०१२-१३ | २,४१९ | १८,७७७ | ११,५१० | १,७४३ | ७२,४७७ | ३५,६०९ | ४८,७११ | २१,९६१ |
| | | २०१३-१४* | २,३६० | १९,१५४ | ७,०९४ | २,०२० | ५९,८१५ | ३२,१२० | ४४,९४७ | १३,०२३ |
| (२०) | मोटार वाहने, ट्रेलर्स (२९) | २०१२-१३ | १,३३१ | २९,६३७ | ६९७ | २,५९५ | ८६,४२२ | ६१,९४० | ७४,१५७ | ८,९५३ |
| | | २०१३-१४* | १,४१४ | ३०,१३१ | (-) ९,००२ | २,५०३ | ८०,१२८ | ४८,४०६ | ६४,९१० | ९,८९४ |
| (२१) | इतर परिवहन सामग्री (३०) | २०१२-१३ | ३३२ | ५,१२५ | २९८ | ४५० | २९,०८० | २०,६६७ | २३,०३१ | ५,५९९ |
| | | २०१३-१४* | ३६९ | ७,३४८ | ८०९ | ५३१ | २८,४९७ | १९,६११ | २२,१३३ | ५,८९७ |
| (२२) | फर्निचर (इतरत्र वर्गीकरण न केलेले) (३१,३२) | २०१२-१३ | १,३४४ | ४,६१० | ७,९०२ | ६६७ | ३६,४९३ | २३,७४९ | ३१,६५४ | ४,५२५ |
| | | २०१३-१४* | १,३२३ | ४,६०८ | २०,०४९ | ८११ | ५०,२४५ | ३८,४७४ | ४५,००६ | ४,८४७ |
| (२३) | इतर | २०१२-१३ | १,१७७ | ५३,९४६ | (-) ८,५७६ | ५१६ | ४१,१२५ | १२,०९९ | ३३,४२५ | ५,६९७ |
| | | २०१३-१४* | १,५४२ | ३१,२०३ | २,४९३ | ८९१ | ३७,५२२ | ६,०९२ | ३०,६०२ | ५,२६७ |
| | **एकूण** | **२०१२-१३** | **२८,९४९** | **३,४४,९३०** | **१,०१,६९२** | **१७,८०३** | **१०,२२,०३२** | **६,३७,७६४** | **८,१९,४५४** | **१,७८,७२९** |
| | | **२०१३-१४*** | **२९,१२३** | **३,२६,३६२** | **१,२०,४१८** | **२०,२९७** | **१०,६५,९२५** | **६,३०,५२१** | **८,३७,४२७** | **२,००,४४०** |

*आधार* - वार्षिक उद्योग पाहणी, केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार   * अस्थायी

# परिशिष्ट ८.२

## भारतातील औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष २००४-०५ = १००)

| अ.क्र. | बाब | भार | २००५-०६ | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६++* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| **I** | **सर्वसाधारण निर्देशांक** | **१००.००** | **१०८.६** | **१६५.५** | **१७०.३** | **१७२.२** | **१७२.०** | **१७६.९** | **१७८.१** |
| **II** | **खाणकाम व दगड खाणकाम** | **१४.१६** | **१०२.३** | **१३१.०** | **१२८.५** | **१२५.५** | **१२४.७** | **१२६.५** | **१२५.३** |
| **III** | **वस्तुनिर्माण** | **७५.५३** | **११०.३** | **१७५.७** | **१८१.०** | **१८३.३** | **१८१.९** | **१८६.१** | **१८६.६** |
| | **उद्योग गट** | | | | | | | | |
| १ | खाद्य उत्पादने व पेय | ७.२८ | ११३.२ | १४२.९ | १६४.८ | १६९.५ | १६७.७ | १७५.७ | १४९.१ |
| २ | तंबाखू उत्पादने | १.५७ | १०१.० | १०४.१ | १०९.७ | १०९.२ | ११०.२ | १११.२ | १०४.८ |
| ३ | कापड उत्पादने | ६.१६ | १०८.३ | १३५.९ | १३४.० | १४२.० | १४८.३ | १५२.४ | १५४.७ |
| ४ | परिधान करावयाची वस्त्रे व रंगाई करणे | २.७८ | ११४.१ | १४२.२ | १३०.१ | १४३.६ | १७१.६ | १८०.४ | १८५.३ |
| ५ | प्रवास सामान, पिशव्या, पादत्राणे, चामडे कमावणे, साफ करणे आणि चामडयाचे उत्पादन | ०.५८ | ९०.९ | ११४.३ | ११८.५ | १२७.१ | १३३.७ | १४७.५ | १४६.८ |
| ६ | लाकुड व लाकडाची उत्पादने (लाकडी बूच सोडून) | १.०५ | १०६.८ | १५६.५ | १५९.२ | १४७.९ | १४४.६ | १५०.९ | १५४.२ |
| ७ | कागद आणि कागदाची उत्पादने | १.०० | १०६.३ | १३१.४ | १३८.० | १३८.७ | १३८.६ | १४३.१ | १४६.५ |
| ८ | प्रकाशने, छपाई आणि प्रसार माध्यमे यांची प्रतिलिपी नोंद ठेवणे | १.०८ | ११३.७ | १४८.८ | १९२.८ | १८३.० | १८३.४ | १७५.९ | १६१.२ |
| ९ | कोक, रिफाईन्ड पेट्रोलियम उत्पादने आणि न्युक्लीक इंधन | ६.७२ | १००.६ | १२१.५ | १२५.८ | १३६.४ | १४३.५ | १४४.७ | १४९.७ |
| १० | रसायने व रासायनिक उत्पादने | १०.०६ | १०१.० | १२३.१ | १२२.७ | १२७.३ | १३८.६ | १३८.२ | १४३.७ |
| ११ | रबर आणि प्लॅस्टिक उत्पादने | २.०३ | ११२.३ | १८५.२ | १८४.६ | १८५.० | १८१.१ | १८९.३ | १८७.९ |
| १२ | अधातू खनिज उत्पादने | ४.३१ | १०७.८ | १५१.४ | १५८.६ | १६१.६ | १६३.३ | १६७.४ | १६५.३ |
| १३ | मूलभूत धातू | ११.३४ | ११५.५ | १७६.७ | १९२.१ | १९५.८ | १९६.४ | २२१.४ | २२३.० |
| १४ | फेब्रीकेटेड धातू उत्पादने (यंत्र व सामग्री सोडून) | ३.०९ | १११.१ | १८२.८ | २०३.३ | १९३.८ | १८०.२ | १७९.१ | १७६.८ |
| १५ | यंत्रे व यंत्रसामग्री | ३.७६ | १२६.१ | २५६.३ | २४१.३ | २३०.० | २१९.२ | २२७.९ | २१६.० |
| १६ | कार्यालयीन लेखा आणि संगणक सामुग्री | ०.३१ | १४५.३ | १४६.३ | १४८.७ | १२८.१ | १०८.० | ६७.० | ६६.४ |
| १७ | विद्युत सामुग्री आणि उपकरणे | १.९८ | ११६.८ | ४७२.१ | ३६७.१ | ३६९.२ | ४२२.६ | ५११.६ | ५०१.३ |
| १८ | रेडीओ, टि.व्ही. आणि दळण-वळणाची साधने आणि उपकरणे | ०.९९ | १२२.७ | ९११.५ | ९५०.५ | १,००३.७ | ७३०.१ | ३३२.७ | ३४९.५ |
| १९ | औषधे, चष्म्याची उपकरणे, भितींवरील घडयाळे व मनगटी घडयाळे | ०.५७ | ९५.४ | १०७.८ | ११९.५ | ११७.१ | १११.१ | १०८.६ | ९८.४ |
| २० | मोटार वाहने, ट्रेलर्स, सेमी ट्रेलर्स | ४.०६ | ११०.१ | २३३.३ | २५८.६ | २४४.८ | २२१.३ | २२६.८ | २३६.२ |
| २१ | इतर परिवहन सामग्री | १.८३ | ११५.३ | २१०.७ | २३५.८ | २३५.७ | २४९.५ | २६५.५ | २६५.४ |
| २२ | फर्निचर, वस्तूनिर्माण व्यतिरिक्त | ३.०० | ११६.२ | १४१.२ | १३८.६ | १३१.५ | ११३.३ | १२१.७ | १७३.५ |
| **IV** | **विद्युत** | **१०.३१** | **१०५.२** | **१३८.०** | **१४९.३** | **१५५.२** | **१६४.७** | **१७८.६** | **१८८.५** |

*आधार* - केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार  * अस्थायी

++ एप्रिल, २०१५ ते डिसेंबर, २०१५

# परिशिष्ट ८.३

## महाराष्ट्रातील उद्योगांना वित्तीय संस्थांनी मंजूर केलेले व वितरित केलेले अर्थसहाय्य

(₹ कोटी)

| अ. क्र. | वित्तीय संस्था | १९९०-९१ | | २०००-०१ | | २०१०-११ | | २०१४-१५* | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | वाटप | मंजूर | वाटप | मंजूर | वाटप | मंजूर | वाटप |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | भारतीय औद्योगिक वित्त महामंडळ मर्यादित | ४०७.७७ | २५१.९३ | २७५.६० | २८८.४९ | ३,६१०.०० | २,९३७.०१ | ३,८७६.०० | ३,१०७.०० |
| २ | भारतीय लघु उद्योग विकास बँक | ३०६.७३ | २२७.२४ | २,०८१.८७ | १,३२०.७९ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| ३ | भारतीय उद्योग गुंतवणूक बँक मर्या. | ३३.५४ | २५.५४ | ५७६.५९ | ५६०.२७ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| ४ | भारतीय आयात - निर्यात बँक | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | ८,३६२.०० | ७,२३५.०० | ३,२५२.४२ | ३,६३४.४० |
| ५ | भारतीय आयुर्विमा महामंडळ | २५४.५५ | ११०.५८ | ५,१५०.६५ | ३,९१९.१२ | २०,७४६.९४ | १९,३४५.२७ | २२,६२८.२२ | २१,०६१.२२ |
| ६ | भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळ $ | १०८.३४ | ५२.२५ | ६१.४१ | ८८.६० | ६२७.४० | ६२७.४० | उ.ना. | १,०५९.८३ |
| ७ | महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ | १५७.९७ | ९४.६१ | ६८.६३ | ४७.१२ | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ८ | सिकॉम मर्यादित | ८५.४० | ६८.८७ | ५९३.०० | ४६३.०० | ४,९४७.०० | ५,३४०.०० | ४,४५७.०० | २,६७०.०० |
| ९ | इतर # | ३,३९१.३८ | १,९६१.०३ | ६१,२२०.०९ | ३५,८८६.७५ | -- | -- | -- | -- |

*आधार* - ह्या तक्त्यात उल्लेखिलेल्या वित्तीय संस्था

टीप - (१) # आयसीआयसीआय, भारतीय औद्योगिक विकास बँक व युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया या वित्तीय संस्थांनी केलेल्या अर्थसहाय्याचा यात समावेश आहे. या संस्थांनी उद्योगांना अर्थसहाय्य देणे बंद केले आहे.

(२) $ यामध्ये वित्तीय संस्थांची रोखे हमी व शासकीय रोखे हमीचा अंतर्भाव आहे.

* अस्थायी उ.ना. उपलब्ध नाही.

# परिशिष्ट ८.४

## महाराष्ट्रातील खनिजांचे उत्पादन

(उत्पादन : '००० टनात)
(मूल्य : ₹ लाख)

| अ. क्र. | खनिज पदार्थ | उत्पादन/ मूल्य | १९६१$ | १९७१$ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१४-१५ * |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | मीठ | उत्पादन | ३८४ | ४७२ | ५४० | २२९ | १४८ | १८० | १६० |
| २ | कोळसा | उत्पादन | ८५६ | २,०८५ | ५,७७० | १६,८४८ | २८,७५४ | ३६,९३२ | ३५,२८५ |
| | | मूल्य | १८६ | ७४५ | ६,६८१ | ४७,२४४ | २,१०,१९२ | ५,०८,२४९ | ६,०८,२९८ |
| ३ | क्रोमाईट | उत्पादन | १ | ३ | २ | -- | ०.६ | -- | -- |
| | | मूल्य | १ | ५ | ५ | -- | ८ | -- | -- |
| ४ | कच्चे लोखंड | उत्पादन | ३६२ | ६१३ | १,४५६ | ६४५ | २२ | १,०१८ | २,०७६ |
| | | मूल्य | ५१ | ६९ | ६५७ | ३८४ | ३१ | ७,१५४ | २८,१७७ |
| ५ | चुनखडी | उत्पादन | ५५ | ३६३ | ७१५ | ५,१३५ | ६,०६६ | १०,४३१ | १२,६०० |
| | | मूल्य | २ | ३३ | १६३ | १,९६८ | ५,२६६ | १५,६४७ | २२,६८० |
| ६ | कच्चे मँगनीज | उत्पादन | १७९ | २१८ | २३२ | २७६ | ३६३ | ५८९ | ६७९ |
| | | मूल्य | २०६ | १४८ | ५५३ | १,६१५ | ६,२८० | ५४,१०९ | ५७,४२३ |
| ७ | केओलिन (नैसर्गिक) | उत्पादन | २ | ३ | ५ | ३ | ०.२ | -- | -- |
| | | मूल्य | ०.१३ | ०.१६ | १ | १ | ०.२९ | -- | -- |
| ८ | बॉक्साईट | उत्पादन | २७ | ३०२ | ३६५ | ५४३ | १,०२७ | २,४९२ | २,४३८ |
| | | मूल्य | २ | २१ | १३७ | ४४३ | १,७०५ | ४,५८५ | १८,०३५ |
| ९ | डोलोमाईट | उत्पादन | ६ | ५ | २७ | २८ | ६५ | ७९ | १३७ |
| | | मूल्य | ०.३८ | १ | ८ | २७ | १४५ | ७१ | ३४६ |
| १० | सिलिका सँड | उत्पादन | ५ | २७ | ८९ | १९७ | १६८ | ३२७ | १९३ |
| | | मूल्य | ०.३४ | ३ | ३ | ८७ | २२८ | ९८२ | ८१७ |
| ११ | फ्लोराईट (ग्रेडेड) | उत्पादन | -- | -- | -- | ३ | ३ | २८४ | ३ |
| | | मूल्य | -- | -- | -- | -- | २४ | १२,४५७ | २६० |
| १२ | लॅटेराईट | उत्पादन | -- | -- | -- | ८५ | ८३ | ४९ | ३१० |
| | | मूल्य | -- | -- | -- | ७६ | १०७ | ५८ | ५४२ |
| १३ | कायनाईट | उत्पादन | -- | ५ | २२ | १५ | ०.२ | ३ | ६ |
| | | मूल्य | -- | ११ | ५३ | ८५ | १ | २४ | १७८ |
| १४ | इतर $$ | उत्पादन | -- | ४ | ५४४ | ९१२ | ३०६ | ४,०३४ | २६५ |
| | | मूल्य | -- | ०.३६ | २७ | १९६ | ४९ | ५,२५८ | १,३८४ |

*आधार* - (१) भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन, नागपूर

(२) सहाय्यक मीठ आयुक्त, भारत सरकार, मुंबई (फक्त मीठाकरिता).

* अस्थायी

$ आकडे कॅलेन्डर वर्षाकरिता आहेत.

$$ कोरंडम, क्ले, पायरोफायलाईट, स्फटिक, वाळू (इतर), सिलीमानाईट, फायर क्ले आणि शेल हे इतर खनिजांमध्ये अंतर्भूत आहेत.

## परिशिष्ट ८.५

## महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचा तपशील

| बाब | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१३-१४ | २०१४-१५* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **१. सहकारी संस्थांची संख्या** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | २९ | ३१ | ३४ | ३४ | ३४ | ३५ | ३५ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | २०,४२०$ | १८,५७७ | १९,५६५ | २०,५५१ | २१,४५१ | २१,१८५ | २१,०६४ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २,९६४ | ५,४७४ | ११,२९१ | २२,०१४ | २३,४३४ | २२,७३७ | २२,३२६ |
| (४)पणन संस्था | ४१० | ४२३ | ९३१ | १,११५ | १,७१९ | १,६०२ | १,५१८ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम @ | ६,८१० | १४,३२७ | २८,९५४ | ३९,०७० | ४८,८४८ | ४८,१४७ | ३९,७८१ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था @ | ११,९६४ | २१,९१५ | ४३,८४५ | ७५,२३२ | १,२८,७६० | १,३६,५८९ | १,४०,९९७ |
| **एकूण** | **४२,५९७** | **६०,७४७** | **१,०४,६२०** | **१,५८,०१६** | **२,२४,३०६** | **२,३०,२९५** | **२,२५,७२१** |
| **२. सभासदांची संख्या ('०००)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था $$ | ७० | १,०१४ | १,४८५ | १,३७१ | २४७ | १८६ | १९५ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ३,७९४ | ५,४१६ | ७,९४२ | १०,१२५ | १५,००१ | १५,०६० | १४,४३७ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २,४३८ | ३,७५९ | ९,३०२ | १८,४६७ | २१,६१८ | २३,११२ | २४,०६४ |
| (४) पणन संस्था | २८२ | ४७१ | ७४५ | ८४० | १,३३७ | १,४६९ | १,४६१ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ९५९ | २,१२४ | ३,९७४ | ६,३३९ | ८,०१० | ५,८७८ | ७,१७६ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | १,०३८ | १,९९९ | ३,४५५ | ५,८८० | ६,८०९ | ६,६९४ | ६,५९७ |
| **एकूण** | **८,५८१** | **१४,७८३** | **२६,९०३** | **४३,०२२** | **५३,०२२** | **५२,३९९** | **५३,९३०** |
| **३. खेळते भांडवल (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ६१३ | १,८३१ | ८,८०६ | ३९,२६७ | ८९,७१९ | १,०३,६३३ | १,०७,५७८ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ३४३ | ५२७ | १,८५१ | ६,९८८ | १८,९८७ | २०,३०९ | २२,६०३ |
| (३)बिगर-कृषि पतसंस्था | १६८ | १,२०९ | ७,५०८ | ६६,८८७ | १,०४,८१४ | १,४२,८४३ | १,५९,९३५ |
| (४)पणन संस्था | ३९ | १८८ | ३४० | १,५१८ | १,३०० | १,३७३ | १,३५६ |
| (५)शेतमाल प्रक्रिया उपक्रम | २१९ | १,०२९ | ४,५८८ | १३,२८८ | २८,७१७ | ३९,८७१ | ४०,४९२ |
| (६)सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | १०७ | ४२६ | १,१९१ | ६,४९२ | ४,८९७ | ६,८९४ | ६,१०९ |
| **एकूण** | **१,४८९** | **५,२१०** | **२४,२८४** | **१,३४,४४०** | **२,४८,४३४** | **३,१४,९२३** | **३,३८,०७४** |
| **४. स्थूल कर्ज (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ७५१ | १,५२८ | ९,०८५ | २८,७०९ | ४०,४३६ | ५७,१६६ | ५६,६५१ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | १३३ | २५० | ८०० | ३,७३४ | ८,०६० | १२,८२६ | १४,०३० |
| (३)बिगर-कृषि पतसंस्था | २०४ | १,१२९ | ५,१७८ | ३९,२६८ | ४९,९०७ | ६०,२३३ | ६२,९२६ |
| (४)पणन संस्था | ३ | ३ | ८ | १८ | ११ | ७ | ७ |
| (५)शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ३ | १२ | १७ | १०३ | २,०५२ | ७३७ | १,१८९ |
| (६)सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ४ | १२ | ६० | २३५ | २१५ | २७३ | २७५ |
| **एकूण** | **१,०९८** | **२,९३४** | **१५,१४८** | **७२,०६७** | **१,००,६८१** | **१,३१,२४२** | **१,३५,०७८** |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ८.५ (समाप्त)

| बाब | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१३-१४ | २०१५-१६* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **५. येणे कर्जे (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ४७८ | १,१३७ | ५,८८९ | २३,१२० | ४२,३८५ | ५२,१९६ | ६१,२७९ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | २८४ | ३८४ | १,३१० | ५,३०८ | १२,०२४ | १३,६०४ | १४,५८४ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | १०५ | ७३१ | ४,५९४ | ३५,९०८ | ४७,८६३ | ६०,९९३ | ६४,७९२ |
| (४) पणन संस्था | २ | ४ | ९ | १८२ | ५,०३२ | ४,९८८ | ५,००२ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ६ | ३० | ६९ | २३६ | ३,७२४ | ६४० | २,१५६ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ८ | २५ | १९१ | २,८९९ | ८३४ | ६४४ | ६७६ |
| **एकूण** | **८८३** | **२,३११** | **१२,०६२** | **६७,६५३** | **१,११,८६२** | **१,३३,०६५** | **१,४८,४८९** |
| **६. उलाढाल-तयार मालाच्या विक्रीचे मूल्य (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ५१ | १४६ | २३९ | १,०१२ | ५९३ | ७६३ | ८३२ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | ३ | १० | .. | ३८ | ७६ | ला.ना. | ला.ना. |
| (४) पणन संस्था | २१४ | ९७९ | २,६०२ | ३,२०५ | १,३६८ | २,३७८ | २,१७९ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | १९४ | १,०३१ | ३,४६७ | ७,४९६ | ४६,११२ | २०,७९७ | १९,७०८ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ६९ | १८७ | ३३० | १,५८८ | ४,०७६ | ४,५५६ | ३,६७१ |
| **एकूण** | **५३१** | **२,३५३** | **६,६३८** | **१३,३३९** | **५२,२२५** | **२८,४९४** | **२६,३९०** |

*आधार* - सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

टीप - १९९०-९१ पर्यंतची आकडेवारी जून अखेरपर्यंतची आहे.

* अस्थायी

$ यात प्राथमिक कृषि पतसंस्था, प्राथमिक भू-विकास बँका आणि धान्य बँका यांचा १९७०-७१ पर्यंत समावेश आहे.

$$ नाममात्र सभासद वगळून

@ २०००-०१ या वर्षापासून उपसा सिंचन संस्थांचा समावेश उत्पादक ऐवजी सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था या प्रकारात करण्यात आला आहे.

ला.ना. - लागू नाही

# ९

# पायाभूत सुविधा

# ९. पायाभूत सुविधा

९.१ पायाभूत सुविधांचा विकास व व्यवस्थापन समाजाच्या शाश्वत विकास आणि भरभराटीसाठी महत्वपुर्ण घटक आहेत. पायाभूत सुविधांमुळे अर्थव्यवस्थेच्या वाढीस वेग मिळतो व त्याचा जीवनाच्या दर्जावर थेट परिणाम होतो. भौतिक पायाभूत सुविधांमध्ये मुख्यतः ऊर्जा, दळणवळण आणि दूरसंचार यांचा समावेश असून त्या व्यापार व औद्योगिक वाढीस सहाय्यकारी ठरतात.

## ऊर्जा

९.२ समाजाकडून ऊर्जेचा वापर विविध स्वरुपात करण्यात येत असतो. वीज हे तिचे एक महत्वापुर्ण स्वरुप आहे. वीज घरांना प्रकाशमान करण्याबरोबरच व्यावसायिक गतिविधींसाठी सहाय्यकारी असून उत्पादक कालावधीत वाढ करते. पारंपरिक (कोळसा, लिग्नाईट, पेट्रोलियम, नैसर्गिक वायू, इ.) आणि नवीकरणीय (पवन, सौर, लघु-जलऊर्जा, जैविक, चिपाडांपासून वीज सहनिर्मिती, इ.) ऊर्जा स्रोतांपासून वीज निर्मिती करण्यात येते. राज्याच्या वीज क्षेत्राची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे आहे.

### स्थापित क्षमता

९.३ मागील वर्षाच्या तुलनेत स्थापित क्षमतेत २०१४-१५ मध्ये ४.८ टक्के वाढ झाली, तर केंद्रिय क्षेत्रातील राज्यासाठीच्या वाटपात बदल झाला नाही. राज्याच्या स्थापित क्षमतेत ३१ मार्च, २०१५ रोजी सार्वजनिक क्षेत्राचा ३६.५ टक्के, खाजगी क्षेत्राचा ५६.४ टक्के (पारंपरिक ३५ टक्के व नवीकरणीय ऊर्जा २१.४ टक्के) आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून साकारलेल्या प्रकल्पाचा (रत्नागिरी गॅस पॉवर प्रोजेक्ट मर्या.-आरजीपीपीएल) ७.१ टक्के वाटा होता. स्रोतनिहाय स्थापित क्षमता तक्ता ९.१ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.१ : राज्यातील क्षेत्रनिहाय स्थापित क्षमता**




**तक्ता ९.१ स्रोतनिहाय स्थापित क्षमता**

(मेगावॅट)

| स्रोत | ३१ मार्च रोजी | | ३१ डिसेंबर, २०१५ रोजी | २०१४-१५ मध्ये २०१३-१४च्या तुलनेतील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | २०१४ | २०१५ | | |
| **राज्यामधील** | **२९,८४९** | **३१,२८१** | **३२,७०६** | **४.८** |
| औष्णिक | १७,२०६ | १८,४३६ | १९,६३६ | ७.१ |
| नवीकरणीय | ६,४६५ | ६,७०७ | ६,९३२ | ३.७ |
| जलजन्य | ३,०६६ | ३,०६६ | ३,०६६ | ०.० |
| नैसर्गिक वायुजन्य | ३,११२ | ३,०७२ | ३,०७२ | (-)१.३ |
| **केंद्रिय क्षेत्राकडून वाटप** | **६,६२७** | **६,६२७** | **६,७७६** | **निरंक** |

*आधार :* महानिर्मिती, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, महाऊर्जा (नवीकरणीय ऊर्जेसाठी), महावितरण, केंद्रिय विद्युत प्राधिकरण (केंद्रिय क्षेत्राकडून वाटप आणि खाजगी कंपन्यांसाठी)

### वीज निर्मिती

९.४ राज्यात २०१४-१५ मध्ये एकूण वीज निर्मिती (नवीकरणीय ऊर्जेसह) मागील वर्षापेक्षा १२.८ टक्के वाढून १,०३,७७९ दशलक्ष युनिटस् झाली. केंद्रिय क्षेत्राकडून राज्याला २०१४-१५ मध्ये ३०,४०१ दशलक्ष युनिटस् वीज उपलब्ध झाली.

९.५ एकूण वीज निर्मितीमध्ये महानिर्मितीचा वाटा ४७.५ टक्के, त्याखालोखाल अदानी पॉवर मर्या. १५.९ टक्के, नवीकरणीय ऊर्जा ७.८ टक्के, टाटा पॉवर ७.५ टक्के, जेएसडब्ल्यू एनर्जी ७.४ टक्के, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, व्हीआयपी बुटीबोरी, व एम्को पॉवर प्रत्येकी ३.५ टक्के आणि इतर ३.४ टक्के असा होता.

९.६ राज्यात २०१५-१६ मध्ये डिसेंबर अखेरपर्यंत ८४,५५८ दशलक्ष युनिटस् वीज निर्मिती झाली व ती २०१४-१५ मधील तत्सम कालावधीतील वीज निर्मितीपेक्षा ८.१ टक्के अधिक होती. केंद्रिय क्षेत्राकडून २०१५-१६ मध्ये डिसेंबर अखेरपर्यंत २१,९९३ दशलक्ष युनिट्स वीज उपलब्ध झाली. स्रोतनिहाय वीज निर्मिती तक्ता ९.२ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.२ : राज्यातील क्षेत्रनिहाय वीज निर्मिती**




**तक्ता ९.२ स्त्रोतनिहाय वीज निर्मिती**

(दशलक्ष युनिट)

| स्त्रोत | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६+* | २०१४-१५ मध्ये २०१३-१४ च्या तुलनेतील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| **राज्यामधील** | **९१,९८७** | **१,०३,७७९** | **८४,५५८** | **१२.८** |
| औष्णिक | ७१,६८६ | ८४,८८२ | ७१,४२५ | १८.४ |
| नैसर्गिक वायुजन्य | ६,०५५ | ४,६२६ | ३,१४४ | (-) २३.६ |
| जलजन्य | ६,७६३ | ५,८५६ | ४,१७४ | (-) १३.४ |
| नवीकरणीय$ | ७,४८३ | ८,४१५ | ५,८१५ | १२.५ |
| **केंद्रिय क्षेत्रातून राज्यास उपलब्ध** | **३१,५२५** | **३०,४०१** | **२१,९९३** | **(-) ३.६** |

+ डिसेंबर पर्यंत  * अस्थायी  $ बंदिस्त विजेसह

टिप : १ युनिट = १ किलो वॅट तास

*आधार* : महानिर्मिती, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, महावितरण (आरजीपीपीएल, केंद्रिय क्षेत्रातून राज्यास उपलब्ध वीज), नवीकरणीय - महावितरणला वीज विक्री करणारे प्रकल्प, केंद्रिय विद्युत प्राधिकरण (खाजगी कंपन्यांसाठी)

## वीज खरेदी

९.७ महावितरण कंपनीने २०१४-१५ मध्ये एकूण ₹ ४९,०८९ कोटी किंमतीची १,१२,५७७ दशलक्ष युनिटस् वीज खरेदी केली, तर २०१३-१४ मध्ये ₹ ३९,५२६ कोटी किंमतीची १,००,११५ दशलक्ष युनिटस् वीज खरेदी केली होती. सन २०१५-१६ मध्ये डिसेंबर अखेरपर्यंत ₹ ३५,०५५ कोटी किंमतीची ८९,४४१ दशलक्ष युनिटस् वीज खरेदी केली. 'बेस्ट' ने २०१४-१५ मध्ये ₹ २,७१८ कोटी किंमतीची ४,७२८ दशलक्ष युनिटस् व २०१५-१६ मध्ये डिसेंबर अखेरपर्यंत ₹ १,९८९ कोटी किंमतीची ३,८०८ दशलक्ष युनिटस् वीज खरेदी केली.

## विजेचा वापर

९.८ राज्यातील २०१४-१५ मधील विजेचा एकूण वापर १,१२,८५५ दशलक्ष युनिटस् इतका असून तो मागील वर्षापेक्षा ९.६ टक्के अधिक होता, तर २०१५-१६ मध्ये डिसेंबर अखेरपर्यंत ७८,३८३ दशलक्ष युनिटस् वापर हा २०१४-१५ मधील तत्सम कालावधीतील वापरापेक्षा थोडा अधिक होता. राज्यातील विजेचा सर्वाधिक वापर औद्योगिक क्षेत्रात (३६.८ टक्के), तर त्या खालोखाल कृषि क्षेत्रात (२३.४ टक्के) आणि घरगुती क्षेत्रात (२२.५ टक्के) होता. या तीन क्षेत्रांचा एकत्रित वापर एकूण वीज वापराच्या ८२.७ टक्के होता. क्षेत्रनिहाय विजेचा वापर तक्ता ९.३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.३ क्षेत्रनिहाय विजेचा वापर**

(दशलक्ष युनिट)

| क्षेत्र | एप्रिल-मार्च | | एप्रिल-डिसेंबर* | | |
|---|---|---|---|---|---|
| | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१५-१६ मध्ये २०१४-१५ च्या तुलनेतील शेकडा बदल |
| औद्योगिक | ३८,९४९ | ४१,५२२ | २४,७५६ | २५,५२६ | ३.३ |
| कृषि | २१,७२५ | २६,४०७ | १४,४६९ | १४,९५१ | २.४ |
| घरगुती | २३,६७९ | २५,४२८ | २०,१३३ | २१,३७४ | ३.१ |
| वाणिज्यिक | १२,४६९ | १२,५०४ | ९,७२४ | ९,९५६ | ६.२ |
| सार्वजनिक सेवा@ | ३,६३४ | ४,१८३ | ३,०६४ | ३,३५१ | ९.४ |
| रेल्वे | २,३८९ | २,४४३ | १,८४२ | १,६८० | (-)८.८ |
| संकीर्ण | १४४ | ३६८ | ३,६६४ | १,५४५ | (-)५७.८ |
| **एकूण** | **१,०२,९८९** | **१,१२,८५५** | **७७,६५२** | **७८,३८३** | **०.९** |

@ सार्वजनिक दिवाबत्ती व पाणी पुरवठा  * अस्थायी

*आधार* : महावितरण, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, बेस्ट

९.९ प्रमुख क्षेत्र निहाय भारतातील (२०१३-१४) आणि महाराष्ट्रातील (२०१३-१४ व २०१४-१५) दरडोई विजेचा अंतिम वापर तक्ता ९.४ मध्ये दिला आहे. स्थापित क्षमता, विद्युत निर्मिती, क्षेत्रनिहाय विजेचा वापर आणि दरडोई विजेचा अंतिम वापर यासंबंधीची मालिका परिशिष्ट ९.१ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.३ : क्षेत्रनिहाय वीज वापर**




**तक्ता ९.४ दरडोई विजेचा अंतिम वापर**

(युनिट)

| क्षेत्र | भारत | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|
| | २०१३-१४ | २०१३-१४ | २०१४-१५ |
| सर्व क्षेत्र | ६०९.२ | ८८८.९ | ९६२.६ |
| औद्योगिक | २१२.५ | ३३६.२ | ३५४.१ |
| घरगुती | १६२.० | २०४.४ | २१६.९ |
| कृषि | १२३.५ | १८७.५ | २२५.२ |

टिप : राज्यातील चार वीज वितरण यंत्रणाकडील वीज वापराची आकडेवारी एकत्रित करुन त्यास केंद्रिय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार यांच्याकडून उपलब्ध झालेल्या २०११ च्या जनगणनेच्या आधारे प्रक्षेपित मध्यावधी लोकसंख्येने भागून दरडोई विजेचा अंतिम वापर परिगणित करण्यात आला आहे.

*आधार :* केंद्रिय विद्युत प्राधिकरण, भारत सरकार ; महावितरण, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, टाटा पॉवर, बेस्ट

## विजेची मागणी व पुरवठा

९.१० विविध स्रोताद्वारे झालेली क्षमता वाढ, पायाभूत जाळ्यातील सुधारणा, पारेषण व वितरण हानीत झालेली घट आणि ऊर्जा संवर्धनाच्या उपाययोजनांमुळे वीज पुरवठ्यात सुधारणा झाली आहे. महावितरणची २०१४-१५ मध्ये विजेची १५,८१२ मेगावॅटची सरासरी कमाल मागणी ४२० मेगावॅट इतक्या तुटीचे भारनियमन करुन भागविण्यात आली. तसेच २०१५-१६ मध्ये डिसेंबर अखेरपर्यंतची १५,८९३ मेगावॅटची सरासरी कमाल मागणी १४३ मेगावॅट इतक्या तुटीचे भारनियमन करुन भागविण्यात आली. सरासरी कमाल मागणीच्या वेळी विजेचा पुरवठा व तूट तक्ता ९.५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.५ सरासरी कमाल मागणीच्या वेळी विजेचा पुरवठा व तूट**

(मेगावॅट)

| वर्ष | सरासरी कमाल मागणी | पुरवठा | तूट |
|---|---|---|---|
| २०११-१२ | १४,०४३ | १२,८४१ | १,२०२ |
| २०१२-१३ | १४,०३२ | १३,३०९ | ७२३ |
| २०१३-१४ | १४,४०६ | १३,८३० | ५७६ |
| २०१४-१५ | १५,८१२ | १५,३९२ | ४२० |
| २०१५-१६+ | १५,८९३ | १५,७५० | १४३ |

*आधार :* महावितरण + डिसेंबर पर्यंत

## पारेषण व वितरणाचे पायाभूत जाळे

९.११ राज्यातील वीज वितरण यंत्रणांमध्ये २०१४-१५ करिता महावितरणचा वाटा ८४ टक्के असून त्या पाठोपाठ रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर ६.८ टक्के, टाटा पॉवर ५.३ टक्के आणि 'बेस्ट'चा ३.९ टक्के होता.

९.१२ पारेषण व वितरणाच्या पायाभूत जाळ्यामध्ये सुधारणा आणि पारेषण व वितरण हानी (तांत्रिक व अतांत्रिक दोन्ही) कमी करणे ही सातत्यपूर्ण प्रक्रिया असून त्यात अति उच्च दाब (इएचव्ही) उपकेंद्रांचे आधुनिकीकरण, सदोष मीटर बदलणे, अत्याधिक भार असलेल्या उच्च व कमी दाबाच्या वाहिन्यांवरील भार अतिरिक्त रोहित्रे पुरवून कमी करणे, नवीन उपकेंद्रे उभारणे व कार्यान्वित करणे, तारा टाकणे यांसह वीजचोरी विरुद्ध मोहीम अशा महापारेषण व महावितरण द्वारा हाती घेतलेल्या उपाययोजनांचा समावेश आहे. महापारेषण कंपनीची ४१,५९१ सर्कीट किमीचे जाळे व ६०९ उपकेंद्रे यांसह २०१४-१५ पर्यंतची पारेषण क्षमता १,०५,११२ मेगा व्होल्ट ॲम्पिअर (एमव्हीए) होती. सन २०१४-१५ मध्ये पारेषण क्षमतेत १,६२८ सर्कीट किमी जाळे व एक उपकेंद्रांसह १,७५० एमव्हीए इतकी वाढ झाली. महावितरण कंपनीच्या वितरण जाळ्यात २०१४-१५ मध्ये ११० उपकेंद्रे, २३,८४५ सर्कीट किमी वाहिन्या व ३०,०१७ वितरण ट्रान्सफॉर्मर्सची वाढ होऊन २०१४-१५ अखेर त्यात २,९२५ उपकेंद्रे, ९,४९,७९१ सर्कीट किमी वाहीन्या व ५,२३,५८३ वितरण ट्रान्सफॉर्मर्स होते. सन २०१४-१५ अखेर १६,८०४ फिडर्स व २,३२,७३० वितरण रोहित्र केंद्रांवर मीटर्स बसविण्यात आले व २०१४-१५ मध्ये १५,८०,३४७ जुने मीटर्स बदलून नवीन बसविण्यात आले. सन २०१५-१६ मध्ये डिसेंबर अखेर २१७ फिडर्स व ४,३४६ वितरण रोहित्र केंद्रांवर मीटर्स बसविण्यात आले तर १०,१७,२९० मीटर्स बदलण्यात आले. वीज चोरी विरुध्द चालविण्यात येत असलेल्या मोहिमेत २०१४-१५ मध्ये ६१,२१९ वीजचोरीची प्रकरणे आढळली व ₹ ५७.०८ कोटी इतकी रक्कम वसूल करण्यात आली

तर २०१५-१६ मध्ये डिसेंबर अखेरपर्यंत २८,३४४ वीजचोरीची प्रकरणे आढळली व ₹ ८.७३ कोटी इतकी रक्कम वसूल करण्यात आली. पारेषण व वितरण हानीचा तपशील तक्ता ९.६ व ९.७ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.६ पारेषण हानी**

(टक्के)

| परवानाधारक | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६+ |
|---|---|---|---|
| महापारेषण | ४.०८ | ३.८९ | ३.९५ |
| टाटा पॉवर | ४.१८ | ३.८९ | ४.०१# |
| रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर | ४.०९ | ३.८९ | ३.८९ |

+ डिसेंबरपर्यंत # नोव्हेंबरपर्यंत

*आधार* : महापारेषण , टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर

**आलेख ९.४ : महावितरणची एकत्रित तांत्रिक व व्यावसायिक आणि वितरण हानी**




**तक्ता ९.७ वितरण हानी आणि तांत्रिक व व्यावसायिक (एटी ॲन्ड सी) हानी**

(टक्के)

| परवानाधारक | वितरण हानी | | | तांत्रिक व व्यावसायिक (एटी ॲन्ड सी) हानी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६+ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६+ |
| महावितरण | १४.०० | १४.१७ | १५.७७# | १७.६८ | १८.७१ | २१.८३# |
| टाटा पॉवर | १.१० | ०.५८ | १.१३# | १.०८ | ०.५८ | १.१३# |
| रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर | ९.५० | ९.५३ | ९.३६ | ९.५० | ९.५० | ९.३६ |
| बेस्ट | ५.९० | ६.५३ | ५.९० | ७.०५ | ८.३६ | -- |

*आधार* : महावितरण , टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर , बेस्ट + डिसेंबरपर्यंत # नोव्हेंबरपर्यंत -- उपलब्ध नाही

## क्षमता वाढ

९.१३ **औष्णिक ऊर्जा** : महानिर्मितीद्वारे सुमारे २,५७० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित व आस्थापित करण्यात येत असून १,५७० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प प्रस्तावित व ४,००० मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पांचे नियोजन करण्यात येत आहे. तपशील तक्ता ९.८ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.८ महानिर्मितीद्वारे प्रस्तावित प्रकल्प**

(मेगावॅट)

| प्रकल्प | क्षमता | अपेक्षित कार्यान्वयन |
|---|---|---|
| परळी संच-८ | २५० | मार्च, २०१६ (पाण्याच्या उपलब्धतेनुसार) |
| चंद्रपूर संच-८ व ९ (प्रत्येकी ५०० मेगावॅट) | १,००० | मार्च, २०१६ |
| कोराडी संच-९ व १० (प्रत्येकी ६६० मेगावॅट) | १,३२० | मार्च, २०१६ पर्यंत संच-९ आणि मे, २०१६ पर्यंत संच-१० |
| पारस संच-५ | २५० | सप्टेंबर, २०१९ |
| भुसावळ संच-६ | ६६० | ऑक्टोबर, २०१९ |
| नाशिक संच-६ | ६६० | एप्रिल, २०२० |

*आधार* : महानिर्मिती

९.१४ **नवीकरणीय ऊर्जा** : पवन, सौर, जैविक, बायोगॅस, सागरी लाटा, भू-औष्णिक, इ. स्वच्छ आणि पर्यावरण पूरक नवीकरणीय ऊर्जेचे स्रोत आहेत. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या संस्थेस ऊर्जा संवर्धन कायदा, २००१ मधील तरतुदींचे समन्वयन, विनियमन व अंमलबजावणी करण्यासाठी नियुक्त यंत्रणा म्हणून राज्य शासनाने अधिसूचित केले आहे. नवीकरणीय ऊर्जेचा प्रसार व विकास आणि ऊर्जा संवर्धन कार्यक्रमांची अंमलबजावणी यासाठी महाऊर्जा सक्रीय आहे.

९.१५ केंद्र शासनाच्या धर्तीवर नवीकरणीय ऊर्जा स्रोतांमधून १० टक्के वीज खरेदीचे उद्दिष्ट गाठण्याचे धोरण राज्य शासनाने स्विकारले आहे. त्यास अनुसरुन नवीकरणीय ऊर्जा स्रोतांद्वारे ग्रीड संलग्न वीज निर्मितीसाठी धोरणे व प्रोत्साहने जाहीर करण्यात आली आहेत. नवीकरणीय ऊर्जा स्रोतांद्वारे वीज निर्मिती प्रकल्पांच्या स्थापित क्षमतेनुसार राज्याचा देशात दुसरा क्रमांक आहे. डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत एकूण ६,९३२ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प स्थापित करण्यात आले आहेत. राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची संभाव्य क्षमता व त्यापैकी स्थापित क्षमता तक्ता ९.९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.९ नवीकरणीय ऊर्जेची संभाव्य क्षमता व त्यापैकी स्थापित क्षमता**

(मेगावॅट)

| नवीकरणीय ऊर्जा स्रोत | संभाव्य क्षमता | स्थापित क्षमता | | |
|---|---|---|---|---|
| | | ३१ मार्च रोजी | | ३१ डिसेंबर, २०१५ रोजी |
| | | २०१४ | २०१५ | |
| पवन | ९,४०० | ४,०८० | ४,४४४ | ४,६३६ |
| लघु जल विद्युत प्रकल्प# | ७३२ | २७१ | २८४ | २८४ |
| चिपाडांपासून वीज सहनिर्मिती | १,५०० | १,३५५ | १,४१५ | १,४१५ |
| कृषि अवशेष | ७८१ | १९० | २०० | २०० |
| शहरी घनकचरा | २८७ | ३ | ३ | ३ |
| औद्योगिक कचरा | ३५० | २६ | ३२ | ३४ |
| सौर औष्णिक | ३५/चौ.मी.$ | २३० | ३२९ | ३६० |
| सौर फोटोव्होल्टाईक (पीव्ही) | ४९/चौ.मी.$ | | | |
| **एकूण** | **१३,०५०** | **६,१५५** | **६,७०७** | **६,९३२** |

*आधार* : महाऊर्जा # जलसंपदा विभागाने स्थापित केलेले २५ मेगावॅट पेक्षा कमी क्षमतेचे प्रकल्प $ एकूण संभाव्य क्षमतेत समाविष्ट नाही

९.१६ स्रोतनिहाय नवीकरणीय ऊर्जेच्या राज्यातील प्रकल्पांची माहिती पुढे दिली आहे.

९.१६.१ पवन ऊर्जा : महाऊर्जाद्वारे ११.०९ मेगावॅट क्षमतेचे प्रदर्शक प्रकल्प राज्यात उभारण्यात आले आहेत. शासनाची आकर्षक धोरणे व प्रोत्साहने यामुळे पवन ऊर्जा क्षेत्रात राज्यात ₹ २३,२०० कोटीपेक्षा अधिक खाजगी गुंतवणूक झाली आहे.

९.१६.२ सौर औष्णिक व सौर फोटो व्होल्टाईक ऊर्जा : राज्यात डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत ३६०.२५ मेगावॅट क्षमतेचे ग्रीड संलग्न सौर फोटो व्होल्टाईक ऊर्जा प्रकल्प महाऊर्जामार्फत कार्यान्वित झाले आहेत. महानिर्मितीने ८९५ मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प प्रस्तावित केले आहेत.

९.१६.३ चिपाडांपासून वीज सह-निर्मिती : राज्यात डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत चिपाडांपासून वीज सह-निर्मितीचे एकूण ८४ प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत. या क्षेत्रात गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी केंद्र शासनाकडून बॉयलर संरचनेवर आधारित वीज सह-निर्मिती प्रकल्पांना भांडवली अर्थसहाय्य देण्यात येते तसेच राज्य शासनाकडून देखील वित्तीय सहाय्य देण्यात येते.

९.१६.४ कृषिजन्य अवशेषांवर आधारित ऊर्जा निर्मिती : नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांच्या आर्थिक मदतीतून महाऊर्जाद्वारे राज्यातील ३९ तालुक्यांमध्ये कृषि अवशेषांच्या उपलब्धतेबाबत अभ्यास घेण्यात आले आहेत. खाजगी सहभागाबाबत आकर्षक धोरणामुळे डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत कृषिजन्य अवशेषांवर आधारित १९ ऊर्जा निर्मिती प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत व १७ प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत.

९.१६.५ लघु जलविद्युत प्रकल्प : राज्यातील एकूण ७३२ मेगावॅट संभाव्य क्षमतेपैकी जलसंपदा विभागाकडून २८४.३० मेगावॅट क्षमतेचे लघु जलविद्युत प्रकल्प डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत स्थापित करण्यात आले आहेत. लघु जलविद्युत प्रकल्प खाजगीकरणातून विकसित करण्यास चालना देण्यासाठीच्या राज्य शासनाच्या धोरणांतर्गत नोव्हेंबर, २०१५ अखेरपर्यंत १०८.१० मेगावॅट क्षमतेचे २५ प्रकल्प कार्यान्वित झाले असून ५२ मेगावॅट क्षमतेच्या १६ प्रकल्पांचे बांधकाम सुरु आहे.

९.१७ नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्रोतांचे महत्व व राज्यातील वाव लक्षात घेवून त्यापासून वीजनिर्मितीच्या पारेषण संलग्न प्रकल्पांना चालना देण्यासाठी राज्याचे एकत्रित धोरण-२०१५ जाहीर करण्यात आले आहे. या धोरणाअंतर्गत एकूण १४,४०० मेगावॅट क्षमतेचे नवीन व नवीकरणीय ऊर्जेपासून वीज निर्मितीचे पारेषण संलग्न प्रकल्प पुढील पाच वर्षांमध्ये आस्थापित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

## नियामक उपाययोजना व वीज दर

९.१८ महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची स्थापना वीज दर निश्चिती, वीज खरेदी आणि पारेषण व वितरण यंत्रणांच्या प्रापण प्रक्रियांचे नियमन, स्पर्धात्मकता, कार्यक्षमता व काटकसरीस उत्तेजन यासाठी झाली. विद्युत अधिनियम, २००३ अन्वये आयोगाकडे आंतर-राज्य पारेषण आणि वीज वहन सुलभीकरण, वीज पारेषण, वितरण आणि खरेदी-विक्री करिता परवाने वितरण, सहवीजनिर्मिती व नवीकरणीय ऊर्जा निर्मितीस प्रोत्साहन ही अतिरिक्त कामे सोपविण्यात आली.

९.१९ महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाकडून एकापेक्षा अधिक वर्षांसाठी वीज दर निर्धारण, नवीकरणीय ऊर्जेस चालना, समांतर परवाना पध्दती, ग्राहक सहभाग व समर्थन, मागणीच्या अनुषंगाने व्यवस्थापन, इ. स्वयंप्रेरित उपाययोजना करण्यात येत आहेत. समांतर परवाना पध्दती अंतर्गत मुंबई हे एकाच भौगोलिक क्षेत्रात वीज पुरवठा करण्यासाठी दोन अधिकृत समांतर परवाना धारक (मुंबई शहरात बेस्ट व टाटा पॉवर आणि मुंबई उपनगरात रिलायन्स इन्फ्रा व टाटा पॉवर) असलेले महानगर बनले असून आयोगाने विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार ग्राहकांना एका परवाना धारकाऐवजी दुसऱ्याची निवड करणे शक्य होत आहे. ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आयोगाकडून ग्राहक तक्रार निवारण मंच आणि मुंबई व नागपूर येथे वीज लोकायुक्त नियमांद्वारे घोषित करण्यात आले आहेत. सन २०१५-१६ मधील वीज दर तक्ता ९.१० मध्ये दिले आहेत.

**तक्ता ९.१० सन २०१५-१६ मधील वीज दर**

(₹ प्रति युनिट)

| ग्राहकाचा प्रकार | महावितरण | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर | टाटा पॉवर | बेस्ट |
|---|---|---|---|---|
| **लघु दाब - घरगुती/निवासी** | | | | |
| दारिद्र्यरेषेखालील | १.४२ | -- | -- | १.२२ |
| ० ते १०० युनिट्स | ४.३३ | ४.४९ | २.३२ | ४.१२ |
| १०१ ते ३०० युनिट्स | ७.७५ | ६.३९ | ४.२९ | ८.६८ |
| ३०१ ते ५०० युनिट्स | १०.५० | ७.७९ | ८.२० | ११.६३ |
| ५०० ते १,००० युनिट्स | ११.८७ | ९.२३ | १०.१५ | १४.१४ |
| १,००० युनिट्स पेक्षा अधिक | १२.९९ | ९.२३ | १०.१५ | १४.१४ |
| **लघु दाब - व्यावसायिक/अनिवासी** | | | | |
| (अ) ०- २० केडब्ल्यु | | | | |
| ० ते २०० युनिट्स | ७.८९ | ८.०७ | ८.८६ | १३.५१ |
| २०० युनिट्स पेक्षा अधिक | १०.९९ | ८.०७ | ८.८६ | १३.५१ |
| (ब) > २० केडब्ल्यु आणि <= ५० केडब्ल्यु | १२.४३ | ९.०६ | ९.३४ | १४.६७ |
| (क) ५० केडब्ल्यु पेक्षा अधिक | १५.०७ | ९.८५ | ९.५५ | १५.१८ |
| **लघु दाब - उद्योग** | | | | |
| २० केडब्ल्यु पेक्षा कमी भार | ५.८३ | ८.१८ | ७.८३ | १२.२४ |
| **लघु दाब - उद्योग** | | | | |
| (अ) २० ते १०० केडब्ल्यु भार | ८.३९ | ८.२७ | ८.८६ | १२.८४ |
| (ब) १०० केडब्ल्यु पेक्षा अधिक भार | ८.३९ | ८.२७ | ८.८६ | १२.४९ |
| **लघु दाब - कृषि** | | | | |
| (अ) कृषि पंप (मीटर शिवाय) | ३.५३ | -- | -- | -- |
| (ब) कृषि पंप (मीटर सह) | २.८१ | -- | -- | -- |
| (क) इतर (मीटर सह) | ४.१७ | -- | -- | -- |
| **लघु दाब - पथदिवे (सार्वजनिक दिवाबत्ती)** | | | | |
| (अ) ग्रामपंचायत आणि अ, ब व क वर्ग नगरपालिका | ४.८९ | -- | -- | -- |
| (ब) महानगरपालिका क्षेत्रे | ५.९८ | ८.१९ | -- | १२.१८ |
| **उच्च दाब - उद्योग** | ७.७६ | ८.४९ | ८.७९ | १२.२२ |
| **उच्च दाब - रेल्वे** | | | | |
| (अ) ३३/२२/११/६.६ केव्ही - सर्व युनिट्स | ८.४६ | -- | ९.१९ | -- |
| (ब) १०० केव्ही - सर्व युनिट्स | ८.४६ | -- | ८.९८ | -- |
| **उच्च दाब - कृषि पंप** | ३.५६ | -- | -- | -- |

*आधार*: महाराष्ट्र वीज नियामक आयोग -- लागू नाही

९.२० **ग्रामीण विद्युतीकरण, जाळयांची सुधारणा आणि ऊर्जा संवर्धन** : राज्यातील वस्ती असलेल्या एकूण ४०,९५९ गावांपैकी (जनगणना २०११ नुसार) डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत ४०,८९८ गावांचे विद्युतीकरण झाले आहे. ग्रामीण विद्युतीकरण, जाळयांची सुधारणा आणि ऊर्जा संवर्धनासाठी राबविण्यात येत असलेल्या महत्वाच्या योजनांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

९.२०.१ राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना : या योजनेअंतर्गत राज्यातील विद्युतीकरण न झालेल्या ४,७०९ खेड्यांचे विद्युतीकरण करण्यात आले असून दारिद्र्यरेषेखालील १२,११,०४१ ग्रामीण कुटुंबांना मोफत वीज जोडणी पुरविण्यात आली.

९.२०.२ दीनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजना : केंद्र शासनाने ग्रामीण भागासाठी ही योजना सुरु केली असून राज्यासाठी ₹ २,१६३.४४ कोटी इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे. कृषि व अकृषक फिडर्स वेगवेगळे करणे, ग्रामीण भागातील उप पारेषण व वितरणाच्या पायाभूत यंत्रणेत वाढ व मिटरींग सह बळकटीकरण, वीज जोडणी नसलेल्या ग्रामीण कुटुंबांसाठी (दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसह) वीजजोडणी देण्यासाठी आवश्यक पायाभूत यंत्रणांची निर्मिती करणे, संसद आदर्श ग्राम योजना अंतर्गत निवड केलेल्या गावांसाठी पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण व बळकटीकरण, इ. कामांचा समावेश आहे.

९.२०.३ दुरस्थ गावांचे विद्युतीकरण कार्यक्रम : केंद्र व राज्य शासनाच्या या कार्यक्रमांतर्गत २०१४-१५ पर्यंत ५४३ गावे आणि ६९४ वस्त्यांचे विद्युतीकरण महाऊर्जामार्फत नवीकरणीय ऊर्जा स्रोतांचा वापर करुन करण्यात आले आहे.

९.२०.४ स्वतंत्र फिडर योजना : सन २०१४-१५ पर्यंत या योजनेअंतर्गत १७,३३४ गावांना गावठाण व कृषि पंपांसाठी स्वतंत्र फिडर्स पुरविण्यात आले.

९.२०.५ कृषि पंपांचे विद्युतीकरण : सन २०१४-१५ मध्ये १,४७,९९३ कृषि पंपांचे व २०१५-१६ मध्ये डिसेंबर अखेरपर्यंत ८३,४१५ कृषि पंपांचे विद्युतीकरण करण्यात आले. डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत विद्युतीकरण झालेल्या पंपांची एकूण संख्या (कायमस्वरुपी जोडणी काढून टाकलेले कृषि पंप वगळून) ३८,९६,११३ इतकी होती.

९.२०.६ अटल सौर कृषि पंप योजना : सौर कृषि पंप आस्थापित करण्याची नवी योजना राज्यात २०१५ पासून सुरु करण्यात आली. सदर योजना महावितरण आणि महाऊर्जा या यंत्रणांमार्फत राबविण्यात येत आहे. राज्यात ७,५४० सौर कृषि पंप आस्थापित करण्याचे उद्दिष्ट आहे.

९.२०.७ पुनर्रचित गतिमान ऊर्जा विकास व सुधारणा कार्यक्रम : या योजनेत ३०,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेली नगरे व शहरे यांचा समावेश आहे. पायाभूत माहिती यंत्रणा प्रस्थापित करणे, जबाबदारी निश्चिती, एकूण तांत्रिक व व्यावसायिक हानी मध्ये कपात, पर्यवेक्षी नियंत्रण व माहिती प्राप्ती /माहिती व्यवस्थापन प्रणाली नियंत्रण केंद्र या बाबी या कार्यक्रमात समाविष्ट आहेत. ऊर्जा वित्त महामंडळाकडून ₹ १,४००.८७ कोटी राज्यास वितरीत केले असून डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत ₹ १,४९०.२६ कोटी खर्च झाला.

९.२०.८ घरगुती कार्यक्षम दिव्यांसाठी कार्यक्रम (डीईएलपी) : जून २०१५ मध्ये घोषित करण्यात आलेल्या या कार्यक्रमांतर्गत घरगुती ग्राहकांकडील सद्यस्थितीतील सीएफएल व इनकॅन्डेसन्ट दिवे बदलून एलईडी दिवे लावण्यात येत आहेत. हा कार्यक्रम एनर्जी एफिशियन्ट सर्व्हिसेस लि. या केंद्रिय वीज मंत्रालयाच्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या संयुक्त उपक्रमाद्वारे राबविण्यात येत असून राज्यात त्यासाठी महावितरण सहाय्य करीत आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मंजुरी दिलेल्या आराखड्यानुसार महावितरणला ३.८६ कोटी एलईडी दिवे वितरणासाठी अंदाजित खर्च ₹ ५५३.९३ कोटी आहे. याद्वारे अंदाजित ७५० दशलक्ष युनिट्सची वार्षिक बचत व मागणीत सुमारे २९३ मेगावॅट घट अपेक्षित आहे. पुढील दोन आर्थिक वर्षात ३.०० कोटी एलईडी दिवे वितरित करण्याचे उद्दिष्ट आहे. राज्यात २०१५-१६ मध्ये दि.१५ फेब्रुवारी पर्यंत सुमारे ९२ लाख एलईडी दिव्यांचे वितरण करण्यात आले आहे.

# वाहतूक व दळणवळण

९.२१ परिवहन व दूरसंचार प्रणालीचे सुव्यवस्थित जाळे देशाच्या विविध भागातील तसेच जगातील लोकांना जवळ आणते. त्याचप्रमाणे ते वस्तु व सेवांच्या मागणी व पुरवठा स्थळापर्यंत दळणवळणाची सुविधाही पुरविते. परिवहनाचे मार्ग अशाप्रकारे आपल्या अर्थव्यवस्थेच्या प्रमुख धमण्या आहेत. त्यामुळे गतिमान विकासासाठी कार्यक्षम परिवहन व दळणवळण व्यवस्था पुर्वावश्यक आहे. परिवहन व्यवस्थेमध्ये भूपृष्ठ, जल व हवाई वाहतूक यांचा समावेश आहे तर टपाल, दूरध्वनी व इंटरनेट या सेवा दूरसंचार व्यवस्थेचे मुख्य घटक आहेत.

## वाहतूक

### रस्त्यांचे जाळे

९.२२ रस्त्यांच्या जाळ्यामध्ये राष्ट्रीय महामार्ग, प्रमुख राज्य महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा रस्ते, इतर जिल्हा रस्ते, ग्रामीण रस्ते व शहरांतर्गत रस्ते यांचा समावेश आहे. राज्यातील रस्त्यांचा विकास राज्य शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषदा, वन विभाग, नागरी स्थानिक संस्था, कटक मंडळे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी), शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या यंत्रणांमार्फत केला जातो.

९.२३ राज्यात ३.३७ लाख किमी लांबीच्या रस्त्यांच्या विकासाचे उद्दिष्ट ठेवून रस्ते विकास आराखडा २००१-२१ ची अंमलबजावणी सुरु आहे. मार्च, २०१५ अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची एकत्रित लांबी (इतर यंत्रणांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी वगळून) २.९९ लाख किमी असून त्यापैकी पृष्ठांकित रस्त्यांची लांबी २.४५ लाख किमी (८१.९ टक्के) होती. मार्च, २०१५ अखेर सुमारे ९९ टक्के गावे बारमाही व हंगामी रस्त्यांनी जोडलेली होती. सन २०१४-१५ मध्ये ₹ ३,८२० कोटी नियतव्यय मंजूर होता व ₹ २,६७७ कोटी खर्च झाला. सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी तक्ता ९.११ मध्ये दिली आहे. वर्षनिहाय व रस्त्यांच्या प्रकारानुसार रस्त्यांच्या लांबीची माहिती परिशिष्ट ९.२ आणि सन २०१४ व २०१५ मधील जिल्हानिहाय रस्त्यांच्या लांबीचे रुंदीनुसार वर्गीकरण परिशिष्ट ९.३ मध्ये दिले आहे.

**तक्ता ९.११ सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी**

(किमी)

| वैधानिक विकास मंडळ | ३१ मार्च रोजी | रस्त्यांचे प्रकार | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | प्रमुख जिल्हा रस्ते | इतर जिल्हा रस्ते | ग्रामीण रस्ते | एकूण |
| विदर्भ | २०१४ | १,२९८ | २,१३७ | ९,७२७ | ११,४७८ | १४,७६८ | २६,५११ | ६५,९१९ |
| | २०१५ | १,५९९ | १,६३९ | ९,६०४ | ११,८९९ | १४,६४२ | २६,२८१ | ६५,६६४ |
| मराठवाडा | २०१४ | १,२९७ | १,७५७ | ७,७७८ | ११,५२७ | १२,२५१ | २४,७२० | ५९,३३० |
| | २०१५ | ८१६ | १,७५७ | ७,७७८ | ११,५२७ | १२,२५१ | ३१,३६८ | ६५,४९७ |
| उर्वरित महाराष्ट्र | २०१४ | ३,२६३ | २,४४३ | १६,४५८ | २७,२२७ | २५,७४२ | ६३,३२६ | १,३८,४५९ |
| | २०१५ | २,३५१ | २,७६७ | १६,४७८ | २७,१५९ | ३१,२२२ | ८८,२३० | १,६८,२०७ |
| **एकूण** | **२०१४** | **५,८५८** | **६,३३७** | **३३,९६३** | **५०,२३२** | **५२,७६१** | **१,१४,५५७** | **२,६३,७०८** |
| | **२०१५** | **४,७६६** | **६,१६३** | **३३,८६०** | **५०,५८५** | **५८,११५** | **१,४५,७७९** | **२,९९,३६८** |

*आधार*: सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

## प्रधान मंत्री ग्राम सडक योजना

९.२४ प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील ५०० व अधिक लोकसंख्या (आदिवासी भागासाठी २५० व अधिक) असलेल्या व रस्त्याने न जोडलेल्या वस्त्यांना बारमाही रस्त्यांनी जोडणे हा आहे. या योजनेंतर्गत २४,४३९ किमी लांबीच्या रस्त्यांनी ८,३१५ लोकवस्त्यांना जोडण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. एकूण उद्दिष्टापैकी ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंत ८,००९ वस्त्यांना २२,८९८ किमी लांबीच्या रस्त्यांनी जोडण्यात आले आहे. प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सुरुवातीपासून बांधलेल्या रस्त्यांची लांबी व जोडलेल्या लोकवस्त्यांची संख्या तक्ता ९.१२ मध्ये आणि भौतिक व आर्थिक साध्य तक्ता ९.१३ मध्ये दिले आहे.

**आलेख ९.५ : रस्ते विकास आराखड्यानुसार (२००१-२१) साध्य**




**तक्ता ९.१२ प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सुरुवातीपासून बांधलेल्या रस्त्यांची लांबी व जोडलेल्या लोकवस्त्यांची संख्या**

| वैधानिक विकास मंडळ | भौतिक लक्ष्य | | संचयी भौतिक साध्य+ | |
|---|---|---|---|---|
| | रस्त्याची लांबी (किमी) | लोकवस्त्यांची संख्या | रस्त्याची लांबी (किमी) | लोकवस्त्यांची संख्या |
| विदर्भ | ७,७८२ | २,९२१ | ७,२८९ | २,६८८ |
| मराठवाडा | ५,०२६ | १,८६३ | ४,९०९ | १,८२० |
| उर्वरित महाराष्ट्र | ११,६३१ | ३,५३१ | १०,७०० | ३,५०१ |
| **एकूण** | **२४,४३९** | **८,३१५** | **२२,८९८** | **८,००९** |

*आधार* : ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबर, २०१५ पर्यंत

९.२५ ज्या राज्यांनी लक्ष्याच्या तुलनेत लोकवस्त्या जोडणीची १०० टक्के व रस्त्यांचा दर्जा सुधारण्याची ७५ टक्के कामे पूर्ण केली त्या राज्यांसाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री ग्राम सडक योजना भाग-२ मंजूर केली आहे. या योजनेअंतर्गत केवळ रस्त्यांचा दर्जा सुधारण्याची कामे घेता येतात. या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून राज्यास, २,६२० किमी रस्ते लांबीचे उद्दिष्ट ठरवून दिले आहे. ही योजना राज्यात सन २०१३ पासून सुरु करण्यात आली असून ती केंद्र शासन व राज्य शासनाच्या ७५:२५ व ९०:१० अशा आर्थिक सहभागाने अनुक्रमे बिगर आदिवासी क्षेत्रात आणि आदिवासी क्षेत्रात २०१४-१५ पर्यंत राबविण्यात आली. केंद्र शासनाने सन २०१५-१६ पासून या योजनेच्या आर्थिक सहभागात ६०:४० असा सुधारीत केला आहे.

**तक्ता ९.१३ प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत वार्षिक भौतिक व आर्थिक साध्य**

| वर्ष | जोडलेल्या लोकवस्त्यांची संख्या | निर्मित रस्त्याची लांबी (किमी) | झालेला खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| २०१३-१४ | २०३ | ४४० | ३८४.२० |
| २०१४-१५ | १५५ | ३६७ | ४१०.०० |
| २०१५-१६+ | ७५ | ८४ | १८५.९४ |

*आधार* : ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबर, २०१५ पर्यंत

## महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

९.२६ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने १९ प्रकल्प पूर्ण केले असून त्यावर डिसेंबर, २०१५ अखेर ₹ ७,७९१ कोटी खर्च झाला. ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंत पूर्ण झालेल्या व अंशत: पूर्ण झालेल्या प्रकल्पांवरील ₹ ८,५८१ कोटी खर्चाच्या तुलनेत टोल वसूलीची एकूण रक्कम ₹ ६,८८५ कोटी होती. महामंडळाचे प्रगतीपथावरील प्रकल्प तक्ता ९.१४ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ९.१४ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सुरु असलेल्या प्रकल्पांची सद्य:स्थिती**

डिसेंबर, २०१५ पर्यंत

| प्रकल्पाचे नांव | प्रकल्प सुरु झाल्याचे वर्ष | प्रकल्पाची अंदाजे किंमत (₹ कोटी) | खर्च (₹ कोटी) | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|---|---|
| नागपूर मधील रस्त्यांची कामे | २००१-०२ | ४२२ | ४६०.९० | २०१५-१६ |
| औरंगाबाद मधील रस्त्यांची कामे | २००१-०२ | १४२ | २७७.६८ | २०१५-१६ |
| नागपूर-काटोल-जलालखेडा रस्त्याचे रुंदीकरण | २००८-०९ | ३१ | ३.६४ | २०१५-१६ |
| वर्सोवा - वांद्रे सागरी सेतू प्रकल्प | २००७-०८ | ४,४१९ | १४.९० | उना |
| सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण | २००८-०९ | १,००० | ४८.९४ | उना |
| पश्चिम मुक्तमार्ग सागरी सेतू | १९९८-९९ | ४,१४३ | १६.५६ | उना |
| मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प (एमयुटीपी) | २००३-०४ | ४७२ | ३२१.०६ | २०१५-१६ |
| मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (एमयुआयपी) | २००५-०६ | ३९३ | १६७.८७ | २०१५-१६ |
| विस्तारीत - एमयुआयपी | २००८-०९ | २,०६५ | ४२८.०७ | २०१५-१६ |
| मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गाची क्षमता वाढ | २००९-१० | ५,००० | ३.१७ | २०१९-२० |
| मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गाशी संलग्न सोई-सुविधा | २०१४-१५ | २०० | १.६८ | २०१५-१६ |
| पेडर रोड उड्डाणपूल | २०१२-१३ | ३८० | -- | उना |

*आधार :* महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ उना उपलब्ध नाही

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

९.२७ मुंबई महानगर क्षेत्रात आठ महानगरपालिका, नऊ नगरपरिषदा आणि ठाणे व रायगड जिल्ह्यातील सुमारे एक हजार गावांचा समावेश आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मुंबई महानगर क्षेत्रांत (एमएमआर) विविध पायाभूत प्रकल्प हाती घेतले आहेत. मुंबई मेट्रो रेल प्रकल्प हा सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर राबविण्यात येणारा सामुहिक वाहतूक व्यवस्था प्रकल्प आहे. मुंबई महानगर क्षेत्रात सुरु असलेल्या वाहतूक प्रकल्पांची माहिती तक्ता ९.१५ मध्ये दिली आहे.

## तक्ता ९.१५ मुंबई महानगर क्षेत्रात सुरु असलेल्या वाहतूक प्रकल्पांची सद्य:स्थिती

(₹ कोटी)

| प्रकल्पाचे नांव | प्रकल्प सुरु झाल्याचे वर्ष | प्रकल्पाची किंमत | डिसेंबर, २०१५ पर्यंतचा खर्च | सद्य:स्थिती | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| **मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प$ :** | | | | | |
| **टप्पा - २अ** : दहिसर - डी. एन. नगर (१८.६ किमी) | २०१५ | ६,४१० | -- | फेब्रुवारी, २०१६ पासून सुरु | मार्च, २०१९ |
| **टप्पा - ३** : कुलाबा - बांद्रे - सीप्झ (३३.५ किमी) | -- | २३,१३६ | १४०.०० | सर्वसाधारण सल्लागाराच्या नियुक्त, स्थापत्य कामाच्या निविदेचे काम प्रगतिपथावर | २०२०-२१ |
| **टप्पा - ४ :** वडाळा - घाटकोपर - ठाणे - कासारवडवली (३२ किमी) | -- | १९,१०० | -- | सुसाध्य अभ्यासाचा अहवाल सादर | उना |
| **टप्पा - ७ :** अंधेरी (पू.) - दहिसर (पू.) (१६.५ किमी) | -- | ६,२०८ | -- | अंतरिम सल्लागाराच्या नियुक्तिचे काम प्रगतिपथावर | मार्च, २०१९ |
| **मुंबई मोनो रेल प्रकल्प :** वडाळा ते चेंबूर आणि संत गाडगेमहाराज चौक (जेकब सर्कल) ते वडाळा (२० किमी) | २००८ | २,४६० | २,२६१.०० | टप्पा १ पूर्ण, टप्पा २ संत गाडगेमहाराज चौक (जेकब सर्कल) ते वडाळा ९० टक्के काम पूर्ण | २०१६ |
| **एमयूआयपी :** रस्ते, उड्डाणपूल, भुयारी मार्ग, इ. | २००३ | ३,२०७ | ४,६८३.५४ | वांद्रे-कुर्ला संकुल ते पूर्व द्रुतगती महामार्ग यांच्या दरम्यान उन्नत मार्गाचे काम वांद्रे-कुर्ला संकुल येथे सुरु करण्यात आले आहे. उर्वरीत सर्व कामे पूर्ण झाली असून संबंधितांकडे हस्तांतरीत केली आहेत. | २०१७ |
| **विस्तारित एमयुआयपी :** एमयुआयपीचा पूरक प्रकल्प. | | | | | |
| **टप्पा - १ व २** :३५ उप प्रकल्प (२७६ किमी रस्ते, १४ उड्डाणपूल, ३ खाडीपूल व २ रेल्वे मार्गावरील पूल) हाती घेण्यात आले आहेत. | २००७ | २,६०७ | १,८३५.९०† | २१४ किमी रस्ते व सात उड्डाणपूल पूर्ण, उर्वरित कामे प्रगतीपथावर | मे, २०१८ |
| **टप्पा - ३** : १७ उप प्रकल्प (३२ पूल, ३ भुयारी मार्ग व १३३ किमी रस्ते) | | ३,६२९ | | पाच उप प्रकल्पाची कामे सुरु असून, उर्वरित उप-प्रकल्पांचे प्राथमिक काम प्रगतीपथावर | मे, २०१८ |
| **मल्टी मोडल कॉरिडोर विरार ते अलिबाग :** वाहनांसाठी ८ मार्गिका व फक्त बसेस करिता राखीव मार्गिका असलेला खुला मार्ग बांधणे (१४० किमी) | २०१० | ९,५००@ | ६.२६ | प्राथमिक काम प्रगतीपथावर | २०१९ |
| **मुंबई ट्रान्स हार्बर लिंक :** शिवडी ते न्हावा सागरी सेतू (२२ किमी) | २०११ | ११,३७० | ७.९५ | प्राथमिक काम प्रगतीपथावर | २०२१ |

एमयूटीपी मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प, एमयुआयपी मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प, @ भूसंपादनावरील खर्च वगळून उना उपलब्ध नाही
$ टप्पा-१: वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर (१४ किमी) चे काम पूर्ण † टप्पा-३ सह *आधार*: मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण

# भूपृष्ठ वाहतूक

## मोटार वाहने

९.२८ राज्यात १ जानेवारी, २०१६ रोजी एकूण २.७ कोटी मोटार वाहने (दर लाख लोकसंख्येमागे २३,००९ वाहने) वापरात होती, जी मागील वर्षाच्या तुलनेत आठ टक्क्यांनी जास्त होती. राज्यातील एकूण वाहनांपैकी २७.३ लाख (१०.१ टक्के) वाहने बृहन्मुंबईत होती. राज्यात प्रति किमी रस्त्यावरील वाहनांची सरासरी संख्या ९० आहे. वापरात असलेल्या मोटार वाहनांची प्रकारनिहाय संख्या तक्ता ९.१६ मध्ये आणि वापरात असलेल्या मोटार वाहनांची वर्षनिहाय मालिका परिशिष्ट ९.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१६ वापरात असलेल्या मोटार वाहनांची प्रकारनिहाय संख्या**

('०००)

| प्रकार | १ जानेवारी रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र # | | | बृहन्मुंबई | | |
| | २०१५ | २०१६* | शेकडा बदल | २०१५ | २०१६* | शेकडा बदल |
| दुचाकी (मोटार सायकली, स्कूटर्स, मोपेड्स) | १८,१५१.४ | १९,७०५.५ | ८.६ | १,४१६.५ | १,५६६.३ | १०.६ |
| ऑटो रिक्षा | ७१९.३ | ७२४.१ | ०.७ | १२४.३ | १२८.६ | ३.४ |
| हलकी मोटार वाहने (कार, जीप्स, स्टेशन वॅगन्स व टॅक्सी) | ३,७४९.८ | ४,०५३.४ | ८.१ | ८६८.७ | ९४७.० | ९.० |
| बसेस (स्टेज कॅरेजेस, कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेस, स्कुल बसेस आणि पीएसव्ही) | ११५.५ | ११६.० | ०.५ | १२.७ | १३.५ | ६.१ |
| माल मोटारी {आर्टीक्युलेटेड/मल्टी एँक्सल वाहने, ट्रक्स व लॉरीज, टँकर्स, डिलेव्हरी व्हॅन्स (३ व ४ चाकी), इ.} | १,३३८.२ | १,४२०.० | ६.१ | ६६.७ | ७१.३ | ६.७ |
| ट्रॅक्टर्स | ५५७.६ | ५९९.१ | ७.४ | ०.२ | ०.२ | नगण्य |
| ट्रेलर्स | ३७०.५ | ३८२.६ | ३.३ | ०.१ | ०.१ | नगण्य |
| रूग्णवाहिका | १३.६ | १४.३ | ४.९ | १.५ | १.६ | ५.३ |
| इतर वाहने | ४३.६ | ४९.५ | १३.५ | १.२ | १.२ | नगण्य |
| **एकूण** | **२५,०५९.५** | **२७,०६४.५** | **८.०** | **२,४९२.०** | **२,७२९.८** | **९.५** |

*आधार :* परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी # बृहन्मुंबईसह पीएसव्ही सार्वजनिक सेवा वाहने

९.२९ मार्च, २०१५ अखेर मोटार वाहने चालविण्याच्या वैध परवान्यांची संख्या तीन कोटी होती जी मागील वर्षाच्या तुलनेत ५.९ टक्क्यांनी जास्त आहे. राज्यात २०१४-१५ मध्ये १९.७ लाख शिकाऊ परवाने देण्यात आले.

९.३० "रस्ता सुरक्षा-आता वेळ कृती करण्याची" या ब्रीद वाक्यासह जानेवारी, २०१६ मध्ये रस्ता सुरक्षा पंधरवडा पाळण्यात आला. ब्रीद वाक्याच्या अनुषंगाने राज्यामध्ये रस्ता सुरक्षाविषयक विविध पथनाट्ये आणि व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. राज्यात आणि बृहन्मुंबईत प्रति दहा हजार वाहनांमागे २०१५ मध्ये झालेल्या अपघातांची संख्या अनुक्रमे २४ व ८६ होती. राज्य व बृहन्मंबईतील अपघात, मृत व जखमी व्यक्तींविषयक आकडेवारी तक्ता ९.१७ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.६ : महाराष्ट्र व बृहन्मुंबईतील अपघात आणि मृत व जखमी व्यक्तींची संख्या**



**तक्ता ९.१७ राज्य व बृहन्मुंबईतील अपघात, मृत व जखमी व्यक्ती विषयक आकडेवारी**

| वर्ष | अपघातांची संख्या | | | मृत व्यक्तींची संख्या | | | जखमी व्यक्तींची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | राज्य# | बृहन्मुंबई | टक्केवारी@ | राज्य# | बृहन्मुंबई | टक्केवारी@ | राज्य# | बृहन्मुंबई | टक्केवारी@ |
| २०११ | ६८,४३८ | २५,४७१ | ३७.२ | १३,०५७ | ५६३ | ४.३ | ४५,६१६ | ५,०५९ | ११.१ |
| २०१२ | ६६,३१६ | २४,५९२ | ३७.१ | १३,३३३ | ४८८ | ३.७ | ४३,८४७ | ४,५४३ | १०.४ |
| २०१३ | ६१,८९० | २३,५१२ | ३८.० | १२,१९४ | ४९६ | ४.१ | ४१,१०६ | ४,२५० | १०.३ |
| २०१४ | ६१,६२७ | २२,५५७ | ३६.६ | १२,८०३ | ५२९ | ४.१ | ४०,४५५ | ३,९३६ | ९.७ |
| २०१५ | ६३,८०५ | २३,३४७ | ३६.६ | १३,२१२ | ५२० | ३.९ | ३९,६०६ | ४,०३७ | १०.२ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मोटार वाहतूक सांख्यिकी @ बृहन्मुंबईची राज्याशी टक्केवारी # बृहन्मुंबईसह

# सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक सुविधा

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

९.३१ महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन (मरामाप) महामंडळाने २०१४-१५ या वर्षात प्रतिदिन सरासरी ६७.२८ लाख प्रवासी वाहतूक केली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत सार्थ किमी वाहतूक सुमारे १.९ (सवलतीच्या रक्कमेसह) टक्क्यांनी वाढली असून मार्गस्थ गाड्यांचे सरासरी भारमान १.३ टक्के अंकानी कमी झाले आहे. मरामाप महामंडळातर्फे सेवा पुरविण्यात आलेली खेडी आणि लोकसंख्येची टक्केवारी तक्ता ९.१८ मध्ये दिली आहे. मरामाप महामंडळाची वाहतूक विषयक आकडेवारी तक्ता ९.१९ आणि वाहनांच्या अपघातांची आकडेवारी व मरामाप महामंडळाने दिलेली भरपाई तक्ता ९.२० मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१८ मरामाप महामंडळातर्फे सेवा पुरविण्यात आलेली गांवे आणि लोकसंख्येची टक्केवारी**

| तपशील | गावे | | लोकसंख्या | |
|---|---|---|---|---|
| | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१३-१४ | २०१४-१५ |
| थेट | ७३.० | ७३.८ | ९०.९ | ९०.४ |
| ३ किमी पर्यंत | १६.७ | १६.४ | ५.९ | ६.३ |
| ३ ते ५ किमीपर्यंत | ६.१ | ५.६ | १.९ | १.९ |
| ५ किमी पेक्षाअधिक | ४.२ | ४.२ | १.३ | १.४ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

**तक्ता ९.१९ मरामाप महामंडळाची वाहतूक विषयक आकडेवारी**

| बाब | २०१३-१४ | २०१४-१५ | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| एकूण वाहने | १८,०५५ | १७,९५६ | (-) ०.५ |
| मार्गस्थ बसगाड्यांची प्रतिदिन सरासरी संख्या | १६,४३७ | १६,६२५ | १.१ |
| एकूण कर्मचारी | १,०७,७०९ | १,०७,५०० | (-) ०.२ |
| प्रतिदिन सरासरी सार्थ किमी (लाख) | ५६.०७ | ५७.१२ | १.९ |
| प्रवाशांची प्रतिदिन सरासरी संख्या (लाख) | ७०.२२ | ६७.२८ | (-) ४.२ |
| वाहन उत्पादकता (किमी) | ३१०.५४ | ३१८.०९ | २.४ |
| प्रति दहा लिटर डिझेल मागे किमीचे प्रमाण | ४७.६९ | ४७.६३ | (-) ०.१ |
| चालक-वाहक उत्पादकता (किमी) | २२६.५१ | २२७.६१ | ०.५ |
| प्रति वाहन कर्मचाऱ्यांचे प्रमाण (नियताप्रमाणे) (दि. ३१ मार्च रोजी) | ६.५२ | ६.४४ | (-) १.२ |
| सरासरी आसन क्षमता | ४४.०८ | ४३.९५ | (-) ०.३ |
| भारमान (लोड फॅक्टर टक्के) (सवलतीच्या रक्कमेशिवाय) | ५८.२८ | ५७.१६ | (-) १.१@ |
| भारमान (लोड फॅक्टर टक्के) (सवलतीच्या रक्कमेसह) | ७२.१८ | ७०.८६ | (-) १.३@ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ @ अंक

**तक्ता ९.२० अपघातांची संख्या व मरामाप महामंडळाकडून दिलेली भरपाई**

| तपशील | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
|---|---|---|---|---|---|
| अपघातांची संख्या | ३,४०७ | ३,४३७ | ३,०७८ | ३,१५४ | ३,१७२ |
| मृत व्यक्तींची संख्या | ५४७ | ५७० | ४४५ | ५३३ | ४९४ |
| जखमी व्यक्तींची संख्या | ६,५२३ | ७,०६२ | ६,१६३ | ६,३६६ | ६,२७६ |
| दर लाख किमी मागे अपघात | ०.१८ | ०.१७ | ०.१५ | ०.१५ | ०.१५ |
| घटनास्थळी दिलेली रक्कम (₹ लाख) | ३२.०० | ३९.५९ | ४९.९३ | ३७.२७ | ६२.५७ |
| अंतिम भरपाई (₹ लाख) | ३,५४९.२० | ४,३८८.०० | ४,०२२.८१ | ३,७७८.२१ | ४,६०७.२४ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

९.३२ नियमित वाहतुकी शिवाय मरामाप महामंडळ यात्रा व नैमित्तिक करार तत्वावर विशेष वाहतूक सेवा पुरविते. यात्रा व नैमित्तिक करारांची वाहतूक विषयक माहिती तक्ता ९.२१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२१ यात्रा व नैमित्तिक करारांची वाहतूक विषयक आकडेवारी**

| तपशील | यात्रा | | नैमित्तिक करार | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०१३-१४ | | | २०१४-१५ | | |
| | २०१३-१४ | २०१४-१५ | सवलतीचे | विना-सवलतीचे | एकूण | सवलतीचे | विना-सवलतीचे | एकूण |
| सार्थ किमी (लाख) | १९७.४२ | १९९.४९ | १२८.०७ | ८९.९९ | २१८.०६ | १३६.८० | १०८.८५ | २४५.६५ |
| मिळालेले उत्पन्न (₹ लाख) | ५,७७३.५८ | ६,१५०.१२ | २,९८१.७३ | ४,२९६.१७ | ७,२७७.९० | ३,४२९.७७ | ६,५५४.७३ | ९,९८४.५० |
| प्रति किमी उत्पन्न (₹) | २९.२५ | ३०.८३ | २३.२८ | ४७.७४ | ३३.३८ | २५.०७ | ६०.२२ | ४०.६४ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

९.३३ मरामाप महामंडळ विद्यार्थी, वरिष्ठ नागरिक (६५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेले), कॅन्सरचे रुग्ण, स्वातंत्र्यसैनिक, इ. प्रवाशांना बस भाड्यात सवलत देते. सवलतीच्या रकमेची प्रतिपूर्ती राज्य शासनाकडून केली जाते. सन २०१४-१५ मध्ये मरामाप महामंडळाने ₹ १,३३४ कोटी रक्कमेची सवलत दिलेली आहे. मरामाप महामंडळाची वित्तीय स्थिती तक्ता ९.२२ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.७ : मरामापम-प्रति किमी मिळकत (₹) आणि प्रति किमी खर्च (मागील ताळमेळासह) (₹)**




**तक्ता ९.२२ मरामाप महामंडळाची वित्तीय स्थिती**

(₹ कोटी)

| तपशील | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
|---|---|---|---|
| (अ) प्राप्ती | | | |
| प्रवासी महसूल | ५,९२१.०७ | ६,५१९.८४ | ७,०६१.६९ |
| इतर महसूल | १७४.७२ | २१७.७० | १९६.९७ |
| **एकूण** | **६,०९५.७९** | **६,७३७.५४** | **७,२५८.६६** |
| (ब) खर्च | | | |
| प्रवासी, मोटार वाहने, महापालिका कर व जकात | ७९६.९७ | ८६२.९८ | ९३२.८५ |
| घसारा | ३६४.५७ | ४०८.१७ | ३७२.९५ |
| इतर | ५,३२२.४२ | ६,०६०.५९ | ६,५९४.४६ |
| **एकूण** | **६,४८३.९६** | **७,३३१.७४** | **७,९००.२६** |
| नफा (अ - ब) | (-) ३८८.१७ | (-) ५९४.२० | (-) ६४१.६० |
| मागील ताळमेळ | (-) ४०.६६ | २१.५५ | २५०.६० |
| निव्वळ नफा | (-) ४२८.८३ | (-) ५७२.६५ | (-) ३९१.०० |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

९.३४ मरामाप महामंडळात ३१ मार्च, २०१५ रोजी केंद्र व राज्य शासनाचे भागभांडवल अनुक्रमे ₹ ५६.७७ कोटी व ₹ १,३४१.२१ कोटी होते.

९.३५ मरामाप महामंडळाने सन २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ (डिसेंबर अखेर) मध्ये अनुक्रमे ₹ १३३ कोटी, ₹ १४६ कोटी व ₹ ९३ कोटी टोल रक्कम अदा केली.

९.३६ सन २०१४-१५ मध्ये मरामाप महामंडळाचे एकूण उत्पन्न व खर्च दोन्हीही मागील वर्षापेक्षा सुमारे ७.७ टक्क्यांनी जास्त होते. ग्रामीण, वातानुकूलित व शहरी वाहतुकीच्या प्रवासी उत्पन्नावर ३१ मार्च, २०१५ रोजी प्रवासी कराचा दर अनुक्रमे १७.५ टक्के, ५.५ टक्के व ३.५ टक्के होता. राज्य शासनाने एप्रिल, २००० पासून ग्रामीण सेवेवरील देय प्रवासी करापैकी ५.५ टक्के प्रवासी कर प्रतिवर्षी ६ टक्के दराने व्याज देय भांडवली अंशदान म्हणून ठेवून घेण्यास मरामाप महमंडळास परवानगी दिलेली आहे. यामुळे एप्रिल, २००९ ते मार्च, २०१५ पर्यंत महामंडळास व्याज देय भांडवली अंशदान म्हणून ₹ १,३८०.३३ कोटी प्राप्त झालेले आहेत. राज्य शासनाने १ एप्रिल, २०१२ पासून व्याज देय भांडवली अंशदानावर सहा टक्के व्याज आकारणी बंद केली आहे.

## शहरी सार्वजनिक वाहतूक

९.३७ सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक व्यवस्था हे शहरातील वाहतुकीचे प्रमुख साधन आहे. राज्यातील २२ शहरात ही सुविधा उपलब्ध आहे. यापैकी सात शहरांत (औरंगाबाद, नांदेड, नाशिक, सांगली-मिरज, रत्नागिरी, चंद्रपूर आणि वसई-विरार-नालासोपारा) मरामाप महामंडळ वाहतूक सेवा पुरविते. बृहन्मुंबईत बेस्ट, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात पुणे महानगर परिवहन महामंडळ आणि उर्वरित १३ शहरात संबंधित नगरपरिषद/ महानगरपालिका वाहतूक सेवा पुरवितात. शहरी सार्वजनिक वाहतूक विषयक आकडेवारी तक्ता ९.२३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२३ शहरी सार्वजनिक वाहतूक विषयक आकडेवारी**

(३१ मार्च रोजी)

| वाहतूक सेवा पुरविणारी यंत्रणा | मार्गस्थ बसेसची प्रतिदिन सरासरी संख्या | | प्रतिदिन सरासरी प्रवासी वाहतूक (लाख) | | प्रतिदिन सरासरी सार्थ वाहतूक (लाख किमी) | | निव्वळ नफा /तोटा (₹ लाख) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१४ | २०१५ | २०१४ | २०१५ | २०१४ | २०१५ | २०१४ | २०१५ |
| बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) | ३,७५३ | ३,६३६ | ३५.८० | ३३.४७ | ६.९९ | ६.६८ | (-)५९,०३८ | (-)८५,८०२ |
| पुणे महानगर परिवहन महामंडळ | १,२९५ | १,३६४ | ११.६४ | १२.१७ | ३.०० | ३.१४ | (-)९,९४१ | (-)१६,७६९ |
| मरामाप महामंडळ (शहर वाहतूक) | ४९७ | ४८२ | ३.०३ | २.४४ | ०.९७ | ०.९१ | (-)२,३९७ | (-)२,६८८ |
| नागपूर महानगरपालिका परिवहन | २४० | २४० | १.३१ | १.३५ | ०.४५ | ०.४२ | (-)२,४८८ | (-)२,५३४ |
| नवी मुंबई महानगरपालिका परिवहन | २२२ | २४३ | २.०४ | २.१९ | ०.६३ | ०.६७ | (-)२,१३२ | (-)३,२०९ |
| ठाणे महानगरपालिका परिवहन | १८९ | १७४ | २.०१ | १.७१ | ०.३९ | ०.३४ | (-)२,७३३ | (-)३,७९६ |
| कोल्हापूर महानगरपालिका परिवहन | १२० | ९२ | ०.९८ | ०.७१ | ०.२९ | ०.२१ | (-)८६ | उना |
| वसई-विरार महनगरपालिका परिवहन | १०५ | ११० | ०.९४ | ०.९६ | ०.२१ | ०.२२ | (-)१७७ | (-)३९६ |
| कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन | ७१ | ७५ | ०.४६ | ०.४० | ०.१३ | ०.१३ | (-)५०७ | (-)१,७६४ |
| सोलापूर महानगरपालिका परिवहन | ६७ | ६९ | ०.४५ | ०.४८ | ०.१५ | ०.१६ | (-)७६७ | (-)३७८ |
| मिरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन | ४७ | ३९ | ०.४८ | ०.२४ | ०.११ | ०.०९ | (-)४० | (-)२१६ |
| अमरावती महानगरपालिका परिवहन | ३३ | ३३ | ०.०३ | ०.०३ | ०.०८ | ०.०८ | ७ | ७ |
| अहमदनगर महानगरपालिका परिवहन | -- | १८ | -- | ०.११ | -- | ०.०२ | -- | (-)७२ |
| खोपोली नगरपालिका परिवहन | २१ | १७ | ०.१७ | ०.१७ | ०.०३ | ०.०३ | (-)नगण्य | (-)नगण्य |
| जळगाव महानगरपालिका परिवहन | १० | ५ | ०.०३ | ०.०१ | ०.०२ | ०.०१ | उना | उना |
| अकोला महानगरपालिका परिवहन | १० | † | ०.०७ | † | ०.०२ | † | (-)२८ | † |

उना उपलब्ध नाही † २०१५-१६ पासून वाहतूक सेवा बंद

*आधार :* बेस्ट, संबंधित नगरपालिका, महानगरपालिका, पुणे महानगर परिवहन महामंडळ व मरामाप महामंडळ

## रेल्वे

९.३८ भारतात रेल्वे ही अतिशय परिणामकारक अशी मोठ्या प्रमाणावरील वाहतूक व्यवस्था आहे. प्रवासी व मालवाहतूक ही रेल्वेची दोन प्रमुख अंगे आहेत. राज्यातील लोहमार्गाची ३१ मार्च, २०१५ रोजी एकूण लांबी ६,१०३ किमी (३७८ किमी कोकण रेल्वेसह) होती. ती भारतातील एकूण ६६,०३० किमी लांबीच्या ९.२ टक्के एवढी होती. राज्यात सुरु असलेल्या रेल्वे कामांची स्थिती तक्ता ९.२४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२४ राज्यातील सुरु असलेल्या रेल्वे कामांची सद्य:स्थिती**

(३१ जानेवारी, २०१६ रोजी)

| मार्गाचे नांव | मार्गाची लांबी (किमी) | प्रकल्पाची एकूण किंमत (₹ कोटी) | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|
| अहमदनगर-नारयणडोह-बीड-परळी-वैजनाथ | २६१ | २,७८६.१८ | अहमदनगर-नारयणडोह ११.६ किमी रुळ जोडणीचे काम पूर्ण, उर्वरित काम प्रगतीपथावर |
| बारामती - लोणंद (नवीन मार्ग) | ५४ | १३८.४८ | लोणंद-फलटण २७ किमी चे काम पूर्ण, उर्वरित पैकी ५० टक्के पूर्ण |
| बेलापूर - सीवूड- उरण (नवीन मार्ग) | २७ | २,२९८.६१ | १५ टक्के |
| वर्धा - नांदेड (नवीन मार्ग) | २८४ | ३,०००.३५ | १० टक्के |
| पनवेल - पेण (दुपदरीकरण) | ३५ | २६०.१६ | पूर्ण |
| पेण - रोहा (दुपदरीकरण) | ४० | २०३.०० | पेण-कासु १४ किमी चे काम पूर्ण, उर्वरित पैकी ९३ टक्के पूर्ण |
| गोधानी-कलमुना (दुपदरीकरण) | १३ | ५९.१३ | ६५ टक्के |
| कल्याण-कसारा ३ रा मार्ग (दुपदरीकरण) | ६८ | २७९.७० | ५ टक्के |
| भुसावळ-जळगांव ३ रा मार्ग (दुपदरीकरण) | २४ | १८४.०६ | १० टक्के |
| वर्धा-सेवाग्राम-नागपूर ३ रा मार्ग (दुपदरीकरण) | ७६ | २९७.८५ | १० टक्के |

*आधार :* दक्षिण पूर्व, मध्य, दक्षिण मध्य व पश्चिम रेल्वे आणि कोंकण रेल्वे महामंडळ

## मुंबई उपनगर रेल्वे

९.३९ उपनगरीय रेल्वे हे मुंबईमध्ये सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे प्रमुख साधन आहे. मुंबईची उपनगरीय रेल्वे सेवा पश्चिम रेल्वे (३६ स्थानके) आणि मध्य रेल्वे (६२ स्थानके) यांद्वारे चालविली जाते. हार्बर मार्गावर ३८ स्थानके असून हा मध्य रेल्वेचा भाग आहे. दर दिवशी एकूण २०५ गाड्या २,८११ फेऱ्यांद्वारे ७९.४ लाख प्रवाशांची ने-आण करतात. उपनगरी रेल्वे गाड्यांची वर्षनिहाय संख्या तक्ता ९.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२५ उपनगरी रेल्वे गाड्यांची वर्षनिहाय संख्या**

| वर्ष | ९ डब्बे | १२ डब्बे | १५ डब्बे | एकूण |
|---|---|---|---|---|
| २०११-१२ | ४७ | १४७ | १ | १९५ |
| २०१२-१३ | ४१ | १५७ | ३ | २०१ |
| २०१३-१४ | ३७ | १६५ | ३ | २०५ |
| २०१४-१५ | ३७ | १६५ | ३ | २०५ |

*आधार :* मुंबई रेल्वे विकास महामंडळ

९.४० मुंबई रेल्वे विकास महामंडळ, एमयुटीपी II मधील रेल्वे मार्गाची कामे करीत आहे. एमयुटीपी II अंतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पांची सद्य:स्थिती तक्ता ९.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२६ एमयुटीपी- II अंतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पांची सद्य:स्थिती**

(३१ ऑक्टोबर, २०१५ रोजी)

| प्रकल्पाचे नाव | काम सुरु झाल्याचे वर्ष | अंदाजित किंमत (₹ कोटी) | खर्च (₹ कोटी) | भौतिक प्रगती | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| सीएसटी-कुर्ला दरम्यान अतिरिक्त ५वा व ६वा मार्ग | २००८-०९ | ८९१ | १६.५५ | काम प्रगतीपथावर | मार्च, २०२१ |
| ठाणे-दिवा दरम्यान अतिरिक्त ५वा व ६वा मार्ग | २००८-०९ | २८८ | १८९.८१ | ६९ टक्के | २०१७ |
| मुंबई सेंट्रल-बोरीवली दरम्यान अतिरिक्त ६वा मार्ग | २००८-०९ | ९१९ | १५९.९७ | १७ टक्के | मार्च, २०१९ |
| अंधेरी - गोरेगाव दरम्यान हार्बर मार्गाचा विस्तार | २००८-०९ | १५४ | १६१.५८ | ७४ टक्के | जून, २०१६ |
| हार्बर मार्गावर १२ डब्यांची उपनगरी रेल्वे चालविणे | २०१२-१३ | | | | |
| अ) १५३ रेल्वे डब्यांची खरेदी | | ५१९ | -- | प्रक्रिया सुरु | २०१८ |
| ब) १२ डब्यांसाठी फलाटांची लांबी वाढविणे | | १९५ | ५५.५३ | ५५ टक्के | मार्च, २०१६ |

*आधार* : मुंबई रेल्वे विकास महामंडळ

## नवी मुंबई मेट्रो रेल प्रकल्प

९.४१ सिडकोने सहा मेट्रोरेल मार्गिकांचा टप्प्या-टप्प्याने विकास करण्याचे निश्चित केले आहे. पहिल्या टप्प्यातील सीबीडी बेलापूर-पेंधर-तळोजा एमआयडीसी-कळंबोली-खांदेश्वर-नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मार्गिकेचे काम तीन टप्प्यात अंमलात येईल. यापैकी, पहिल्या टप्प्याचे सीबीडी बेलापूर-पेंधर (११.१ किमी) चे काम प्रगतीपथावर असून याचा अंदाजित खर्च ₹ ३,०४३ कोटी आहे. डिसेंबर, २०१५ पर्यंत त्यावर ₹ ७९४.७० कोटी खर्च झाला आहे. सीबीडी बेलापूर-पेंधर (पहिला टप्पा) सन २०१७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

# जलवाहतूक

## मोठी बंदरे

९.४२ राज्यास ७२० किमी लांबीची समुद्र किनारपट्टी लाभली असून, त्यावर मुंबई पोर्ट ट्रस्ट (एमबीपीटी) व जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) द्वारे परिचालित केली जाणारी दोन मोठी बंदरे आहेत. सन २०१५-१६ मध्ये, जानेवारी पर्यंत एमबीपीटी व जेएनपीटी यांनी अनुक्रमे ५१४.०१ लाख मे.टन व ५३५.४७ लाख मे.टन मालाची वाहतूक केली. एमबीपीटीचे सन २०१४-१५ चे परिचालन अधिक्य ₹ ३३१.६८ कोटी होते जे मागील वर्षापेक्षा २.२ टक्क्यांनी कमी होते. जेएनपीटीचे वर्ष २०१४-१५ साठी परिचालन अधिक्य ₹ ८३६.५७ कोटी होते जे मागील वर्षापेक्षा १३.९ टक्क्यांनी जास्त होते. मोठया बंदरांची वाहतूक विषयक आकडेवारी तक्ता ९.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२७ मोठ्या बंदरांची वाहतूक विषयक आकडेवारी**

| बाब | एमबीपीटी | | शेकडा बदल | जेएनपीटी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१३-१४ | २०१४-१५ | | २०१३-१४ | २०१४-१५ | |
| एकूण माल वाहतूक क्षमता (लाख मे.टन) | ४९२.५० | ५०२.५० | २.० | ६५८.८० | ६५८.८० | ०.० |
| कर्मचारी संख्या | १२,०१७ | १०,८९७ | (-) ९.३ | १,६९७ | १,६६९ | (-) १.६ |
| माल वाहतूक (लाख मे.टन) | | | | | | |
| अ) आयात | ३८९.५० | ४०६.१६ | ४.३ | ३१३.०३ | ३४५.६८ | १०.४ |
| ब) निर्यात | २०२.३४ | २१०.४४ | ४.० | ३१०.३० | २९२.३३ | (-) ५.८ |
| **एकूण** | **५९१.८४** | **६१६.६०** | **४.२** | **६२३.३३** | **६३८.०१** | **२.४** |
| प्रवासी वाहतूक (हजारात) | २.९६ | ७.९२ | १६७.६ | लाना | लाना | लाना |
| बंदरात आलेल्या बोटींची संख्या | ४,६११ | ४,५८४ | (-) ०.६ | २,५२६ | २,६४२ | ४.६ |
| परिचालन उत्पन्न (₹ कोटी) | १,३०४.८८ | १,३९९.७८ | ७.३ | १,३४५.२९ | १,५०८.०८ | १२.१ |
| परिचालन खर्च (₹ कोटी) | ९६५.८२ | १,०६८.१० | १०.६ | ६११.०३ | ६७१.५१ | ९.९ |
| परिचालन अधिक्य (₹ कोटी) | ३३९.०६ | ३३१.६८ | (-) २.२ | ७३४.२७ | ८३६.५७ | १३.९ |

*आधार* : एमबीपीटी व जेएनपीटी लाना लागू नाही

## लहान बंदरे

९.४३ राज्याच्या सन २०१० च्या बंदर धोरणानुसार महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड (एमएमबी) सहा लहान बंदरे विकसित करीत आहे. या बंदरांपैकी धामणखोल-जयगड, दिघी आणि लवगण-जयगड (आंग्रे बंदर) ही बंदरे कार्यान्वित झाली आहेत. रेवस-आवरे, विजयदुर्ग आणि रेडी या बंदरांची बांधकाम पूर्व कामे प्रगतीपथावर आहेत. याशिवाय, लहान बंदरांच्या परिसरात अनेक बंदिस्त व बहुउद्देशीय थांबे असून तेथेदेखील मालाची वाहतूक केली जाते. सर्व लहान बंदरांनी मिळून सन २०१५-१६ मध्ये नोव्हेंबर पर्यंत १७०.३३ लाख मे.टन माल वाहतूक आणि ११३.५२ लाख प्रवासी वाहतूक केली. याशिवाय जयगड बंदराद्वारे ९५ कंटेनर टीईयुची वाहतूक झाली आहे. लहान बंदरांची वाहतूक विषयक माहिती तक्ता ९.२८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२८ लहान बंदरांची वाहतूक विषयक माहिती**

| बाब | २०१३-१४ | २०१४-१५ | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| **माल वाहतूक (लाख मे.टन)** | | | |
| अ) आयात | २१८.९९ | २३०.१३ | ५.१ |
| ब) निर्यात | २८.७५ | ४३.४५ | ५१.१ |
| **एकूण** | **२४७.७४** | **२७३.५८** | **१०.४** |
| **प्रवासी वाहतूक (लाख)** | | | |
| अ) यांत्रिकी बोटीतून | १६५.९९ | १६७.०३ | ०.६ |
| ब) बिगर - यांत्रिकी बोटीतून | १२.०२ | ११.३२ | (-)५.८ |
| **एकूण** | **१७८.०१** | **१७८.३५** | **०.२** |

*आधार* : महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड

## विमान वाहतूक

९.४४ राज्यात तीन आंतरराष्ट्रीय व आठ देशांतर्गत विमानतळे आहेत. विमानतळनिहाय प्रवासी व मालवाहतूक तक्ता ९.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२९ विमानतळनिहाय प्रवासी व माल वाहतूक**

(३१ मार्च रोजी)

| विमानतळ | प्रवासी वाहतूक (लाख) | | शेकडा बदल | माल वाहतूक (मे.टन) | | शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१४ | २०१५ | | २०१४ | २०१५ | |
| **देशांतर्गत** | | | | | | |
| मुंबई | २१८.८१ | २५२.०५ | १५.२ | १,८१,१०१ | २,०७,७२० | १४.७ |
| पुणे | ३४.९६ | ४०.६८ | १६.४ | २१,१३५ | २७,३९० | २९.६ |
| नागपूर | १२.२० | १३.५६ | ११.१ | ५,१०८ | ५,५९५ | ९.५ |
| औरंगाबाद | ४.४१ | ४.२४ | ३.९ | ८४३ | १,२५० | ४८.३ |
| कोल्हापूर | # | # | ५३५.० | ० | ० | ० |
| जुहू | १.६५ | १.५६ | (-)५.५ | ४१७ | ४०७ | (-)२.४ |
| नांदेड | ०.०७ | # | (-)९८.४ | ० | ० | ० |
| सोलापूर | ०.०० | ०.०२ | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | **२७२.१०** | **३१२.१२** | **१४.७** | **२,०८,६०४** | **२,४२,३६२** | **१६.२** |
| **आंतरराष्ट्रीय** | | | | | | |
| मुंबई | १००.९३ | ११२.०३ | ११.० | ४,६७,६४१ | ४,८६,५४० | ४.० |
| नागपूर | ०.४४ | ०.४५ | २.३ | ४१६ | ४३६ | ४.८ |
| पुणे | १.०१ | १.२३ | २१.८ | १० | ० | ० |
| औरंगाबाद@ | ०.०६ | ०.०२ | (-)६६.७ | ० | ० | ० |
| **एकूण** | **१०२.४४** | **११३.७३** | **११.०** | **४,६८,०६७** | **४,८६,९७६** | **४.०** |

*आधार* : भारतीय विमानतळ प्राधिकरण @ चार्टर्ड विमानाने प्रवासी वाहतूक # पाचशे पेक्षा कमी प्रवासी

९.४५ मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मर्यादित यांच्यासह भारतीय विमानतळ प्राधिकरणाने (एएआय) छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई (सीएसआयए) च्या आधुनिकीकरणांतर्गत एकात्मिक नवीन टी २ टर्मिनल बांधण्याचा महाप्रकल्प हाती घेतला आहे. नवीन टी २ टर्मिनल हे जागतिक दर्जाचे सुसज्ज टर्मिनल असून, त्यांची प्रतिवर्ष ४० दशलक्ष प्रवासी वाहतूक हाताळण्याची क्षमता आहे. नवीन टी २ टर्मिनलचे काम पूर्ण झाले असून, वाहतूक सुरु झाली आहे.

९.४६ ओझर विमानतळ, नाशिक येथून २०१४-१५ व २०१५-१६ (जानेवारी पर्यंत) मध्ये अनुक्रमे ४१,१५० मे. टन आणि ४२,७८३ मे. टन मालाची वाहतूक केली आहे.

९.४७ नागपूर येथील बहुआयामी आंतरराष्ट्रीय प्रवासी व कार्गो हब विमानतळ (मिहान) प्रकल्पामध्ये सध्याच्या विमानतळाला आंतरराष्ट्रीय प्रवासी व कार्गो हब विमानतळामध्ये विकसीत करण्याचा समावेश आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित (एमएडीसी) व एएआय यांच्या मिहान इंडीया लि. (एमआयएल) या संयुक्त भांडवली कंपनीद्वारे सदर प्रकल्प राबविण्यात येत आहे. मिहान इंडीया लि. ने डॉ. बाबासाहेब आबेंडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूरचे उन्नयन व आधुनिकीकरणास मदत करण्यासाठी सल्लागाराची निवड केली आहे.

९.४८ मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळावरील ताण कमी करण्यासाठी नवी मुंबई येथे सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर अतिरिक्त विमानतळ उभारण्याचे प्रस्तावित असून चार टप्प्यातील या प्रकल्पाचा अपेक्षित खर्च ₹ १६,७०४ कोटी आहे. पहिल्या टप्प्याचा प्रकल्प खर्च ₹ ७,२७७ कोटी आहे (उभारणीपूर्व ₹ ३,१४४ कोटी खर्चासह). पहिल्या टप्प्याचे काम २०१९ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित असून त्याची सुरुवातीची क्षमता प्रतिवर्ष १० दशलक्ष प्रवासी इतकी असेल.

९.४९ राज्य औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) रिलायन्स विमानतळ प्राधिकरणास ९५ वर्षाच्या भाडे कराराने विकास, सुधारणा, कार्यान्वयन, व्यवस्थापन व देखरेख करण्यासाठी नोव्हेंबर, २००९ पासून राज्यातील नांदेड, लातूर, उस्मानाबाद, यवतमाळ आणि बारामती ही पाच विमानतळे दिली आहेत. या विमानतळांवरून केवळ विमानांची अनियोजित उड्डाणे होतात, याद्वारे २०१४-१५ मध्ये २,६७४ प्रवासी वाहतूक झाली.

## दळणवळण

९.५० टपाल, दुरध्वनी, दृकश्राव्य व माहिती दूरसंचार हे दळणवळण व्यवस्थेचे प्रमुख घटक आहेत. डाक सेवेबाबतची आकडेवारी तक्ता ९.३० मध्ये दिली आहे.

९.५१ सप्टेंबर, २०१५ अखेर राज्यात एकूण दूरध्वनी जोडण्यांची संख्या ५१.११ लाख होती. दर लाख लोकसंख्येमागे दूरध्वनी व भ्रमणध्वनी जोडण्यांची संख्या अनुक्रमे ४,३०८ व ९२,७६६ होती. दूरध्वनी जोडण्या व भ्रमणध्वनींची आकडेवारी तक्ता ९.३१ मध्ये दिली आहे.

९.५२ राज्यात ३० सप्टेंबर, २०१५ रोजी इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या ४.३० कोटी होती. जी सर्व राज्यांच्या तुलनेत सर्वात जास्त आहे.

**तक्ता ९.३० डाक सेवेबाबतची आकडेवारी**

(संख्या)

| बाब | क्षेत्र | २०१३-१४ | २०१४-१५ |
|---|---|---|---|
| डाक कार्यालये | ग्रामीण | ११,३५५ | ११,३६२ |
| | नागरी | १,२४३ | १,२३९ |
| | **एकूण** | **१२,५९८** | **१२,६०१** |
| टपाल पेट्या | ग्रामीण | ४०,१९९ | ३५,५७० |
| | नागरी | ८,६२९ | ८,०८७ |
| | **एकूण** | **४८,८२८** | **४३,६५७** |
| डिलिव्हरी पोस्टमेन (ग्रामीण डाक सेवकांसह) | ग्रामीण | १९,०३४ | २१,१३४ |
| | नागरी | ६,४७४ | ६,१६१ |
| | **एकूण** | **२५,५०८** | **२७,२९५** |

*आधार :* मुख्य डाक कार्यालय, मुंबई

**तक्ता ९.३१ दूरध्वनी व भ्रमणध्वनी जोडण्या**

(लाख)

| सेवापुरवठादार | २०१३-१४ | | २०१४-१५ | | २०१५-१६+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | दूरध्वनी | भ्रमणध्वनी | दूरध्वनी | भ्रमणध्वनी | दूरध्वनी | भ्रमणध्वनी |
| एमटीएनएल | १९.४० | १०.६५ | १९.४२ | ११.७४ | १९.१७ | १२.५४ |
| बीएसएनएल | १८.८२ | ६५.८३ | १६.८२ | ५१.०७ | १६.१० | ५१.४१ |
| भारती | ४.२६ | १५१.२७ | ४.०९ | १६७.४६ | ४.१६ | १७५.११ |
| आयडीया/स्पाईस | -- | २२३.२६ | -- | २५७.९६ | -- | २६६.८० |
| रिलायंस | ३.३३ | १३१.६६ | ३.१९ | १०९.०४ | ३.२५ | १०३.५६ |
| टाटा | ७.८० | ९७.९८ | ८.०६ | १०३.१३ | ८.१६ | ९७.९१ |
| वोडाफोन | ०.१३ | २३०.४१ | ०.२२ | २५८.६८ | ०.२७ | २६४.६५ |
| एअरसेल-डिशनेट | -- | ३४.६३ | -- | ४३.२९ | -- | ५१.३३ |
| टेलेविंग्स/टेलेनॉर | -- | ६०.१३ | -- | ७३.५० | -- | ७७.२८ |
| लूप | -- | २८.९६ | -- | -- | -- | -- |
| **एकूण** | **५३.७४** | **१,०३४.७८** | **५१.८०** | **१,०७५.८७** | **५१.११** | **१,१००.५९** |

*आधार :* टेलिफोन रेग्यूलेटरी ॲथॉरिटी ऑफ इंडिया + सप्टेंबरपर्यंत

* * * * *

## परिशिष्ट ९.१

## राज्यातील विजेचा पुरवठा व वापर

| बाब | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१४-१५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **अ. स्थापित क्षमता (मेगावॅट)** | | | | | | | |
| अ-१ राज्यातील स्थापित क्षमता- | | | | | | | |
| (१) औष्णिक | ४७७$ | १,०६५$ | २,७७१ | ६,४६२ | ८,०७५ | ९,६६५ | १८,४३६ |
| (२) नवीकरणीय ऊर्जा | -- | -- | -- | -- | -- | ३,४०८ | ६,७०७ |
| (३) जलजन्य | २८२ | ८४४ | १,३१७ | १,५५२ | २,८७४ | ३,०६६ | ३,०६६ |
| (४) नैसर्गिक वायुजन्य | -- | -- | -- | ६७२ | १,८२० | २,७१४ | ३,०७२ |
| **एकूण (अ-१). .** | **७५९** | **१,९०९** | **४,०८८** | **८,६८६** | **१२,७६९** | **१८,८५३** | **३१,२८१** |
| अ-२ स्थापित क्षमतेत महाराष्ट्राचा हिस्सा | | | | | | | |
| (१)राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २,०४८@ | ४,६८६ | ५,९३७ |
| (२)अणुशक्ती महामंडळ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | १३७ | ६९० | ६९० |
| **एकूण (अ-२)** | **उ.ना.** | **उ.ना.** | **उ.ना.** | **उ.ना.** | **२,१८५** | **५,३७६** | **६,६२७** |
| **एकूण (अ-१ + अ-२)** | **७५९** | **१,९०९** | **४,०८८** | **८,६८६** | **१४,९५४** | **२४,२२९** | **३७,९०८** |
| **ब. निर्मिती (दशलक्ष युनिट)** | | | | | | | |
| (१) औष्णिक | १,९०३$ | ३,३९२ | ११,४१६ | २८,०८५ | ४९,३७७ | ५२,७९६ | ८४,८८२ |
| (२) नैसर्गिक वायुजन्य | -- | -- | -- | २,७३० | ६,९४३ | १८,७२९ | ४,६२६ |
| (३) जलजन्य | १,३६५ | ४,५३३ | ६,४४८ | ५,६१५ | ४,८८९ | ६,३७४ | ५,८५६ |
| (४) नवीकरणीय ऊर्जा # | -- | -- | -- | -- | -- | ५,११८ | ८,४१५ |
| **एकूण . .** | **३,२६८** | **७,९२५** | **१७,८६४** | **३६,४३०** | **६१,२०९#** | **८३,०१७** | **१,०३,७७९** |
| **क. वापर (दशलक्ष युनिट)** | | | | | | | |
| (१) औद्योगिक | १,८५३ | ५,३१२ | ८,१३० | १४,७०६ | १८,३६३ | ३४,४१६ | ४१,५२२ |
| (२) घरगुती | २६० | ७३२ | १,७७९ | ५,०६५ | ११,१७२ | १९,५४६ | २५,४२८ |
| (३) कृषि | १५ | ३५६ | १,७२३ | ६,६०४ | ९,९४० | १६,२५७ | २६,४०७ |
| (४) वाणिज्यिक | १९८ | ५४७ | ९४९ | २,०६८ | ४,१०५ | ११,५२७ | १२,५०४ |
| (५) रेल्वे | ३३९ | ४२१ | ७६६ | ९७० | १,५८१ | २,१८८ | २,४४३ |
| (६) सार्वजनिक पाणी पुरवठा | ३५ | १४६ | ३३० | उ.ना. | १,१९९ | १,९८३ | २,६०० |
| (७) सार्वजनिक दिवाबत्ती | २० | ७४ | १५९ | २९१ | ५५१ | ८४६ | १,५८३ |
| (८) संकीर्ण | -- | ६२ | १९८ | २६७ | ३७८ | ६३३ | ३६८ |
| **एकूण . .** | **२,७२०** | **७,६५०** | **१४,०३४** | **२९,९७१** | **४७,२८९** | **८७,३९६** | **१,१२,८५५** |
| **ड. दरडोई विजेचा अंतिम वापर (युनिट)** | | | | | | | |
| (१) औद्योगिक | ४६.८ | १०५.४ | १२९.५ | १९५.४ | १९१.२ | ३०७.२ | ३५४.१ |
| (२) वाणिज्यिक | ५.० | १०.९ | १५.१ | २७.५ | ४२.७ | १०२.९ | १०६.६ |

*आधार* - (१) केंद्रीय विद्युत प्राधिकरण, भारत सरकार, नवी दिल्ली.
(२) महानिर्मिती
(३) महावितरण
(४)बेस्ट
(५) टाटा पॉवर
(६) रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर

टीप - (१) उपलब्ध आकडेवारी केवळ सार्वजनिक विद्युत व्यवसायी यंत्रणेची आहे.
(२) @ यात राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळ व अणुशक्ती महामंडळाकडील वाटप न झालेला तसेच गोवा राज्याचा शिलकी ३२३ मेगावॅटचा अतिरिक्त हिस्सा समाविष्ट आहे.
(३) # यात बंदिस्त वीज व नवीकरणीय ऊर्जेची (महावितरणला विकलेली) आकडेवारी समाविष्ट आहे.
(४) $ यात तेलजन्य ऊर्जेची आकडेवारी औष्णिक ऊर्जेत समाविष्ट आहे.
(५) टाटा पॉवर व रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर वगळून इतर खाजगी कंपन्यांची स्थापित क्षमता व निर्मिती सीइएच्या वेबसाईट अहवालानुसार दिली आहे.
(६) १ युनिट = एक किलो वॅट तास

उ.ना. - उपलब्ध नाही.

# परिशिष्ट ९.२

## महाराष्ट्र राज्यातील रस्त्यांची प्रकारांनुसार लांबी
## (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदा यांच्या देखभालीखालील)

(किमी)

| अ.क्र. | वर्ष | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | रस्ते | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रमुख जिल्हा | इतर जिल्हा | ग्रामीण | एकूण |
| (१) | (२) | (३) | | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | १९६५-६६ | २,३६४ | -- | १०,५२८ | १२,६२८ | ८,७४४ | १७,५२४ | ५१,७८८ |
| २ | १९७०-७१ | २,४४५ | -- | १४,२०३ | १७,६८४ | ११,०१२ | २०,०२० | ६५,३६४ |
| ३ | १९८०-८१ | २,९४५ | -- | १८,९४९ | २५,२३३ | २५,४०४ | ६८,६०० | १,४१,१३१ |
| ४ | १९९०-९१ | २,९५९ | -- | ३०,९७५ | ३८,९३६ | ३८,५७३ | ६१,५२२ | १,७२,९६५ |
| ५ | २०००-०१ | ३,६८८ | -- | ३३,२१२ | ४६,७५१ | ४३,६९६ | ८९,५९९ | २,१६,९४६ |
| ६ | २००५-०६ | ४,३६७ | -- | ३३,५७१ | ४८,९८७ | ४५,२२६ | ९९,२७९ | २,३१,४३० |
| ७ | २००६-०७ | ४,३६७ | -- | ३३,६७५ | ४९,१४७ | ४५,६७४ | १,००,८०१ | २,३३,६६४ |
| ८ | २००७-०८ | ४,३६७ | -- | ३३,८०० | ४९,३९३ | ४५,८८६ | १,०२,१४९ | २,३५,५९५ |
| ९ | २००८-०९ | ४,३६७ | -- | ३३,९३३ | ४९,६२१ | ४६,१४३ | १,०३,६०४ | २,३७,६६८ |
| १० | २००९-१० | ४,३७६ | -- | ३४,१०२ | ४९,९०१ | ४६,८१७ | १,०४,८४४ | २,४०,०४० |
| ११ | २०१०-११ | ४,३७६ | -- | ३४,१०३ | ४९,९३६ | ४६,८९७ | १,०६,४०० | २,४१,७१२ |
| १२ | २०११-१२ | ४,३७६ | -- | ३४,१५७ | ५०,२५६ | ४७,५२९ | १,०६,६०१ | २,४२,९१९ |
| १३ | २०१२-१३ | ४,३७६ | ६,६९४ | २७,५२८ | ५०,२५६ | ४७,५७३ | १,०६,७४५ | २,४३,१७२ |
| १४ | २०१३-१४ | ५,८५८ | ६,३३७ | ३३,९६३ | ५०,२३२ | ५२,७६१ | १,१४,५५७ | २,६३,७०८ |
| १५ | २०१४-१५ | ४,७६६ | ६,१६३ | ३३,८६० | ५०,५८५ | ५८,११५ | १,४५,८७९ | २,९९,३६८ |

*आधार* - सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

टीप - (१) १९८७ पर्यंतच्या रस्ते लांबीची विभागणी १९६१-८१ रस्ते विकास योजनेनुसार आणि १९८७-८८ पासून ही विभागणी १९८१-२००१ रस्ते विकास योजनेनुसार केली आहे .

(२) सन १९६५-६६ ते २०११-१२ करिता राज्य महामार्गात प्रमुख राज्य महामार्गाचा समावेश आहे.

(३) सन २०१२-१३ पासून रस्ते लांबीची विभागणी २००१-२१ रस्ते विकास योजनेनुसार आहे.

## परिशिष्ट ९.३

### जिल्हानिहाय रस्त्यांच्या लांबीचे रुंदीनुसार वर्गीकरण
### (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील)

(किमी)

| अ. | जिल्हा | साध्य लांबी २०१३-१४ | | | | | साध्य लांबी २०१४-१५ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | रूंदी (मीटर) | ७.०० | ५.५ | ३.७५ | इतर | एकूण | ७.०० | ५.५ | ३.७५ | इतर | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १ | बृहन्मुंबई | ४९ | ० | ० | ० | ४९ | ४९ | ० | ० | ० | ४९ |
| २ | ठाणे | ५८२ | ७७५ | २,०६९ | ४,१६४ | ७,५९० | ५८३ | ७७४ | ४,१४० | ४,१६० | ९,६५६ |
| ३ | रायगड | ७८१ | ४८० | १,७८७ | २,३७७ | ५,४२५ | ७८२ | ४८१ | २,६१४ | २,३६० | ६,२३७ |
| ४ | रत्नागिरी | ४१५ | ९९७ | ६,९४३ | ० | ८,३५५ | ४४९ | ८७२ | ८,०५३ | ० | ९,३७४ |
| ५ | सिंधुदुर्ग | १३२ | ७५२ | ४,७२२ | ० | ५,६०६ | १२० | ७१३ | ७,०७० | ० | ७,९०३ |
| | **कोकण** | **१,९५९** | **३,००४** | **१५,५२१** | **६,५४१** | **२७,०२५** | **१,९८२** | **२,८४०** | **२१,८७७** | **६,५२०** | **३३,२१९** |
| ६ | पुणे | ८६८ | १,१३९ | १४,२३१ | २२५ | १६,४६३ | ७८५ | १,२२७ | १६,६१४ | ६१ | १८,६८८ |
| ७ | सातारा | ३६३ | ८४८ | ७,८८६ | १,८५० | १०,९४७ | ३७१ | ९६९ | ८,८३८ | २,१७० | १२,३४८ |
| ८ | सांगली | ४०८ | ९३४ | ६,००१ | २,९०२ | १०,२४५ | ४०७ | १,०४५ | ६,४४९ | ४,२४७ | १२,१४७ |
| ९ | कोल्हापुर | ४५० | ९०० | ३,७५३ | २,६५५ | ७,७५८ | ४४८ | ८५९ | ३,७५९ | ३,५०१ | ८,५६६ |
| १० | सोलापूर | १,३९९ | १,०४८ | ९,४६७ | १,९०८ | १३,८२२ | १२१० | १,०७७ | ११,८५८ | २,९२८ | १७,०७३ |
| | **पश्चिम महाराष्ट्र** | **३,४८८** | **४,८६९** | **४१,३३८** | **९,५४०** | **५९,२३५** | **३,२२१** | **५,१७७** | **४७,५१८** | **१२,९०६** | **६८,८२२** |
| ११ | अहमदनगर | १,१५१ | १,०४७ | ९,२७६ | ३,५२५ | १४,९९९ | १,०५० | १,३०९ | १०,९८० | ७,३०४ | २०,६६२ |
| १२ | नाशिक | १,०७६ | १,१४९ | ८,०७९ | ३,६५८ | १३,९६२ | १,००३ | १,४८८ | ११,७०७ | ४,८२५ | १९,०२४ |
| १३ | धुळे | ३७१ | ५७७ | ४,००९ | १,२२४ | ६,१८१ | ३९० | ५३७ | ४,४८८ | १५६ | ६,६५८ |
| १४ | नंदुरबार | १०८ | ४३१ | ३,७९५ | १,४६० | ५,७९४ | १२१ | ४०४ | ४,७५६ | १,८१५ | ७,०९६ |
| १५ | जळगाव | ५७४ | १,१४० | ४,३११ | ५,२३८ | ११,२६३ | ५८९ | १,२७४ | ४,३४२ | ६,५२३ | १२,७२७ |
| | **उत्तर महाराष्ट्र** | **३,२८०** | **४,३४४** | **२९,४७०** | **१५,१०५** | **५२,१९९** | **३,१५४** | **५,०१२** | **३६,२७४** | **२०,६२४** | **६६,१६६** |
| १६ | औरंगाबाद | ५३४ | ५६२ | ६,१५५ | १,३६३ | ८,६१४ | ५४३ | ६३४ | ६,९२२ | २,०१५ | १०,११४ |
| १७ | जालना | २८६ | ४२४ | ४,५७४ | १,४६९ | ६,७५३ | २८६ | ४२४ | ४,९३७ | १,७५४ | ७,४०१ |
| १८ | परभणी | १८१ | ५०७ | ३,२९५ | ९२९ | ४,९१२ | १८१ | ५१३ | ३,७८९ | ९२९ | ५,४१२ |
| १९ | हिंगोली | २२० | १९० | ३,००५ | १७ | ३,४३२ | १३९ | १९१ | ३,५०५ | १७ | ३,८५२ |
| २० | बीड | ६८९ | ७१९ | ७,८१५ | १,३५१ | १०,५७४ | ४३९ | ७३३ | ८,३०६ | १,८४६ | ११,३२४ |
| २१ | नांदेड | ७६७ | ५९८ | ७,०३० | ३,४६७ | ११,८६२ | ७४८ | ५९८ | ७,५१९ | ३,४९७ | १२,३६२ |
| २२ | उस्मानाबाद | ४२७ | ७७३ | ३,८४७ | १,४७८ | ६,५२५ | ३८९ | ७८९ | ४,८३१ | १,४८८ | ७,४९७ |
| २३ | लातूर | ५२४ | ७४८ | ४,२१६ | १,१७० | ६,६५८ | ४०१ | ८३७ | ४,६३२ | १,६६५ | ७,५३५ |
| | **मराठवाडा** | **३,६२८** | **४,५२१** | **३९,९३७** | **११,२४४** | **५९,३३०** | **३,१२६** | **४,७१९** | **४४,४४१** | **१३,२११** | **६५,४९७** |
| २४ | बुलढाणा | ३४७ | ८०२ | २,६४४ | १,५६३ | ५,३५६ | ३४७ | ८२६ | २,६३५ | १,५८५ | ५,३९३ |
| २५ | अकोला | ३३६ | ४९१ | १,५४२ | ९६१ | ३,३३० | २८४ | ५०३ | १,५३३ | ९६८ | ३,२८८ |
| २६ | वाशिम | ३२९ | ४४७ | १,१३४ | १,११० | ३,०२० | २८२ | ४५० | १,११९ | १,११९ | २,९७० |
| २७ | अमरावती | ५२७ | ९२२ | १,८९३ | ४,८४१ | ८,१८३ | ५५५ | ९६५ | १,७९३ | ४,९०९ | ८,२२२ |
| २८ | यवतमाळ | ७७१ | ८८४ | ६,४०७ | ५०६ | ८,५६८ | ६४३ | ९२० | ४,३२७ | २,५२३ | ८,४१३ |
| | **अमरावती** | **२,३१०** | **३,५४६** | **१३,६२०** | **८,९८१** | **२८,४५७** | **२,१११** | **३,६६४** | **११,४०७** | **११,१०४** | **२८,२८६** |
| २९ | वर्धा | ३१९ | ४३९ | १,२२४ | २,१९४ | ४,१७६ | २८२ | ४२१ | १,२३१ | २,२९१ | ४,२२५ |
| ३० | नागपूर | ८३१ | ६४२ | ६,८९९ | ५४८ | ८,९२० | ७७५ | ६५२ | ३,०९९ | ४,१२२ | ८,६४७ |
| ३१ | भंडारा | ९८ | ३४३ | ४,५३५ | ३०९ | ५,२८५ | ९८ | ३४७ | ३,८२१ | ९६२ | ५,२२८ |
| ३२ | गोंदिया | १०९ | ३८९ | ४,४१५ | ६१७ | ५,५३० | ११३ | ४३१ | २,३२६ | २,६८३ | ५,५५२ |
| ३३ | चंद्रपुर | ३९२ | १,४४२ | २,३४५ | ३,६०५ | ७,७८४ | ३६२ | १,४८४ | २,३४५ | ३,६०० | ७,७९२ |
| ३४ | गडचिरोली | ४०९ | ५२९ | २,१३६ | २,६९३ | ५,७६७ | ४०३ | ६३१ | २,०४८ | २,८५३ | ५,९३५ |
| | नागपूर | **२,१५८** | **३,७८४** | **२१,५५४** | **९,९६६** | **३७,४६२** | **२,०३३** | **३,९६७** | **१४,८६९** | **१६,५१०** | **३७,३७८** |
| | **महाराष्ट्र** | **१६,८२३** | **२४,०६८** | **१,६१,४४०** | **६१,३७७** | **२,६३,७०८** | **१५,६२८** | **२५,३७९** | **१,७६,३८६** | **८०,८७५** | **२,९९,३६८** |

*आधार* - सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

## परिशिष्ट ९.४

## महाराष्ट्र राज्यातील वापरात असलेली मोटार वाहने

(१ जानेवारी रोजी )

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ | २०१५ | २०१६* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | मोटार सायकली, स्कूटर व मोपेड | ८३,९३० | ३,४६,८२६ | १६,९६,१५७ | ४४,०९,९०६ | १,२०,६०,९९० | १,८१,५१,३८६ | १,९७,०५,५११ |
| २ | मोटार गाड्या, जीप आणि स्टेशन वॅगन्स् | १,२२,५०८ | २,२४,७५२ | ४,२३,५०५ | ९,०१,२७८ | २३,८२,७८९ | ३५,४६,६५३ | ३८,३६,२९४ |
| ३ | टॅक्सी कॅब्ज | १७,८०६ | ३१,३०२ | ४३,१६८ | ८६,४३८ | १,८२,६७६ | २,०३,१८० | २,१७,०६२ |
| ४ | स्वयंचलित रिक्शा | ३,०४९ | २९,४७४ | १,२६,०४९ | ४,०७,६६० | ६,४४,०३७ | ७,१९,३४१ | ७,२४,०८० |
| ५ | स्टेज कॅरेजेस् | १०,२५० | १३,७८९ | १८,२०३ | २७,२८६ | ३४,०६१ | ३७,६३० | ३८,२१९ |
| ६ | कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेस | -- | १,४९८ | ३,९८० | १३,९७५ | ३१,४५९ | ३९,६६२ | ४३,७८२ |
| ७ | मालमोटारी - | | | | | | | |
| | (१) डिझेल इंजिन | ३४,९८७ | ८७,०७९ | १,८०,८८३ | ३,४१,३४४ | ८,७८,२३९ | १२,९६,११६ | १३,७५,५३८ |
| | (२) पेट्रोल इंजिन | २१,७९१ | १८,००५ | १३,७७४ | ५७,३१७ | ७७,१८९ | ३६,९६९ | ३९,०३६ |
| | (३ ) इतर (सीएनजी, एलपीजी, इ.) | -- | -- | -- | उ.ना. | उ.ना. | ५,०९४ | ५,४१७ |
| ८ | रुग्णवाहिका | ४४१ | ९२५ | २,२३३ | ४,०२५ | ९,६०० | १३,६२५ | १४,२९५ |
| ९ | शाळेच्या बसेस | ४९१ | ५९४ | १,०२५ | १,७१४ | ६,११७ | २७,०४६ | २२,४०२ |
| १० | खाजगी प्रवासी वाहने | ८१० | २,१७१ | ४,६२२ | ५,८१५ | ९,४२१ | ११,१६३ | ११,६४० |
| ११ | जोड वाहने (ट्रेलर) | ७,०७५ | २३,१७३ | ६०,८५८ | १,६७,८५६ | २,८४,६९६ | ३,७०,४५२ | ३,८२,५९१ |
| १२ | ट्रॅक्टर्स | ७,८२१ | २४,०७९ | ६१,०८८ | १,७२,५७८ | ३,५८,५५६ | ५,५७,६२२ | ५,९९,०९९ |
| १३ | इतर | ८१० | १,३१९ | ५,०४० | ९,८७२ | २९,८२९ | ४३,६१० | ४९,४८७ |
| | **एकूण** | **३,११,७६९** | **८,०४,९८६** | **२६,४०,५८५** | **६६,०७,०६४** | **१,६९,८९,६५९** | **२,५०,५९,५४९** | **२,७०,६४,४५३** |
| | दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या | ६१८ | १,३०९ | ३,३५३ | ७,१८६ | १५,११९ | २१,३७४ | २३,००९ |
| | दर किमी रस्तेलांबीमागे मोटार वाहनांची संख्या | ५ | ६ | १५ | ३१ | ७१ | ९५ | ९० |
| | दर लाख लोकसंख्येमागे रुग्णवाहिकांची संख्या | ०.९ | १.५ | २.८ | ४.४ | ८.५ | ११.६ | १२.० |

*आधार* - परिवहन आयुक्त, महाराष्ट्र शासन, मुंबई    * अस्थायी    उ.ना. उपलब्ध नाही.

# १०

# सामाजिक क्षेत्र

# १०. सामाजिक क्षेत्र

१०.१ अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी सामाजिक क्षेत्र हे एक महत्वाचे क्षेत्र असून यामध्ये मानवी संसाधनाच्या विकासात योगदान देणा-या घटकांचा समावेश होतो. शिक्षण, आरोग्य व वैद्यकीय सुविधा, पाणीपुरवठा व स्वच्छता, रोजगार इत्यादींचे मानव विकासात महत्वाचे योगदान असते. शाश्वत विकासासाठी नियोजनाचा हेतू दुर्बल, वंचित व नि:शक्त इत्यादी समाजातील घटकांना मदत करणे हा आहे.

## शिक्षण

१०.२ शिक्षणामुळे वैयक्तिक व सांघिक उत्कर्षाच्या संधी उपलब्ध होतात. कौशल्य व ज्ञान प्रदान करुन लोकांचे सबलीकरण करण्याचे शिक्षण हे महत्वाचे साधन आहे ज्याद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन परिणामी राज्याच्या आर्थिक विकासाला चालना मिळण्यास मदत होते. समान व सर्वसमावेशक दर्जेदार शिक्षण हे 'शाश्वत विकासाचे' शिक्षणविषयक लक्ष्य आहे. जनगणना २०११ नुसार साक्षरतेत राष्ट्रीय स्तरावर राज्याचा १२ वा क्रमांक असून साक्षरता दर ८२.३ टक्के आहे जो राष्ट्रीय स्तरावरील साक्षरतेच्या सरासरीपेक्षा (७३ टक्के) बराच जास्त आहे.

### शालेय शिक्षण

१०.३ शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी विद्यार्थ्यांना शिक्षणविषयक सुविधा नजिकच्या अंतरावर उपलब्ध असणे गरजेचे आहे. शैक्षणिक संस्था व त्यातील पटसंख्या तक्ता १०.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१ शैक्षणिक संस्था आणि त्यातील पटसंख्या**

(पटसंख्या आणि शिक्षकांची संख्या हजारात)

| शिक्षणाचा स्तर | २०१४-१५ | | | | | २०१५-१६* | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शाळांची संख्या | पटसंख्या एकूण | पटसंख्या पैकी मुली | शिक्षकांची संख्या | विशिप्र | शाळांची संख्या | पटसंख्या एकूण | पटसंख्या पैकी मुली | शिक्षकांची संख्या | विशिप्र |
| प्राथमिक (१ ली ते ८ वी) | १,०४,५५१ | १६,१७२ | ७,५७६ | ५०६ | ३१.९ | १,०५,४८९ | १६,०१७ | ७,५०९ | ५१५ | ३१.१ |
| माध्यमिक व उच्च माध्यमिक (९ वी ते १२ वी) | २४,४९७ | ६,१८१ | २,८२७ | २१९ | २८.२ | २५,०१३ | ६,४१४ | २,९२० | २२१ | २९.१ |

आधार : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई * अस्थायी विशिप्र – विद्यार्थी शिक्षक प्रमाण

## सर्व शिक्षा अभियान

१०.४ सर्व शिक्षा अभियान हा केंद्र शासनाचा फ्लॅगशीप कार्यक्रम असून राज्यांच्या सहाय्याने शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण साध्य करण्यासाठी हा कार्यक्रम कालबध्द पध्दतीने राबविण्यात येत आहे. ज्या लोकवस्त्यांच्या ठिकाणी शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी नवीन शाळा बांधणे आणि असलेल्या शाळांत अतिरिक्त वर्गखोल्या, प्रसाधनगृहे, पेयजल, इत्यादी पायाभूत सुविधा पुरवून या कार्यक्रमाद्वारे बळकटीकरण करण्यात येत आहे. सर्व शिक्षा अभियानावर २०१४-१५ मध्ये ₹ १,०६७.६१ कोटी तर २०१५-१६ मध्ये जानेवारी पर्यंत ₹ ७३१.३१ कोटी खर्च झाला. मूलभूत शिक्षणाबाबतचे काही महत्वाचे निर्देशक तक्ता क्र. १०.२ मध्ये देण्यात आले आहेत.

**तक्ता १०.२ मूलभूत शिक्षणाबाबतचे काही महत्वाचे निर्देशक (३० सप्टेंबर रोजी)**

| निर्देशक | | २०१२-१३ | २०१३-१४* | २०१४-१५* |
|---|---|---|---|---|
| बांधकाम झालेल्या वर्गखोल्यांची संख्या | | १०,००५ | ६,८१७ | ५,३०७ |
| स्थापन करण्यात आलेल्या संगणक कक्षांची संख्या | | ७४३ | १२९ | ० |
| मोफत पाठ्यपुस्तके मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या (लाखात) | | १३३.४९ | १२८.४२ | १२३.८६ |
| प्रशिक्षित शिक्षकांची संख्या (लाखात) | | ३.७ | ३.६ | २.४ |
| दर १० चौ किमी मागील शाळांची/तुकड्यांची घनता | (अ) प्राथमिक | २.६९ | २.७१ | २.७४ |
| | (ब) उच्च प्राथमिक | १.४७ | १.४० | १.४२ |
| दर हजार मुलांच्या लोकसंख्येमागे (६ ते ११ वर्ष) प्राथमिक शाळा/तुकड्यांची संख्या | | ८ | ८ | ८ |
| दर हजार मुलांच्या लोकसंख्येमागे (११ ते १४ वर्ष) उच्च प्राथमिक शाळा/तुकड्यांची संख्या | | ७ | ७ | ७ |
| सरासरी विद्यार्थी-वर्ग प्रमाण (सर्व शाळा) | | ३३ | ३२ | ३१ |
| **सुविधा असलेल्या शाळांची टक्केवारी** | | | | |
| पिण्याचे पाणी | | ९८.४ | ९९.३ | ९९.६ |
| संरक्षक भिंत | | ६८.३ | ७६.४ | ८२.७ |
| मुलींकरिता कार्यरत शौचालय | | ७७.० | ९७.३ | ९८.६ |
| संगणक | | ४७.४ | ५०.६ | ५४.३ |
| नि:शक्तांसाठी उतारता रस्ता @ | | ८६.७ | ८९.२ | ९१.९ |
| विद्युत जोडणी | | ८५.० | ८६.० | ९३.८ |
| खाजगी शाळांची एकूण शाळांशी टक्केवारी | | २६.३ | २९.३ | ३०.० |

@ उतार आवश्यक व उपलब्ध असणाऱ्या शाळा * अस्थायी

आधार : एलीमेंटरी एज्युकेशन इन इंडिया प्रोग्रेस टुवर्डस युईई फ्लॅश स्टॅटिस्टिक्स रिपोर्ट महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

१०.५ विशेष गरज असलेल्या मुलांना सर्वसाधारण परिस्थितीत सर्वसाधारण मुलांसोबत चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळून त्यांची भावनिक उन्नती होण्यासाठी तसेच त्यांना सामाजिकदृष्ट्या सामावून घेण्यासाठी राज्यात 'विकलांग समावेशक शिक्षण' कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमामध्ये विशेष गरज असलेल्या मुलांना आवश्यकतेनुसार ब्रेल लिपीतील पुस्तके, चष्मे, श्रवणयंत्रे व उपकरणे, वाचा प्रशिक्षक, इत्यादी शैक्षणिक सहाय्यभूत सुविधा पुरवून पुनर्वसन करणे यांचा समावेश आहे. सन २०१४-१५ मध्ये २.९५ लाख मुलांनी लाभ घेतला असून ₹ ६१.४० कोटी खर्च झाला तर सन २०१३-१४ मध्ये ३.०८ लाख मुलांकरीता ₹ ५८.५७ कोटी खर्च झाला होता.

## मुलींचे शिक्षण

१०.६ मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यापैकी काही योजनांची प्रगती तक्ता १०.३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३ मुलींच्या शिक्षणासाठीच्या विविध योजनांचे लाभार्थी व झालेला खर्च**

| योजना | २०१३-१४ | | २०१४-१५ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) |
| उपस्थिती भत्ता योजना | ४.९१ | १०.८१ | ३.८९ | ८.५५ |
| अहिल्याबाई होळकर योजना | १९.५० | ५७.८५ | १६.०९ | ५७.६० |
| ११ वी आणि १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण | ३.७० | २.०७ | २.८७ | २.०२ |
| कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय | ०.०४ | १६.४२ | ०.०४ | १९.२३ |

*आधार* : प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

## शिक्षणासाठी प्रोत्साहनपर योजना

१०.७ शिक्षणात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढण्यासाठी आणि पालकांचा आर्थिक भार कमी करण्यासाठी राज्य शासन विविध योजनांद्वारे विद्यार्थ्यांना सवलती देत आहे. योजनानिहाय लाभार्थ्यांची संख्या व झालेला खर्च तक्ता १०.४ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.४ शिक्षणासाठी प्रोत्साहनपर योजनांचे लाभार्थी व झालेला खर्च**

| योजना | २०१३-१४ | | २०१४-१५ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) |
| १ली ते ४थी इयत्तेतील गरीब मुलांना मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविणे | १८.३९ | १३.० | १८.७० | १४.५ |
| १ ली ते १० वी च्या शासन अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलत | २५.३६ | ३.७ | ३०.५४ | ४.४ |
| आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण (११ वी आणि १२वी) | २.०० | १.४ | १.८८ | १.४ |
| अवर्षण प्रवण क्षेत्रातील १० वी व १२ वी तील विद्यार्थ्यांना परिक्षा शुल्क माफी/ प्रतिपूर्ती | २.०४ | ९.१ | ५.६३ | १७.८ |
| आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन | ०.०४ | ०.२ | ०.०३ | ०.१ |

आधार : प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन

## शालेय पोषण आहार

१०.८ इयत्ता १ ली ते ५ वी तील विद्यार्थ्यांची पटनोंदणी, उपस्थिती वाढविणे व टिकविणे याबरोबरच त्यांना पोषक आहार पुरविणे याकरिता भारत सरकारने 'शालेय पोषण आहार' योजना सुरू केली. याव्दारे ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथिने इतके पोषण मुल्य असलेले तयार भोजन पुरविण्यात येते. सन २०१४-१५ मध्ये ६५ लाख विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला असून ₹ ९२० कोटी खर्च झाला तर सन २०१३-१४ मध्ये ६९ लाख विद्यार्थ्यांकरिता ₹ ७३५ कोटी खर्च झाला होता. सन २००८-०९ मध्ये ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांकरिता ही योजना विस्तारीत करण्यात आली, ज्यामध्ये ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथिने इतके पोषण मुल्य असलेले तयार भोजन पुरविण्यात येते. सन २०१४-१५ मध्ये ३९ लाख विद्यार्थ्यांना लाभ मिळाला असून ₹ ४५१ कोटी खर्च झाला तर सन २०१३-१४ मध्ये ४० लाख विद्यार्थ्यांकरिता ₹ ४१६ कोटी खर्च झाला होता.

### राज्याचा शैक्षणिक स्थितीचा वार्षिक अहवाल (असर) - २०१५

सन २०१५ मध्ये 'प्रथम' या संस्थेतर्फे राज्यातील ३३ जिल्हयातील ९८४ गावांमध्ये मुलांची शैक्षणिक स्थिती आणि वाचन व गणितातील मुलभूत शिक्षण पातळीचे मुल्यांकन करण्यासाठी पाहणी घेण्यात आली. सदर पाहणीमध्ये एकूण १९,७७२ कुटूंबातील ३-१६ वर्षे वयोगटातील २६,८३३ मुलांची माहिती गोळा करण्यात आली.

या पाहणीचे महत्वाचे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

- ग्रामीण भागातील ६-१४ वर्षे वयोगटातील प्रवेश घेतलेल्या मुलांची एकूण टक्केवारी ९८.७ टक्के होती.
- पहिली ते पाचवी इयत्तेत खाजगी शाळेमध्ये शिकणा-या मुलांची टक्केवारी २०१४ व २०१५ या वर्षात समान होती (२३.१ टक्के) तर सहावी ते आठवीतील विद्यार्थ्यांची हीच टक्केवारी २०१४ मधील ५५.२ टक्यांवरून कमी होऊन २०१५ मध्ये ५०.३ टक्के झाली.

**मुलांची मूलभूत शिक्षण पातळी खाली दर्शविली आहे.**

| निर्देशांक | २०१४ | २०१५ |
|---|---|---|
| **वाचनक्षमता** | | |
| इयत्ता पहिली स्तराची वाचनक्षमता असलेल्या तिस-या इयत्तेतील मुलांची टक्केवारी | ५४.१ | ६३.३ |
| इयत्ता दुसरी स्तराची वाचनक्षमता असलेल्या पाचव्या इयत्तेतील मुलांची टक्केवारी | ५३.५ | ६१.८ |
| **गणित** | | |
| कमीतकमी वजाबाकी करू शकणा-या तिस-या इयत्तेतील मुलांची टक्केवारी | १८.७ | २३.६ |
| कमीतकमी भागाकार करू शकणा-या पाचव्या इयत्तेतील मुलांची टक्केवारी | १८.९ | २४.४ |

## महाराष्ट्र छात्र सेना

१०.९ विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, बंधुत्व, खेळाडूवृत्ती, राष्ट्रीय ऐक्य, समाजसेवा, इत्यादि गुण रुजविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. इयत्ता ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी वैकल्पिक स्वरूपात ही योजना राबविली जाते. सन २०१४-१५ मध्ये सुमारे १९.०१ लाख विद्यार्थ्यांनी या योजनेमध्ये भाग घेतला असून ₹ चार कोटी खर्च झाला तर सन २०१३-१४ मध्ये १९.०२ लाख विद्यार्थ्यांकरिता ₹ पाच कोटी खर्च झाला होता.

## सैनिकी शाळा

१०.१०	राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तराच्या ४२ सैनिकी शाळा असून त्यापैकी पाच शाळा फक्त मुलींसाठी, ३३ शाळा फक्त मुलांसाठी आणि चार सह-शिक्षणासाठी आहेत. सन २०१५-१६ मध्ये या शाळांमधील पटसंख्या १५,३४५ आहे.

## क्रीडा शिक्षण

१०.११	खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी व क्रीडापटूंचे नैपुण्य विकसित करण्यासाठी राज्य शासनाने पुणे येथे 'शिव छत्रपती क्रीडापीठाची' स्थापना केली. या क्रीडापीठाकडून ८ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांकरिता क्रीडा कौशल्य चाचण्या घेतल्या जातात आणि १७ विविध खेळांसाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांना सुमारे ८ ते १० वर्षे आवश्यक प्रशिक्षण दिले जाते. या क्रीडापीठा अंतर्गत ११ क्रीडा प्रबोधिनी कार्यरत आहेत. शासन दरमहा प्रति प्रशिक्षणार्थी सरासरी ₹ ९,००० खर्च करते. सन २०१५-१६ मध्ये ५९३ प्रशिक्षणार्थींची निवड झाली. क्रीडा प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी संपादित केलेल्या यशाचा तपशील तक्ता १०.५ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.५ क्रीडा प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी संपादित केलेल्या यशाचा तपशील**

| वर्ष | एकूण प्रशिक्षणार्थी | आंतरराष्ट्रीय स्तरावरील पदके | | | | राष्ट्रीय स्तरावरील पदके | | | | राज्य स्तरावरील पदके | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण |
| २०१२-१३ | ७७२ | २ | ७ | ७ | १६ | १२६ | ८० | ४६ | २५२ | १५२ | १२४ | ६९ | ३४५ |
| २०१३-१४ | ६६५ | २ | २ | ४ | ८ | ४४ | ४९ | ३३ | १२६ | १४३ | १२८ | ८५ | ३५६ |
| २०१४-१५ | ५६३ | २ | २ | ३ | ७ | ६६ | ६३ | ४६ | १७५ | १४८ | ११६ | ११६ | ३८० |

आधार : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

## शिक्षण विकास निर्देशांक

१०.१२	राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन विद्यापीठ आणि मानव संसाधन व विकास मंत्रालय (शालेय शिक्षण व साक्षरता विभाग) यांच्या मार्फत प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरांवरील शिक्षण विकास निर्देशांकाची परिगणना करण्यात येते तसेच संपूर्ण मूलभूत शिक्षणाकरिता संयुक्त निर्देशांक 'जिल्हा शैक्षणिक माहिती प्रणाली' च्या आधारे परिगणित करण्यात येतो. शिक्षण विकास निर्देशांक परिगणित करताना मूलभूत शिक्षणाच्या विविध पैलूंसह राज्याच्या विशिष्ट निर्देशकांचाही अंतर्भाव केला जातो. शिक्षण विकास निर्देशांकाची गणना करतांना उपलब्धता, पायाभूत सुविधा, शिक्षक आणि फलनिष्पत्ती अशा चार उपविभागांमध्ये एकत्रित केलेल्या एकूण २४ निर्देशकांचा वापर करण्यात येतो. 'भारतातील मूलभूत शिक्षण आणि सार्वत्रिक मूलभूत शिक्षणाच्या दिशेने प्रगती (फ्लॅश सांख्यिकी २०१३-१४)' अहवालानुसार राज्याचा प्राथमिक स्तराकरिता, उच्च प्राथमिक स्तराकरिता आणि संयुक्त स्तराकरिता अनुक्रमे १३ वा, १६ वा व १३ वा क्रमांक असून शिक्षण विकास निर्देशांक अनुक्रमे ०.६३, ०.६७ आणि ०.६५ इतका आहे. सन २०१३-१४ करिता राज्यनिहाय, उपविभागनिहाय निर्देशांक व संयुक्त शिक्षण विकास निर्देशांक परिशिष्ट १०.१ मध्ये दर्शविले आहेत.

## उच्च व तंत्र शिक्षण

१०.१३	उच्च शिक्षणात कृषि, पशुवैद्यक, वैद्यकीय, औषध निर्माणशास्त्र, अभियांत्रिकी, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण, इत्यादिंचा समावेश सर्वसाधारण उच्च शिक्षणासह होतो. मूलभूत शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाबरोबरच, उच्च शिक्षणातील संधींचादेखील विस्तार करण्यासाठी शासन परिश्रम घेत आहे. राज्यात एकूण २१ विद्यापीठे असून त्यापैकी चार कृषि विद्यापीठे, एक आरोग्य विज्ञान विद्यापीठ, एक पशुवैद्यक विद्यापीठ, एक तंत्रज्ञान विद्यापीठ आणि १४ अन्य सर्वसाधारण विद्यापीठे (त्यामध्ये केवळ महिलांसाठी असणारे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ, मुंबई, अनौपचारिक शिक्षणासाठी असलेले यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि संस्कृत भाषेचा अभ्यास, संशोधन, विकास व प्रसार करण्यासाठी कवी कुलगुरू कालिदास विद्यापीठ, नागपूर) यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, राज्यात २१ अभिमत विद्यापीठे आहेत. विद्याशाखानिहाय एकूण संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व सन २०१५-१६ मध्ये प्रथम वर्षात प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या परिशिष्ट १०.२, १०.३, १०.४ व १०.५ मध्ये दिली आहे.

# सार्वजनिक आरोग्य

**तक्ता १०.६ राज्यातील सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा**

(डिसेंबर, २०१५)

| आरोग्य संस्थेचा प्रकार | संख्या |
|---|---|
| उप केंद्रे | १०,५८० |
| फिरती आरोग्य पथके | १३ |
| प्राथमिक आरोग्य केंद्रे | १,८११ |
| ग्रामीण रुग्णालये (३० खाटा) | ३६० |
| क्षमतेनुसार उप जिल्हा रुग्णालये | |
| अ) ५० खाटा | ५८ |
| ब) १०० खाटा | २८ |
| सामान्य रुग्णालये | ४ |
| अस्थिरोग रुग्णालये | १ |
| जिल्हा रुग्णालये | २३ |
| सुपर स्पेशालिटी रुग्णालये | २ |
| मनोरुग्णालये | ४ |
| स्त्री रुग्णालये | ११ |
| क्षयरोग रुग्णालये | ४ |
| कुष्ठरोग रुग्णालये | ४ |
| आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण संस्था | ८ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

१०.१४ राज्यातील आरोग्य विषयक पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक, खाजगी तसेच स्वयंसेवी क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळ प्राथमिक तसेच आधुनिक वैद्यकीय सेवा पुरवितात. राज्यातील जनतेला विश्वसनीय, जबाबदार, समाधानकारक, गुणात्मक, प्रतिबंधात्मक आणि गुणकारी आरोग्यसेवा पुरविणे हा सार्वजनिक आरोग्य सेवेचा उद्देश असून माता व बाल आरोग्यात सुधारणा करण्यावर विशेष भर आहे.

१०.१५ राज्यात, विशेषत: ग्रामीण भागात, सर्वसमावेशक आरोग्यसेवा पुरविण्यासाठी त्रिस्तरीय पायाभूत सुविधा शासनाने निर्माण केल्या आहेत. उप केंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व सामुहिक आरोग्य केंद्रे यांचा प्राथमिक स्तरामध्ये समावेश होतो. व्दितीय स्तरावर ग्रामीण व निमशहरी भागातील उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हास्थित रुग्णालये यांचा समावेश होतो. तर, प्रमुख शहरांमध्ये स्थित सुसज्ज सुपर स्पेशालिटी रुग्णालयांसह वैद्यकीय महाविद्यालये, औषधीद्रव्ये व शस्त्रक्रिया या दोन्ही क्षेत्रांतील मूलभूत व अतिविशेषोपचार पुरविणा-या रुग्णालयांचा तृतीय स्तरावर समावेश होतो. राज्यातील सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधांचा तपशील तक्ता १०.६ मध्ये तर राज्यात उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधांबाबतची तपशीलवार श्रृंखला (सार्वजनिक आणि शासन सहाय्यित) परिशिष्ट १०.६ मध्ये दिली आहे. आरोग्यविषयक निवडक निर्देशकांची श्रृंखला परिशिष्ट १०.७ मध्ये दिली आहे.

१०.१५.१ या व्यतिरिक्त, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या अधिपत्त्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना संलग्न असलेल्या रुग्णालयांमधून देखील वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात. एकूण १३,५१२ खाटांसह २९ रुग्णालये १५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना संलग्न आहेत. दरवर्षी राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमासाठी २,१५० व पदव्यूत्तर अभ्यासक्रमांसाठी ८३७ विद्यार्थ्यांची नोंदणी होते.

१०.१६ आरोग्य निगा मनुष्यबळात राज्य अग्रणी असून राज्याच्या आरोग्य विषयक गरजा पूर्ण करण्यासाठी राज्याकडून प्रशिक्षित डॉक्टरांचा पुरवठा केला जात आहे. ॲलोपॅथी व भारतीय वैद्यकशास्त्र प्रणाली या दोन्हींची सर्वाधिक वैद्यकीय महाविद्यालये राज्यात आहेत. राज्यातील ॲलोपॅथी, आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथींच्या नोदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांच्या आकडेवारीवर आधारित डॉक्टरांचे लोकसंख्येशी गुणोत्तर सन २०११ मध्ये १:६०० होते आणि तत्सम आकडेवारी सन २०१४ मध्ये १:५३६ होती. राज्यातील नोंदणीकृत ॲलोपॅथी वैद्यकीय व्यावसायिक डॉक्टरांचे लोकसंख्येशी गुणोत्तर तक्ता १०.७ मध्ये दिले आहे.

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

१०.१७ राष्ट्रीय आरोग्य अभियान हे जनतेला किफायतशीर, विश्वासार्ह आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करण्यासाठी २०१३ मध्ये सुरु करण्यात आले आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान आणि राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये समाविष्ट करण्यात आले. राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान ५०,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेली गावे/शहरांतील झोपडपट्ट्यांमध्ये राहणारे रहिवासी व इतर दुर्बल घटकांसाठी राबविण्यात येते. केंद्र शासनाने राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत २०१५-१६ साठी राज्याकरिता ₹ २८३.०९ कोटींच्या (मुंबईकरिता ₹ ५१.६९ कोटी आणि उर्वरित महाराष्ट्राकरिता ₹ २३१.४० कोटी) प्रकल्प अंमलबजावणी कार्यक्रमास मान्यता दिली आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत २०१५-१६ करिता ₹ २,२७८.३८ कोटी नियतव्यय ठेवण्यात आला आहे.

**आलेख १०.१ : निवडक आरोग्यविषयक निर्देशांक**



## महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा

१०.१७.१ राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवेमार्फत रुग्णांना नजिकच्या रुग्णालयांमध्ये पुढील उपचारार्थ दाखल करण्यासाठी पुर्वरुग्णालयीन आरोग्यसेवेसह जीवन समर्थक प्रणालीयुक्त रुग्णवाहिका उपलब्ध करण्यात आल्या आहेत. अतिसुसज्ज जीवन समर्थक प्रणालीयुक्त २३३ रुग्णवाहिका आणि मूलभूत जीवन समर्थक प्रणालीयुक्त ७०४ रुग्णवाहिका आहेत. सन २०१५-१६ मध्ये डिसेंबरपर्यंत पुरविण्यात आलेल्या आपत्कालीन सेवांची संख्या ३.२५ लाख होती तर सन २०१४-१५ मध्ये ती २.६० लाख होती.

**तक्ता १०.७ डॉक्टरांचे लोकसंख्येशी गुणोत्तर**

| वर्ष | नोंदणीकृत ॲलोपॅथी वैद्यकीय व्यवसायिकांची संख्या | अंदाजित डॉक्टर लोकसंख्या गुणोत्तर$ |
|---|---|---|
| २०११ | ६३,७३१ | १:१७७५ |
| २०१२ | ६७,६३६ | १:१६९३ |
| २०१३ | ७३,८४७ | १:१५६९ |
| २०१४ | ७९,३९९ | १:१४७७ |
| २०१५ | ८३,६६८ | १:१४१८ |

$ केंद्रीय साख्यिकी कार्यालय, भारत सरकार यांनी प्रक्षेपित केलेल्या लोकसंख्येवर आधारित

*आधार* : संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, महाराष्ट्र शासन

## प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम - II

१०.१७.२ राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत, प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम - II बाल आरोग्याचा दर्जा उंचावणे व लोकसंख्या स्थिर ठेवण्यासाठी राबविण्यात येत आहे जेणेकरुन मातामृत्यूदर, अर्भकमृत्यूदर व एकूण जननदर कमी होईल. प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम - II अंतर्गत झालेला खर्च तक्ता १०.८ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.८ प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम - II अंतर्गत झालेला खर्च**

(₹ कोटी)

| वर्ष | नियतव्यय | खर्च | खर्चाची नियतव्ययाशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०११-१२ | ४००.२२ | ३४१.३५ | ८५.३ |
| २०१२-१३ | ४५३.३७ | ३६८.०० | ८१.२ |
| २०१३-१४ | ६३२.७७ | ४७४.०२ | ७५.० |
| २०१४-१५ | ६५५.८६ | ४७१.३७ | ७१.९ |
| २०१५-१६ | ६२०.७५ | २७३.५२+ | ४४.०+ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## कुटुंब कल्याण कार्यक्रम

१०.१७.३ लोकसंख्या स्थिर करणे हे कुटुंब कल्याण कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. नसबंदी आणि दोन अपत्यांच्या जन्मात अंतर राखणे हे या कार्यक्रमाचे महत्वाचे पैलू आहेत. तांबी (आययुडी), पारंपारिक संतति प्रतिबंधक साधने, इ. पद्धतींच्या प्रसारावर जास्त भर दिला जातो. कुटुंब कल्याण नसबंदी कार्यक्रमाचा तपशील तक्ता १०.९ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.९ कुटुंब कल्याण नसबंदी कार्यक्रमाचा तपशील**

(हजारात)

| वर्ष | नसबंदी | | | | तांबी | | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | | | लक्ष्य | साध्य | |
| | | पुरुष | स्त्री | एकूण | | | |
| २०११-१२ | ५५० | २०.३ | ४७४.३ | ४९४.६ (८९.९) | ४५० | ३६६.८ (८१.५) | ३२.६७ |
| २०१२-१३ | ५५० | १८.९ | ४८६.२ | ५०५.१ (९१.८) | ४५० | ३७६.९ (८३.८) | ३७.०० |
| २०१३-१४ | ५६० | १७.३ | ४८६.९ | ५०४.२ (९०.०) | ४५० | ४११.९ (९१.५) | ३३.०३ |
| २०१४-१५ | ५६५ | १३.९ | ४५८.६ | ४७२.५ (८३.६) | ४५० | ३९१.५ (८७.०) | २९.१७ |
| २०१५-१६+ | ५६५ | ११.० | ३१८.८ | ३२९.८ (५८.४) | ४६० | २९२.६ (६३.६) | १८.०१ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन टीप : कंसातील आकडे साध्याची लक्ष्याशी टक्केवारी दर्शवितात. + डिसेंबरपर्यंत

## नवसंजीवनी योजना

१०.१७.४ आदिवासी भागातील माता व अर्भक मृत्यू कमी व्हावेत या उद्देशाने १६ जिल्ह्यांतील आदिवासी भागात ८,४१९ गावांमध्ये १७३ फिरत्या वैद्यकीय पथकांव्दारे नवसंजीवनी योजना राबविण्यात येत आहे. नवसंजीवनी योजनेअंतर्गत विविध योजना राबविण्यात येत आहेत.

१०.१७.४.१ मातृत्व अनुदान योजनेअंतर्गत प्रसूतीपूर्व आरोग्य तपासणीकरिता वैद्यकीय केंद्राला भेट देण्यासाठी आदिवासी महिलेला ₹ ४०० रोख व चांगले आरोग्य राखण्यासाठी ₹ ४०० ची औषधे पुरविण्यात येतात. मातृत्व अनुदान योजनेअंतर्गत लाभार्थी मातांची संख्या व खर्च तक्ता १०.१० मध्ये दिला आहे.

## जननी सुरक्षा योजना

१०.१७.५ जननी सुरक्षा योजनेचा (१०० टक्के केंद्र पुरस्कृत) उद्देश राज्यातील ग्रामीण व नागरी भागातील आरोग्य संस्थांतील प्रसुतीला प्रोत्साहन देवून दारिद्र्य रेषेखालील, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कुटुंबातील माता व बालमृत्यू प्रमाण कमी करणे हा आहे. या योजनेअंतर्गत आरोग्य संस्थांतील प्रसुतीसाठी सात दिवसांच्या आत शहरी भागात प्रति लाभार्थी ₹ ६०० व ग्रामीण भागात प्रति लाभार्थी ₹ ७०० दिले जातात, तर कुशल दाईच्या मदतीने घरी प्रसूत होणाऱ्या फक्त दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिला लाभार्थ्यास ₹ ५०० दिले जातात. सिझेरियनद्वारे प्रसूती झालेल्या महिला लाभार्थ्यास ₹ १,५०० पर्यंतच्या खर्चाची प्रतिपूर्ती केली जाते. जननी सुरक्षा योजनेअंतर्गत लाभार्थी व खर्च तक्ता १०.११ मध्ये दिला आहे.

## सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम

१०.१७.६ सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमाचा उद्देश क्षयरोग, घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, पोलिओ, काविळ-बी, गोवर यांसारख्या लसीकरणाद्वारे प्रतिबंध करता येण्याजोग्या आजारांमुळे गर्भवती स्त्रिया, अर्भके व विविध वयोगटातील बालके यांच्या मृत्यूचे, रोगग्रस्ततेचे व अपंगत्वाचे प्रमाण कमी करण्यासाठी उत्तम दर्जाच्या लसीकरण सेवा पुरविणे हा आहे. सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांची संख्या आणि खर्च तक्ता १०.१२ मध्ये दिला आहे.

## पल्स पोलिओ कार्यक्रम

१०.१७.७ पाच वर्षाखालील मुलांना यापूर्वी कितीही वेळा पोलिओ डोस दिला असला तरी देशभरात ठरविलेल्या विशिष्ठ दिवशी तोंडाव्दारे पोलिओ मात्रा देवून विषाणूचे संक्रमण रोखण्यात येते. राज्याने पोलिओ विषाणूचा प्रसार नियंत्रणात ठेवण्यासाठी उत्तम प्रगती केली असून सन २०१०-११ नंतर पोलिओचा एकही रुग्ण आढळला नाही. भारताला २७ मार्च, २०१४ रोजी पोलिओ मुक्त घोषित करण्यात आले. पल्स पोलिओ कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.१३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१३ पल्स पोलिओ कार्यक्रमाची प्रगती**

| वर्ष | मुलांची संख्या (लाखात) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|
| २०११-१२ | ११९.९८ | १५.६० |
| २०१२-१३ | १२०.८३ | ३४.४३ |
| २०१३-१४ | १२१.२३ | ३४.६७ |
| २०१४-१५ | १२३.२६ | १०.९२ |
| २०१५-१६+ | ७७.९७ | २.०७ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

**तक्ता १०.१० मातृत्व अनुदान योजनेअंतर्गत लाभार्थी मातांची संख्या व खर्च**

(₹ कोटी)

| वर्ष | नियतव्यय | खर्च | लाभार्थी माता |
|---|---|---|---|
| २०११-१२ | ८.२७ | ७.७७ | ८१,४९६ |
| २०१२-१३ | ९.५१ | ५.३८ | ६६,३०० |
| २०१३-१४ | ५.३४ | ४.४५ | ७१,७७३ |
| २०१४-१५ | ५.६३ | ३.०६ | ६१,३५२ |
| २०१५-१६ | ३.५६ | ०.५४+ | ११,२३३+ |

आधार : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

**तक्ता १०.११ जननी सुरक्षा योजने अंतर्गत लाभार्थी व खर्च**

(₹ कोटी)

| वर्ष | नियतव्यय | खर्च | लाभार्थ्यांची संख्या (लाख) |
|---|---|---|---|
| २०११-१२ | ३४.९४ | ३५.२८ | ४.०५ |
| २०१२-१३ | ३०.२३ | ३४.४१ | ३.६४ |
| २०१३-१४ | ४४.८२ | ४४.५५ | ४.०३ |
| २०१४-१५ | ५२.६४ | ४६.५३ | ३.४८ |
| २०१५-१६ | ४९.८२ | २७.९६+ | २.४७+ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

**तक्ता १०.१२ सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांची संख्या व खर्च**

(लाखात)

| लस | २०१४-१५ | | २०१५-१६+ | |
|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य |
| बीसीजी | १९.७३ | १९.३४ | २०.८७ | १५.०४ |
| डीपीटी III | १९.७३ | १९.२१ | २०.८७ | १४.०० |
| पोलिओ III | १९.७३ | १९.१५ | २०.८७ | १४.०० |
| काविळ बी III | १९.७३ | १९.१३ | २०.८७ | १३.९२ |
| गोवर | १९.७३ | १८.८२ | २०.८७ | १४.२७ |
| डीपीटी (बुस्टर) | १९.३२ | १८.१६ | २०.४६ | १३.६३ |
| पोलिओ (बुस्टर) | १९.३२ | १८.०५ | २०.४६ | १३.६२ |
| डीटी (५ वर्ष) | १९.३२ | १६.६४ | २०.४६ | १३.१५ |
| टीटी (१० वर्ष) | २१.१५ | १८.६१ | २१.३२ | १४.३१ |
| टीटी (१६ वर्ष) | २१.८६ | १९.०३ | २२.०३ | १४.९३ |
| टीटी (गरोदर माता) | २१.७१ | १७.१० | २२.९६ | १२.५४ |
| **खर्च (₹ कोटी)** | **३१.८२** | | **२०.२२** | |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम

१०.१७.८ राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम बालकांच्या आरोग्याचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी पध्दतशीर आरोग्य तपासणी व आवश्यकतेनुसार वेळीच वैद्यकीय उपचार करण्यासाठी राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.१४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१४ राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाची प्रगती**

(संख्या)

| वर्ष | शाळा/ अंगणवाडी | विद्यार्थी (लाखात) | | | मोठ्या शस्त्रक्रिया | हृदय शस्त्रक्रिया |
|---|---|---|---|---|---|---|
| | | तपासलेले | उपचार केलेले | संदर्भसेवेसाठी पाठविलेले | | |
| २०१४-१५ | ८४,०६६ | १२२.३६ | १५.०९ | ०.७९ | ८,१३३ | १,४१९ |
| | १,०२,०९६# | ६३.३४ | ६.४८ | ०.८५ | | |
| | १,०१,८३५## | ६३.३४ | ५.९८ | ०.६४ | | |
| २०१५-१६+ | ८४,४२४ | १०१.७३ | ११.११ | ०.७४ | ८,६८६ | ८४८ |
| | १,०४,४७९# | ६३.७५ | ६.१० | ०.४१ | | |
| | १,०२,५९५## | २७.१५ | २.५६ | ०.२२ | | |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन $ शालेय आरोग्य कार्यक्रम + डिसेंबरपर्यंत # अंगणवाडी सत्र I, ## अंगणवाडी सत्र II

## राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम

१०.१८ हिवताप, हत्तीरोग, डेंग्युताप, मेंदूज्वर, चिकुनगुनीया, चंडीपूरा, इत्यादी किटकजन्य रोगांचा प्रतिबंध, रोगनिदान, उपचार व नियंत्रणासाठी राज्यात राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाची माहिती तक्ता १०.१५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१५ राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाची माहिती**

| रोग | २०१४-१५ | | २०१५-१६+ | |
|---|---|---|---|---|
| | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू |
| हिवताप | ५५,५९८ | ६६ | ४८,०१३ | २९ |
| हत्तीरोग | ३,३०३ | ० | १,८११ | ० |
| डेंग्यू | ८,५२४ | १३९ | ४,८०७ | २४ |
| मेंदूज्वर | १ | ० | ७ | ० |
| चिकुनगुनिया | २२४ | ० | १७१ | ० |
| एईएस/चंडीपुरा | ५ | २ | १ | १ |
| **खर्च (₹ कोटी)** | **३१.७४** | | **२२.३५** | |

एईस : ॲक्यूट एन्सेफॅलिटीस सिंड्रोम + डिसेंबरपर्यंत
*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

## इतर कार्यक्रम

१०.१९ राज्यात इतर अनेक आरोग्य कार्यक्रम राबविले जात आहेत. काही कार्यक्रमांची प्रगती खालीलप्रमाणे:

- सुधारित राष्ट्रीय क्षय रोग नियंत्रण कार्यक्रम: दर लाख लोकसंख्येमागे संशयित क्षय रोग रुग्णांची संख्या २०१५ मध्ये २१४ होती व रोग मुक्ततेचे प्रमाण ८२ टक्के होते, तर सन २०१४ मध्ये प्रति लाख लोकसंख्येमागे संशयित क्षय रोग रुग्णांची संख्या २०९ होती व रोग मुक्ततेचे प्रमाण ८३ टक्के होते.
- राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम: सन २०१५-१६ मधील मोतीबिंदू शस्त्रक्रियांचे ७.५० लाख लक्ष्यापैकी डिसेंबरपर्यंत ७१ टक्के उद्दिष्ट साध्य करण्यात आले तर २०१४-१५ मध्ये तेवढ्याच लक्ष्याचे उद्दिष्ट ओलांडण्यात आले (१०८ टक्के).
- राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम: सन २०१५-१६ मध्ये डिसेंबरअखेर नविन व ग्रस्त कुष्ठरुग्णांची संख्या अनुक्रमे ११,८७७ व ११,०१९ होती, तर सन २०१४-१५ मध्ये तत्सम आकडेवारी अनुक्रमे १६,४१५ व ११,३७९ होती.

## राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना

१०.२० राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना नॅशनल इन्शुरन्स कंपनीच्या सहयोगाने राबविण्यात येत असून ही योजना दारिद्र्य रेषेखालील पिवळे शिधापत्रक धारक तसेच दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रक धारक (अन्नपूर्णा व अंत्योदय शिधापत्रक धारक समाविष्ट) असलेल्या रुग्णांना निवडक आजारांवरील उपचारांकरिता रोख रक्कम रहित (कॅशलेस) वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी आहे. प्रति वर्ष प्रति कुटुंब विम्याचा हप्ता राज्य शासन अदा करते व प्रति वर्ष ₹ दीड लाखाचे विमा संरक्षण दिले जाते. ही योजना टप्प्या-टप्प्याने कार्यान्वीत झाली असून आता संपूर्ण राज्यात राबविली जाते. यामध्ये ९७१ प्रकारच्या उपचारपध्दतीचा समावेश होतो. योजनेअंतर्गत २०१४-१५ मध्ये एकूण २.७३ लाख शस्त्रक्रिया आणि उपचार करण्यात आले व त्यासाठी ₹ ६६१.५६ कोटी खर्च झाले. सन २०१५-१६ मध्ये डिसेंबर अखेर एकूण २.६१ लाख शस्त्रक्रिया आणि उपचार करण्यात आले व त्याकरिता ₹ ६२३.५२ कोटी खर्च झाले.

## राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम

१०.२१ राज्यात राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम प्रभाविपणे राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेची स्थापना करण्यात आली. जनजागृती अभियान आणि विशिष्ट गटातील लोकांचे प्रबोधन व तपासणी यावर या कार्यक्रमाचा भर आहे. त्याकरिता लैंगिक संसर्गजन्य रोग चिकित्सालयातील रुग्णांची व प्रसुतीपूर्व तपासणीसाठी आलेल्या गर्भवती महिलांच्या रक्ताची नमुना तपासणी केली जाते. एचआयव्ही / एड्स विषयक प्रकरणांचा तपशील तक्ता १०.१६ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता १०.१६ एचआयव्ही / एड्स विषयक प्रकरणांचा तपशील**

| बाब | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ |
|---|---|---|---|---|---|
| जोखीम गटातील तपासणी केलेल्या व्यक्ती (हजारात) | २,८१८ | ३,०६७ | ३,२७४ | ४,११६ | ४,३७१ |
| तीन चाचण्यांवरुन एचआयव्ही बाधित (हजारात) | ५७ | ६१ | ४६ | ३९ | ३० |
| एचआयव्ही बाधितांचे प्रमाण (टक्के) @ | २.० | २.० | १.० | ०.९ | ०.७ |
| एड्स रुग्ण | १०,७५० | १९,३८९ | १०,६७० | २०,८८० | १५,७८४ |
| एड्सने मृत्यू | १,५८० | ३,२७० | ३,१६८ | २,५२१ | २,५५२ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था + डिसेंबरपर्यंत @ तपासणी केलेल्या जोखीम गटातील व्यक्तींशी

## राज्य रक्त संक्रमण परिषद

१०.२२ सुरक्षित रक्ताचा व त्याच्या घटकांचा पुरेसा पुरवठा वाजवी दरात करणे हे राज्य रक्त संक्रमण परिषदेचे मुख्य उद्दिष्ट आहे. सन २००० पासून सीकल सेल ग्रस्त बालके तसेच थॅलेसेमिया व हेमोफिलियाने पीडित रूग्णांना मोफत रक्तपुरवठा केला जातो. रक्त संकलनाचा तपशील तक्ता १०.१७ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.१७ रक्त संकलनाचा तपशील**

(लाख युनिटमध्ये)

| वर्ष | रक्तपेढ्यांची संख्या | एकूण संकलन | पैकी ऐच्छिकपणे केलेले |
|---|---|---|---|
| २०११ | २८२ | १३.४४ | ११.९२ |
| २०१२ | २९१ | १४.४१ | १३.२९ |
| २०१३ | ३०० | १४.७५ | १३.९० |
| २०१४ | ३१३ | १५.६२ | १४.९२ |
| २०१५ | ३१७ | १५.६६ | १५.१६ |

*आधार* : राज्य रक्त संक्रमण परिषद, महाराष्ट्र शासन

## साथरोग नियंत्रण कार्यक्रम

१०.२३ या कार्यक्रमांतर्गत कॉलरा, गॅस्ट्रो, अतिसार, काविळ, विषमज्वर, इत्यादी जलजन्य आजारांच्या साथींचा उद्रेक तसेच अधूनमधून उद्भवणाऱ्या आजारांचे संनियंत्रण केले जाते. या आजारांमुळे होणारी लागण व मृत्यू कमी करणे याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात. साथींचा उद्रेक व अधूनमधून उद्भवणाऱ्या आजारांमुळे झालेली लागण व मृत्यूंची संख्या तक्ता १०.१८ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.१८ साथउद्रेक व अधूनमधून उद्भवणाऱ्या आजारांमुळे झालेली लागण व मृत्यूंची संख्या**

| आजार | २०११-१२ | | २०१२-१३ | | २०१३-१४ | | २०१४-१५ | | २०१५-१६+ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागण | मृत्यू | लागण | मृत्यू | लागण | मृत्यू | लागण | मृत्यू | लागण | मृत्यू |
| कॉलरा | ६,०७० | २ | १,९९१ | ० | ४,०९३ | ६ | १०८ | १ | १६८ | २ |
| गॅस्ट्रो | १,३०,५४८ | ११ | १,०१,८५५ | १४ | २,६५,४४८ | ५ | ५४,८९७ | ६ | ७२,०८९ | ३ |
| अतिसार | ७,०३,३६१ | २ | ३,६८,१९८ | ३ | १०,३३,५१९ | ६ | ९,१८,९९९ | ३ | ९,४८,१६४ | १ |
| काविळ | ५,५२९ | ३१ | ९,४९५ | ४२ | ६,३२३ | ३ | ५,७११ | ४ | ४,८०१ | ५ |
| विषमज्वर | ६८,७३५ | ० | ५१,६९३ | ० | २,०१,६८० | ० | ३६,१६० | ० | ३६,७२० | ० |
| लेप्टोस्पायरोसिस | ४५४ | २९ | ४९७ | १४ | ३३८ | २० | २३२ | २० | २४६ | २२ |
| **एकूण** | **९,१४,६९७** | **७५** | **५,३३,७२९** | **७३** | **१५,११,४०१** | **४०** | **१०,१६,१०७** | **३४** | **१०,६२,१८८** | **३३** |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## मानवी अवयव प्रत्यारोपण

१०.२४ मानवी उपचारांकरिता तसेच मानवी अवयवांची व्यावसायिक विक्री रोखण्याकरिता तत्संबंधी मानवी अवयव काढणे, जतन करणे, प्रत्यारोपण करणे याकरिता भारत सरकारने मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम, १९९४ लागू केला आहे. एक-अवयव प्रत्यारोपणाकरिता १११ केंद्रे, एकापेक्षा जास्त अवयवांच्या प्रत्यारोपणाकरिता २२ आणि नेत्रदान, नेत्रपेढी व बुब्बुळ प्रत्यारोपणासाठी २५९ केंद्रांची राज्यात नोंदणी झाली आहे. सन २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये करण्यात आलेल्या प्रत्यारोपणांची संख्या तक्ता १०.१९ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.१९ प्रत्यारोपणांची संख्या**

| प्रत्यारोपण | २०१४-१५ | २०१५-१६+ |
|---|---|---|
| जीवित मुत्रपिंड | ६६४ | ४२६ |
| जीवित यकृत | ९९ | ५३ |
| मृतवत अवयव प्रत्यारोपण | | |
| अ) मुत्रपिंड | ९९ | ४० |
| ब) यकृत | ४७ | २१ |
| बुब्बुळ प्रत्यारोपण | २,६०० | २,३७१ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

# महिला व बाल विकास

१०.२५ देशाचा आर्थिक आणि सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी महिला सक्षमीकरण आणि बाल विकास हा शासनाच्या कार्यक्रमांचा एक अनिवार्य भाग आहे. महिला सक्षमीकरणासाठी महिलांचे शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक परिस्थिती सुधारणे आवश्यक आहे. महिला धोरण (सन १९९४) आखणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असून ते २००१ मध्ये सुधारित करण्यात आले आणि २०१३ मध्ये नव्याने महिला धोरण जाहीर करण्यात आले. महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिलांशी निगडीत विशिष्ट योजनांच्या आखणीसह अनेक पुढाकार घेण्यात आले आहेत.

१०.२६ निवडक महिला विकास योजनांची प्रगती तक्ता १०. २० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२० निवडक महिला विकास योजनांची प्रगती**

(₹ कोटी)

| योजना | २०१४-१५ | | | २०१५-१६+ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च | लाभार्थी | नियतव्यय | खर्च + | लाभार्थी + |
| शासकीय महिला वसतिगृहे / संरक्षण गृहे/ स्वयंसेवी आधार गृहे | १२.३६ | १२.३६ | १,३६८ | १३.३५ | ८.०५ | २,०१५ |
| समुपदेशन केंद्रे | ४.२० | ३.१५ | १३६ | १.५१ | १.०६ | १३६ |
| शुभमंगल सामुहिक विवाह योजना | २.१० | १.५८ | १,३११ | ०.६१ | ०.२१ | १७६ |
| मनोधैर्य योजना | ३५.११ | २९.९० | १,३१७ | २१.८९ | १५.२८ | ५१० |

*आधार* : महिला व बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

१०.२७ महिलांसाठी राज्यात राबविण्यात येणा-या केंद्र पुरस्कृत योजना खालीलप्रमाणे आहेत.

- **नोकरदार महिलांसाठी वसतिगृहे :** केंद्र शासनाने नोकरदार महिलांच्या वसतिगृहात प्रवेशासाठी उत्पन्नाची मर्यादा महानगरांसाठी वार्षिक ₹ ३०,००० व इतर शहरांसाठी वार्षिक ₹ २५,००० प्रमाणे घालून दिलेली आहे. राज्यात अशी १२७ वसतिगृहे असून त्यात ९,१७२ महिला राहतात.
- **प्रशिक्षण व रोजगार कार्यक्रमासाठी आधार (स्टेप) :** या कार्यक्रमाची मुख्य उद्दिष्टे महिलांच्या छोट्या गटांना चालना देणे, स्वयंरोजगार व कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण देणे आणि रोजगार तथा उत्पन्न निर्मितीचे प्रकल्प सुरू करण्यासाठी अनुषंगिक सहाय्य करणे ही आहेत. या कार्यक्रमांतर्गत १६ प्रकल्प कार्यरत असून त्यांची एकूण प्रवेश क्षमता १,०५० आहे.
- **स्वाधार :** या योजनेंतर्गत संकटग्रस्त महिलांच्या पुनर्वसनासाठी संरक्षण, संगोपन, शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येते. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या एकूण ४६ प्रकल्पांमध्ये २,५०० लाभार्थी आहेत.
- **उज्वला :** महिलांच्या लैंगिक शोषणाच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी आणि पीडितांची सुटका, पुनर्वसन व पुनर्स्थापना करण्यासाठी ५२ संस्था कार्यरत असून, त्यापैकी १६ निवासी संस्था आहेत.

## निर्णय प्रक्रियेत सहभाग

१०.२८ केंद्र शासनाने महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एक-तृतीयांश आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि, राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांतील हे आरक्षण ५० टक्क्यांपर्यंत वाढविले आहे. राज्यातील स्थानिक संस्थांमध्ये महिलांसाठी राखीव जागा तक्ता १०.२१ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.२१ राज्यातील स्थानिक संस्थांमध्ये महिलांसाठी राखीव जागा**

(**संख्या**)

| स्थानिक संस्था | संख्या | एकूण जागा | महिलांसाठी राखीव |
|---|---|---|---|
| महानगरपालिका | २६ | २,६२४ | १,३१८ |
| नगरपरिषद | २३० | ५,०२३ | २,५९५ |
| नगरपंचायत | ११० | १,८७० | ९९० |
| जिल्हा परिषद | ३४ | २,००६ | १,०१३ |
| पंचायत समिती | ३५१ | ४,०१२ | २,००६ |
| ग्रामपंचायत | २७,९२० | २,२३,८५७ | १,११,९२९ |
| **एकूण** | **२८,६७१** | **२,३९,३९२** | **१,१९,८५१** |

*आधार* :राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र शासन

## महिला आर्थिक विकास महामंडळ

१०.२९ केंद्र व राज्य पुरस्कृत विविध विकास योजना राबविण्याकरिता, राज्य शासनाने महिला आर्थिक विकास महामंडळास (माविम) राज्यस्तरीय शिखर संस्था म्हणून घोषित केले आहे. स्व-सहाय्यता गट, वित्तीय संस्था, स्वयंसेवी संस्था आणि शासनाचे संबंधित विभाग यांमधील समन्वय संस्था म्हणूनही माविम काम करते. माविमला विविध योजनांखाली सन २०१५-१६ मध्ये ₹ १९.३५ कोटी निधी प्राप्त झाला असून डिसेंबर पर्यंत ₹ १२.८६ कोटी खर्च झाला आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती तक्ता १०.२२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२२ महिला आर्थिक विकास महामंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या योजना**

(₹ कोटी)

| योजना | २०१४-१५ | | | २०१५-१६+ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च | लाभार्थी | नियतव्यय | खर्च + | लाभार्थी + |
| तेजस्विनी | ५.६० | ३.३६ | ७,०१,३३० | ८.७७ | ६.०० | १०,४९,७५४ |
| महिला सक्षमीकरण (कर्जावरील व्याजासाठी चार टक्के अनुदान) | २.१० | २.१० | ५३,७८४ | ०.०३ | ० | १०,७२५ |
| महिला सक्षमीकरण (अजा उपयोजना) | २.०० | २.०० | २,४२,९९९ | ०.७५ | ० | २,४९,४०० |
| महिला सक्षमीकरण (अर्थ सहाय्य माविम ) | १२.११ | १२.११ | लागू नाही | ९.८० | ६.८६ | लागू नाही |
| महिलांना कुशल प्रशिक्षण देण्यासाठी अर्थसहाय्य | १.७५ | ० | ० | ०.०० | ०.०० | ० |

*आधार* : महिला आर्थिक विकास महामंडळ,मुंबई + डिसेंबरपर्यंत

१०.२९.१ महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्व-सहायता गट हे चांगले माध्यम आहे. स्व-सहायता गटांची एकूण बचत सुमारे ₹ ३४८.३५ कोटी होती आणि एकूण अंतर्गत वितरीत कर्ज ₹ ९६७.१८ कोटी होते. स्व-सहाय्यता गटांना विविध वित्तीय संस्थांकडून ₹ ९८९.४५ कोटी कर्ज मिळाले. राज्यातील महिला स्व-सहाय्यता गटांची माहिती तक्ता १०.२३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२३ राज्यातील महिला स्व-सहाय्यता गटांची माहिती**

(संख्या)

| विभाग | क्षेत्र | गावे/शहरे | २०१४-१५ | | २०१५-१६+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्व-सहाय्यता गट | सदस्य | स्व-सहाय्यता गट | सदस्य |
| कोकण | ग्रामीण | ९६८ | ६,४७० | ७६,७०६ | ६,८२७ | ८१,०४६ |
| | नागरी | २ | ८६१ | १०,६४७ | ९४० | १२,९४० |
| | एकूण | ९७० | ७,३३१ | ८७,३५३ | ७,७६७ | ९३,९८६ |
| पुणे | ग्रामीण | १,०३९ | ९,४०९ | १,२७,७८९ | १०,३३५ | १,३८,९६५ |
| | नागरी | २ | ४५२ | ५,७६१ | ४३० | ५,९०५ |
| | एकूण | १,०४१ | ९,८६१ | १,३३,५५० | १०,७६५ | १,४४,८७० |
| नाशिक | ग्रामीण | १,६०० | ९,८१४ | १,४९,०५८ | १०,२८५ | १,५४,२४३ |
| | नागरी | १ | २३७ | २,८१२ | २४९ | ३,४१२ |
| | एकूण | १,६०१ | १०,०५१ | १,५१,८७० | १०,५३४ | १,५७,६५५ |
| औरंगाबाद | ग्रामीण | २,५१० | ११,६५५ | १,८९,८१२ | १२,३५५ | १,९८,१२२ |
| | नागरी | ३ | ७३२ | ९,५१३ | ७३७ | १०,१२३ |
| | एकूण | २,५१३ | १२,३८७ | १,९९,३२५ | १३,०९२ | २,०८,२४५ |
| अमरावती | ग्रामीण | १,९४२ | १०,४८० | १,३३,१२४ | ११,१९६ | १,४०,८१५ |
| | नागरी | १ | २०० | २,४१९ | २१३ | २,७५८ |
| | एकूण | १,९४३ | १०,६८० | १,३५,५४३ | ११,४०९ | १,४३,५२३ |
| नागपूर | ग्रामीण | २,४३६ | १४,२१६ | २,०९,०५८ | १५,०७० | २,१९,१८७ |
| | नागरी | १ | २०१ | २,५४९ | २०१ | २,७१४ |
| | एकूण | २,४३७ | १४,४१७ | २,११,६०७ | १५,२७१ | २,२१,९०० |
| प्रादेशिक गैर सरकारी संस्था | - | - | १२,९५२ | १,६०,३९१ | १२,९५२ | १,६०,३९१ |
| **एकूण** | **ग्रामीण** | **१०,४९५** | **७४,९९६** | **१०,४५,९३८** | **७९,०२०** | **१०,९२,७६९** |
| | **नागरी** | **१०** | **२,६८३** | **३३,७०१** | **२,७७०** | **३७,८५२** |
| | **एकूण** | **१०,५०५** | **७७,६७९** | **१०,७९,६३९** | **८१,७९०** | **११,३०,६२१** |

*आधार :* मा‍विम, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## बाल विकास

१०.३० बाल विकासासाठी राज्य शासनामार्फत राज्यात विविध योजना राबविण्यात येत असून त्या पुढीलप्रमाणे आहेत:

- **निरीक्षण गृहे :** राज्यात ११ जिल्ह्यांत शासनाकडून एकूण १२ शासकीय निरीक्षण गृहे चालविली जात असून त्यांची प्रवेश क्षमता ६०० आहे. याशिवाय स्वयंसेवी संस्थांमार्फत ४८ निरीक्षण गृहे (१९ मुलींसाठी व २९ मुलांसाठी) चालविली जात असून, त्यांची प्रवेश क्षमता ४,२७५ आहे. अनाथ, परित्याग केलेली मुले, हरवलेल्या व काम करणाऱ्या मुलांना बाल कल्याण समिती / बाल न्याय मंडळ यांच्या शिफारसीने निरीक्षणगृहात प्रवेश दिला जातो. राज्य शासनाकडून प्रति लाभार्थी दरमहा ₹ ९०० सहाय्यक अनुदान दिले जाते.

- **बालगृहे :** वय वर्ष १८ पर्यंतच्या मुलांना या गृहात प्रवेश दिला जातो. राज्यात शासनाकडून २८ बालगृहे चालविली जात असून त्यांची प्रवेश क्षमता २,९९० आहे. याशिवाय स्वयंसेवी संस्थांमार्फत ९९४ अनुदानित बालगृहे कार्यरत असून त्यांची प्रवेश क्षमता ८२,८५९ आहे तसेच विना अनुदानित ६३ बालगृहे चालविली जात असून, त्यांची प्रवेश क्षमता ३,८४० आहे. राज्य शासनामार्फत दरमहा प्रति लाभार्थी ₹ १,२१५ व एडस् ग्रस्त मुलांसाठी दरमहा ₹ १,३०५ याप्रमाणे या बालगृहांना

सहाय्यक अनुदान देण्यात येते. या योजनेंतर्गत सन २०१४-१५ मध्ये ७७,७७४ लाभार्थ्यांवर ₹ २६.६० कोटी खर्च झाला. तर सन २०१५-१६ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ १७.५३ कोटी खर्च झाला.

- **अनुरक्षण गृहे :** या योजनेंतर्गत बाल गृहामधील १८ वर्षे वयाच्या किशोरवयीन मुलांचे अनुरक्षणगृहात पुनर्वसन केले जाते. प्रवेशितांना त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत किंवा त्यांना रोजगार मिळेपर्यंत अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, वैद्यकिय सुविधा, समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन, इ. सुविधा पुरविण्यात येतात. सद्यस्थितीत राज्यात सहा शासकीय व तीन स्वयंसेवी संस्थांची अनुरक्षण गृहे असून त्यांची प्रवेश क्षमता अनुक्रमे ६०० व ११० आहे. राज्य शासनाकडून दरमहा प्रति लाभार्थी ₹ १,२१५ सहाय्यक अनुदान या गृहांना देण्यात येते.

- **बाल संगोपन योजना :** गरजू बेघर मुला-मुलींना पर्यायी कुटुंब उपलब्ध करुन देण्यासाठी ही योजना राज्यात राबविण्यात येते. सद्यस्थितीत राज्यात १३७ स्वयंसेवी संस्थांमार्फत १३,००४ बालकांचे संगोपन केले जाते. या योजनेंतर्गत सन २०१४-१५ मध्ये ₹ ४.४५ कोटी खर्च झाला, तर सन २०१५-१६ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ १.०६ कोटी खर्च झाला.

- **सुकन्या :** या योजनेंतर्गत १ जानेवारी, २०१४ व त्यानंतर दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांमध्ये जन्मलेल्या मुलीच्या नावावर ₹ २१,२०० भारतीय आयुर्विमा महामंडळामध्ये जमा करण्यात येतात. मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिला ₹ एक लाख प्राप्त होतात. याशिवाय तिच्या इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंतच्या शिक्षणासाठी दरमहा ₹ १०० शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेंतर्गत सन २०१४-१५ मध्ये १३,३९३ लाभार्थ्यांवर ₹ ३२६ लाख खर्च झाला.

## एकात्मिक बाल विकास सेवा

१०.३१ ग्रामीण, आदिवासी व झोपडपट्टी भागातील शालेयपूर्व बालकांची योग्य वाढ व विकास साधण्यासाठी, एकात्मिक सेवा पुरविणे ही एकात्मिक बाल विकास सेवा या योजनेची उद्दिष्टे आहेत. हा कार्यक्रम ९७,४७५ अंगणवाड्या, ११,०८४ मिनी अंगणवाड्या आणि ५५३ बालविकास प्रकल्पामार्फत राबविला जातो.

## पोषण कार्यक्रम

१०.३१.१ बालके, गर्भवती महिला व स्तनदा माता यांच्या पोषण विषयक किमान गरजा भागविण्यासाठी व त्यांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी पूरक पोषण आहार हा कार्यक्रम एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत राबविण्यात येतो. पूरक पोषण कार्यक्रमांतर्गत समाजातील मागासलेल्या घटकांतील सहा वर्षापेक्षा कमी वयाच्या बालकांना पोषण आहार देणे, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांचे आरोग्य सुधारणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. दुर्गम व संवेदनशील भागातील कुपोषण नियंत्रित करुन अर्भक मृत्यूदर कमी करणे हे सुध्दा या योजनेचे एक उद्दिष्ट आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकानुसार,सन २०१०-११ पासून बालकांचे योग्य वजनाची, कमी वजनाची व अति कमी वजनाची बालके असे वर्गीकरण करण्यात येते. बालकांची (० ते ५ वर्षे) पोषण श्रेणीनिहाय टक्केवारी तक्ता १०.२४ मध्ये दिली आहे. पूरक पोषण आहार कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२४ बालकांची (० ते ५ वर्षे) पोषण श्रेणीनिहाय टक्केवारी**

| वर्ष | क्षेत्र | योग्य वजनाची बालके | कमी वजनाची बालके | अति कमी वजनाची बालके |
|---|---|---|---|---|
| २०१४-१५ | ग्रामीण | ९२.५ | ६.४ | १.१ |
| | आदिवासी | ८०.६ | १५.६ | ३.८ |
| | नागरी | ८३.४ | १५.४ | १.२ |
| | **एकूण** | **८९.२** | **९.६** | **१.५** |
| २०१५-१६+ | ग्रामीण | ९२.५ | ६.३ | १.१ |
| | आदिवासी | ८१.२ | १५.२ | ३.६ |
| | नागरी | ८३.९ | १५.८ | १.१ |
| | **एकूण** | **८९.५** | **९.१०** | **१.४** |

*आधार* : आयुक्तालय, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

**तक्ता १०.२५ पूरक पोषण आहार कार्यक्रमाची प्रगती**

| क्षेत्र | वर्ष | लाभार्थी (लाखात) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| ग्रामीण (आदिवासी भागासह) | २०१४-१५ | ५९.९४ | १,०९१.९६ |
| | २०१५-१६+ | ५८.६७ | ५५१.३३ |
| नागरी | २०१४-१५ | ११.९८ | २१७.६३ |
| | २०१५-१६+ | ११.७८ | २६.०४ |

*आधार* : आयुक्तालय, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

१०.३१.२ एकात्मिक बाल विकास सेवा योजनांतर्गत राज्यात राबविल्या जाणाऱ्या केंद्र पुरस्कृत योजना खालीलप्रमाणे आहेत.

- **राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण (सबला) :** ही योजना सन २०११ पासून ११ ते १८ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलींच्या सक्षमीकरणासाठी राज्यातील ११ जिल्ह्यांमध्ये २०७ प्रकल्पांमार्फत राबविण्यात येत आहे. पूरक पोषण आहार कार्यक्रमांतर्गत या योजनेखाली सन २०१४-१५ मध्ये १०.४४ लाख व सन २०१५-१६ मध्ये नोव्हेंबर पर्यंत ९.०८ लाख लाभार्थी होते.
- **इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना :** गर्भवती महिला व स्तनदा माता यांचे आरोग्य व पोषणाचा दर्जा सुधारावा या उद्देशाने ही योजना भंडारा व अमरावती या दोन जिल्ह्यांमध्ये सन २०११ पासून प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येत आहे. लाभधारक गर्भवती महिलांना व स्तनदा माता यांना दोन हप्त्यांमध्ये ₹ ६,००० रोख रक्कम दिली जाते. या योजनेंतर्गत सन २०१४-१५ मध्ये ०.५७ लाख व सन २०१५-१६ मध्ये नोव्हेंबर पर्यंत ०.४३ लाख लाभार्थी होते.

## महिला व बालकांवरील अत्याचार

१०.३२ महिलांवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष शारीरिक किंवा मानसिक क्रूर कृत्य केली जातात त्या गुन्ह्यांना 'महिलांवरील अत्याचाराचे गुन्हे' असे म्हटले जाते आणि बालकांवरील अत्याचाराचे जे गुन्हे घडतात किंवा ज्या गुन्ह्यात बालके पीडित असतात असे गुन्हे 'बालकांवरील अत्याचाराचे गुन्हे' म्हणून संबोधले जातात. महिलांवरील अत्याचाराचे नोंदलेले गुन्हे तक्ता १०.२६ मध्ये व बालकांवरील अत्याचाराचे नोंदलेले गुन्हे तक्ता १०.२७ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.२६ महिलांवरील अत्याचाराचे नोंदलेले गुन्हे**

(संख्या)

| अत्याचाराचा प्रकार | २०१३ | २०१४ | २०१५+ |
|---|---|---|---|
| बलात्कार | ३,०६३ | ३,४३८ | ४,१७६ |
| अपहरण आणि पळवून नेणे | १,८७४ | २,४५७ | ४,८६४ |
| हुंडाबळी | ३२० | २७९ | २६२ |
| पती व पतीच्या नातेवाईकांकडून झालेले अत्याचार | ८,५४२ | ७,६९६ | ७,४३५ |
| विनयभंग | ८,१३२ | १०,००१ | ११,६९६ |
| लैंगिक अत्याचार | २,६३२ | १,५७५ | ९८६ |
| अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा | २८९ | २०२ | ४०० |
| इतर | १,२७७ | १,०४५ | १,०२८ |
| **एकूण** | **२६,१२९** | **२६,६९३** | **३०,८४७** |

*आधार* : गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

**तक्ता १०.२७ बालकांवरील अत्याचाराचे नोंदलेले गुन्हे**

(संख्या)

| गुन्ह्याचा प्रकार | २०१३ | २०१४ | २०१५+ |
|---|---|---|---|
| खून (एकूण) | १९७ | २०७ | १४३ |
| १) गर्भातील जीव | ६ | १२ | ३१ |
| २) इतर | १९१ | १९५ | ११२ |
| बालकांवरील बलात्कार | १,५४६ | १,७१४ | १,९८८ |
| अपहरण व पळवून नेणे | १,६९८ | २,६१६ | ६,५७६ |
| परित्याग | २५९ | २२५ | ८९ |
| इतर | २,७१० | ३,३५३ | २,८८० |
| **एकूण** | **६,४१०** | **८,११५** | **११,६७६** |

*आधार* : गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

# रोजगार व दारिद्र्य

## रोजगार

१०.३३ विकासाचा अविभाज्य भाग असल्याने रोजगार निर्मितीस शासन व आर्थिक नियोजनकारांनी प्राथम्य दिले आहे. जनगणना २०११ नुसार, राज्यातील सुमारे एक-पंचमांश लोकसंख्या वय वर्षे १५ ते २४ या वयोगटात आहे. सर्व क्षेत्राच्या गरजा भागविण्याकरिता या कार्यबलाच्या प्रशिक्षणावर लक्ष केंद्रित करून त्यांना रोजगाराच्या संधी व मागणी यांच्याशी त्यांची सांगड घालणे गरजेचे आहे.

१०.३४ रोजगार व बेरोजगार यासंबंधीच्या आकडेवारीचे मुख्य स्रोत, जनगणना, आर्थिक गणना, राष्ट्रीय नमुना पाहणी (रानपा) कार्यालय व श्रम केंद्र, भारत सरकार यांनी घेतलेल्या पाहण्या, कारखाने अधिनियम-१९४८ खालील नोंदणीकृत कारखान्यांची अनिवार्य विवरणपत्रे आणि रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रम हे आहेत. स्रोतनिहाय रोजगारविषयक आकडेवारी खाली दिली आहे.

### जनगणना

१०.३५ जनगणनेद्वारे लोकसंख्याविषयक आकडेवारीशिवाय रोजगार संरचना व कार्यबलाची माहिती उपलब्ध होते. जनगणना २०११ नुसार, राज्यात एकूण ४.९४ कोटी कामगार असून, त्यापैकी ३.२६ कोटी पुरुष होते. अखिल-भारतीय स्तरावरील ३९.१ या कार्य सहभाग दराच्या तुलनेत राज्याचा हा दर ४४ आहे. राज्यातील विभाग व क्षेत्रनिहाय कार्य सहभाग दर तक्ता १०.२८ मध्ये दिले आहेत. जनगणना २०११ नुसार, कामगारांचे आर्थिक कार्यानुसार वर्गीकरण परिशिष्ट १०.८ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.२८ राज्यातील विभाग व क्षेत्रनिहाय कार्यबल सहभाग दर - जनगणना २०११**

(टक्के)

| विभाग | क्षेत्र | मुख्य कामगार | | | सीमांतिक कामगार | | | एकूण कामगार | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण |
| कोकण | ग्रामीण | ४४.७ | २२.० | ३३.३ | १०.९ | १२.१ | ११.५ | ५५.६ | ३४.१ | ४४.८ |
| | नागरी | ५५.१ | १५.५ | ३६.८ | ३.२ | २.४ | २.८ | ५८.३ | १७.९ | ३९.६ |
| | एकूण | ५२.९ | १७.० | ३६.० | ४.८ | ४.७ | ४.७ | ५७.७ | २१.७ | ४०.७ |
| पुणे | ग्रामीण | ५३.६ | ३१.८ | ४३.० | ३.५ | ६.५ | ५.० | ५७.१ | ३८.३ | ४८.० |
| | नागरी | ५१.९ | १६.२ | ३४.७ | ३.० | २.२ | २.६ | ५४.९ | १८.४ | ३७.३ |
| | एकूण | ५२.९ | २५.५ | ३९.६ | ३.३ | ४.८ | ४.० | ५६.२ | ३०.३ | ४३.६ |
| नाशिक | ग्रामीण | ५२.० | ३९.८ | ४६.१ | ४.० | ६.७ | ५.३ | ५६.० | ४६.५ | ५१.४ |
| | नागरी | ४८.१ | १२.२ | ३०.९ | ३.६ | २.५ | ३.१ | ५१.७ | १४.७ | ३४.० |
| | एकूण | ५०.८ | ३१.४ | ४१.४ | ३.९ | ५.४ | ४.६ | ५४.७ | ३६.८ | ४६.० |
| औरंगाबाद | ग्रामीण | ५२.१ | ३९.० | ४५.७ | ३.१ | ५.६ | ४.३ | ५५.२ | ४४.६ | ५०.० |
| | नागरी | ४४.८ | ११.४ | २८.६ | ४.२ | २.८ | ३.५ | ४९.० | १४.२ | ३२.१ |
| | एकूण | ५०.१ | ३१.५ | ४१.१ | ३.४ | ४.८ | ४.१ | ५३.५ | ३६.३ | ४५.२ |
| अमरावती | ग्रामीण | ५२.६ | ३५.८ | ४४.५ | ५.० | ७.२ | ६.१ | ५७.६ | ४३.० | ५०.६ |
| | नागरी | ४७.९ | ११.४ | ३०.१ | ४.२ | २.१ | ३.२ | ५२.१ | १३.५ | ३३.३ |
| | एकूण | ५१.३ | २९.० | ४०.५ | ४.८ | ५.७ | ५.३ | ५६.१ | ३४.७ | ४५.८ |
| नागपूर | ग्रामीण | ४८.४ | ३०.४ | ३९.५ | ११.८ | १६.५ | १४.१ | ६०.२ | ४६.९ | ५३.६ |
| | नागरी | ४८.७ | १२.६ | ३१.१ | ४.६ | ३.२ | ३.९ | ५३.३ | १५.८ | ३५.० |
| | एकूण | ४८.५ | २३.० | ३६.० | ८.७ | १०.९ | ९.८ | ५७.२ | ३३.९ | ४५.८ |
| **राज्य** | **ग्रामीण** | **५१.३** | **३४.४** | **४३.१** | **५.४** | **८.१** | **६.७** | **५६.७** | **४२.५** | **४९.८** |
| | **नागरी** | **५१.७** | **१४.३** | **३४.०** | **३.५** | **२.५** | **३.०** | **५५.२** | **१६.८** | **३७.०** |
| | **एकूण** | **५१.५** | **२५.४** | **३८.९** | **४.५** | **५.६** | **५.०** | **५६.०** | **३१.१** | **४४.०** |

*आधार :* भारताचे महानिबंधक

### आर्थिक गणना

१०.३६ सहाव्या आर्थिक गणनेच्या निष्कर्षानुसार, राज्यातील आस्थापनांची संख्या ६१.३ लाख असून, त्यात काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या १४५.१ लाख आहे. पाचव्या आर्थिक गणनेच्या तुलनेत सहाव्या आर्थिक गणनेत राज्यातील रोजगारात ३६.५ टक्के वाढ झाली आहे. एकूण रोजगारापैकी ४१.८ टक्के रोजगार ग्रामीण भागात, तर ५८.२ टक्के रोजगार नागरी भागात आहे. सहाव्या आर्थिक गणनेची विस्तृत माहिती या प्रकाशनाच्या 'विशेष अभ्यास' प्रकरणात दिली आहे.

## राष्ट्रीय नमुना पाहणी

१०.३७ राष्ट्रीय नमुना पाहणी कार्यालय रोजगार व बेरोजगार विषयक व्यापक पंचवार्षिक पाहण्या घेते. सन २०११-१२ मध्ये नित्य कार्यरत व्यक्तींची टक्केवारी ५३.६ होती. प्रमुख उद्योग गटानुसार नित्य कार्यरत व्यक्तींची टक्केवारी तक्ता १०.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२९ प्रमुख उद्योग गटानुसार नित्य कार्यरत व्यक्तींची टक्केवारी**

| प्रमुख उद्योग गट | जुलै, २००४-जून,२००५ (६१ वी फेरी) | | | जुलै,२००९-जून,२०१० (६६ वी फेरी) | | | जुलै, २०११-जून, २०१२ (६८ वी फेरी) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | राज्य | ग्रामीण | नागरी | राज्य | ग्रामीण | नागरी | राज्य |
| कृषि | ७८.३ | ५.० | ५४.० | ७७.९ | ५.० | ४९.१ | ७४.० | ३.९ | ४७.२ |
| खाणकाम आणि दगड खाणकाम | ०.२ | ०.४ | ०.३ | ०.५ | ०.२ | ०.४ | ०.३ | ०.२ | ०.२ |
| वस्तूनिर्माण | ५.७ | २२.० | ११.१ | ५.८ | २२.२ | १२.३ | ५.९ | २१.९ | १२.० |
| वीज, वायू व पाणी पुरवठा | ०.१ | ०.३ | ०.२ | ०.१ | ०.५ | ०.२ | ०.१ | ०.४ | ०.२ |
| बांधकाम | २.७ | ८.५ | ४.६ | ३.१ | १०.५ | ६.० | ४.८ | १०.८ | ७.१ |
| व्यापार | ५.५ | २५.२ | १२.१ | ४.७ | २४.२ | १२.४ | ५.१ | १७.० | ९.७ |
| वाहतूक | २.१ | १०.३ | ४.८ | २.४ | ११.४ | ६.० | २.५ | ९.७ | ५.३ |
| सेवा | ५.४ | २८.३ | १२.९ | ५.५ | २६.० | १३.६ | ७.३ | ३६.१ | १८.३ |
| **एकूण** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** |

*आधार :* अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

१०.३७.१ चालू आठवड्याच्या कार्यस्थितीनुसार १५ ते ५९ वर्षे वयोगटातील कार्यबलाची टक्केवारी तक्ता १०.३० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३० चालू आठवड्याच्या कार्यस्थितीनुसार १५ ते ५९ वर्षे वयोगटातील कार्यबलाची टक्केवारी**

| कार्यबलाचा प्रकार | जुलै, २००४-जून,२००५ (६१ वी फेरी) | | | जुलै,२००९-जून,२०१० (६६ वी फेरी) | | | जुलै, २०११-जून, २०१२ (६८ वी फेरी) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | राज्य | ग्रामीण | नागरी | राज्य | ग्रामीण | नागरी | राज्य |
| स्वयंरोजगार / घरगुती व्यवसायात मदतनीस | ४९.० | ३७.४ | ४५.१ | ४८.५ | ३७.४ | ४४.१ | ४९.५ | ३२.१ | ४२.७ |
| नियमित रोजंदारी/ वेतनी कर्मचारी | ८.१ | ५१.६ | २२.८ | ९.३ | ५०.९ | २५.८ | ११.१ | ५५.० | २८.२ |
| नैमित्तिक मजूर | ४२.९ | ११.० | ३२.१ | ४२.२ | ११.७ | ३०.१ | ३९.४ | १२.९ | २९.१ |
| **एकूण** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** |

*आधार :* अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

## कारखान्यातील रोजगार

१०.३८ सन २०१३ च्या अस्थायी निष्कर्षानुसार, कारखाना अधिनियम, १९४८ अंतर्गत नोंदणीकृत एकूण ३८,३२६ कार्यरत कारखान्यातील सरासरी दैनिक रोजगार सुमारे २०.२ लाख होता. सन २०१२ मधील तत्सम आकडेवारीच्या तुलनेत कारखान्यांच्या संख्येत २.६ टक्के वाढ, तर रोजगारात १.७ टक्के घट झाली आहे. सन २०१३ मध्ये कार्यरत कारखान्यांपैकी ५० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असणाऱ्या कारखान्यांचे प्रमाण २२ टक्के होते. सर्वाधिक कामगार 'मूलभूत धातू व धातू उत्पादनांचे उत्पादन' (१७.६ टक्के) व त्याखालोखाल 'यंत्रे व उपकरणे (परिवहन उपकरणांशिवाय)' (१२.९ टक्के) या कारखान्यांमध्ये कार्यरत होते. कारखान्यांतील सरासरी दैनिक रोजगाराची टक्केवारी तक्ता १०.३१ मध्ये दिली आहे आणि औद्योगिक सांख्यिकी परिशिष्ट १०.९ व १०.१० मध्ये दिली आहे.

## रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रम

१०.३९ रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रम ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यात राबविण्यात येत आहे. रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमाचा मुख्य उद्देश सार्वजनिक व खाजगी आस्थापना आणि त्यातील रोजगार यांच्याबाबतची माहिती उपलब्ध करणे तसेच रोजगाराच्या स्थितीतील बदलाची नोंद करणे हा आहे. या कार्यक्रमांतर्गत त्रैमासिक आकडेवारी गोळा करण्यात येते. सदर कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक क्षेत्रातील सर्व आस्थापना (आकार विचारात न घेता) व खाजगी क्षेत्रातील १० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या बिगर-कृषि आस्थापनांचा समावेश होतो. तर बृन्हमुंबईसाठी २५ किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या बिगर-कृषि खाजगी आस्थापनांचा समावेश आहे. सप्टेंबर,२०१५ अखेर, रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमानुसार राज्यातील एकूण रोजगार ५७.४६ लाख होता, त्यापैकी २२.२१ लाख (४०.१ टक्के) रोजगार सार्वजनिक क्षेत्रात होता. एकूण रोजगारात महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण ३१ टक्के होते.

**तक्ता १०.३१ कारखान्यांतील सरासरी दैनिक रोजगाराची टक्केवारी**

| उद्योग प्रकार | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|
| | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४* |
| ग्राहक वस्तू | २८.५ | २८.९ | २७.८ | २८.० |
| मध्यम तयार माल | ३६.६ | ३५.६ | ३५.६ | ३६.१ |
| भांडवली वस्तू | २७.७ | २८.३ | २८.२ | २७.० |
| इतर | ७.२ | ७.२ | ८.४ | ८.९ |
| **एकूण** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** |

*आधार* :औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

**आलेख १०.२ : रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमांतर्गत रोजगार**




## कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रे

१०.४० काम शोधणाऱ्या व्यक्तींना रोजगार व स्वयंरोजगारासाठी समुपदेशन, मार्गदर्शन व मदत करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. राज्यात अशी एकूण ५० केंद्रे कार्यरत असून, त्यापैकी ३५ जिल्हा स्तरावर, सहा विद्यापीठात, आठ आदिवासींकरिता, तर एक विशेष केंद्र शारिरीकदृष्ट्या नि:समर्थ व्यक्तींसाठी आहे.

१०.४०.१ या केंद्रांच्या चालू नोंदवहीत, ३१ डिसेंबर, २०१५ रोजी नोंद असलेल्या व्यक्तींची संख्या ३४.०२ लाख होती. सन २०१५ मध्ये या केंद्रांत नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या ४.६२ लाख होती. सन २०१५ मध्ये, ५.७१ लाख रिक्त पदे अधिसूचित करण्यात आली, तर ०.७० लाख व्यक्तींना रोजगार पुरविण्यात आला. अधिसूचित रिक्त पदे, भरलेली पदे आणि चालू नोंदवहीत असलेल्या व्यक्तींचा शैक्षणिक पात्रतेनुसार तपशील अनुक्रमे परिशिष्ट १०.११ व १०.१२ मध्ये दिला आहे.

## रोजगार प्रोत्साहनाकरिता कार्यक्रम

१०.४१ राज्य शासनामार्फत खालील रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम राबविण्यात येतात. रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमांची प्रगती तक्ता १०.३२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३२ रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमांची प्रगती**

| कार्यक्रम | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६+ |
|---|---|---|---|---|---|
| रोजगार प्रोत्साहन@ | १८,९५६ | १८,४६६ | १५,८६८ | १९,८३३ | १३,८५७ |
| शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण $ | ४४,७३७ | ४६,७०६ | ४५,९७२ | ४३,३९६ | ५४,०५० |
| उद्योजकता विकास प्रशिक्षण # | ३५,०७६ | ४२,००२ | ४०,०५१ | ४०,४८६ | १२,७३९ |

\+ डिसेंबरअखेर

*आधार*: @ रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, महाराष्ट्र शासन $ व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन
# उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

१०.४१.१ कुशल कामगारांना रोजगाराच्या संधी व उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे या उद्देशाने राज्य शासनाने सन २००९-१० पासून जिल्ह्यांमध्ये रोजगार मेळावे आयोजित करण्यास सुरुवात केली आहे. वर्षनिहाय आयोजित रोजगार मेळावे व त्याद्वारे पुरविण्यात आलेला रोजगार तक्ता १०.३३ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.३३ वर्षनिहाय आयोजित रोजगार मेळावे व पुरविण्यात आलेला रोजगार**

(संख्या)

| वर्ष | रोजगार मेळावे | उपस्थित उद्योजक | रोजगार मेळाव्यात उपस्थित असलेले बेरोजगार युवक | त्यापैकी रोजगार पुरविलेले |
|---|---|---|---|---|
| २०११-१२ | १५९ | ९८१ | ६३,१८५ | २१,७६७ |
| २०१२-१३ | १४५ | ९०६ | ६१,९८६ | १९,३१२ |
| २०१३-१४ | ११५ | १,०४२ | ६९,८२३ | २०,८३४ |
| २०१४-१५ | १५६ | ८५३ | ५०,९५० | १५,६२५ |
| २०१५-१६+ | १३१ | ७३३ | ५४,९७५ | १५,२४८ |

*आधार* : कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## रोजगार निर्मिती व दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम

१०.४२ दारिद्र्य निर्मूलन हे विकासाच्या धोरणाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. सर्वसमावेशक विकास साध्य करण्यासाठी, विविध दारिद्र्य निर्मूलन व रोजगार निर्मिती कार्यक्रम, केंद्र तसेच राज्य शासनामार्फत राबविण्यात येत आहेत. यापैकी काही कार्यक्रमांबाबतची माहिती खाली दिली आहे.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

१०.४२.१ महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (सन २००६ मध्ये सुधारणा केल्याप्रमाणे) राज्यातील ३४ जिल्ह्यातील ग्रामीण भागात राबविण्यात येत आहे. राज्यात राबविण्यात येत असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रगती तक्ता १०.३४ मध्ये तर, कामाच्या वर्गीकरणानुसार कामांची संख्या व त्यावर झालेला खर्च परिशिष्ट १०.१३ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.३४ राज्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रगती**

| तपशील | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६+ |
|---|---|---|---|---|---|
| रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची संख्या (लाखात) | १३.७६ | १६.२५ | ११.४४ | ११.६० | ९.७९ |
| एकूण खर्च (₹कोटी) | १,५८८.१४ | २,१७०.२९ | १,२७४.६८ | १,६१७.८५ | १,३९४.६२ |
| पूर्ण झालेल्या कामांची संख्या | ६,४३३ | ७७,०८४ | ७८,८०७ | १,४७,२२४ | ६७,१६२ |
| मनुष्य दिवस निर्मिती (कोटी) | ६.५१ | ८.७२ | ५.१७ | ६.१४ | ४.९६ |
| प्रति कुटुंब सरासरी रोजगार (दिवस) | ४७ | ५४ | ४५ | ५३ | ५१ |
| रोजगारातील हिश्शाची टक्केवारी | | | | | |
| (i) अजा | ५.८ | ८.९ | ९.९ | १०.१ | ९.३ |
| (ii) अज | १७.१ | १६.९ | १९.७ | १८.७ | १७.५ |
| (iii) महिला | ४६.० | ४४.६ | ४३.७ | ४३.५ | ४३.८ |
| एक दिवसाच्या रोजगार निर्मितीची किंमत (₹) | २४४ | २४९ | २४७ | २६३ | २८१ |

*आधार*: नियोजन विभाग (रोहयो ), महाराष्ट्र शासन + १ फेब्रुवारी रोजी

## राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान

१०.४२.२ राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान सन २०११ पासून सुरु केले आहे. दारिद्र्य निर्मूलनासाठी गरीबांकरिता बळकट संस्था उभारणे, जेणे करून गरीबांसाठी स्वयंरोजगाराच्या आणि कौशल्याधारीत जीवनोन्नतीच्या वर्धित संधी उपलब्ध होऊन परिणामी त्यांच्या उत्पन्नात सातत्य रहावे, असा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. सन २०१५-१६ मध्ये डिसेंबरपर्यंत एकूण ८२,८१७ स्वयंसहायता गटांना ₹ २९४.४५ कोटींचा पतपुरवठा करण्यात आला. राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची प्रगती तक्ता १०.३५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३५ राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची प्रगती**

| तपशील | २०१४-१५ | २०१५-१६+ |
|---|---|---|
| सहाय्यित स्वयंसहाय्यता गट (संख्या) | ४६,०४८ | ८२,८१७ |
| स्वयंसहाय्यता गटातील एकूण सदस्यांची संख्या | १२,७१,८०८ | १५,७३,५६७ |
| एकूण अनुदान (₹ कोटी) | ५३.६१ | १४.९१ |
| एकूण कर्ज (₹ कोटी) | ५२७.७८ | २९४.४५ |
| एकूण खर्च (₹ कोटी) | १६०.०२ | ६३.८६ |

*आधार*: ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन. + डिसेंबरपर्यंत

## राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान

१०.४२.३ राज्यात राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाची अंमलबजावणी सन २०१४ पासून करण्यात येत आहे. ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासन ७५ टक्के व राज्य शासन २५ टक्के निधी या तत्त्वावर राबविण्यात येत आहे. या अभियानामध्ये राज्यामधील ५३ महानगरपालिका / नगरपरिषदांचा समावेश आहे. सन २०१५-१६ या वित्तीय वर्षामध्ये केंद्र शासनाने ₹ १२८ कोटी इतका निधी या अभियानाकरिता उपलब्ध करून दिलेला असून, राज्य शासनाने ₹ ४१.५७ कोटी वितरीत केले आहेत. कौशल्य प्रशिक्षण व रोजगार या कार्यक्रमांतर्गत ७६,९५६ लाभधारकांच्या लक्ष्याच्या तुलनेत १७,२१० लाभधारक होते व त्यावर ₹ १२.१८ कोटी खर्च झाला. स्वयंरोजगार कार्यक्रमांतर्गत १९,५०० लाभधारकांच्या लक्ष्याच्या तुलनेत १०,०२८ लाभधारक होते व त्यावर ₹ ०.३८ कोटी खर्च झाला.

## पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम

१०.४२.४ पंतप्रधान रोजगार निर्मिती हा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे :

- शहरी भागात होणारे स्थलांतर कमी करण्यासाठी पारंपरिक कारागीर / बेरोजगार युवकांसाठी स्वयंरोजगार उद्योगांची उभारणी करुन रोजगाराच्या संधी निर्माण करणे.
- कारागिरांच्या मजुरी मिळविण्याच्या क्षमतेत वाढ करुन रोजगाराच्या संधीत वाढ करणे.

सन २०१४-१५ मध्ये ३,२३९ प्रकल्पांना ₹ ७२.५५ कोटी तारण वितरीत करण्यात आले व त्याद्वारे १४,३८० इतका रोजगार निर्माण झाला, तर सन २०१५-१६ मध्ये डिसेंबरपर्यंत, १,७१९ प्रकल्पांना ₹ ३६.५८ कोटी तारण वितरित करण्यात आले व त्याद्वारे १४,०२६ इतका रोजगार निर्माण झाला.

## बीज भांडवल योजना

१०.४३ उद्योग, सेवा व व्यापार यासारखे स्वयंरोजगार सुरु करण्याच्यादृष्टीने तारण भागविण्यासाठी वित्तीय संस्थांकडून कमी व्याज दराचे कर्ज पुरवून बेरोजगार व्यक्तींना प्रोत्साहित करण्यासाठी राज्य शासनाद्वारे ही योजना राबविण्यात येते. स्थानिक बेरोजगार व्यक्ती किंवा १८ ते ५० वर्षे वयोगटातील सातवी उत्तीर्ण व्यक्ती या योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत. सन २०१४-१५ मध्ये एकूण १,८३५ प्रकल्पांना ₹ १५.७३ कोटी, तर २०१५-१६ मध्ये डिसेंबरपर्यंत एकूण ९५४ प्रकल्पांना ₹ ८.४० कोटी बीज भांडवल वितरीत करण्यात आले.

## औद्योगिक संबंध

१०.४४ मागील वर्षातील १९२ काम बंद झालेली प्रकरणे (संप व टाळेबंदी) व त्यामुळे प्रभावित झालेल्या ९५,९०१ कामगारांच्या तुलनेत २०१५ मध्ये काम बंद झालेली प्रकरणे (संप व टाळेबंदी) २१५ होती व त्याचा परिणाम १,१९,५९८ कामगारांवर झाला. सन २०१५ या वर्षातील संप व टाळेबंदीमुळे वाया गेलेल्या मनुष्य दिवसांची संख्या ३०.१० लाख होती, तर सन २०१४ मध्ये ती २४.९९ लाख होती. राज्यातील औद्योगिक विवादाबाबतचा तपशील परिशिष्ट १०.१४ मध्ये दिला आहे.

# दारिद्र्य

१०.४५ राष्ट्रीय नमुना पाहणी कार्यालय, भारत सरकार यांच्याकडून दर पाच वर्षांनी घेतल्या जाणाऱ्या 'कुटुंबाच्या उपभोग्य बाबीवरील खर्च' या विषयावरील राष्ट्रीय नमुना पाहणीच्या आधारे तत्कालीन नियोजन आयोगाकडून दारिद्र्य रेषा आणि दारिद्र्याचे दर यांचे अंदाज वेळोवेळी तयार करण्यात येत होते. राष्ट्रीय नमुना पाहणी ६८ व्या फेरीच्या 'कुटुंबाचा उपभोग्य बाबींवरील खर्च' या पाहणीतील माहितीच्या आधारे तत्कालीन नियोजन आयोगाने तेंडुलकर समितीच्या शिफारशींनुसार, सन २०११-१२ साठी दारिद्र्याचे अंदाज तयार केले.

१०.४५.१ सन २०११-१२ साठी अखिल-भारतीय स्तरावरील दारिद्र्यरेषा ग्रामीण भागासाठी ₹ ८१६ दरडोई दरमहा आणि नागरी भागासाठी ₹ १,००० दरडोई दरमहा अशी निश्चित करण्यात आली. महाराष्ट्राकरिता ग्रामीण भागासाठी ₹ ९६७ दरडोई दरमहा आणि नागरी भागासाठी ₹ १,१२६ दरडोई दरमहा अशी ठरविण्यात आली.

# गृहनिर्माण

१०.४६ गृहनिर्मिती हा सामाजिक व आर्थिक विकास दर्शविणारा एक महत्वाचा घटक आहे. चांगले जीवनमान व चांगला समाज घडविण्यासाठी सुरक्षित व परवडण्याजोगी घरे आवश्यक आहेत. अल्प उत्पन्न गटातील, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील तसेच दारिद्र्य रेषेखालील लोकांना घरे उपलब्ध करून देणे ही उद्दिष्टे शासनाच्या गृहनिर्माण धोरणात नमूद करण्यात आली आहेत. याकरिता विविध योजना राबविण्यात येत आहेत.

१०.४६.१ नागरी भागातील लोकसंख्येच्या वाढत्या एकत्रिकरणामुळे झोपडपट्टयांमध्ये राहणाऱ्या लोकांच्या संख्येत वाढ झाली आहे. जमिनीच्या अवाक्याबाहेरील किंमतींमुळे अशा भागात परवडणारी घरे उपलब्ध करुन देणे हे मोठे आव्हान आहे. नागरी भागात गृहनिर्माण योजनांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) तसेच शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) महाराष्ट्र मर्यादित यांची स्थापना केली आहे. याखेरीज निवडक शहरात झोपडपट्टयांचा पुनर्विकास व झोपडपट्टीवासीयांकरिता घरबांधणी यासाठी राज्य शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची (झोपुप्रा) स्थापना केली आहे.

# नागरी गृहनिर्माण

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

१०.४७ मुंबई तसेच राज्याच्या काही भागात घरे उपलब्ध करुन देण्याकरिता म्हाडाची स्थापना सन १९७७ मध्ये करण्यात आली. स्थापनेपासून डिसेंबर, २०१५ पर्यंत म्हाडाने एकूण ४,५०,००० सदनिकांचे बांधकाम व पुनर्विकास केला आहे. म्हाडाकडून बांधण्यात आलेल्या सदनिका व मालकीचे भूखंड तक्ता १०.३६ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.३६ म्हाडाकडून बांधण्यात आलेल्या सदनिका व मालकीचे भूखंड**

(संख्या)

| वर्ष | आर्थिक दुर्बल गट | अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | इतर | | एकूण सदनिका$ | भूखंडांची संख्या | खर्च @ (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सदनिका | संक्रमण शिबिरे | | | |
| २०११-१२ | ८१५ | २,९४१ | २३८ | ३८८ | १२२ | -- | ४,५०४ | ७९४ | ९२८.९४ |
| २०१२-१३ | १२४ | १,२९८ | ३१८ | १९७ | ३७८ | -- | २,३१५ | २२४ | ४६५.४५ |
| २०१३-१४ | १,५४२ | ४,६२७ | ६८७ | ४६९ | ९९ | ३५६ | ७,४२४ | ४३३ | ८५०.४२ |
| २०१४-१५ | ९१५ | १,१३६ | १,२९० | १९६ | ७१ | ८५५ | ३,६०८ | -- | ४२४.३८+ |
| २०१५-१६+ | ३३९ | १८२ | २५१ | -- | -- | -- | ७७२ | -- | ४८८.३१ |

*आधार* : म्हाडा, मुंबई    + डिसेंबर पर्यंत    @ भूखंडांसह    $ संक्रमण शिबिरे वगळून

१०.४८ सन २०१४-१५ मध्ये म्हाडाच्या विविध मंडळांमार्फत बांधलेल्या सदनिका तक्ता १०.३७ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता १०.३७ म्हाडाच्या विविध मंडळांमार्फत सन २०१४-१५ मध्ये बांधलेल्या सदनिका**

(संख्या)

| मंडळ | आर्थिक दुर्बल गट | अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | इतर | | एकूण $ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सदनिका | संक्रमण शिबिरे | |
| मुंबई | ४६७ | २३२ | ३९३ | १२९ | २४ | ८५५ | १,२४५ |
| कोकण | ० | ४० | ७४ | १६ | २० | ० | १५० |
| पुणे | ४४८ | ५९ | ३९ | १८ | ० | ० | ५६४ |
| नाशिक | ० | २६८ | ३७४ | ० | ४ | ० | ६४६ |
| औरंगाबाद | ० | ५०१ | २७८ | ० | १७ | ० | ७९६ |
| अमरावती | ० | २६ | २३ | ३ | ६ | ० | ५८ |
| नागपूर | ० | १० | १०९ | ३० | ० | ० | १४९ |
| **एकूण** | **९१५** | **१,१३६** | **१,२९०** | **१९६** | **७१** | **८५५** | **३,६०८** |

*आधार* : म्हाडा , मुंबई    $ संक्रमण शिबिरे वगळून

## शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

१०.४९ रस्ते, शाळा, रुग्णालये, समाज केंद्रे, इ. सारख्या पायाभूत सुविधांसह समाजातील सर्व घटकांना घरे देण्याचा विकास कार्यक्रम सिडको राबवित आहे. वेगाने वाढणारी घरांची मागणी भागविण्यासाठी सिडकोने गृहनिर्माण धोरणात जमिनीचा वापर मुख्य संसाधन म्हणून करून स्ववित्तपुरवठा या तत्वाचा समावेश केला आहे. स्थापनेपासून डिसेंबर, २०१५ पर्यंत सिडकोने एकूण १,८२,९४२ सदनिका नवी मुंबई, औरंगाबाद, नाशिक आणि नांदेड येथे बांधल्या आहेत. सिडकोने बांधलेल्या सदनिकांचा तपशील तक्ता १०.३८ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.३८ सिडकोने बांधलेल्या सदनिका@**

(संख्या)

| ठिकाण | आर्थिक दुर्बल गट/ अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | एकूण सदनिका | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| नवी मुंबई | ६४,४७३ | ३५,२४५ | २८,७३६ | १,२८,४५४ | २,४४७ |
| औरंगाबाद | १९,५०१ | २,१२७ | ४३२ | २२,०६० | ५६ |
| नाशिक | २१,३४३ | २,६१९ | ५८२ | २४,५४४ | ४२ |
| नांदेड | ७,७५८ | १२६ | ० | ७,८८४ | ९ |
| **एकूण** | **१,१३,०७५** | **४०,११७** | **२९,७५०** | **१,८२,९४२** | **२,५५४** |

*आधार* : सिडको @ स्थापनेपासून डिसेंबर,२०१५ पर्यंत

## जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान

१०.५० जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान हा शहर आधुनिकीकरणाचा मोठा कार्यक्रम आहे. या अभियानांतर्गत 'शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा' व 'एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम' या दोन योजना राज्यात म्हाडामार्फत राबविण्यात येत आहेत.

## शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा

१०.५०.१ नागरी भागातील गरीब लोकांसाठी पायाभूत सुविधांसह निवासी वसाहतींचा विकास करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. मार्च,२०१२ पर्यंत मंजूर झालेल्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने या योजनेची मुदत मार्च, २०१७ पर्यंत वाढविली आहे. ही योजना मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, नाशिक, नांदेड, कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर आणि कुळगांव-बदलापूर या १० शहरांमध्ये राबविण्यात येत आहे.

## एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम

१०.५०.२ या योजनेंतर्गत शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा कार्यक्रमांतर्गत समाविष्ट असलेली १० शहरे वगळून, ८७ शहरांमध्ये ११९ प्रकल्प राबविण्यात येत आहेत. शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा आणि एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.३९ मध्ये दिली आहे.

## झोपडपट्टी पुनर्वसन योजना

१०.५१ झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत झोपडपट्टीत राहणाऱ्या कुटुंबांना निवारा पुरविण्यात येत आहे. स्थापनेपासून (१९९५) डिसेंबर, २०१५ पर्यंत १,५१२ प्रकल्पांची कामे पूर्ण झाली असून १,६२,५०२ झोपडपट्टीतील कुटुंबांचे पुनर्वसन केले आहे.

**तक्ता १०.३९ शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा आणि एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाची प्रगती@**

(संख्या)

| तपशील | शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा | एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम |
|---|---|---|
| केंद्र सरकारने मंजूर केलेले प्रकल्प | ५५ | ११९ |
| सदनिका लक्ष्य | ९९,३८७ | ७७,८८५ |
| प्रकल्पांची एकूण किंमत (₹ कोटी) | ४,१४३ | २,२९० |
| बांधलेल्या सदनिका | ७१,९७० | ४४,०३८ |
| बांधकाम प्रगतीपथावर असलेल्या सदनिका | २३,०७७ | २८,३०९ |

*आधार* : म्हाडा, मुंबई @ डिसेंबर, २०१५ पर्यंत

## शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

१०.५२ झोपडपट्टी पुनर्वसनाची कामे जलदगतीने होण्याच्या उद्देशाने शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितची स्थापना करण्यात आली. स्थापनेपासून ऑक्टोबर, २०१५ पर्यंत १०,६७२ सदनिका असलेल्या १११ इमारती बांधण्यात आल्या (ज्यापैकी १०,१९२ सदनिकांचे वाटप करण्यात आले) व त्यावर ₹ ४६९ कोटी खर्च झाला.

## प्रधानमंत्री आवास योजना

१०.५३ 'सन २०२२ पर्यंत सर्वांना घरे' हे उद्दिष्ट साध्य करण्याच्यादृष्टीने केंद्र शासनाने नागरी भागाकरिता 'प्रधानमंत्री आवास योजना' ही व्यापक योजना सुरू केली आहे. ज्यामध्ये देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण होताना प्रत्येक कुटुंबास पाणी, स्वच्छतागृह, अखंड वीजपुरवठा व पोहोच रस्ते असणारे पक्के घर देण्याचा मानस आहे. राज्य शासनाने ही योजना राज्यातील ५१ शहरात राबविण्याचे निश्चित केले आहे.

# ग्रामीण गृहनिर्माण

## इंदिरा आवास योजना

१०.५४ ग्रामीण भागात घरे नसलेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांकरिता घरे बांधण्यासाठी इंदिरा आवास योजना राज्यात एप्रिल, १९८९ पासून राबविण्यात येत आहे. ही केंद्र पुरस्कृत योजना असून यात केंद्र व राज्याचा हिस्सा ६०:४० असा आहे. सन २०१५-१६ करिता १,५७,२६० घरे बांधण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले असून त्यासाठी केंद्र शासनाने ₹ ६९३.४८ कोटी मंजूर केले व राज्य शासनाने ₹ ३०६.३८ कोटी तरतूद केली. सन २०१४-१५ मध्ये १,००,८७० घरे बांधण्यात आली असून त्यासाठी ₹ १,३६८ कोटी खर्च झाला. सन २०१५-१६ पासून सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे देय निधी लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा करण्यात येत आहे.

## सुधारित राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-२

१०.५५ सुधारित राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-२ दारिद्र्य रेषेवरील परंतु अल्प उत्पन्न गटातील लोकांकरिता राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत प्रति घरकुल ₹ एक लाख किंमत निर्धारित करण्यात आली असून त्याकरिता जिल्ह्यातील अग्रणी बँकेकडून ₹ ९०,००० कर्ज पुरविले जाते व उर्वरित ₹ १०,००० लाभार्थ्याने उभारावयाचे आहेत. कर्जावरील व्याज अनुदानाच्या स्वरुपात राज्य शासनाकडून दिले जाते. सदर योजनेअंतर्गत डिसेंबर २०१५, पर्यंत ₹ ३४ कोटी व्याजाची रक्कम म्हाडामार्फत बँकांना वितरित करण्यात आली आहे.

## शबरी आदिवासी घरकुल योजना

१०.५६ शबरी आदिवासी घरकुल योजना ग्रामीण व शहरी भागातील अनुसूचित जमातीतील बेघर किंवा कच्चे घर असलेल्या लोकांकरिता राबविण्यात येते. लाभार्थ्याला स्वत:चे घर बांधण्यासाठी ग्रामीण क्षेत्राकरिता ₹ एक लाख, नगर परिषद क्षेत्राकरिता ₹ १.५ लाख तर महानगर पालिका व मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्राकरिता ₹ दोन लाख किंमत निश्चित करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत घरे बांधण्यासाठी ग्रामीण, नगर परिषद व महानगर पालिका क्षेत्राकरिता अनुक्रमे १०० टक्के, ९२.५ टक्के व ९० टक्के अनुदान राज्य शासनामार्फत देण्यात येते तर उर्वरित हिस्सा लाभार्थ्याने भरावयाचा आहे.

## रमाई आवास योजना

१०.५७ रमाई आवास योजना ग्रामीण व शहरी भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील बेघर किंवा कच्चे घर असलेल्या लोकांकरिता राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत घराची किंमत ग्रामीण क्षेत्राकरिता ₹ एक लाख, नगर परिषद क्षेत्राकरिता ₹ १.५० लाख व महानगर पालिका क्षेत्राकरिता ₹ दोन लाख खर्चाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत घरे बांधण्यासाठी ग्रामीण, नगर परिषद व महानगर पालिका क्षेत्राकरिता अनुक्रमे १०० टक्के, ९२.५ टक्के व ९० टक्के अनुदान राज्य शासनामार्फत देण्यात येते तर उर्वरित हिस्सा लाभार्थ्याने भरावयाचा आहे. सन २०१४-१५ या कालावधीत १,८४,१४६ घरे बांधण्यात आली असून ५५,०५० घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे व त्यासाठी एकूण ₹ १,७७१ कोटी खर्च झाला आहे.

## पंडीत दीनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना

१०.५८ राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना प्राथम्याने निवारा पुरविणे शासनाने निश्चित केले आहे. सद्यस्थितीत राज्यात दोन लाखांच्या वर पात्र कुटुंबे घरबांधणीकरिता स्वत:ची जागा नसल्यामुळे आवास योजनांचा लाभ घेऊ शकत नाहीत. अशा कुटुंबांकरिता राज्य शासनाने सन २०१५-१६ पासून पंडीत दीनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना सुरू केली आहे. ही योजना इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना व शबरी आवास योजनेच्या पात्र कुटुंबांकरिता लागू आहे. या योजनेअंतर्गत इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांना ₹ १०,००० केंद्र शासनामार्फत व ₹ ४०,००० राज्य शासनामार्फत पुरविण्यात येणार आहेत. रमाई आवास योजना व शबरी आवास योजनेच्या लाभार्थ्यांना ₹ ५०,००० राज्य शासनामार्फत पुरविण्यात येणार आहेत.

# पाणी पुरवठा आणि स्वच्छता

१०.५९ निरोगी राहणीमानासाठी पिण्याच्या शुध्द पाण्याची उपलब्धता व स्वच्छता या दोन किमान आवश्यक गरजा आहेत. या सुविधा नागरिकांना राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्थाव्दारे पुरविण्यात येतात. अपुऱ्या पावसामुळे ग्रामीण तसेच नागरी भागात पिण्याचे पाणी पुरविणे ही एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे. राज्यात पाणी पुरवठा व स्वच्छतेसाठी विविध योजना राबविल्या जात आहे.

## पाणी पुरवठा

१०.६० राज्यात कमी प्रमाणात झालेल्या पावसामुळे बहुतांशी भागात निर्माण झालेली दुष्काळग्रस्त परिस्थिती हाताळण्यासाठी २०१५-१६ मध्ये डिसेंबर पर्यंत शासनाने ₹ ३००.३५ कोटी निधी (केंद्रीय निधीसह) उपलब्ध करुन दिला आहे. यापैकी कोकण विभागाला ₹ ९.२५ कोटी, पुणे विभागाला ₹ १७.३० कोटी, नाशिक विभागाला ₹ ५०.२३ कोटी, औरंगाबाद विभागाला ₹ १८१.८५ कोटी, अमरावती विभागाला ₹ २७.३२ कोटी, व नागपूर विभागाला ₹ १४.४० कोटी वितरीत करण्यात आलेले आहे. राज्याने २,३७८ टंचाईग्रस्त गावे आणि ३,२६३ वाड्यांकरिता तात्पुरत्या नळ पाणी योजना, कुपनलिका व इतर पाण्याचे स्रोत पुनरुज्जीवित करणे, टँकरने पाणी पुरवठा करणे, इत्यादी सारख्या विविध उपाययोजना केल्या आहेत.

### पाणी टंचाई निवारण कार्यक्रम

१०.६१ पाणी टंचाईग्रस्त गावे आणि वाड्यांमध्ये दरवर्षी ऑक्टोबर ते जून या कालावधीत पाणी टंचाई निवारण कार्यक्रम राबविला जातो. सन २०१४-१५ मध्ये पडलेला असमान पाऊस आणि सन २०१५-१६ मध्ये झालेल्या अपुऱ्या पावसामुळे पाणी टंचाई निवारण कार्यक्रम, सप्टेंबर, २०१५ पर्यंत वाढविण्यात आला होता. या कार्यक्रमावर ₹ २१०.४३ कोटी खर्च झाला. पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत गावे/वाड्यांची संख्या तक्ता १०.४० मध्ये दिली आहे तसेच पिण्याच्या पाणी पुरवण्याची साप्ताहिक स्थिती (दिनांक १५ फेब्रुवारी २०१६ रोजीच्या अहवालानुसार) माहिती तक्ता १०.४१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४० पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत गावे / वाड्या**

(संख्या)

| उपाययोजना / कामे | गावे | | वाड्या | |
|---|---|---|---|---|
| | २०१३-१४@ | २०१४-१५+ | २०१३-१४@ | २०१४-१५+ |
| नवीन विंधण विहिरी | १,६९७ | २,३२७ | १,१६८ | १,६५६ |
| तात्पुरता नळ पाणीपुरवठा- विशेष दुरुस्ती | ३६५ | ७०० | ८५ | ३०१ |
| विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती | १,१०४ | १,७२४ | २३३ | २०२ |
| तात्पुरती पुरक नळजोडणी | ५८ | १४७ | १० | ९४ |
| टँकर / बैलगाडीने पाणीपुरवठा | १,५९४ | २,५२३ | ४,६०८ | ३,३७२ |
| खाजगी विहिरींचे अधिग्रहण | १,८७८ | ४,२६९ | १,५२० | १,४५८ |
| विहिरी खोल करणे / गाळ काढणे | ८७ | २०६ | ०६ | १२० |
| बुडक्या विहिरींचे बांधकाम | ० | ०५ | ० | ११ |

*आधार*: पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन @ ऑक्टोबर, २०१३ ते सप्टेंबर, २०१४ + ऑक्टोबर, २०१४ ते सप्टेंबर, २०१५

**तक्ता १०.४१ टँकरव्दारे पिण्याच्या पाणी पुरवण्याची साप्ताहिक स्थिती**

(संख्या)

| विभाग | जिल्हा | गावे | वाड्या | टँकर |
|---|---|---|---|---|
| नाशिक | नाशिक | ५० | ९५ | ४७ |
| | धुळे | २ | ० | २ |
| | जळगांव | १७ | ० | १० |
| | अहमदनगर | १२१ | ६२० | १८२ |
| पुणे | पुणे | ३६ | २४४ | ५० |
| | सातारा | २१ | १३७ | २० |
| | सांगली | ५९ | ४५६ | ७२ |
| | सोलापूर | ९ | ५ | १० |
| औरंगाबाद | औरंगाबाद | २३६ | ४ | ३०० |
| | जालना | ९६ | २८ | १३० |
| | बीड | २६३ | २१८ | ३५१ |
| | परभणी | ६८ | २३ | ८३ |
| | हिंगोली | ९ | ० | ८ |
| | नांदेड | १५७ | ९५ | २३५ |
| | उस्मानाबाद | १६० | ४ | २२५ |
| | लातुर | ११० | २९ | १३७ |

१५ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या अहवालानुसार

## राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम

१०.६२ राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा केंद्र शासनाचा फ्लॅगशीप कार्यक्रम असून सदर कार्यक्रम राज्यामध्ये एप्रिल, २००९ पासून राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाचा उद्देश ग्रामीण भागात कायमस्वरुपी, पिण्यायोग्य व पुरेसे पाणी पुरविणे हा आहे. सन २०१४-१५ मध्ये या कार्यक्रमांतर्गत ४,२०० गावे/वाड्यांच्या उद्दिष्टापैकी ३,७४८ गावे/वाड्यांची कामे पूर्ण झाली असून त्यावर ₹ १,५६५.७७ कोटी खर्च झाला आहे. सन २०१५-१६ मध्ये जानेवारीपर्यंत या योजनेंतर्गत निर्धारीत केलेल्या १,६११ गावे/वाड्यांच्या उद्दिष्टापैकी १,०८८ गावे/वाड्यांची कामे पूर्ण झाली आहेत. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.४२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४२ राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची प्रगती**

| सन | गावे /वाड्या | | खर्च |
|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | (₹ कोटी) |
| २०११-१२ | ६,५०२ | ६,३६४ | १,२५२.९२ |
| २०१२-१३ | ५,९४० | ४,६३७ | १,१६९.२७ |
| २०१३-१४ | ५,०६६ | ४,०६५ | १,२२५.२२ |
| २०१४-१५ | ४,२०० | ३,७३७ | १,५६५.७७ |
| २०१५-१६+ | १,६११ | १,०८८ | ७११.६३ |

+ जानेवारीपर्यंत

*आधारः* पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन

## शिवकालीन पाणीसाठवण योजना

१०.६२.१ शिवकालीन पाणी साठवण योजना हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचा घटक असून पारंपरिक व अपारंपरिक उपाययोजनांद्वारे पाण्याचे संधारण करण्याच्या उद्देशाने, पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे बळकटीकरण म्हणजेच, छतावरील पावसाच्या पाण्याची साठवणूक, पावसाचे पाणी साठविण्यासाठी डोंगराळ भागात तलाव बांधणी आणि यासारख्या इतर उपाययोजनांद्वारे पिण्याचे पाणी सातत्याने उपलब्ध होण्यासाठी ही योजना राज्यात राबविण्यात येत आहे. योजनेच्या सुरुवातीपासून (२००२) ते डिसेंबर,२०१५ पर्यंत १५,१७० वस्त्यांची निवड करुन ४४,४७२ उपाययोजना निश्चित करण्यात आल्या असून १२,५०३ वस्त्यांमधील ३४,९१३ उपाययोजना पूर्ण झाल्या आहेत व त्यावर एकूण ₹ ४९२.५० कोटी खर्च झाला.

१०.६२.२ पावसाच्या पाण्याची साठवण ही जलसंधारणासाठी एक महत्वाची उपाययोजना आहे. ह्या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात डिसेंबर, २०१५ पर्यंत पावसाच्या पाण्याच्या साठवणीसाठी ११,०८५ बांधकामे करण्यात आली असून त्यापैकी १,०३४ कोकण, १,२७९ पुणे, ६५४ नाशिक, ४,०१३ औरंगाबाद, २,११४ अमरावती आणि १,९९१ नागपूर विभागात झाली आहेत.

## स्वच्छता

१०.६३ आरोग्यदायी आणि प्रतिष्ठित जीवन जगण्यासाठी स्वच्छतेची आवश्यकता आहे. स्वच्छतेसाठी राज्य शासनाकडून विविध योजना राबविण्यात येत आहेत.

## महाराष्ट्र सुजल आणि निर्मल अभियान

१०.६४ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व स्वच्छता विषयक सुविधा सर्व नागरिकांना उपलब्ध करुन देऊन पाणी टंचाई निवारण करणे व पाण्याची वाढती मागणी पूर्ण करणे हा महाराष्ट्र सुजल आणि निर्मल अभियानाचा प्राथमिक उद्देश आहे. तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय सुधारणा करण्यासाठी सेवा शुल्क आकारण्यात येत आहे. योजनेच्या सुरवातीपासून (२००८-०९) डिसेंबर,२०१५ पर्यंत पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या ₹ १,२४८.९७ कोटी खर्चाच्या २५८ कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून ₹ ९१६.३२ कोटी निधी वितरित केला आहे. सन २०१४-१५ मध्ये ₹ ४६.९० कोटी व सन २०१५-१६ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ ३९.१९ कोटी खर्च झाला आहे.

## स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण)

१०.६५ निर्मल भारत अभियान या योजनेचे नामकरण दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ पासून 'स्वच्छ भारत अभियान' असे करण्यात आले असून या अंतर्गत २०१९ पर्यंत भारत हागणदारी मुक्त करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. हागणदारी मुक्त ग्रामपंचायतीच्या संख्येनुसार देशात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक (जून, २०१५ साठी ४,३०३ ग्रामपंचायतीसह) आहे. सन २०१५-१६ जानेवारी पर्यंत ५.४६ लाख स्वतंत्र शौचालय (दारिद्र्य रेषेखाली व दारिद्र्य रेषेवरील कुटूंबासाठी) आणि सात सार्वजनिक शौचालय संकुले बांधण्यात आली असून यासाठी एकूण ₹ ५३३.७० कोटी खर्च झाले आहेत. सन २०१५-१६ मधील शौचालय बांधकामा बाबतची माहिती तक्ता १०.४३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४३ शौचालय बांधकामाबाबतची आकडेवारी**

| प्रकार | २०१५-१६ | | |
|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य+ | टक्केवारी |
| दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासाठी स्वतंत्र शौचालय | ५,५५,२५८ | १,४२,६०९ | २५.६८ |
| दारिद्र्य रेषेवरील कुटुंबासाठी स्वतंत्र शौचालय | ११,८८,००६ | ४,०४,०१३ | ३४.०१ |

*आधार :* पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन + जानेवारीपर्यंत

## संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान

१०.६६ राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये हे अभियान २००२-०३ पासून राबविण्यात येत आहे. या अभियानामुळे पाणी पुरवठ्याचे बळकटीकरण, मलनिस्सारण, घनकचरा व्यवस्थापन इत्यादि क्षेत्रात सातत्याने सुधारणा होण्यास मदत झाली आहे. या अभियानांतर्गत सन २०१४-१५ मध्ये ₹ १६.२५ लक्ष निधी खर्च झाला असून सन २०१५-१६ साठी ₹ २०० लक्ष निधीची तरतूद करण्यात आली आहे.

## एकात्मिक कमी खर्चाची स्वच्छता योजना

१०.६७ एकात्मिक कमी खर्चाची स्वच्छता योजनेचा उद्देश हा झोपडपट्टी व अनधिकृत वसाहतींसह जेथे शौचकूपे नाहीत किंवा कोरडी शौचालये आहेत अशा सर्व कुटुंबांना शौचकूप सुविधा देणे हा आहे. या योजनेअंतर्गत केंद्र शासनाने १६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या २१ प्रस्तावांना मान्यता दिलेली आहे व त्याअंतर्गत ३९,६६३ वैयक्तिक शौचालये बांधण्यात येणार असून त्यापैकी २७,१८४ शौचालये बांधण्यात आली आहेत, तर २,१८९ शौचालयांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

# पर्यावरण संवर्धन

१०.६८ जीवसृष्टीतील घटक जेव्हा पर्यावरणात शिरकाव झालेल्या हानीकारक पदार्थांना नष्ट करू शकत नाही तेव्हा प्रदूषण निर्मिती होते. प्रदूषणामुळे मानवी आरोग्य, जीवसृष्टीचा दर्जा आणि जल व भूपृष्ठीय जैव वैविध्य यांच्यावर तात्कालीक वा कायमस्वरूपी परिणाम व बदल होवू शकतो.

१०.६९ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची (मप्रनिमं) स्थापना घटनात्मक तरतूदीनुसार झाली असून राज्यात पर्यावरणासंबंधीचे विविध कायदे व नियमांच्या अंमलबजावणीचे काम ही संस्था करते. प्रदूषण कमी करण्यासाठी व नियंत्रित ठेवण्यासाठी संबंधित आकडेवारी व शास्त्रीय माहिती तयार करणे, धोरण निश्चितीसाठी तांत्रिक बाबींची माहिती पुरविणे, मनुष्यबळ प्रशिक्षित करणे आणि विविध स्तरावर जागृती करणे अशा महत्वाच्या भूमिका मप्रनिमं पार पाडते.

## वायू प्रदूषण

१०.७० हवेमध्ये हानीकारक वायू, धूलीकण, दुर्गंधीयुक्त वायू जेव्हा प्रमाणाबाहेर असतात तेव्हा वायू प्रदूषण होते. वायू प्रदूषण प्रतिबंधीत, नियंत्रित व कमी करण्यासाठी वायू (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९८१ अधिनियमीत करण्यात आला आहे. राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या वायू गुणवत्ता संनियंत्रण स्थानकांपैकी आठ अविरत, ७१ राष्ट्रीय आणि चार राज्य वायू गुणवत्ता संनियंत्रण स्थानके आहेत. वायू प्रदूषण नियंत्रित ठेवण्यासाठी कमी गंधक असलेले डिझेल, शिसेरहीत पेट्रोल, सीएनजी/एलपीजी या पर्यायी इंधनाचा वापर करणे, पीयुसी अनिवार्य करणे, १५ वर्षे झालेल्या वाहनांवर बंदी घालणे अशा उपाय योजना करण्यात येत आहेत. राज्यात ३१ मार्च, २०१५ रोजी सीएनजी/एलपीजी मध्ये रूपांतरित करता येण्याजोग्या एकूण ७७.२६ लाख वाहनांपैकी १.२५ लाख वाहनांना एलपीजी संच आणि ४.०३ लाख वाहनांना सीएनजी संच बसविण्यात आले तर मागील वर्षी ही संख्या अनुक्रमे १.१९ लाख व ३.४७ लाख इतकी होती. सन २०१५ मध्ये प्रमुख संनियंत्रण स्थानकांनी नोंदविलेल्या परिसर वायू गुणवत्तेची माहिती तक्ता १०.४४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४४ सन २०१५ मध्ये प्रमुख संनियंत्रण स्थानकांनी नोंदविलेल्या परिसर वायू गुणवत्ता**

| स्थानक | वायू प्रदुषित करणाऱ्या पदार्थांची तीव्रता ($\mu g/m^3$) | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सल्फर डायऑक्साईड ($SO_2$) (मर्यादा ५०) | | | नायट्रोजन ऑक्साईड्स ($NO_x$) (मर्यादा ४०) | | | अधांतरी दूषित कण (मर्यादा ६०) | | |
| | किमान | कमाल | सरासरी | किमान | कमाल | सरासरी | किमान | कमाल | सरासरी |
| मुंबई (सायन) | १ (२) | ४१ (८६) | १३ (१०) | ११ (५) | १८९ (२०८) | ८७ (९३) | २३ (३६) | ३७९ (३९०) | १३१ (१२९) |
| पुणे (स्वारगेट) | ६ (१२) | ५५ (५१) | २२ (२३) | १३ (१६) | १६७ (१०५) | ६७ (४५) | १८ (८) | २८६ (२६८) | १०१ (७९) |
| नाशिक (नवीन मनपा इमारत) | ३ (५) | २९ (३४) | १६ (२५) | ९ (१६) | ४८ (४६) | २३ (२७) | २२ (३४) | ३५९ (१३८) | ८२ (७३) |
| औरंगाबाद (कडा कार्यालय) | ९ (७) | १८ (३७) | १२ (१२) | ३४ (२६) | ५७ (७७) | ४१ (३९) | २१ (१५) | १६१ (१५३) | ६८ (७७) |
| अमरावती (शास. अभि. महाविद्या.) | ५ (५) | १४ (१४) | ११ (११) | ६ (६) | १५ (१६) | १३ (१२) | ३८ (४२) | ९७ (१०८) | ७४ (७७) |
| नागपूर (मप्रनिमं यांचे प्रादेशिक कार्यालय) | ६ (७) | ४२ (१४) | ९ (९) | १६ (१६) | ६२ (४५) | २९ (२६) | ३६ (२७) | १४४ (११७) | ५५ (६४) |

टिप : कंसातील आकडे सन २०१४ करिता वायू गुणवत्ता दर्शवितात. $\mu g/m^3$ मायक्रोग्रॅम प्रति घन मीटर

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## जल प्रदूषण

१०.७१ जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९७४ हा जल प्रदूषण प्रतिबंधीत व नियंत्रित करून जल गुणवत्ता राखणे आणि पूर्ववत करण्यासाठी अधिनियमीत करण्यात आला आहे. राष्ट्रीय जल गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जागतिक पर्यावरण संनियंत्रण यंत्रणा व भारतीय राष्ट्रीय जलस्रोत नियंत्रण प्रकल्प राबवित आहे. राज्यातील १५६ नद्या, ३४ खाड्या/समुद्रजल, १० नाले / कारखान्यांचे सांडपाणी आणि ५० विहिरींचा समावेश या संनियंत्रणात आहे. सदर २५० संनियंत्रण केंद्रांमध्ये २०० भूपृष्ठीय आणि ५० भूगर्भिय ठिकाणांचा समावेश आहे. भूपृष्ठावरील पाण्याचे मासिकरित्या आणि भूगर्भिय पाण्याचे सहामाहीरित्या गुणवत्ता संनियंत्रण केले जाते. पाण्याच्या नमुन्यांचे नऊ मूळ आणि एकोणीस सर्वसाधारण प्रमाणकांसाठी तसेच काही ठिकाणी अवशिष्ट धातूंसाठी देखिल विश्लेषण केले जाते. सन २०१४-१५ मधील गोदावरी, कृष्णा व पंचगंगा आणि भीमा या प्रमुख नद्यांची ३९ स्थानांवरील जल गुणवत्ता तक्ता १०.४५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४५ सन २०१४-१५ मधील गोदावरी, कृष्णा व पंचगंगा आणि भीमा या प्रमुख नद्यांची ३९ स्थानांवरील जल गुणवत्ता**

| प्रमाणक | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| pH मूल्य | | जैवरासायनिक प्राणवायूची मागणी | | विरघळलेला प्राणवायू | | फिकल कॉलिफॉर्म | |
| ६.० ते ८.५# | | ५ मि ग्रॅ / लि# | | ४.० मि ग्रॅ / लि# | | ५,००० पेक्षा जास्त नाही# | |
| कक्षा | स्थाने | कक्षा | स्थाने | कक्षा | स्थाने | कक्षा | स्थाने |
| ५.५ - ६.५ | ० | २.५ - ५.५ | ० | ३ - ५ | ७ | ० - १०० | २५ |
| ६.५ - ७.५ | ० | ५.५ - ८.५ | ३८ | ५ - ७ | ३२ | १०० - २०० | ८ |
| ७.५ - ८.५ | ३९ | ८.५ - ११.५ | ० | ७ - ९ | ० | २०० - ३०० | ५ |
| ८.५ - ९.५ | ० | ११.५ आणि त्यापेक्षा अधिक | १ | ९ आणि त्यापेक्षा अधिक | ० | ३०० आणि त्यापेक्षा अधिक | १ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ # जल गुणवत्तेचे प्रमाण pH मूल्य वगळता उर्वरित सर्व परिमाणे मिली ग्रॅम प्रति लिटर

१०.७२ मार्च, २०१५ अखेर, राज्यात १४ महानगरपालिकांनी प्रति दिवस ४,४०८.५ दशलक्ष लिटर्स आणि १३ नगरपरिषदांनी प्रति दिवस ७४.६९ दशलक्ष लिटर्स सांडपाणी प्रक्रिया आणि निचऱ्याची क्षमता असलेली व्यवस्था केली आहे.

१०.७३ महापालिका घन कचरा प्रक्रियेमध्ये यांत्रिकी व जैविक प्रक्रियेचा समावेश केला आहे. राज्यातील सन २०१४-१५ मध्ये स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील घन कचरा निर्मिती व प्रक्रियेची माहिती तक्ता १०.४६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४६ राज्यातील सन २०१४-१५ मध्ये स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील घन कचरा निर्मिती व प्रक्रियेची माहिती**

(प्रति दिवस मे.टन मध्ये)

| स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | संख्या | महापालिका घन कचरा | |
|---|---|---|---|
| | | निर्मिती | प्रक्रिया |
| महानगर पालिका | २६ | २३,९२१.०० | ४,००२.०० |
| ‘अ’ वर्ग नगर पालिका | १२ | ५५९.०० | १०९.०० |
| ‘ब’ वर्ग नगर पालिका | ६१ | १,१०२.४६ | ३९६.७४ |
| ‘क’ वर्ग नगर पालिका | १४६ | १,१०६.३३ | ४३२.७६ |
| नगर पंचायत/कटक मंडळे | १२ | १३१.५० | ९६.०० |
| **एकूण** | **२५७** | **२६,८२०.२९** | **५,०३६.५०** |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## ध्वनि प्रदूषण

१०.७४ ध्वनि प्रदूषण (नियमन व नियंत्रण) अधिनियम, २००० अन्वये क्षेत्रनिहाय ध्वनि स्तर प्रमाणाच्या मर्यादा तक्ता १०.४७ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता १०.४७ क्षेत्रनिहाय ध्वनि स्तर प्रमाणाच्या मर्यादा**

(डेसिबल्समध्ये)

| क्षेत्र संकेतांक | क्षेत्राचा प्रकार | मर्यादा | |
|---|---|---|---|
| | | दिवस | रात्र |
| अ | औद्योगिक | ७५ | ७० |
| ब | वाणिज्यिक | ६५ | ५५ |
| क | निवासी | ५५ | ४५ |
| ड | शांतता प्रभाग | ५० | ४० |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

१०.७५ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त ध्वनि प्रदूषणाचा प्रभाव अभ्यासण्याकरिता पाच प्रमुख शहरांमध्ये (मुंबई, नाशिक, औरंगाबाद, नागपूर व कोल्हापूर) दोन दिवस (कामकाजाचा व सुट्टीचा दिवस) २४ तासांच्या कालावधीकरिता परिसर ध्वनि स्तर संनियंत्रण कार्यक्रम आयोजित केला जातो. दोन्ही दिवशी त्याच ठिकाणी समान कालावधीकरिता संनियंत्रण करण्यात येते. प्रमाणित मर्यादेशी

तुलना करता सुट्टी तसेच कामकाजाच्या अशा दोन्ही दिवशी सर्व पाच शहरांमध्ये ध्वनि स्तर अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले. प्रमुख शहरांमधील निवासी क्षेत्रातील दिवस-रात्रीचे ध्वनि स्तराचे सन २०१३ ते २०१६ मधील प्रमाण तक्ता १०.४८ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.४८ प्रमुख शहरांमधील निवासी क्षेत्रातील दिवस-रात्रीचे ध्वनि स्तराचे सन २०१३ ते २०१६ मधील प्रमाण**

(डेसिबल्समध्ये)

| ठिकाण | सुट्टीचा दिवस | | | | | | कामकाजाचा दिवस | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २२-१२-२०१३ | | १४-१२-२०१४ | | १०-०१-२०१६ | | २३-१२-२०१३ | | १५-१२-२०१४ | | ११-०१-२०१६ | |
| | दिवस | रात्र | दिवस | रात्र | दिवस | रात्र | दिवस | रात्र | दिवस | रात्र | दिवस | रात्र |
| मुंबई (अँटॉप हिल) | ६७.१ | ६३.४ | ७०.० | ६१.० | ६७.१ | ६२.१ | ६३.६ | ६०.१ | ६७.० | ६६.० | ७२.६ | ५९.६ |
| मुंबई (शिवाजी पार्क) | ६७.९ | ५७.६ | ६९.० | ६६.० | ८३.८ | ६३.५ | ६८.३ | ५७.० | ६५.० | ४८.० | ६८.५ | ५२.० |
| नाशिक (पंडित कॉलनी) | ६७.३ | ६६.१ | ७०.० | ६७.० | ६३.३ | ५७.२ | ६८.१ | ६७.३ | ७३.० | ६६.० | ५७.५ | ६०.० |
| नाशिक (पवन नगर) | ७६.५ | ६९.६ | ७३.० | ६५.० | ५७.५ | ६०.९ | ६९.३ | ७१.१ | ७४.० | ६७.० | ५८.१ | ५४.३ |
| औरंगाबाद (सिडको एन-४) | ६५.१ | ५५.१ | ६३.० | ५२.० | ६४.२ | ५२.९ | ६४.५ | ६४.१ | ६५.० | ५२.० | ६६.१ | ५४.९ |
| नागपूर (शिवाजी नगर) | ६२.९ | ५४.४ | ६१.० | ५४.० | ६१.८ | ४८.२ | ६४.१ | ६६.१ | ५९.० | ५४.० | ६५.३ | ४४.१ |
| कोल्हापूर (जिल्हाधिकारी कार्यालय) | ५२.८ | ४४.३ | ५५.० | ४६.० | ६८.६ | ५४.७ | ६८.६ | ५५.६ | ५८.० | ४७.० | ६५.१ | ५०.७ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## औद्योगिक प्रदूषण

१०.७६ मार्च, २०१५ अखेर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यक्षेत्रातील एकूण ८२,७२० उद्योगांपैकी १३ टक्के वायू प्रदूषण प्रवण, २३ टक्के जलप्रदूषण प्रवण तर सहा टक्के घातक टाकाऊ पदार्थ निर्माण करणारे होते.

१०.७७ सन २०१४-१५ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने १,५४८ उद्योगांना जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९७४ च्या कलम ३३ अ अंतर्गत आणि ३३५ उद्योगांना वायू (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९८१ च्या कलम ३१ अ अंतर्गत निर्देश दिले आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रदूषणास कारणीभूत ठरणा-या कारखान्यांवर ७८९ प्रकरणे न्यायालयात दाखल केली असून, त्यापैकी दोषी, बाद व प्रलंबीत प्रकरणांची संख्या अनुक्रमे २८७, २२६ व २२१ असून ५५ प्रकरणांचा निकाल मप्रनिमंडळाच्या विरोधात देण्यात आला आहे.

१०.७८ सामायिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्र या योजनेंतर्गत लघु उद्योगांमध्ये निर्माण होणा-या घातक घनकच-यावर प्रक्रिया करणे आणि विल्हेवाट लावण्यासाठी प्रदूषण नियंत्रण उपकरणे बसविण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रे २६ औद्योगिक वसाहतीतील ८,३५२ कारखान्यांसाठी कार्यान्वित करण्यात आली असून ३१ मार्च, २०१५ रोजी प्रति दिवस १९२.८५ दशलक्ष लिटर्स दूषित सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात आली.

## घातक कचरा

१०.७९ राज्यात ६,६३७ घातक कचरा निर्माण करणारे कारखाने असून त्यापैकी ५,८४४ कारखाने सामाईक घातक कचरा व्यवस्थापन सुविधा केंद्राचा लाभ घेतात. राज्यात ठाणे येथील तळोजा व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे ठाणे खाडी किनारपट्टीवरील औद्योगिक क्षेत्र, पुणे येथील रांजणगाव आणि नागपूर येथील बुटीबोरी या चार प्रमुख ठिकाणी घातक टाकाऊ कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी सामाईक सुविधा असणाऱ्या चार प्रमुख केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. सामाईक सुविधा केंद्राव्दारे प्रक्रिया केलेल्या घातक कच-याबाबतची माहिती तक्ता १०.४९ मध्ये दिली आहे.

१०.८० घातक कचरा वाहून नेणाऱ्या वाहनांचा मागोवा घेण्यासाठी वाहनांवर जीपीएस स्थापित करणे राज्यात अनिवार्य करण्यात आले आहे. मप्रनिमंडळाने नोव्हेंबर २०१५, अखेर १०१ घातक कचरा वाहतूकदारांना प्राधिकृत केले आहे.

**तक्ता १०.४९ सामाईक सुविधा केंद्राव्दारे प्रक्रिया केलेल्या घातक कचऱ्याबाबतची माहिती**

(लाख मे टन)

| वर्ष | प्रक्रियेचा प्रकार | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | थेट जमिनीत पुरणे | प्रक्रिया केल्यानंतर जमिनीत पुरणे | भस्मीकरण करण्याजोगे | |
| २०१२-१३ | २.२६ | ०.७६ | ०.४५ | ३.४७ |
| २०१३-१४ | ०.८१ | ०.९९ | ०.४६ | २.२६ |
| २०१४-१५ | २.०८ | ०.८७ | ०.४९ | ३.४४ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## ई-कचरा

१०.८१ मप्रनिमंडळाने ३० नोव्हेंबर, २०१५, अखेर ई-कच-याचे पुनर्प्रक्रिया करता यावे यासाठी ४५ ई-कचरा संकलन केंद्रांना आणि ई-कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २०११ नुसार पर्यावरणास अनुकुल पुनर्प्रक्रिया / विघटन तंत्रज्ञान असलेल्या ३२ उद्योगांना मान्यता दिली असून त्यांची पुनर्प्रक्रिया / विघटन क्षमता प्रतिवर्ष ४८,०६० मे. टन इतकी आहे.

## जैव-वैद्यकीय कचरा

१०.८२ राज्यात एकूण ३७ सामुहिक जैव-वैद्यकीय कचरा प्रकिया व विल्हेवाट केंद्रे असून त्यापैकी ३४ केंद्रे भस्मीकरण व उर्वरीत केंद्रे जमिनीत खोलवर पुरणे या पद्धतीची आहेत. सन २०१४ मध्ये सरासरी सुमारे प्रति दिवशी ४४,०२६ किलो जैव-वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आली.

## पर्यावरणविषयक मान्यता

१०.८३ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ अंतर्गत केंद्र शासनाने महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (१९९८), राज्य स्तर पर्यावरण प्रभाव मूल्यमापन प्राधिकरण (२००८) व राज्य स्तर तज्ञ मूल्यांकन समिती अनुक्रमे तटीय नियमन क्षेत्र व पर्यावरणविषयक मान्यता प्रदान करण्यासाठी गठीत केल्या आहेत. राज्यामध्ये पर्यावरणविषयक मान्यतेच्या कामांना गती येण्यासाठी तीन राज्य स्तर तज्ञ मूल्यांकन समिती स्थापित करण्यात आल्या आहेत.

१०.८४ सन २०१५ मध्ये, २१७ इमारत व बांधकाम, ३६ खाणकाम, तीन सिंचन आणि ४३ उद्योग क्षेत्रातील तर सन २०१४ मध्ये, ३७८ इमारत व बांधकाम, ६८ खाणकाम, तीन सिंचन आणि ३७ उद्योग क्षेत्रातील प्रस्तावांना पर्यावरणविषयक मान्यता देण्यात आली आहे.

१०.८५ सन २०११ ते २०१५ या कालावधीमध्ये महाराष्ट्र तटीय व्यवस्थापन प्राधिकरणाकडून सागरी नियमन क्षेत्र (सीआरझेड) अधिसूचना, २०११ नुसार ६६१ प्रकल्पांना सीआरझेड विषयक शिफारसी देण्यात आल्या आहेत.

## सरोवर संवर्धन योजना

१०.८६ राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजने अंतर्गत १४ तलावांचे संवर्धन करण्यात आले आहे. राज्य शासन देखिल अवनती झालेल्या सरोवरांच्या संवर्धनाकरिता निधी उपलब्ध करुन देते. या योजनेअंतर्गत ३८ तलावांचा समावेश करण्यात आला असून सदर योजनेसाठी ₹ १०७.३२ कोटी रक्कम मंजूर करण्यात आली असून डिसेंबर, २०१५ पर्यंत ₹ ३०.४९ कोटी खर्च झाला आहे.

# सामाजिक न्याय

१०.८७ समाजाकडून सर्व घटकांना, विशेषत: अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्यांक, नि:शक्त व जेष्ठ नागरीक इत्यादींना न्याय्य वागणूक आणि सामाजिक लाभांमध्ये समान वाटा प्रदान करणे म्हणजे सामाजिक न्याय होय. भारतीय घटनेत राज्य धोरणांची निदेशक तत्त्वे समाविष्ट करण्यात आली असून त्याअनुषंगाने दुर्बल घटकांना समाजातील इतर घटकांच्या समान पातळीवर आणण्यासाठी विविध विकास कार्यक्रम हाती घेतले आहेत. राज्य शासन अनुसूचित जातींकरिता ‘अनुसूचित जाती उपयोजना’ व अनुसूचित जमातींकरिता ‘आदिवासी उपयोजना’ अशा दोन स्वतंत्र उपयोजना तयार करते. सर्वसाधारण योजनांतर्गत उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या निधी व लाभांव्यतिरिक्त, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजना यांद्वारे संबंधित समुदायास त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जातो.

## अनुसूचित जाती उपयोजना

१०.८८ बाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (२०१२-१७) अनुसूचित जाती उपयोजनेसाठी ₹ २८,०५० कोटी नियतव्यय निश्चित केला असून तो राज्याच्या एकूण नियतव्ययाच्या १०.२ टक्के आहे. सन २०१५-१६ करिता अनुसूचित जाती उपयोजनेसाठी ₹ ६,४९० कोटी नियतव्यय उपलब्ध करुन दिला असून, त्यापैकी राज्यस्तरीय योजनांकरिता ₹ ४,०९० कोटी (६३ टक्के) तर उर्वरीत जिल्हास्तरीय योजनांकरिता आहे. सन २०१५-१६ मध्ये डिसेंबर पर्यंत ‘सामाजिक व सामुहिक सेवा’ क्षेत्रावरील खर्चाचा वाटा मोठा आहे. या क्षेत्रात शिक्षण, आरोग्य, गृहनिर्माण, पाणीपुरवठा, महिला व बालविकास, मागासवर्गीयांचे कल्याण, इत्यादी महत्त्वाची उपक्षेत्रे आहेत. सन २०१४-१५ मध्ये अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत एकूण १९७ योजना (११४ राज्यस्तरीय व ८३ जिल्हास्तरीय) राबविण्यात आल्या असून, सन २०१५-१६ मध्ये एकूण २०५ योजनांची (११९ राज्यस्तरीय व ८६ जिल्हास्तरीय) अंमलबजावणी करण्यात येत आहे. अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत नियतव्यय व खर्च तक्ता १०.५० मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.५० अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत नियतव्यय व खर्च**

(₹ कोटी)

| क्षेत्र | २०१४-१५ | | | २०१५-१६ | |
|---|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च | खर्चाची नियतव्ययाशी टक्केवारी | नियतव्यय | खर्च + |
| **अ) राज्यस्तरीय योजना** | **४,०४४.२६** | **१,७२०.४७** | **४२.५** | **४,०९०.००** | **७४४.५८** |
| कृषि व संलग्न कार्ये | ६४.२८ | २७.१३ | ४२.२ | ६१.३० | १०.७८ |
| ग्राम विकास | १३.६८ | ०.०० | ०.० | ३०.०० | १०.५८ |
| उद्योग व खनिजे | २१.२६ | १०.०७ | ४७.४ | ३०.०३ | ०.०० |
| सामान्य आर्थिक सेवा | ६०.०० | ३३.५३ | ५५.९ | ०.०० | ०.०० |
| सामाजिक व सामुहिक सेवा | ३,८७५.०४ | १,६४८.०१ | ४२.५ | ३,९४५.३६ | ७०७.५७ |
| सामान्य सेवा | १०.०० | १.७३ | १७.३ | ३३.३१ | १५.६५ |
| **ब) जिल्हास्तरीय योजना** | **२,०००.००** | **१,८६२.८२** | **९३.१** | **२,४००.००** | **१,२७२.७४** |
| कृषि व संलग्न कार्ये | २७०.६९ | २६९.१९ | ९९.४ | २९४.०० | १६२.६६ |
| ग्राम विकास | ०.०० | ०.०० | ०.० | ०.०० | ०.०० |
| ऊर्जा | ७४.९७ | ०.०० | ०.० | ७६.६९ | १०.९९ |
| उद्योग व खनिजे | ११.५६ | ११.०० | ९५.२ | ११.८९ | २.७३ |
| वाहतूक | ३२.२५ | २५.९९ | ८०.६ | ५५.६० | २०.२३ |
| सामाजिक व सामुहिक सेवा | १,६१०.५२ | १,५५६.६४ | ९६.७ | १,९६१.७३ | १,०७६.१३ |
| **एकूण (अ + ब)** | **६,०४४.२६** | **३,५८३.२९** | **५९.३** | **६,४९०.००** | **२,०१७.३२** |

*आधार* : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ मर्यादित

१०.८९ चर्मकार समाजाच्या विकासासाठी संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ स्थापन करण्यात आले असून, राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त आणि विकास महामंडळाच्या (राअजाविविम) विविध योजना राबविण्यासाठी या महामंडळास राज्याची वाहिनीकृत यंत्रणा म्हणून प्राधिकृत केले आहे. महामंडळाचे अधिकृत भागभांडवल ₹ ७३.२१ कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ ३०६.२१ कोटी आहे (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के). या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.५१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५१ संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१४-१५ | | २०१५-१६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| वीस टक्के बीज भांडवल | १६२ | १५.१० | ११२ | १०.७० |
| मुदत कर्ज | ४७० | ३८.५० | २६४ | २१.७० |
| पन्नास टक्के अनुदान | ३५३ | ३५.२५ | २०४ | २०.४० |
| सूक्ष्म वित्तपुरवठा | ३०१ | ३०.१० | २०६ | २०.६० |
| महिला समृद्धी | ५७१ | ५७.१० | २३० | २३.०० |
| महिला किसान | ३८ | ३.२० | ८ | ०.६० |

*आधार* : संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ मर्यादित + डिसेंबरपर्यंत

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित

१०.९० राज्य शासनाने मातंग समाजातील १२ उपजातींच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकासासाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची स्थापना केली आहे. महामंडळाचे अधिकृत भागभांडवल ₹ ३०० कोटी आहे, तर भरणा केलेले भागभांडवल ₹ ३९४.६० कोटी असून, त्यात राज्य शासनाचा हिस्सा ५१ टक्के आणि उर्वरीत हिस्सा केंद्र शासनाचा आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ हे राअजाविविम ची राज्याची वाहिनीकृत यंत्रणा म्हणूनही काम करते. या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.५२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५२ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१४-१५ | | २०१५-१६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| बीज भांडवल | १८,३४२ | ७,९६२.२६ | ६ | १.८७ |
| अनुदान | १६,०९५ | १,६०९.५० | ५ | ०.५० |
| मुदत कर्ज | ९५६ | ९२४.२६ | ५ | ३.१५ |
| सूक्ष्म वित्तपुरवठा | ८ | १.७० | ० | ०.०० |
| महिला समृद्धी | ३,४२१ | १,३६७.०० | ० | ०.०० |
| शैक्षणिक कर्ज | ३ | ४.६६ | १ | ६.५० |

*आधार* : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित + डिसेंबरपर्यंत

## महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादित

१०.९१ अनुसूचित जाती आणि नवबौध्दांच्या आर्थिक विकासासाठी राज्य शासनाने महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाची स्थापना केली. सध्या या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ५०० कोटी आहे, तर भरणा केलेले भागभांडवल ₹ ६३२ कोटी असून, त्यात राज्य शासनाचा हिस्सा ५१ टक्के आणि उर्वरीत हिस्सा केंद्र शासनाचा आहे. हे महामंडळ राअजाविविम आणि राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ (रासकविविम)) यांची राज्याची वाहिनीकृत यंत्रणा म्हणूनही काम करते. या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.५३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५३ महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१४-१५ | | २०१५-१६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| बीज भांडवल | २,२२५ | १,०८०.२१ | १,३५५ | ७४५.२१ |
| पन्नास टक्के अनुदान | ४,४३८ | ७०२.०३ | १,९६४ | ३१३.४८ |
| राअजाविविम ची मुदत कर्ज | २ | ३.७४ | ० | ०.०० |
| राअजाविविम ची शैक्षणिक कर्ज | १४ | ११.५६ | ० | ३.११ |
| रासकविविम ची मुदत कर्ज | ४६७ | १,९५६.९४ | ८१ | ३४५.७६ |
| रासकविविम ची शैक्षणिक कर्ज | १ | १४.०७ | १ | ३.२४ |
| रासकविविम ची प्रशिक्षण | ३०० | २०.८१ | ० | ०.०० |

*आधार* : महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादित + डिसेंबरपर्यंत

## आदिवासी उपयोजना

१०.९२ राज्यातील आदिवासी लोकसंख्या ही धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, पालघर, ठाणे, रायगड, अहमदनगर व पुणे या पश्चिमेकडील डोंगरी जिल्ह्यांमध्ये (सह्याद्री प्रदेश) आणि चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, अमरावती, यवतमाळ व नांदेड या पूर्वेकडील जंगलव्याप्त जिल्ह्यांमध्ये (गोंडवाना प्रदेश) मोठ्या प्रमाणात केंद्रित झाली आहे. भारत सरकारच्या निर्देशानुसार राज्यातील आदिवासी लोकसंख्येच्या घनतेवर आधारित २९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, ४३ सुधारित क्षेत्र विकास खंड (माडा) व २४ लघु सुधारित क्षेत्र विकास खंड (मिनीमाडा) तयार करण्यात आले आहेत. आदिवासी उपयोजनेअंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, माडा क्षेत्र व मिनीमाडा क्षेत्रांमध्ये तसेच आदिवासी क्षेत्राबाहेर वास्तव्य करणाऱ्या आदिवासी समाजाला मुलभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

१०.९३ आदिवासी उपयोजनेकरिता बाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत ₹ २४,४७५ कोटी नियतव्यय निश्चित केलेला असून तो राज्याच्या एकूण नियतव्ययाच्या ८.९ टक्के आहे. सन २०१५-१६ साठी ₹ ५,१७० कोटी नियतव्यय उपलब्ध करुन दिला असून, त्यापैकी राज्यस्तरीय योजनांकरिता ₹ २,३२६ कोटी (४५ टक्के) तर जिल्हास्तरीय योजनांकरिता ₹ २,८४४ कोटी (५५ टक्के) नियतव्यय आहे. सन २०१४-१५ मध्ये आदिवासी उपयोजनेअंतर्गत एकूण ३५० योजना राबविण्यात आल्या असून, त्यातील ३२ योजना राज्य व जिल्हा या दोन्ही स्तरावरील आहेत. सन २०१५-१६ मध्ये आदिवासी उपयोजनेअंतर्गत एकूण ३११ योजना (१०५ राज्यस्तरीय, २०५ जिल्हास्तरीय व एक दोन्ही स्तरावरील) राबविण्यात येत आहेत. आदिवासी उपयोजनेअंतर्गत सन २०१५-१६ च्या खर्चात 'सामाजिक व सामुहिक सेवा' क्षेत्राचा प्रमुख (५८ टक्के) वाटा असून, त्या खालोखाल 'ग्राम विकास' (२० टक्के) आणि 'कृषि व संलग्न कार्ये' (१० टक्के) यांचा वाटा आहे. आदिवासी उपयोजनेअंतर्गत नियतव्यय व खर्च तक्ता १०.५४ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.५४ आदिवासी उपयोजनेअंतर्गत नियतव्यय व खर्च**

(₹ कोटी)

| क्षेत्र | २०१४-१५ | | | २०१५-१६+ | |
|---|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च | खर्चाची नियतव्ययाशी टक्केवारी | नियतव्यय | खर्च + |
| कृषि व संलग्न कार्ये | २९९.६९ | ३२१.६५ | १०७.३ | ३१६.७५ | १६४.७१ |
| ग्राम विकास | २११.६१ | १८९.२५ | ८९.४ | ४५७.५४ | ३२८.८० |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | २६८.०१ | १३८.१९ | ५१.६ | २१०.१२ | ४२.९८ |
| ऊर्जा | ९५.५३ | १११.६३ | ११६.९ | १३०.३२ | ४८.३५ |
| उद्योग व खनिजे | १.०७ | ०.९४ | ८७.९ | १.४५ | ०.३३ |
| वाहतूक | ५०६.४६ | ६६०.३१ | १३०.८ | ५४५.१४ | १३४.७५ |
| सामान्य आर्थिक सेवा | १७.७३ | ९.९३ | ५६.० | १७.२२ | ०.५६ |
| सामाजिक व सामुहिक सेवा | ३,४१४.७४ | २,६००.७८ | ७६.२ | ३,४९१.४६ | ९९७.६४ |
| इतर कार्यक्रम | ०.०० | ०.०० | ०.० | ०.०० | ०.०० |
| **एकूण** | **४,८१४.९२** | **४,०३२.६८** | **८३.७** | **५,१७०.००** | **१,७१८.१२** |

*आधार:* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित

१०.९४ आदिवासी समाजाच्या आर्थिक कल्याणासाठी राज्य शासनाने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना केली आहे. सध्या या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ २०० कोटी आहे, तर भरणा केलेले भागभांडवल ₹ ७७.११ कोटी असून, त्यात राज्य शासनाचा हिस्सा ५१ टक्के आणि उर्वरीत हिस्सा केंद्र शासनाचा आहे. हे महामंडळ राष्ट्रीय आदिवासी वित्त व विकास महामंडळाची (राआविविम) यांची राज्याची वाहिनीकृत यंत्रणा म्हणूनही काम करते. या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.५५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५५ शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नाव | २०१४-१५ | | २०१५-१६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी संख्या | वितरित रक्कम | लाभार्थी संख्या | वितरित रक्कम |
| मुदत कर्ज | २८९ | ५२७.३५ | २४१ | २९७.०० |
| महिला सबलीकरण योजना | २८४ | १४२ | २३५ | १०३.२६ |

*आधार* : शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित + डिसेंबर पर्यंत

## विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग आणि विशेष मागासवर्गीयांचे कल्याण

१०.९५ विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग या समाजातील लोकांच्या कल्याणासाठी शासनाने स्वतंत्र संचालनालय स्थापन केले आहे. या समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी विविध विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. सन २०१४-१५ मधील ₹ ३४५.५४ कोटी नियतव्ययाच्या तुलनेत ₹ २०९.१२ कोटी खर्च झाला. सन २०१५-१६ करीता ₹ ३४५.५४ कोटी नियतव्यय उपलब्ध केला असून डिसेंबर पर्यंत ₹ ९४.७१ कोटी खर्च झाला.

## वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित

१०.९६ विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळास राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाची (रामाविविम) राज्याची वाहिनीकृत यंत्रणा म्हणून प्राधिकृत करण्यात आले आहे. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ २०० कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ १८९.२३ कोटी आहे (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के). या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.५६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५६ वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नाव | २०१४-१५ | | २०१५-१६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| थेट कर्ज | १,०६५ | २६६.२५ | २१० | ५२.५० |
| बीज भांडवल | ५८२ | ७०८.७५ | १२८ | १५७.५० |
| मुदत कर्ज | ० | ०.०० | ५,०५० | १,०००.०० |

*आधार* : वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित + डिसेंबरपर्यंत

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित

१०.९७ राज्यातील इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ २५० कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ ८५.४६ कोटी आहे (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के). हे महामंडळ रामाविविम ची राज्यातील वाहिनीकृत यंत्रणा म्हणूनही कार्य करते. या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.५७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५७ महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नाव | २०१४-१५ | | २०१५-१६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| वीस टक्के बीज भांडवल | ४२७ | २०५.०२ | २४८ | १२३.४८ |
| थेट कर्ज | ० | ० | ३२७ | ८०.८० |
| मुदत कर्ज | ४०४ | ६००.५९ | १८६ | १८६.९१ |
| मार्जिन मनी | १९ | ३५.७७ | १२ | २२.६० |
| महिला समृद्धी | १० | २.२५ | २० | ४.७५ |
| स्वर्णिमा | ३५ | २०.७५ | १२ | ८.५० |
| शैक्षणिक कर्ज | ३९५ | १३४.४७ | ३२९ | १११.२५ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित + डिसेंबरपर्यंत

## नि:शक्त व्यक्तींचे कल्याण

१०.९८ नि:शक्त व्यक्तींच्या क्षमता ओळखणे, कौशल्य विकास, समान संधी देणे, अधिकारांचे रक्षण करून सक्षमीकरण करणे, त्याचबरोबर त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी राज्य शासनाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत. शासन सेवेत गट क व ड मधील पदावर नियुक्ती तसेच सेवांतर्गत बढतीमध्ये नि:शक्त व्यक्तींना तीन टक्के आरक्षण दिले जाते. सरकारी नोकऱ्यांमध्ये नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षेपर्यंत शिथिल करण्यात आली आहे. सन २०१४-१५ मधील ₹ ६.१२ कोटी नियतव्ययाच्या तुलनेत ₹ ४.७३ कोटी खर्च झाला. सन २०१५-१६ करीता ₹ ७.१२ कोटी नियतव्यय उपलब्ध केला असून डिसेंबर पर्यंत ₹ १.७५ कोटी खर्च झाला.

## महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित

१०.९९ नि:शक्त व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्यात महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. हे महामंडळ राष्ट्रीय अपंग वित्त व विकास महामंडळाची (राअविविम) राज्याची वाहिनीकृत यंत्रणा म्हणून कार्य करते. सध्या या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ५० कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ ४०.५२ कोटी आहे (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के). या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.५८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५८ महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१४-१५ | | २०१५-१६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| थेट कर्ज | २५१ | ५०.२० | १४८ | २९.६० |
| मुदत कर्ज | ८५६ | १,३१९.३२ | ७६५ | १,५८४.१० |

*आधार* : महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित. + डिसेंबरपर्यंत

## अल्पसंख्यांक विकास

१०.१०० राज्य शासनामार्फत अल्पसंख्याक समुदायाच्या विकासासाठी स्वतंत्र अल्पसंख्यांक विकास विभाग स्थापन करण्यात आला. बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये या विभागासाठी ₹ १,६८५ कोटी नियतव्यय निश्चित केला आहे. सन २०१४-१५ मध्ये ₹ ३६२.०५ कोटी नियतव्ययाच्या तुलनेत ₹ २५०.६२ कोटी खर्च झाला. सन २०१५-१६ करीता ₹ ३३०.०५ कोटी नियतव्यय उपलब्ध केला असून डिसेंबर पर्यंत ₹ ११०.५४ कोटी खर्च झाला.

## मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित

१०.१०१ राज्य शासनामार्फत अल्पसंख्यांकांच्या कल्याणासाठी मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. सध्या या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ` ५०० कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ ३००.६९ कोटी आहे (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के). हे महामंडळ राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळाची (राअविविम) राज्याची वाहिनीकृत यंत्रणा म्हणूनही कार्य करते. या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.५९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५९ मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१४-१५ | | २०१५-१६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| थेट कर्ज | ११,०३६ | ४,४१४.४० | २,६१० | १,०४३.६० |
| शैक्षणिक कर्ज | २,८६१ | २,०४५.०० | १,६०७ | १,२०८.०८ |
| इतर कर्ज (स्वयंसहायता बचत गट) | २६५ | ५०६.०० | १५४ | २९१.३० |
| मुदत कर्ज | ० | ०.०० | ३३७ | ३१८.५४ |

*आधार* : मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित + नोव्हेंबरपर्यंत

# सामाजिक सुरक्षेच्या महत्त्वपूर्ण योजना

१०.१०२ राज्य शासन सामाजिक सुरक्षेच्या विविध योजना राबविते. महत्त्वाच्या सामाजिक सुरक्षा योजनांचे लाभार्थी व झालेला खर्च तक्ता १०.६० मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.६० महत्वाच्या सामाजिक सुरक्षा योजनांचे लाभार्थी व झालेला खर्च**

(₹ कोटी)

| योजनेचे नांव | २०१४-१५ | | २०१५-१६+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या (लाखात) | खर्च | लाभार्थ्यांची संख्या (लाखात) | खर्च |
| संजय गांधी निराधार अनुदान | ७.८२ | ५९१.३७ | ८.५४ | ५२४.४७ |
| श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन | १८.२५ | ९८३.११ | १९.०६ | ८७५.०३ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन | १२.०३ | २८३.१४ | ११.९६ | २३२.३५ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन | ०.४४ | ९.२६ | ०.४६ | ९.४५ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन | ०.०७ | १.७२ | ०.०७ | १.५४ |
| राष्ट्रीय कुटुंब लाभ | ०.१५ | २९.८८ | ०.१३ | २५.१८ |
| आम आदमी विमा | ५३.०० | ३६.०९ | ५६.३० | ३.९८ |

*आधार:* सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

# वस्ती/क्षेत्र विकास योजना

१०.१०३ राज्य शासन वस्ती/क्षेत्र विकासाच्या विविध योजना राबविते. वस्ती/क्षेत्र विकासाबाबतच्या प्रमुख योजनांचा नियतव्यय व झालेला खर्च तक्ता १०.६१मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.६१ वस्ती/क्षेत्र विकासाबाबतच्या प्रमुख योजनांचा नियतव्यय व झालेला खर्च**

(₹ कोटी)

| योजनेचे नांव | २०१४-१५ | | २०१५-१६+ | |
|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च | नियतव्यय | खर्च |
| दलित वस्ती सुधार ++ | ६२१.५८ | ६२१.५८ | ७५३.४६ | ७५३.४६ |
| नागरी दलित वस्ती सुधार @ | ३५८.१९ | ३५८.११ | ४६७.७६ | २४८.३६ |
| नागरी आदिवासी वस्ती सुधार @ | ६.०० | ४.५० | ६.०० | ०.०० |
| ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम # | २६१.४९ | २४७.५० | २५५.७५ | ३६.२४ |
| तांडा/वस्ती सुधार ++ | २१.०० | १५.५३ | २१.०० | १.३१ |
| अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रविकास कार्यक्रम $ | १५.०० | ४.८७ | २५.०० | १.१९ |
| अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्रविकास कार्यक्रम $ | ४०.०० | १६.५६ | २५.०० | ०.०० |

*आधार* : ++ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, @ नगर विकास विभाग, # आदिवासी विकास विभाग , $ अल्पसंख्यांक विकास विभाग + डिसेंबरपर्यंत

# मानव विकास

१०.१०४ आरोग्यदायी दिर्घायुष्य, ज्ञान आणि दर्जेदार राहणीमानाकरिता आवश्यक संसाधने वापरण्याची मुभा या तीन परिमाणांचा मानव विकासात विचार केला जातो. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (युएनडीपी) या कार्यालयाने डिसेंबर, २०१५ मध्ये मानव विकास अहवाल २०१५ प्रकाशित केला. या अहवालानुसार मानव विकास निर्देशांक (माविनि) ०.९४४ सह नॉर्वे पहिल्या क्रमांकावर आहे, तर भारत माविनि ०.६०९ सह १३० व्या क्रमांकावर आहे. भारत मानव विकास अहवाल २०११ नुसार केरळ (माविनि ०.७९०) देशात प्रथम क्रमांकावर असून, त्यापाठोपाठ दिल्ली (माविनि ०.७५०), हिमाचल प्रदेश (माविनि ०.६५२), गोवा (माविनि ०.६१७), पंजाब (माविनि ०.६०५) व महाराष्ट्र (माविनि ०.५७२) ही राज्ये आहेत. महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०१२ नुसार एकूण ३४ जिल्ह्यांपैकी नऊ अति उच्च विकसित (माविनि ०.७४२ आणि त्यापेक्षा जास्त), आठ उच्च विकसित(माविनि ०.७२० ते ०.७४२), आठ मध्यम विकसित (माविनि ०.६७८ ते ०.७१८) व नऊ जिल्हे अल्प विकसित (माविनि ०.६७१ व त्यापेक्षा कमी) आहेत. महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०१२ नुसार जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांक २०११ परिशिष्ट १०.१५ मध्ये दिले आहेत.

## महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम

१०.१०५ राज्यातील अतिमागास १२५ तालुक्यांमध्ये आणि सर्व ‘क’ वर्ग नगरपालिकांमध्ये महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम राबविण्याकरिता सन २०१४-१५ मध्ये ₹ १५६.२५ कोटी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली होती आणि ₹ १२८.६७ कोटी खर्च झाला, तर २०१५-१६ करीता ₹ १९२ कोटी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली असून डिसेंबर,२०१५ पर्यंत ₹ १०५.१४ कोटी खर्च झाला.

## तालुका विशिष्ट योजना

१०.१०६ तालुक्यांची सामाजिक - आर्थिक व भौगोलिक स्थिती आणि स्थानिक गरजा यांचा विचार करुन तालुका विशिष्ट योजना राबविण्यात येतात. सन २०१४-१५ मध्ये शिक्षण विषयक १७, आरोग्य विषयक १४ आणि उत्पन्न विषयक सात तालुका विशिष्ट योजना मंजूर करण्यात आल्या. यापैकी शिक्षण विषयक चार, आरोग्य विषयक पाच व उत्पन्न विषयक दोन योजनांची कामे पूर्ण झाली असून डिसेंबर, २०१५ पर्यंत झालेला खर्च अनुक्रमे ₹ २.५३ कोटी, ₹ १.६७ कोटी व ₹ ३.७० कोटी होता. सन २०१५-१६ मध्ये ₹ ०.७२ कोटीच्या शिक्षण विषयक एका योजनेस प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.

१०.१०७ महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत राबविण्यात येणा-या योजनांची भौतिक प्रगती तक्ता १०.६२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६२ महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत राबविण्यात येणा-या योजनांची भौतिक प्रगती**

| योजना | लाभार्थ्याचा प्रकार | भौतिक प्रगती | |
|---|---|---|---|
| | | २०१४-१५ | २०१५-१६+ |
| **अ) शिक्षण** | | | |
| माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये अभ्यासिका - मंजूर अभ्यासिकांची संख्या २,८८९ | लाभ घेतलेले विद्यार्थी | १,६७,६१५ | १,३४,५४६ |
| ग्रामीण भागातील मुलींना मोफत बस सेवा (६२५ बसेस उपलब्ध) | | | |
| ➢ प्रति तालुका नियमित ५ बसेस (प्रति वर्ष प्रति बस ₹ ७.०४ लाख राज्य परिवहन महामंडळास अदा करण्यात येतात.) | लाभ घेत असलेल्या मुली | ७६,३९६ | ७९,३४९ |
| ➢ प्रति तालुका २ अतिरिक्त बसेस याप्रमाणे १२२ तालुक्यांमध्ये (₹ २० लाख प्रति वर्ष प्रति बस राज्य परिवहन महामंडळास अदा करण्यात आले आहेत.) | लाभ घेत असलेल्या मुली | लागू नाही | २१,२०५ |
| बालभवन विज्ञान केंद्र स्थापन करणे (१२३ केंद्रे) | भेट दिलेले विद्यार्थी | २,५७,०६४ | १,३८,७७२ |
| कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजनेची व्याप्ती इयत्ता १० वी पर्यंत वाढविणे (३२ शाळांना प्रशासकीय मान्यता) | शिकत असलेल्या मुली | १,८०३ | १,८९० |
| इयत्ता आठवी ते बारावी मध्ये शिक्षण घेत असलेल्या व शाळेपासून ५ किमी अंतरावर राहणाऱ्या गरजू मुलींना सायकलींचे वाटप करणे | सायकल वितरित केलेल्या मुली | २१,७६० (२३,२४१ निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी) | १७,४३७ लाभार्थी (वाटपाची प्रक्रिया सुरु) |
| अंगणवाड्यांचे बांधकाम (मान्यता देण्यात आलेल्या ८६७ पैकी ५७६ बिगर आदिवासी आणि २९१ आदिवासी भागात) | - | २३६ (बांधकामे पूर्ण) | २१४ (बांधकामे पूर्ण) |
| **ब) आरोग्य** | | | |
| गर्भवती महिला, स्तनदा माता तसेच ० ते ६ महिने वयोगटातील बालकांकरिता आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे | महिला व बालके | ६,३१,६५८ (६,५४९ शिबिरे) | १,४९,५०१ (१,७४६ शिबिरे) |
| किशोरवयीन मुलींना आरोग्यविषयक बाबींचे प्रेरिकांद्वारे प्रशिक्षण | किशोरवयीन मुली | २,८५,५४१ ( ५,५९३ प्रेरिका) | १,३८,९०६ (५,३४५ प्रेरिका) |
| अजा / अज / दारिद्र्यरेषेखालील गर्भवती महिलांना बुडीत मजूरी देणे | लाभार्थी महिला | १,०७,८५४ | ३४,३४५ |
| आरोग्य उपकेंद्रांचे बांधकाम (३० उपकेंद्रांना मान्यता ) | - | - | १ (बांधकाम पूर्ण) |
| **क) उत्पन्न** | | | |
| फिरती माती परिक्षण प्रयोगशाळा (३३ प्रयोगशाळा) | - | २४,८६७ (मातीचे तपासलेले नमुने) | २३,१०३ (मातीचे तपासलेले नमुने) |

*आधार* : महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

## सहस्त्रकातील विकास उद्दिष्टे

१०.१०८ सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार यांनी फेब्रुवारी, २०१५ मध्ये भारत देशाचा सहस्त्रकातील विकास उद्दिष्टांबाबतचा अहवाल २०१५ प्रकाशित केला असून यात उद्दिष्टांच्या तुलनेत देशाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला आहे. राज्यातील सहस्त्रकातील विकास उद्दिष्टांबाबतच्या निर्देशकांची लक्ष्ये व अपेक्षित साध्ये तक्ता १०.६३ मध्ये देण्यात आली आहेत.

**तक्ता १०.६३ राज्यासाठी सहस्त्रकातील विकास उद्दिष्टांबाबतच्या निर्देशकांची लक्ष्ये व अपेक्षित साध्ये**

| निर्देशक | लक्ष्य २०१५ | अपेक्षित साध्य २०१५ |
|---|---|---|
| दारिद्र्याचे अंदाज[$] (टक्के) | २५.४ | १६.४ |
| अपु-या वजनाची मुले (< ३ वर्षे) (टक्के) | २६.१ | २५.४ |
| निव्वळ पटसंख्येचे प्रमाण (प्राथमिक) | १००.० | ८६.४ |
| पाच वर्षाखालील मृत्यू दर | २५.० | २५.२ |
| अर्भक मृत्यू दर | १९.३ | २२.८ |
| गोवर लसीकरण केलेल्या एक वर्षाच्या मुलांची टक्केवारी (१२-२३ महिने) | १००.० | ९६.० |
| माता मृत्यू प्रमाण (प्रति १,००,००० जीवित जन्मामागे मृत्यू) | ५८.६ | ६४.५ |

आधार : भारत देशाचा सहस्त्रकातील विकास उद्दिष्टांबाबतचा अहवाल २०१५ टिप : $ तेंडुलकर पध्दती वापरून तयार करण्यात आलेले दारिद्र्याचे अंदाज

* * * * *

## परिशिष्ट १०.१

## सन २०१३-१४ करिता राज्यनिहाय, उपविभागनिहाय निर्देशांक व संयुक्त शिक्षण विकास निर्देशांक
## सर्व शाळा : सर्व व्यवस्थापन

| अ. क्र. | राज्य / केंद्रशासित प्रदेश | उपलब्धता निर्देशांक | | पायाभूत सुविधा निर्देशांक | | शिक्षक निर्देशांक | | फलित निर्देशांक | | संयुक्त प्राथमिक व उच्च प्राथमिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राथमिक स्तर | उच्च प्राथमिक स्तर | प्राथमिक स्तर | उच्च प्राथमिक स्तर | प्राथमिक स्तर | उच्च प्राथमिक स्तर | प्राथमिक स्तर | उच्च प्राथमिक स्तर | शिविनि | श्रेणी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १ | अंदमान व निकोबार | ०.२५ | ०.२३ | ०.७४ | ०.६८ | ०.८५ | ०.९६ | ०.७४ | ०.६९ | ०.६६८ | १२ |
| २ | आंध्र प्रदेश | ०.२६ | ०.२८ | ०.५७ | ०.६० | ०.६७ | ०.८१ | ०.७८ | ०.७५ | ०.६०३ | १९ |
| ३ | अरुणाचल प्रदेश | ०.४३ | ०.३७ | ०.५० | ०.६६ | ०.३३ | ०.६५ | ०.६५ | ०.८० | ०.५४८ | २८ |
| ४ | आसाम | ०.३८ | ०.२२ | ०.५२ | ०.४१ | ०.३५ | ०.६४ | ०.८२ | ०.७८ | ०.५२४ | ३० |
| ५ | बिहार | ०.१९ | ०.२६ | ०.५२ | ०.६५ | ०.४२ | ०.६१ | ०.६९ | ०.६१ | ०.४९१ | ३४ |
| ६ | चंदिगड | ०.२० | ०.५० | ०.६९ | ०.६६ | ०.९८ | ०.९९ | ०.४४ | ०.६८ | ०.६८० | ११ |
| ७ | छत्तीसगड | ०.३१ | ०.३२ | ०.७६ | ०.७६ | ०.४६ | ०.४७ | ०.८१ | ०.७६ | ०.५७१ | २६ |
| ८ | दादरा व नगर हवेली | ०.२३ | ०.२५ | ०.७३ | ०.७४ | ०.६९ | ०.७९ | ०.५२ | ०.७३ | ०.६०६ | १८ |
| ९ | दमण व दिव | ०.१४ | ०.३५ | ०.८३ | ०.८५ | ०.८४ | ०.८९ | ०.४४ | ०.६० | ०.६४२ | १५ |
| १० | दिल्ली | ०.५२ | ०.५८ | ०.७२ | ०.६७ | ०.८४ | ०.९५ | ०.५० | ०.६६ | ०.७०५ | ६ |
| ११ | गोवा | ०.२५ | ०.२१ | ०.७२ | ०.५५ | ०.७६ | ०.८६ | ०.५० | ०.६८ | ०.६०१ | २० |
| १२ | गुजरात | ०.१५ | ०.३४ | ०.८८ | ०.९३ | ०.८६ | ०.९० | ०.७२ | ०.६८ | ०.६९६ | ८ |
| १३ | हरियाणा | ०.१५ | ०.३४ | ०.८१ | ०.८० | ०.७२ | ०.७९ | ०.७१ | ०.७३ | ०.६४६ | १४ |
| १४ | हिमाचल प्रदेश | ०.४८ | ०.४४ | ०.९० | ०.८५ | ०.६८ | ०.७९ | ०.७७ | ०.७४ | ०.७१४ | ४ |
| १५ | जम्मू व काश्मीर | ०.४० | ०.४० | ०.५८ | ०.६८ | ०.५४ | ०.७६ | ०.६१ | ०.५७ | ०.५७० | २७ |
| १६ | झारखंड | ०.२९ | ०.२८ | ०.६५ | ०.६७ | ०.३५ | ०.४९ | ०.७८ | ०.६० | ०.५०५ | ३३ |
| १७ | कर्नाटक | ०.२६ | ०.३५ | ०.९१ | ०.९३ | ०.७८ | ०.८८ | ०.८२ | ०.६९ | ०.७१० | ५ |
| १८ | केरळ | ०.१४ | ०.२७ | ०.८७ | ०.८२ | ०.९७ | ०.९५ | ०.५८ | ०.७२ | ०.६९६ | ९ |
| १९ | लक्षद्विप | ०.२६ | ०.४६ | ०.८६ | ०.७८ | ०.९९ | ०.९३ | ०.६४ | ०.७७ | ०.७४१ | २ |
| २० | मध्य प्रदेश | ०.३० | ०.३२ | ०.७८ | ०.७५ | ०.४३ | ०.२४ | ०.७४ | ०.७१ | ०.५१९ | ३१ |
| २१ | महाराष्ट्र | ०.१८ | ०.२७ | ०.८८ | ०.८३ | ०.६८ | ०.८० | ०.७४ | ०.७३ | ०.६५० | १३ |
| २२ | मणिपूर | ०.३६ | ०.३४ | ०.७१ | ०.६९ | ०.६० | ०.८२ | ०.६८ | ०.७२ | ०.६२८ | १७ |
